म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.
REFBK-0003674

.अ. सं. ठाण
य इतिहास
नं. २११

रांत.

२११
२-२-२८

# क्रमवंत घराण्याचा

# इतिहास.

REFBK-0003674

लेखक-

ग. दा. टिल्लू एम्. ए.

सं. इ. २८२

हें पुस्तक ग्रंथकर्त्यानें मोठ्या आदरानें " मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें " या संस्थेस अर्पण केलें असे.

आपला-
वि. रा. टिळू.

मुंबई
१८-१२-२८

सं. इ. २८२
२-१-२८

क्र. ३६७४

नं. ६. २६२

अष्टागरांतील

# क्रमवंत घराण्याचा इतिहास.

लेखक—

गणेश दामोदर टिल्लू एम्. ए.

मुद्रक—कॉ. ए. सो. प्रिंटिंग वर्क्स, अलिबाग.

प्रकाशक—ग. दा. टिल्लू एम्. ए. पेठ रामनाथ, अलिबाग.

सन १९२८

किंमत २ रुपये

# प्रास्ताविक दोन शब्द.

अष्टागरांतील क्रमवंत घराण्यावरील ग्रामण्याचा इतिहास आजपर्यंत विशेष उपलब्ध नव्हता तो आह्मीं संकलित करून प्रस्तुत पुस्तकांत देण्याचा प्रयत्न केला आहे. आजच्या ब्राह्मणसंघटनेच्या आणि पोटजातींतील एकीकरणाच्या काळांत या माहितीची किती अवश्यकता आहे हें सांगणें नकोच. सुमारें दोनशें वर्षापूर्वी ज्या वेळेस देशस्थ, कोंकणस्थ, व कऱ्हाडे या तीन ब्राह्मण जातींमध्यें अंतर्जातीय विवाह विशेष रूढ नव्हते, तेव्हां क्रमवंतांच्या मध्यवर्ती दुव्यामुळें या तीनही जातींच्या एकीकरणाचा प्रयत्न अष्टागरामध्यें झाला. व अशा रीतीनें ज्या गोष्टी अकोला ब्राह्मण परिषदांसारख्या सभा करून हल्लींच्या काळीं घडाव्या ह्मणून ठराव केले जातात, त्याच गोष्टी क्रमवंतांच्याद्वारें दोनशें वर्षांपूर्वी अष्टागरांत झाल्या, यावरून या बाबतींतील सामाजिक सुधारणेच्या अग्रपूजेचा मान क्रमवंतांकडेच जातो हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

पुढें छापलेल्या मूळ कागदपत्रामध्यें कांहीं ठिकाणीं "क्रमवंत" व कांहीं ठिकाणीं त्याचें अपभ्रष्टरूप "करवंत" असे शब्द वापरले आहेत. पण या शब्दभेदामुळें वाचकांचा गैरसमज किंवा मनाचा घोटाळा होऊं नये म्हणून सर्व ठिकाणीं आम्हीं क्रमवंत हाच शब्द कायम ठेवला आहे. त्याचप्रमाणें मूळांतील ऱ्हस्व दीर्घांच्या चुका दुरुस्त करून हल्लींच्या काळीं चटकन समजेल अशा स्वरूपांत छापले आहेत. पण कागदछपाईचें बहुतेक काम मुंबईस झालें असल्यामुळें मूळांतील कित्येक चुका तशाच राहून गेल्या आहेत या बद्दल दिलगिरी वाटते.

या पुस्तकाच्या बाबतींत कित्येकांनीं स्वार्थनिरपेक्ष साह्य केलें या बद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होणार आहेत. या प्रकरणांतील बहुतेक कागदपत्र कै. वे. शा. सं. बाळकृष्ण विनायक टिल्लू व कै. बाळकृष्ण विश्वनाथ टिल्लू उर्फ बाबासाहेब रुर्वेअर यांच्या दप्तरांत नीट ठेविलेले आहेत. त्यांनीं व त्यांच्या पुत्रांनीं अस्सल बरहुकूम नकला घेण्याची परवानगी दिली याबद्दल आमच्या प्रमाणें रुर्वे क्रमवंत ज्ञातीनें त्यांचे आभार मानणें वाजवी आहे. या कागदपत्रांच्या नकला घेण्याचें कष्टसाध्य व जिकिरीचें काम रुंवर्स्चे रा. विष्णुपंत टिल्लू यांनीं आपली पोटांतील त्रासदायक नोकरी संभाळून केवळ ज्ञातीच्या हितार्थ केली, व फावल्या वेळांत जरूर ती माहिती जमा केली यामुळें या ग्रंथाचें सर्व श्रेय त्यांच्याकडेच आहे हें

सांगणें नकोच. या पुस्तकाचा आराखडा आरंभीं कै. केशवराव आचार्य, मु. ठाणें, यांनीं तयार केला होता. अपुऱ्या माहितीमुळें तो जरी अपूर्ण होता तरी प्रस्तुत पुस्तकांतील क्रमवंत घराण्याचा संगतवार इतिहास लिहिण्यास त्यामुळें आह्मांस फार मदत झाली. त्याचप्रमाणें मुंबईचे रा. जनार्दन गोविंद उर्फ बाबूराव पाटील यांनींही शरीर संबंधाच्या यादी तयार करणें वगैरे बाबतींत मदत केली आहे. तसेंच रा. दा. अ. पुराणिक यांनीं कागदपत्रांची मुद्रितें तपासण्याची कामगिरी केल्याबद्दल त्यांचेही आभार मानणें योग्य आहे. अशा रीतीनें या ग्रंथप्रकाशनाचें सर्व श्रेय वरील सर्व गृहस्थांमध्यें वाटून देणें योग्य आहे.

त्याचप्रमाणें मुंबईच्या ऐक्योत्तेजक मंडळीनें या पुस्तकाचें महत्व व आवश्यकता लक्षांत घेऊन मोठ्या उदार मनानें ग्रंथप्रकाशकास मदत ह्मणून शंभर रुपये दिले याबद्दल आम्ही मंडळीचे फार आभारी आहों. सदर संस्थेनें जर मदत केली नसती तर हें पुस्तक एवढ्या लवकर छापून झालें असतें कीं नाहीं याची शंकाच आहे. ह्मणून आह्मांप्रमाणेंच वाचकवर्गानेंही वरील संस्थेचे आभार मानणें जरूर आहे. हा संकलित इतिहास अलिबाग येथें निघणाऱ्या "कोंकण" वर्तमानपत्रांत प्रथम खंडशः प्रसिद्ध झाला याबद्दल कोंकणच्या संपादकांचेही आह्मी आभारी आहों.

या आमच्या अल्पकृतीमुळें क्रमवंतांबद्दलचा गैरसमज नाहींसा होऊन ब्राह्मणसंघटनास मदत झाली तर आमच्या श्रमाचा मोबदला आम्हांस पूर्णपणें मिळाला असें मानावयास हरकत नाहीं.

पेठ रामनाथ, अलिबाग. }
ता. ३१।३।२८ }

ग. दा. टिळक.

# अगरांतील

# क्रमवंत घराण्याचा इतिहास.

३६७४

---○××○---

हिंदू समाज चातुर्वर्ण्यव्यवस्थेवर उभारलेला असल्यामुळें आपल्या समाजांत जातिसंस्थेचें विशेष महत्व असल्यास नवल नाहीं. हिंदूंची सर्व सामाजिक उभारणी जातिव्यवस्थेवर झाली आहे; व आपल्या स्मृतिशास्त्रांतही जातिव्यवस्था गृहीत धरूनच प्रत्येक मनुष्याला कर्तव्यकर्मे लावून दिलीं आहेत. हिंदू समाज व जातिसंस्था हीं समव्याप्त असल्यामुळें जाति मोडूं पहाणें किंवा त्या सर्वांचें एकीकरण करूं पहाणें ह्मणजे हिंदुधर्मावर घातक हल्ला चढविण्यासारखें होय असें कित्येकांना वाटतें, याचें कारण वर दाखविलेला समवायसंबंध होय. पण कांहीं संशोधक म्हणतात त्याप्रमाणें पूर्वी एकच वर्ण किंवा एकच जात असो; किंवा भगवंतांनीं गीतेंत म्हटल्याप्रमाणें सृष्टीच्या आरंभापासूनच चातुर्वर्ण्यव्यवस्था असो; आज ही गोष्ट मात्र खरी कीं चार जातींच्या चार हजार जाती बनून हिंदुस्थानदेश जातीजातींच्या झगड्यानें फार खिळखिळा झाला आहे. कोणत्याही कार्याला सामुदायिक शक्तीची जरूर असते, पण आज राष्ट्रकार्य अमर्याद स्वरूपांत आपल्या पुढें उभें असतां जातीजातींतील वैमनस्यामुळें आपणांस एकदिलानें काम करणें अशक्यप्राय झालें आहे. ब्राम्हणब्राम्हणेतर वादासारखें भारतवर्षाच्या मर्मस्थळावर आघात करणारे निरर्थक वाद उपस्थित झाले असून हिंदुसमाजानें त्याला तोंड देणें भाग आहे. स्पृश्यास्पृश्यतेचा विकट प्रश्न असाच भेसूर रूपानें हिंदुसमाजाला भेडसावीत आहे. हिंदूमुसलमानांतील परस्पर बेदिलीमुळें रक्ताचे पाट वाहाविणारे दंगे नित्यशः आपल्यांना ऐकूं येत आहेत. ख्रिस्ती मिशनरी लोक व मुसलमान मौलवीमुल्ला धर्मप्रसाराचें तट्टू बेसुमार दामटून हिंदूधर्मावर सर्व बाजूनीं हल्ला चढवीत आहेत. अशा स्थितींत हिंदूसमाजानें आत्मनिरीक्षण करून समाजाच्या स्थिरीकरणाचा प्रयत्न जोरानें करावयास नको काय? भिन्न संस्कृतीच्या झगड्यामध्यें हिंदू समाज नामोहरम होऊन दुर्बल होऊं नये, व आजपर्यंत निरनिराळ्या वावटळींतून जिवंत राहिलेली आपली संस्कृति उध्वस्त होऊन जाऊं नये, ह्मणून समाजधुरीणानीं आटोकाट प्रयत्न करावयास नको काय? जातिव्यवस्थेमध्यें विषमतेचें व कलहाचें बीज जन्मतःच विद्यमान असल्यामुळें समाजाचे वेगवेगळे घटक कारणपरत्वें एकमेकांवर आदळून हिंदू समाज बराच खिळखिळा झाला आहे. जातीमुळें ठिकठिकाणां

तिडलेल्या या दुर्बल समाजाला ख्रिस्ती व मुसलमान समाजांसारख्या सुसंघटित समाजांशीं टक्कर द्यावयाची असल्यामुळें समाजाच्या एकीकरणाचा प्रयत्न प्रत्येकानें करणें जरूर आहे.

ब्राह्मण हा हिंदू समाजाचा केंद्र असून, त्याच्या अस्तित्वावर चातुर्वर्ण्य व्यवस्था अवलंबून आहे. " वर्णानां ब्राह्मणो गुरुः " म्हणून स्मृतिकारांनीं त्याची महती गाइली असून, आर्यसंस्कृतीचा संरक्षक व हिंदू समाजाचें मुख म्हणून त्याचा गौरव केला जातो. पण या उच्च पदवीबरोबर समाजाचा आदर्श, व नेता या दृष्टीनें त्याच्यावर जबाबदारीही मोठीच पडते. ही जबाबदारी नीट ओळखून त्यानें तदनुसार वर्तन न ठेवल्यास हिंदू समाजाचा घात करण्याचें पातक इतरांपेक्षां त्याच्या डोक्यावर जास्त लादलें जाईल. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, ब्राह्मण समाजाला या मोठ्या जबाबदारीची अद्यापि तीव्रतम जाणीव झाली नसून कित्येक लोक पूर्वपरंपरागत खोट्या समजुती, दुरभिमान, आग्रही हट्ट व कांहीं बाबतींत औदासीन्य यांनाच उराशीं बाळगून स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेत आहेत. आज हिंदू समाजाची विस्कटलेली घडी पुनः व्यवस्थित बसविण्याचें काम इतरांपेक्षां ब्राह्मणांनींच मोठ्या उत्साहानें करावयास नको काय ? आज जातिभेदामुळें हिंदू समाजाचे तळहाताएवढे अनेक तुकडे पडले आहेत; व त्यामुळें त्याचें अंतःसामर्थ्य व प्रतिकारक्षमता नाहींशी होऊन, परधर्मीयांनी त्याचे लचके तोडावयास सुरवात केली आहे. अशा स्थितींत जातींच्या एकीकरणाच्या प्रयत्नांत स्वतःला पुढारलेले म्हणविणाऱ्या ब्राह्मणांनींच पुढाकार घ्यावयास नको काय ?

पण आज ब्राह्मणांचीच काय दुस्थिति झाली आहे पहा ! यजनयाजनादि षट्कर्मांचे अधिकारी म्हणून सर्व ब्राह्मण एकरूप असावयास पाहिजेत. पण आज हिंदुस्थानांत ब्राह्मणांच्या चारशेपेक्षां जास्त जाती आहेत त्यांतहि कित्येक पोटजातींत भोजनप्रतिभोजनाचा साधा व्यवहारही बंद आहे, मग शरीरसंबंधाची गोष्ट बाजूलाच राहिली! हे सर्व भेद कृत्रिम व शास्त्रानें मान्य न केलेले असल्यामुळें ते नाहींसे होणें इष्ट आहे. त्यापैकीं कित्येक भेद इतके क्षुल्लक व हास्यास्पद आहेत कीं, स्वतंत्र जातीचें गमक या मोठ्या पदवीला ते कसे पात्र झाले तें समजणें शक्य नाहीं. आचार भेद, प्रादेशिक भेद, उपास्य भेद, व्यवसाय भेद, इत्यादि प्रकारांवरून जाति एकमेकांपासून विलग पडल्या. व पुढें वृत्तीच्या लोभामुळें म्हणा, किंवा कांहीं क्षुद्र अपराधामुळें म्हणा, जातींमध्यें ग्रामण्यें माजून जातिभेद दृढमूल झाले. भिक्षुकी अट्टहासामुळें व गृहस्थ लोकांच्या आग्रही स्वभावामुळें जीं ग्रामण्यें प्रथम उपस्थित झालीं, त्यांचें यथाविधि निराकरण झालें असतां अद्याप त्यांचे अनर्थावह परिणाम शिल्लक राहिले आहेत; व तेच आज

अनेक जातींच्या बजबजपुरीच्या रूपानें हिंदुस्थानाच्या बोकांडीं बसले आहेत. जर त्या वेळच्या ब्राम्हणांनीं व्यापक दृष्टीनें समाजाच्या प्रगतीचें निरीक्षण केलें असतें, तर ग्रामण्यासारख्या आत्यंतिक शस्त्राचा उपयोग करण्यापूर्वीं त्यांनीं अनेकवार विचार केला असता. पण दृष्टि आग्रही बनल्यानंतर सदसद्विवेकबुद्धि बोथट होऊन जाते हा नेहमींचा अनुभव आहे. त्यामुळें भिक्षुकांनीं, व त्यांच्या दुर्मंत्राला बळी पडलेल्या गृहस्थांनीं हिंदू समाजाचें अपरिमित नुकसान केलें आहे. गेल्या पांचशें वर्षांतील ग्रामण्यांच्या इतिहासाकडे वरवर पाहिलें असतां आमच्या म्हणण्याची सत्यता कोणालाही पटेल. गोवर्धन ब्राम्हण, सारस्वत ब्राम्हण, शुक्लयजुर्वेदीय ब्राम्हण, इत्यादि ब्राह्मणांना ग्रामण्याची झळ कशी लागली, व पेशव्यांच्या ब्राम्हणशाही राज्यांत ब्राह्मणांच्या ग्रामण्याबरोबरच प्रभु, दैवज्ञ वगैरे इतर जातींच्या ग्रामण्यांना कसा ऊत आला होता,व त्याचे दुर्धर परिणाम पेशवाईला कसे भोंवले, या गोष्टी इतिहासकालीन असल्यामुळें त्यांच्याबद्दल येथें लिहिण्याचें कारण नाहीं.

ग्रामण्य हें ब्रम्हवृंदाजवळ फार अमोघ शस्त्र आहे. पण या शस्त्राचा उपयोग फार जपून केला पाहिजे. नाहींतर कित्येक उपद्व्यापी व स्वार्थपरायण लोकांच्या हातांत हें कोलीत मिळाल्यानें आपले घातकी हेतू तडीस न्यावयास त्यांना समाजाचें सर्व मुलुखमैदान मोकळें मिळण्याचा संभव आहे. आजपर्यंतचा ग्रामण्यांचा इतिहास हीच गोष्ट स्पष्टपणें सांगतो. वरवर दाखवावयास हेतू मात्र ब्राह्मण जात शुद्ध राखण्याचा, पण अंतर्यामीं सुप्रतिष्ठित ब्राह्मणसमूहाच्या वृत्त्यंशावर लोभी नजर ठेऊन त्यांच्यावर भलताच आरोप आणलेला असावयाचा! असला स्वार्थी हेतू परिणामीं यशस्वी होत नाहीं ही गोष्ट खरी. पण त्यामुळें एकजिनसी जात दुभंगली जाऊन तिच्या पुढें पोटजाती पडत गेल्या, व परस्परांबद्दल जी तेढ एकदां मनांत बसली ती मात्र कायम राहिली मग ग्रामण्यानें ब्राम्हण्याचें संरक्षण झालें कीं विदारण झालें याचा सुज्ञ वाचकांनींच विचार करावा. आज हिंदुस्थानांत ब्राम्हणांमध्यें ज्या शेंकडों जाती आहते त्याच्या बुडाशीं ग्रामण्यमूलक स्वतःच्या शुद्धतेची घमेंड हीच दिसून येते.

कोणी आक्षेप काढील, "मग आतां या गोष्टींची चर्चा करण्यांत काय अर्थ आहे? ब्राह्मणांमधल्या परस्परवैमनस्याच्या शिळ्या कढीला ऊत देऊन पुनः पूर्वींचीं भांडणें उकरून काढण्यांत काय स्वारस्य आहे, असा प्रश्न साहाजिक निघतो. आजचा काल एकीकरणाचा, संघटणाचा आहे. परकीयांशीं झगडतानां आपलें शक्तिसर्वस्व एकवटलें पाहिजे. जर आपआपसांत दुही उत्पन्न झाली तर ब्राह्मणांचें अंतःसामर्थ त्या अंशानें कमी होऊन ब्राह्मण समाज दुबळा होईल. म्हणून राष्ट्रीयत्वाची उदात्त भावना डोळ्यापुढें

ठेऊन परस्परांतील भेद विसरावयास आपण शिकलें पाहिजे. " हा युक्तिवाद दिसावयास ठीक दिसतो. पण ब्राह्मणांच्या संघटनेचा विचार करण्यापूर्वीं त्यांच्यामध्यें जाति कशा पडल्या, आज विद्यमान ब्राम्हणजाति कोणत्या आहेत, ब्राम्हण्याच्या सरहद्दीवर कोणत्या जाति मुमूर्षु अवस्थेत पडल्या आहेत, इत्यादि बाबींची सांगोपांग चर्चा होणें जरुर आहे. शिवाय या बाबींची चर्चा करणें म्हणजे द्वेष वाढविणें नव्हे, तर आजपर्यंत एखाद्या ब्रम्हसमूहाबद्दल जे ज्ञाताज्ञात दोष घडले असतील त्यांचें निराकरण करुन, व त्याच्या बद्दलच्या गैरसमजाला तिलांजळी देऊन ब्राह्मण्याच्या गोटांमध्यें त्यांनां सबहुमान घेणें होय. ब्राह्मणांच्या जातिपोटजातींबद्दल आजपर्यंत पुष्कळ लेखकांनीं यथाशक्ति माहिती जमा करुन लेख लिहिले, त्या वरून उत्तर प्रत्युत्तरें होऊन अज्ञात अशी पुष्कळशी माहिती प्रकाशांत आली आहे. आज ब्राह्मणब्राम्हणेतर वादामुळें म्हणा, किंवा हिंदुसंघटनेचा एक भाग या दृष्टीनें म्हणा, ब्राम्हणांना आपली संघटणा करण्याची अवश्यकता भासूं लागली आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. त्यामुळें कित्येक लेखक व वेगवेगळ्या जातींतील पुढारी पुरुष आपल्या जातीची माहिती मिळविण्याचा आस्थापूर्वक प्रयत्न करीत आहेत. या दृष्टीनें महाराष्ट्र ज्ञानकोशकारांनीं जातींवर मोठाच उपकार केला आहे असें म्हटलें पाहिजे ! कारण त्यांनी वेगवेगळ्या जातींवर आणलेले आक्षेप व केलेली निराधार विधानें खोडून काढण्याच्या उद्देशानें कित्येक जातींतील पुढारी कसून प्रयत्न करीत आहेत, व स्वतःच्या जातीबद्दल माहिती मिळवून संशोधन दृष्टया पुरावा जमा करीत आहेत. त्याचप्रमाणें हिंदू धर्माचे प्रचारक ब्रह्मश्री दिवेकर शास्त्री यांनीं ब्राम्हणांच्या पोटजातींबद्दल परिश्रमपूर्वक माहिती मिळवून केसरी, महाराष्ट्र, श्रद्धानंद, प्रबोध, ब्राह्मण इत्यादि वृत्तपत्रांत व मासिकांत विद्वत्ताप्रचुर लेख लिहिले व अखिल ब्रम्हवृंदांचें लक्ष या प्रश्नाकडे आकर्षिलें. अशा रीतींनें जातीपोटजातींबद्दल संशोधनपूर्वक माहिती जमा होत असल्यामुळें, एके काळीं अष्टागरांत व पर्यायानें महाराष्ट्रांत गाजलेल्या क्रमवंत प्रकरणाबद्दल आह्मांला उपलब्ध असलेली माहिती या लहानशा पुस्तकात देण्याचें आह्मीं योजिलें आहे.

×अष्टागरामध्यें, म्हणजे कुलाबा जिल्ह्यांतील अलिबाग तालुक्यामध्यें क्रमवंत नांवाचा लहानसा ब्राह्मणसमूह आहे. पण या घराण्याबद्दल अद्यापि सुसंगत अशी

---

×पूर्वीं अलिबाग तालुक्याच्या समुद्रकिनाऱ्यावरील खालील आठ गांवांना ( व भोंवतालच्या प्रदेशाला ) अष्टागर म्हणत असत. त्यांची नांवें:– १ रेवदंडा, २ चौल, ३ नागांव, ४ अक्षी, ५ वरसोली, ६ थळ, ७ किहिम ८ आवास.

हकीकत छापण्यांत आली नाहीं. *कुलाबा गॅझेटिअर, +ठाणें गॅझोटेयर इत्यादि सरकारतर्फे प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांत जी माहिती दिली आहे ती अत्यंत त्रोटक व अपुरी असल्यामुळें बहुजनसमाजाला त्यापासून कांहीं एक फायदा होण्या–सारखा नाहीं. रा. ना. भा. पावगींचें §भारतीय साम्राज्य, डॉ. केतकरांचा ज्ञानकोश ‡ इत्यादि ठिकाणीं आलेली माहिती थोड्या फार अंशानें गैरसमज उत्पन्न करण्यासारखी आहे, रा. रा. भि. गुंजीकरांनीं सारस्वतमंडळांत दिलेली माहिती साधार दिली नसल्यामुळें त्यानें लोकांची निर्विवाद खात्री पटणें शक्य नाहीं. इंदुप्रकाशांत रा. ब. वि. के. कुंटे§ यांनीं अशीच भ्रामक माहिती देण्याचा उपक्रम केला होता. पण त्याला वेळींच आळा पडल्यामुळें तें प्रकरण लवकरच मिटलें. रा. जगन्नाथ रावजी टिल्लू यांनीं लिहिलेला "क्रमवंत" नांवाचा निबंध के. वि. गो. विजापूरकर यांनीं काढलेल्या ग्रंथमालेंत× छापला होता पण तो लोकांच्या फारसा वाचनांत नाहीं. आणि त्याला जुन्या कागदपत्रांची जोड दिली नसल्यामुळें जिज्ञासू लोकांना पुरावा मुळांत पडताळून बघण्याची संधी मिळत नाहीं. याच ग्रंथकारानें लिहिलेल्या "वनाचें उपवन" या ग्रंथांत अनुषंगानें क्रमवंतांबद्दल माहिती आली आहे. पण तो ग्रंथ केवळ स्वतःचे कुलवृत्त सांगण्यासाठींच लिहिला असल्यामुळें लोकांच्या विशेष वाचण्यांत नाहीं त्यानंतर ब्रह्मश्री दिवेकरशास्त्री यांनीं केसरी पत्रांत† क्रमवंतांबद्दल त्रोटक माहिती दिली आहे. पण त्यांतही कांहीं गैरसमज उत्पन्न करणारीं विधानें असल्यामुळें तीं पूर्णपणें साधार म्हणतां येत नाहींत. आजही क्रमवंतांबद्दल सामान्य लोकांना फारशी माहिती नसल्यामुळें कित्येक असमंजस व आततायी लोकांकडून क्रमवंत ब्राह्मणांची जाणून किंवा न जाणून आगळीक केली जाते, व क्रमवंतांनाही स्वतःबद्दल पुरेशी माहिती नसल्यामुळें त्यांना आक्षेपकांना समर्पक उत्तर देतां येत नाहीं. म्हणून जुन्या कागदपत्रांच्या आधारावर क्रमवंतांबद्दल संगतवार हकीकत बहुजनसमाजाला कळणें जसें अवश्यक आहे, तसेंच ब्राह्मणसंघटना करणाऱ्या जिज्ञासू लोकांना क्रमवं-तांवरील ग्रामण्यांची ऐतिहासिक व साधार माहिती पुराव्यानिशीं कळणें फार जरूर

---

* पुस्तक १० पान ४५ + पुस्तक १३ भाग १ पा. ७९

§ भारतीयसाम्राज्य, उत्तरार्ध, पुस्तक ८ पान ११३ भाग ४५ प्रकरण ९

‡ महाराष्ट्र ज्ञानकोश भाग ११ पान ८४६

§ इंदुप्रकाश १०-७-१९१४; १-९-१९१४; २२-१-१९१५; २०-७-१९१५

× ग्रंथमाला १९०५ † केसरी २३-७-१९२७

आहे. म्हणून आम्हांस उपलब्ध झालेली हकीगत जुन्या कागदपत्रांच्या पुराव्यासह या पुस्तकाच्या रूपानें आम्ही वाचकांपुढे सादर करीत आहों.

कोणत्याही जातीची मूळ पीठिका कालाच्या विशाल उदरांत गडप झाल्यामुळें ती पीठिका ऐतिहासिक कागदपत्रांच्या द्वारानें सिद्ध करणें फार कठीण जातें. जातीच्या मूळारंभाभोंवतीं दंतकथेचें दाट वलय असल्यामुळें, मूळपीठिका वर्णन करीत असतां, कुळपरंपरागत हकीकतीवरच विसंबून रहाणं भाग पडतें. आज बृहन्महाराष्ट्रांत कोंकणस्थ चित्पावन ब्राह्मण सर्वत्र पसरले आहेत, व त्यांच्या बुद्धिमत्तेमुळें, सामाजिक दर्जामुळें, व मोठ्या लोकसंख्येमुळें ते सर्वत्र प्रसिद्ध झाले आहेत. पण आज या जातीच्या मूळारंभाबद्दल कितीशी ऐतिहासिक माहिती उपलब्ध आहे ? * इतिहासाचार्य राजवाडे यांना चित्पावनांच्या इतिहासाची छाननी करीत असतां सह्याद्रिखंडांतील उपपत्ती-पेक्षां जास्त ऐतिहासिक पुरावा सांपडला नाहीं. वाजसनेयी ब्राह्मणांची गोष्ट तशीच. × बिंबराजानें वाजसनेय ब्राह्मणांना गंगथडीहून किंवा पैठणहून आणून त्यांची उत्तर कोंकणांत स्थापना केली, यापेक्षां जास्त जुना पुरावा आज उपलब्ध नाहीं. पण त्यांचे मूलस्थान कोणतें, व त्यांची तेथील परिस्थिति काय होती याबद्दल कांहींच माहिती मिळत नाहीं. सारांश कोणत्याही जातीच्या मूळ पीठिकेबद्दल हीच रड असणार. " नदीचें मूळ व ऋषीचें कूळ पाहूं नये, " अशी जी आपल्यांत म्हण आहे त्याचें स्वारस्य हेंच आहे. यामुळें क्रमवंतांच्या मूळपीठिकेबद्दल परंपरागत दंतकथेपेक्षां दुसरा दस्तऐवजी पुरावा आज न मिळाल्यास नवल नाहीं. पण ग्रामण्याबद्दल जे वेळोवेळीं निवाडे झाले आहेत, व संमतिपत्रें व आज्ञापत्रें झालीं आहेत, त्यांत मात्र क्रमवंतांच्या मूलस्थानाबद्दल थोडीशी माहिती मिळते.

हल्लीं अष्टागरांत क्रमवंत नांवानें संबोधिलेला ब्राम्हणसमूह ऋग्वेदी आश्वलायन शाकलशाखीय देशस्थ टिल्लू घराण्याचा विस्तार होय. यांचे मूळ पुरुष मोंगलाईंत जोगाईचे आंबें येथून आले. हा गांव सोलापूर बार्शीच्या पूर्वेस सुमारें ६० मैलावर निजामसरकारचे हद्दींत आहे, व त्याला हल्लीं मोमिनाबाद म्हणतात. क्रमवंतांची कुलदेवता † अंब्याची जोगाई किंवा जोगेश्वरी असून त्यांनीं अष्टागर प्रांतांत आल्यावर

---

* चित्पावनांची सामाजिक मूळपीठिका.........शके १८३६

× शुक्लयजुर्वेदीय ब्राह्मण-वैद्य पुरंदरे कृत पा. १९

२६९२

आपल्या मूळ ठिकाणची आठवण म्हणून ही †कुलदेवता तशीच कायम, ठेवली, इ. स. १३९६ सालच्या दुर्गादेवीच्या दुष्काळांत उदरनिर्वाहाची पंचाईत पडल्यामुळें टिल्लू घराण्याचे चार आद्य पुरुष आपल्या नशिबाची परीक्षा पहाण्यासाठीं व पोटाचें साधन शोधण्यासाठीं मूलस्थान जें जोगाइचें आंबें तेथून § निघाले. एक पुरुष पुण्यस्तंभास (पुणतांबे) वसतीस राहिला, त्याचें नांव टिल्लू. दुसरा खिरड मुक्कामीं राहिला त्याला खिरडे, खेरडे किंवा खेडकर हें नांव मिळालें. तिसरा अयाचितवृत्तीनें रहात होता, त्याला अयाचित म्हणूं लागले. आणि चौथा पुरुष अष्टागरांत आला, तो क्रमांत अध्ययन केलेला असल्यामुळें बहुमान-सूचक अशी '**क्रमवंत**' ही पदवी त्याला देण्यांत आली. पुढें त्याचा जो वेलविस्तार वाढला त्यालाही क्रमवंत हें उपनांव वापरूं लागले. यावरून अष्टागरांतील क्रमवंत हा एकाच मूळ पुरुषाचा विस्तार आहे असें सहज दिसून येईल. हें घराणें सच्छील, सदाचरणी, व्युत्पन्न व उत्तम पाठक असल्यामुळें अष्टागरांतील आंग्रे सरकारचें कुलगुरुत्व यांच्यांकडेच × होतें. "आंग्र्याचें मूळपुरुष संस्थानचे संपादक कान्होजी आंग्रे संस्थानीं आले तेव्हांपासून संस्थानचे उपाध्येपणाची वृत्ति क्रमवंत यांची त्याप्रमाणें हल्लींही चालत आलेली आहे." असें मागील वहीवाटीवरून जयसिंगराव चिमणाजी आंग्रे यांनीं लिहून दिलें आहे.¶ त्याचप्रमाणें क्रमवंतांना अष्टागरांतील जवळ जवळ २५० गांवांची उपाध्ये-पणाची वृत्ति असून आलिबाग तालुक्यांतील मुळें तर्फे खंडाळें हा गांव कृष्ण-भट्ट क्रमवंत व नारायणभट्ट क्रमवंत यांना इनाम देतांना त्यावेळचे शंभू छत्रपति यांनीं‡ "तुम्हीं बहुत थोर विद्यावंत सत्पात्र, तुमचे योगक्षेमाचे अनुकूलतेस इनाम गांव सुरक्षित चालविल्यानें स्वामीस व स्वामींच्या राज्यास बहुत श्रेयस्कर" असा

---

† चित्पावनांचे आद्यपुरुष जे चौदा ब्राम्हण यांचीं लग्नें जागाईच्या आंब्याहून चौदा मुली आणून परशुरामानें केलीं म्हणून स्त्रियांकडील कुलदेवत जोगेश्वरी हें चित्पावनांचें दैवत आहे असें कै. राजवाडे म्हणतात.

§पान ४, ८, १०, १५, १७, ५४, ६६, ६९.

×पान ४५, ७१.

¶पान ७१

‡पा. १८

त्यांचा गौरव केला आहे. क्रमवंत कुलगुरु व धर्माधिकारी असल्यामुळें आंग्र्यांच्या दरबारीं त्यांचें वरेंच वजन होतें. इतकेंच नव्हे तर त्यांच्या विद्वत्तेमुळें पेशव्यांच्या दरबारांत त्यांनां बरीच मानमान्यता मिळत असे. शिवाजीमहाराजांचें इ. स. १६७४ सालीं राज्यारोहण झालें, त्यावेळीं सुप्रसिद्ध वाराणशीकर महापंडित विश्वेश्वरभट्ट किंवा गागाभट्ट यांनीं आपले दोन प्रिय शिष्य बाळकृष्णभट्ट क्रमवंत व रघुनाथभट्ट क्रमवंत यांनां बरोबर आणले होते.‡ पुढें बाळकृष्णभट्टाच्या विवाहप्रसंगीं वाराणशी क्षेत्रांत त्यांचे सुहृत्संबंधीं नव्हते म्हणून बाळकृष्णभट्टाला आपल्या मुलाप्रमाणें समजून गागाभट्टांनीं त्याचें लग्न लाविलें. शिवाजी महाराजांच्या अभिषेक समारंभाला अष्टागराहून रघुनाथ क्रमवंत, वीरेश्वर क्रमवंत व जनार्दन क्रमवंत असे क्रमवंत घराण्यांतील ठळक पुरुष आले होते. छत्रपतींच्या दरबारांतहि वेदमूर्ति गोपाळभट्ट टिल्लू हे विद्वान पुरुष होते.अशा रीतीनें दुर्गादेवीच्या दुष्काळापासून पेशव्यांच्या कारकीर्दीपर्यंत सुमारें ३०० वर्षांच्या अवधींत क्रमवंत घराण्यांतील पुरुषांनीं आपल्या विद्वत्तेच्या* जोरावर अष्टागरांत आंग्रे सरकारचें कुलगुरुत्व मिळविलें, इतकेंच नव्हे तर राजदरबारीं त्यांचा दरारा व मानमान्यता बरीच होती.

सुमारें २५० गांवांची उपाध्येपणाची वृत्ति त्यांच्याकडेच असल्यामुळें हें घराणें सुसंपन्न व वैभवशाली झालें असल्यास नवल नाहीं. केवळ ब्राह्मणेतरांचीच उपाध्येपणाची वृत्ति त्यांच्याकडे होती असें नाहीं; तर अष्टागरांतील " ÷ ब्राह्मणांचा गर्भाधानादि सपिंडीकरणांत यत्किंचित् व्यवहार क्रमवंतांचे हस्तें चालत असे." शके १६४१ सालीं झालेल्या संमति पत्रांतही " आपण चौल प्रांत अष्टागर येथें वंशपरंपरेनें बहुकाळ राहोन सकळ ब्राह्मण यातिमात्र यांचे घरीं श्रौत स्मार्त सकळ कर्मीं उपाध्येपण व धर्माधिकरण पुराणादिक चालवून हा काळवर असों. † " असें क्रमवंतांनीं सादर केलेल्या कैफियतींत नमूद केल्याचें लिहिलें आहे. क्रमवंतांना उपाध्येपण व धर्माधिकरण यांची वृत्ति आहे, जोशीपणाची वृत्ति नाहीं. कारण अष्टागरांत वृत्तिवंत

---

‡ पान ५

* " चेऊलकर वेदमूर्ती सीतारामभट्ट पित्रकर यांनीं प्रस्तुत ग्रंथकारास ( ज. रा. टिल्लू ) ता. ९-६-१९०१ रोजीं असें कथन केलें कीं क्रमवंतमंडळी ही इतकी विद्वान् होती कीं पर्जन्यसुक्तानें भर शिमगा चैत्रांत पाऊस पाडून आंग्रेसरकारकडून तिनें चार गांवांची वृत्ति मिळविली " अशी हकीकत ज. रा. टिल्लू यांनीं वनाचें उपवन या ग्रंथांत पान ८ वर नमूद केली आहे.

÷ पान १२ † पान ९

जोशी वेगळे आहेत. त्यामुळें पूर्वी इतर ब्राह्मणांना क्रमवंतांच्याच हस्तें जरी उपाध्येपण चालवावें लागत असे तरी क्रमवंतांना प्रसंग पडल्यास स्वतांचें उपाध्येपण दुसऱ्यांना देतां येत असे. या वृत्तीची प्रसंगविशेषीं विक्री केली जात असे, व क्रमवंतांनींही अशा कांहीं वृत्ति विकत घेतल्याचीं उदाहरणें आहेत.

वर दिलेल्या माहितीवरून क्रमवंत घराणें हें एकाच मूळपुरुषापासून निघालें असून त्याचा वेलविस्तार बराच मोठा झाला होता असें दिसून येईल. खुद्द पेशवाईच्या सुरवातीला अग्रागरांत क्रमवंतांचीं सुमारें सात आठशें घराणीं झालीं होतीं व त्यामुळें दोन अडीच हजार ब्राह्मणांशीं त्यांचें शरीरसंबंध झाले होते, असें बाळाजी विश्वनाथ पेशवे यांनीं श्री. कान्होजी आंग्र्याला लिहिलेल्या एका पत्रांत म्हटलें आहे. त्यावेळीं अग्रागरांत देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे या तीनही ब्राम्हण जाती असून वे. शा. सं. अप्पाशास्त्री काका वाईकर यांना विनायक परशराम बिवलकर यांना पाठविलेल्या एका पत्रांत म्हटल्याप्रमाणें क्रमवंतांचे या तीनही जातींशीं लग्नव्यवहार झाले होते.

या तीन मुख्य महाराष्ट्रीय ब्राम्हण जातींमध्यें परस्पर शरीरसंबंध व्हावयास शास्त्रांत प्रत्यवाय नाहीं. इतकेंच नव्हे तर आधुनिक विद्वान् व श्रीजगद्गुरु शंकराचार्य यांनीं ब्राम्हणांच्या एकीकरणाच्या दृष्टीनें असले संबंध होणें इष्ट व सशास्त्र आहे असें प्रतिपादन केलें आहे. तरीही हा प्रघात सरास सुरू झाला नाहीं. अशीं बरींच उदाहरणें ब्राम्हण-समाजांत जातीच्या व्यापक दृष्टीनें रूढ झाल्याशिवाय बहुजनसमाजाच्या मनांतील शंका नाहींशी होणें शक्य नाहीं.

ब्राह्मण समाजांत असले अंतर्जातीय विवाह रूढ करण्याचा प्रयत्न पेशव्यांनीं सुद्धां केला व ते सत्ताधीश असल्यामुळें त्यांच्या प्रयत्नास थोडेंबहुत यशही आलें. खुद्द पेशव्यांनींच भिन्न जातीय बायकांशीं शरीरसंबंध करण्याचा उपक्रम केला होता." बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांस चार जातींच्या बायका होत्या. एक चित्पावन रास्ते यांची कन्या गोपिकाबाई, दुसरी कऱ्हाड्याची मुलगी, तिसरी पैठण येथील बाखर म्हणून देशस्थाची मुलगी राधाबाई, चवथी क्रमवंत ब्राह्मणाची मुलगी.× " पण ही गोष्ट पेशवे सत्ताधीश असल्यामुळें त्यांना बाधक झाली नाहीं, उलट त्यांनीं राष्ट्रसंग्राहक व

---

× लोकहितवादी कृत ऐतिहासिक गोष्टी गोष्ट ६९

ब्राह्मण्यवर्धक दृष्टि ठेवली म्हणून ज्या गोष्टीबद्दल त्यांचा गौरव केला जातो, तीच क्रमवंताना थोडीबहुत नडली असें दिसतें. आजहा ब्राह्मण जातींतील पोटभेद मोडून अंतर्जातीय विवाह घडवून आणण्यासाठीं पुढारी लोक ब्राह्मण परिषदा भरवीत आहेत, व पोटजातींत विवाह घडवून आणण्यासाठीं ठराव पास करीत आहेत. पण हल्लींच्या समाजसुधारणेच्या व उदारमतवादाच्या काळांत जी गोष्ट ब्राह्मणांसारख्या पुढारलेल्या लोकांना करणें जड जात आहे, तीच गोष्ट, तीच सामाजिक सुधारणा क्रमवंतांच्या द्वारें दोन अडीचशें वर्षांपूर्वी प्रत्यक्ष घडत असतां, त्याबद्दल ते दोषार्ह ठरावे हें दुर्दैव नव्हे काय ?

पेशव्यांच्या अमदानीच्यापूर्वी क्रमवंतांचे शरीरसंबंध अष्टागरांतील तीनही सुब्राह्मण ज्ञातींशीं झाले होते. त्यावेळच्या ब्राह्मणांनी निःशंकमनानें क्रमवंतांना आपल्या मुली दिल्या व त्यांच्या केल्या. क्रमवंतांच्या हस्तें सर्वांचे षोडश संस्कार झाले होते. अशा स्थितींत क्रमवंतांच्या सुब्राह्मण्याविषयीं कोणाच्या तरी मनांत शंका येणें शक्य आहे काय ? प्रथम ज्यावेळीं क्रमवंतांचे मूळ पुरुष अष्टागरांत आले, त्यावेळीं त्यांच्या कुलगोत्राची नीट छाननी झाल्याशिवाय त्यांच्याशीं शरीरसंबंध करावयास कोणी ब्राम्हण धजावला असेल काय ?§ त्यांना २५० गांवांच्या वृत्ति मिळाल्या, व क्रमवंताचें उपाध्येपण कित्येक पिढ्या तेथील ब्राम्हणांनीं विनतक्रार चालू दिलें, यावरून त्यांचें सुब्राम्हण्यच शाबीत होतें. ब्राह्मणांशीं रोटीबेटी व्यवहार निःशंकमनानें चालू असणें हेंच ब्राम्हण्याचें उत्कृष्ट गमक होय. निराग्रही मनुष्यास हा पुरावा पूर्णपणें संशयनिवृत्ति करावयास पुरेसा वाटेल. पण दुराग्रहानें पछाडलेल्या मनुष्याला बळकट पुरावाही काडिमोल वाटूं लागतो. त्याप्रमाणें त्यावेळच्या 'कांहीं दुराग्रही लोकांनीं असा कोटिक्रम लढविला कीं ज्या अर्थी क्रमवंत ब्राह्मण अंतर्जातीय विवाह विशेष रूढ नसूनही तिन्ही जातींशीं आपला रोटीबेटी व्यवहार ठेवित आहेत, त्या अर्थी येथ कोठें-तरी पाणी मुरत असावे. हा कोटिक्रम किती शुष्क आणि खोडसाळ आहे हें पुनः विवरण करून सांगावयास नकोच. पण हल्लींच्या काळींही रा. नारायण भवानराव पावगी सारखे विद्वान व संशोधक लेखक त्याच कोटिक्रमाचा अवलंब करून निष्कारण गैरसमज माजवितात हें पाहून मात्र नवल÷ वाटतें. अतर्जातीय विवाहावरून जातिभेद विवेक-सारामध्यें क्रमवंताबद्दल असेंच एक निरर्गल विधान ठोकून दिलें गेलें आहे.

---

§ पान १२

÷ ना. भ. पावगी कृत भारतीय साम्राज्य जातिवैचित्र्य पु. ८ "कोंकणस्थांशीं आपला शरीरसंबंध व्हावा एतदर्थ ते (क्रमवंत) मनापासून झटतात व उत्कट लालसा प्रदर्शित करतात."

तीन सुब्राम्हण जातींशीं अंतर्जातीय विवाह सररास चालू असणें हा ब्राम्हण्याबद्दल बिनतोड पुरावा क्रमवंतांजवळ असतां विरुद्ध परिस्थितींत तोच त्यांच्या गळ्यांत यावा हें मोठें दुर्दैव होय. या पुस्तकाच्या शेवटीं छापलेल्या शरीर संबंधाच्या याद्यांवरून क्रमवंतांचे शरीरसंबंध देशस्थ घराण्यांशीं प्रामुख्येंकरून, चित्पावनांशीं थोडे बहुत,व कर्‍हाड्यांशा अल्पप्रमाणांत झाले आहेत, हें दिसून येईल. म्हणून क्रमवंतांच्या ब्राह्मण्याबद्दल संशय प्रकट करणें ह्मणजे अष्टागरांतील शेंकडा ५०–६० घराण्यांच्या शुद्धतेबद्दल साशंक होण्यासारखें आहे. आह्मांला शरीर-संबंधाच्या ज्या यादी आज उपलब्ध झाल्या आहेत तेवढ्याच आह्मीं छापल्या आहेत. खरें म्हटलें तर यापेक्षां जास्त घराण्यांशीं क्रमवतांचा शरीर संबंध झालेला आहे. पण त्या याद्या तयार करणें फार कष्टसाध्य काम असल्यामुळें हातांत असलेल्या याद्यांवरच सध्यां संतोष मानून घेणें भाग आहे. असो.

क्रमवंतांचे आंग्र्यांच्या दरबारीं बरेंच वजन असल्यामुळें प्रथम त्यांच्या विरुद्ध अवाक्षर काढावयास कोणी धजला नाहीं. पण चित्पावन पेशव्यांचें राज्य चालू झाल्याबरोबर अष्टागरांतील कित्येक चित्पावन ब्राम्हणांना जोर आला. क्रमवंतांना अष्टागरांत २५० गांवांच्या उपाध्येगिरीच्या वृत्ति होत्या, व आंग्र्यांचें कुलगुरुत्व व धर्माधिकारित्व त्यांच्याकडेच असल्यामुळें क्रमवंतांचा हेवा करण्यासारखी सुस्थिति होती. मवंतांना आंग्र्यांच्या दरबारांत मानमान्यता होती. केवळ धर्मकारणांतच नव्हे तर राजकारणादि इतर व्यवहारांतही क्रमवंतांच्या मुत्सद्देगिरीचा आंग्र्यांना उपयोग होत असे. क्रमवंतांतील कर्त्या पुरुषांच्या विद्वत्तेमुळ पेशव्यांकडेही त्यांचा बोलबाला होता. अशा रीतीनें कर्तृत्व, विद्वत्ता, ऐहिक वैभव व सामाजिक योग्यता यांमुळें क्रमवंतांची स्थिति अत्यंत स्पृहणीय अशी होती. त्यांचा पाडाव करण्यासाठीं कित्येक परोत्कर्षासहिष्णु लोक डोळ्यांत तेल घालून टपून बसले होते, व कोठें फट पडतें कीं काय हें पाहण्यासाठीं कित्येक लोक काकदृष्टीनें निरीक्षण करीत होते. त्यांच्या† ब्राम्हण्याबद्दल संशय उपस्थित केल्यास त्यांच्या वृत्ति आपल्यांना घशांत उतरवतां येतील या दुर्बुद्धीला अष्टागरांतील कांहीं ब्राम्हण बळी पडले. त्यांत नागांवचे वे. शा स. हरिभट्ट लेले यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता. संशय उत्पन्न करणाराचें काम अतिशय सोपें असतें, पण त्याचें निराकरण करण्याचें दुर्घट काम ज्यांच्यावर पडतें त्यानां मात्र पुरावा गोळा करतांना नाकीं नऊ येतात. त्याप्रमाणें हरभट्ट

---

† पान ३०, ३७, ४४, ४५, ५०, ५५,

लेले यांनीं संशयाचें बीजारोपण केलें. एकदां कार्यवशात् ते जंजिरे कुलाबा मुक्कामीं आले होते. त्यावेळीं श्री. कान्होजी आंग्र्यांशीं बोलतांना त्यांचे कुलगुरु जे क्रमवंत यांच्या ब्राम्हण्याबद्दल हरभट्टांनीं संशय प्रगट केला. अंतर्जातीय विवाह ब्राम्हणांत अद्याप रूढ नसतां क्रमवंतांनीं तो चालू ठेवला यावरून ते ब्राम्हण नव्हत; तर गोंवा, फोंडा, अतूर, सांवतवाडी वगैरे ठिकाणीं जी किरवंत नांवाची जात आहे त्यांच्या पैकींच हे असावेत अशी शंका त्यांनी प्रदर्शित केली. क्रमवंत व किरवंत या नामसादृश्यावरही हरभट्ट लेल्यांनी बराच जोर दिला. इतकेंच नव्हे तर स्वतःची साक्ष या दृष्टीनें हरभट्ट म्हणाले "‡आपण कुडाळ प्रांता गेलों होतों. ते काळीं महादू किरवंत होता तो आपणास बोलला आमच्या प्रांताहून एक शेणवई मुंबई प्रांतांत बहुत दिवस गेला होता. त्यासमई आमचाही एक पुरुष कुटुंब घेऊन गेला. त्याचें वृत्त काय आहे किंवा नाहीं हें कळत नाहीं. ऐसें बोलत होता तरी हेही क्रमवंत आहेत तरी त्या घराण्यांतील होतील कीं काय." एवढाच संशय प्रकट करून ते राहिले नाहींत, तर "¶कुडाळ फोंडे प्रांतींच्या किरवंतांशीं व इतर तत्प्रांतीय सुब्राम्हणांशीं अन्नादिव्यवहार चालत नाहीं आणि अष्टागर प्रांतस्थ क्रमवंतांशीं एतत्प्रांतीय सुब्राम्हण यांशीं अन्नादिशरीर संबंध कैसा चालतो" असा प्रश्न त्यांनीं उपस्थित केला. पण यावर श्री. कान्होजी आंग्रे काय उत्तर देणार? हा ब्राम्हणांचा विषय असल्यामुळें त्यांनीं पांच सात ब्राह्मणांना बोलावून त्यांच्या समक्ष हरभट्ट यांनीं उपस्थित केलेले आक्षेप सांगितले. क्रमवंतांनींही परंपरागत माहित असलेली हकीकत सांगितली. पण तेवढ्यानं त्या ब्राम्हणांचें समाधान कसें होणार? त्यामुळे श्री. कान्होजीराव आंग्रे अधिक पेंचांत पडले. शेवटीं त्यांनीं असा निर्णय दिला कीं क्रमवंतांनीं अधिक पुरावा गोळा करून स्वतःच्या ब्राम्हण्याची खात्री पटवीपर्यंत त्यांनीं अपंक्त रहावें. आंग्रे सरकारनें असा निर्णय दिल्यानंतर क्रमवंत काय करणार? चित्पावन ब्राम्हणांना अस्मान ठेंगणें झाल्याप्रमाणें झालें. कारण त्यांना तात्पुरता जय मिळाला. क्रमवंत अपंक्त झाल्यामुळें त्यांच्या वृत्ति सरकारजमा झाल्या. त्यांच्या जप्त झालेल्या वृत्तींवर इतर ब्राम्हण मनमुराद चरूं लागले व गब्बर झाले. पण क्रमवंतांवर हा निष्कारण गहजब करण्यांत आला व आंग्रेसरकारनें तडकाफडकी निकाल देऊन त्यांच्यावर मोठा अन्याय केला. इतके दिवस चालत आलेली गोष्ट हरभट्ट लेले प्रभृति नाकारित होते. त्यामुळें व्यवहारनिर्णयाच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें क्रमवंतांनें अब्राम्हण्य सिद्ध करण्याचा बोजा संशय प्रकट करणाऱ्या हरभट्ट प्रभृतींवरच पडावयास पाहिजे होता. पण ते आग पेटवून

‡ पान ४ ¶ पान ६

स्वस्थ बसले आणि विघ्नविण्याचें दुर्घट काम क्रमवंतांवर पडलें. क्रमवंत (किंवा त्याचें अपभ्रष्ट रूप करवंत) व किरवंत यांचें शब्दसादृश्य हा क्रमवंतांविरुद्ध मोठा पुरावा होता. त्यांचे तीनही जातींशीं लग्न व्यवहार होत असत हेंही नाकारणें शक्य नव्हतें. कुडाळ प्रांतांतील किरवंत व अष्टागरांतील क्रमवंत हे एक नव्हत हें सिद्ध करण्याचें एकही साधन क्रमवंतांजवळ उपलब्ध नसल्या-मुळें ते मोठ्या पंचायतींत पडले. पण उघड्या डोळ्यांनीं क्रमवंत घराण्याचा होत असलेला वृत्तिच्छेद व कुलच्छेद त्यांच्यान कसा बघवणार? शेवटीं स्वतांच्या ब्राम्हण्या-बद्दल निर्विवाद पुरावा गोळा करण्याचें दुर्घट काम करण्यासाठीं त्यांनीं आपली कंबर कसली, व त्यांतील दोन प्रमुख पुरुष, आप्पाजी भट्ट क्रमवंत व अनंत भट्ट क्रमवंत यांना घांटाचा रस्ता धरला.

आतां प्रमाणें प्रवासाच्या सुखसोयी उपलब्ध नसतां क्रमवंतद्वयांनीं हें दुर्घट काम करण्याची जबाबदारी स्वतांच्या शिरावर घेतली, व स्वपक्ष सिद्ध करण्याच्या बाबतींत नानाविध अडचणी येणार हें लक्षांत घेऊन पुरावा गोळा करण्याची हिंमत धरली, यावरून ग्रामण्याच्या नरमेधांत ते किती हैराण होऊन गेले असतील याचा वाचकांनीं विचार करावा. पण जातीसाठीं माती खावी लागते म्हणतात; त्याप्रमाणें शारीरिक कष्ट सोसूनही, आपल्या घराण्यावर कित्येक स्वार्थपंडित ब्राम्हणांनीं उठविलेल्या काहूराचें निरा-करण करण्याचा त्यांनीं चंग बांधला. हरभट्ट लेल्यांनीं कोणत्या वर्षी या विषवृक्षाचें बीजारोपण केलें त्याचा उल्लेख उपलब्ध कागदपत्रांत नाहीं. पण हें प्रकरण बरेच दिवस रंगत असावें असा तर्क आहे; व तेवढ्या अवधींत क्रमवंतांच्या वृत्तींवर टपलेल्या भिक्षु-कांनीं आपली यथेच्छ तुंबडी भरून घेतली असावी. अशी परिस्थिति आणखी कांहीं वर्षें चालली असती तर आपलें अष्टागरांतून समूळ उच्चाटण होईल, व आपल्या वाडवडिलांनीं विद्वत्तेच्या जोरावर मिळविलेल्या वृत्तींवर आपण आपल्या आळसानें पाणी सोडल्याचें महापातक आपल्यांना लागेल, हें मनांत येऊन क्रमवन्तद्वयानें घांटाचा मार्ग पकडला, व पुढें दिल्याप्रमाणें ठिकठिकाणीं जाऊन आपल्या घराण्याच्या सुब्राह्मण्याबद्दल दस्तऐवजी पुरावा गोळा करावयास त्यांनीं सुरवात केली.

(१) प्रथम आप्पाजी भट्ट आणि अनंतभट्ट हे पुणतांब्यास आले. तेथें त्र्यंबक-भट्ट टिल्लू व त्यांचे पुत्र शिवरामभट्ट होते, त्यांच्या कडून अष्टागरांतील क्रमवंत हे त्यांचेच गोत्र पुरुष असल्याचें त्यांनीं संमति पत्र आणलें. इतर ठिकाणीं टिल्लू घरा-ण्याच्या सुब्राह्मण्याबद्दल कोणीही संशय प्रगट केला नव्हता, हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे.

( २ ) नंतर तेथून हे दोघेजण नाशीक त्र्यंबकेश्वरास गेले. त्यांनीं पुणतांब्याहून आणलेला लेखी पुरावा तेथें जमलेल्या जनस्थाननिवासी ब्राह्मणांनीं पाहिला. इतकेंच नव्हे तर नाशीक व त्र्यंबक येथें रहाणाऱ्या टुल्ल घराण्यांतील पुरुषांची जबानी घेतली. त्यावेळीं त्यांनीं सांगितलें * "जे हे क्रमवंत व आह्मी एक गोत्रज असों. या गोष्टीचा संशय नाही. आह्मी समस्त प्रांतींचे ब्राह्मण व क्रमवंत हे सर्व परस्परें सुहृत्संबंधी असों. या गोष्टीचा संशय न धरणें. ज्याचें ब्राम्हणहृदय असेल त्यास संशय न होय. यास विप्रतिपात्तिकर्ता तो जातीचा, कुळाचा, गुणाचा नाशक निःसंशय." हा सर्व पुरावा जमेस धरून तेथील ब्राम्हणांनीं क्रमवंतांना आपलें संमतिपत्र दिलें.

( ३ ) अष्टागरांतील क्रमवंतांचा कुडाळ प्रांतांतील किरवंतांशीं शब्दसादृशामुळें संबंध जोडला गेला, ह्मणून तेथील किरवंत जात कशा प्रकारची आहे याची माहिती मिळविणें क्रमवंतांना भाग पडलें. वेदमूर्ति आप्पाजीभट्ट क्रमवंत व अनंतभट्ट क्रमवंत हे पुणतांबे, नाशीक, त्र्यंबकेश्वर वगैरे ठिकाणीं माहिती गोळा करावयास गेल्यामुळे, अलीबागनजीक थळ गांवांतील वेदमूर्ति दामोदरभट्ट क्रमवंत व नरसिंहभट्ट क्रमवंत हे कुडाळ प्रांतांत आले. त्यावेळीं श्रीमंत सामंतचक्रचूडामणि सावंत यांनीं सहस्रचंडी अनुष्ठान आरंभिलें होतें. त्या निमित्तानें वांडीपासून राजापूर संगमेश्वरपर्यंत, व घांटावरचा सहस्रावधी ब्राह्मणसमुदाय मिळाला होता. तेथें सर्व वैदिक, शास्त्री, व शिष्ट ब्राह्मण यांच्यापुढें क्रमवंतांनीं आपली कैफियत सादर केली, व आपलें कुलवृत्त, आचारविचार, वगैरेची माहिती दिली. तेव्हां "†त्यांनीं या क्रमवंतांचा पूर्वोत्तर वृत्तांत मनास आणिला, व ते फोंडे प्रांतांचे किरवंतांचा पूर्वोत्तर वृत्तांत मनास आणला. परन्तु ते किरवंत आणि हे क्रमवंत कोणी एकसामान्यकरून एक नव्हत" असा सर्व ब्राह्मणांनीं निर्णय दिला. व त्याप्रमाणें समाराधनेस जमलेल्या सर्व ब्रम्हवृंदानें संमतिपत्र करून दिलें.

( ४ ) परंतु या दोन महापुरुषांनीं एवढ्यावरच संतुष्ट न रहातां त्यांनीं किरवंतांची गांठ घेतली, व हरभट्ट लेल्यांजवळ तुम्हीं काय बोललां यावद्दल त्यांच्याजवळ चौकशी केली. त्यावेळीं किरवंत लोकांनीं आपल्या ज्ञातीची सभा करून हा

---

* पान १७

† पान ७

विषय त्यांच्यापुढें ठेवला. 'आमचा एक पुरुष मुंबईप्रांतीं गेला त्याचें कांहीं वृत्त कळलें नाहीं' असें आपण साहजिकपणें बोलतों काय, आणि हरभट्ट लेल्यांसारखे विद्वान ब्राम्हण त्याच्यावर एवढी इमारत रचतात काय, याचा त्यांना अचंबा वाटला. व शेवटीं त्यांनीं असा महत्वाचा कबुलीजबाब लिहून दिला कीं, * " तुमचे गोत्र भिन्न व कुलधर्म भिन्न, आमचीं गोत्रें भिन्न व कुलधर्म व आचार भिन्न. तुम्हांशीं व आम्हांशीं कोणेही अर्थी संबंध नाहीं." खुद्द किरवंतांनीं दिलेल्या या कबुलीजबाबाला या प्रकरणांत केवढें महत्व आहे हें सुज्ञ वाचकांना सांगावयास नकोच.

[ ५ ] इतक्या अवधींत या ग्रामण्याच्या महायज्ञांतील मुख्य ऋत्विज् जे हरभट्ट लेले ते निवर्तले असावेत असें दिसतें. त्यांचे चिरंजीव विश्वनाथ भट्ट यांनीं स्पष्ट लिहून दिलें कीं आपल्या वडिलांनीं कमवंतांवर जो दोषारोप आणला होता तो फुकट आहे.

अशा रीतीनें पुष्कळ शारीरिक व मानसिक आपत्ति सोसून या कमवंतद्वयानें बहुमोल पुरावा जमा केला, व पुन: कुलाब्यास येऊन आंग्रेसरकार पुढें तो त्यांनीं सादर केला. पण त्यावेळच्या स्वार्थपरायण व लोभी ब्राह्मणांना तो पुरावा मान्य झाला नाहीं. कारण मान्य करावा तर इतक्या कौटिल्यानें उभारलेलें ग्रामण्य विलयाला जाणार, व कमवंत अपंक्त ठरल्यामुळें इतके दिवस त्यांच्या वृत्तींच्या कुरणांत इतर ब्राह्मणांना बिनदिक्कत चरतां येत असे, त्याला आळा बसणार. म्हणून त्या धूर्त ब्राह्मणांनीं हा पुरावा कवडीमोल ठरविला; व कमवंत पुनः निराशेच्या खोल गर्तेत पडले.

आतां मात्र कमवंतांना आकाश फाटल्याप्रमाणें झालें. इतक्या आयासानें जमविलेला पुरावा फुकट गेलेला पाहून पुढें काय करावें याची त्यांना चिंता पडली. आंग्रे सरकारच्या दरबारीं न्याय मिळणें कठीण आहे असें पाहून त्यांनीं एकदम श्री शाहू–छत्रपतींकडे दाद मागण्याचें ठरविलें. या कामांत अविश्रांत खटपट करणार समाजसेवक उपरिनिर्दिष्ट कमवंतद्वय यांनीं पुनः मोठ्या हुरुपानें सातार्‍यास शाहू छत्रपतींकडे प्रयाण केलें. पण हा ब्राह्मणांचा विषय असल्यामुळें त्यांनींच त्याचा निकाल करणें योग्य आहे असें मनात आणून श्रीछत्रपतींनीं वेदमूर्ति मुद्गलभट्ट पंडितराय यांस आज्ञा केली कीं, बाळाजीपंत प्रधान माहुली संगमक्षेत्रांत अतिरुद्र व कोटीहोम अनुष्ठान करीत आहेत तेथें यांच्या तक्रारीचा विचार व्हावा. अनुष्ठानाच्या निमित्तानें,

---

* पान ५

काशी, उभय गोदातीर, कृष्णातीर, प्रतिष्ठान, पुण्यस्तम्भ, नाशीक, वरखेड, राजापूर, वैराट क्षेत्र, परशुराम क्षेत्र इत्यादि ठिकाणचे सहस्रावधि मोठमोठे शास्त्री, पंडित, व वैदिक ब्राह्मण जमा झाले होते. त्यांच्यापुढें क्रमवंतांनीं आपला सर्व दस्तऐवजी पुरावा मांडला. जमलेल्या ब्राम्हणांनीं पुराव्याची नीट छाननी केली, व क्रमवंतांची तोंडी करून तपासणी केली. तेथें आलेल्या बाळकृष्णभट्ट हिंगणे नांवाच्या काशीकर वैदिकानें गागाभट्टाच्या दोन क्रमवंत शिष्यांबद्दल माहिती सांगितली. व गागाभट्टानें बाळकृष्णभट्ट क्रमवंताला " † देशस्थ जाणोन पुत्रत्वें मानोन यांचा विवाह केला. " असेंही वृत्त निवेदन केलें. त्यावेळीं राजद्वारीं गोपाळभट्ट टिल्लू होते त्यांच घरीं अष्टागरांतून वे. जनार्दनभट्ट क्रमवंत येत असत त्यावेळीं दोघेजण बंधुत्वाच्या नात्यानें वागत हें सर्वांना ठाऊक होतें. केवळ शब्दसादृश्यामुळें क्रमवंतांवर किरवंत जातीचा आरोप करणें योग्य नव्हतें. म्हणून तेथें जमलेल्या सर्व ब्राम्हणांनीं " § संमतिपत्र करोन दिधले, व यांस ब्राम्हणसमुदायांत व अनुष्ठानांत, व राजद्वारीं व श्री. श्रीपतराव प्रतिनिधि यांच्या घरीं, व बाळाजीपंत प्रधान यांच्या घरीं अनुष्ठान झालें तें समई अनुष्ठान सांगोन बहुमान करून यथार्थपूर्ण व्यवहार्य पंक्तिपावन केले असत. " हें संमतिपत्र शके १६४१ सालांतील असून त्याच्यावर तेथें जमलेल्या सर्व प्रमुख ब्राम्हणांच्या सह्या आहेत. ज्या हरभट्ट लेल्यांनीं आकसानें या कटाची उभारणी केली होती, ते मध्यंतरीं निवर्तले असावे असें दिसतें. क्रमवंतांनीं स्वतःचें सुब्राम्हण्य प्रस्थापित करण्यासाठीं जमा केलेला पुरावा त्यांचे चिरंजीव विश्वनाथ यांनीं स्वतः पाहिला. व माहुली संगमक्षेत्रांत बाळाजी विश्वनाथ पेशव्यांच्या समोर झालेल्या संमतिपत्रावर त्यांनीं सही केली, व वडिलांनीं केलेला दोषारोप मिथ्या होता, असा त्यांनी स्पष्ट कबुलीजबाब दिला याचा उल्लेख पूर्वीं आलाच आहे.

ठिकठिकाणचीं संमतिपत्रें जमविण्याच्या इराद्यानें क्रमवंतद्वयाला महाराष्ट्रांत पुष्कळ ठिकाणीं जावें लागलें व कुडाळ प्रांतांत व माहुली संगमीं काशीपासून गोव्यापर्यंत पंडित व वैदिक जमा झाले असल्याकारणानें क्रमवंतांवर केलेल्या ग्रामण्याची बातमी लवकरच हिंदुस्थानभर पसरली. क्रमवंतांचे सुहृत्संबंधी महाराष्ट्रभर पसरले असल्यामुळें त्यांनीं अष्टागरस्थ प्रतिनिविष्ट ब्राह्मणांची कानउघाडणी करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला.

---

† पान ५

§ पान ५

कांहींनीं आंग्रे सरकारला अलाहिदा पत्रें पाठवून कमवंतांवरील मिथ्यारोप दूर करण्य विषयीं विनविलें. कमवंतांसारख्या सुब्राह्मणांवर तोहमत उभारणें म्हणजे ब्रह्मद्रोहाचे पातक करण्यासारखें आहे हें त्यांनीं त्यांच्या निदर्शनास आणलें. जनस्थानांतील दिनकरभट्ट पेंगे यांनीं कान्होजीला स्वतंत्र पत्र लिहून अष्टागरांत थैमान घालणाऱ्या ब्रह्मद्वेषाच्या समंधाला कायमचें गाडून टाकण्याविषयीं कळकळीची विनंती केली " * हरभट्ट लेले यांहीं प्रत्यवस्थान व्यर्थ केलें याचा परामर्ष करायाकारणें महाराज सर्वप्रकारें समर्थ आहेत. " कर्जग्रामस्थ केशव जोशी यांनीं अष्टागरांत राहणाऱ्या धर्माधिकारी जोशी उपाध्ये पुराणिक व शिष्ट ब्राह्मण यांना उद्देशून एक पत्र लिहिलें आहे; त्यांत हे ग्रामण्य उभारणाऱ्या ब्राह्मणांना रोकडा सवाल टाकतात " † पूर्वी चंपावती प्रांतीं ब्राह्मणसमाज चार सहस्र होता, त्यामध्यें कांहीं शिष्ट विद्वज्जन असतील त्यांनीं शोध करून जो व्यवहार करणें तो केलाच असेल. त्यामध्यें तुमचेही पूर्वज कितीएक असतील. सप्त पुरुष पर्यंत तुमचे शरीरसंबंध वृत्तामुळें गर्भाधानादि सपिंडीकरणांत यत्किंचित व्यवहार कमवंतांचे हस्तें चालत असतां हरिभट्ट लेले यांच्या वचनीं विश्वास मानून प्रभुनिग्रहें करून कमवंत कुळाचा अपमानपूर्वक स्वपूर्वजांच्या ठायीं अज्ञान संपादून प्रभूचें भय ( न ) मानून हरिभट्टाचे मतांशीं मिळोन संमति केल्यात तर हें कर्म बहुत अनुचित केलें असे. ज्या कर्में करून राष्ट्रभंग, राज्यभंग होणें असें संपादिलेंत व ज्या प्रभूचें अन्न भक्षून त्यांचेंहि अनिष्टच इच्छितां ऐसें मजला कळोन येतें कीं ज्या पदार्थें करून प्रभूचें पदरीं द्वेष न पडे आणि उत्तरोत्तर कल्याण होय असा अर्थ करणें. कमवंत कुळ तर प्रसिद्ध यांचा अपमान करून कुळाचा उच्छेद करणें उचित नसे. " काशींतील कमवंतांच्या सुहृत्संबंधी लोकांनाही ग्रामण्याची हकीकत ऐकून वाईट वाटलें. त्यांनीं अष्टागरांतील कमवंत आपले आप्तवर्गांतील आहेत असें सांगितलें; इतकेंच नव्हे तर त्यांनीं श्री. कान्होजी आंग्रे यांना स्पष्ट बजाविलें कीं एका चित्पावनानें संशय प्रकट केल्यावरून कमवंतांच्याच दुर्दैवानें त्यांच्यावर अनर्थ कोसळला, व आतां त्याचें निराकरण करून त्यांना स्वस्थळीं स्थापण्याची कामगिरी सुदैवानें तुमच्याकडे आली आहे; म्हणून त्यांच्यावरचा मिथ्यारोप दूर करावा. " किंवा हे ब्राह्मण येथें नसावे हें चित्तीं असेल तर आपलें राज्यांतून बाहेर घालविणें. आम्ही वाराणशीपर्यंत या ब्राह्मणांचा अंगिकार करूं [ चित्पावनांनीं ]. परशुरामजीचें चित्र पोळविलें आहे, मनुष्याचें पोळवितील हें

---

* पान ८

† पान १२

अपूर्व काय आहे? तर त्यांचा विश्वास न धरणें" श्रीमत् परमहंस श्री ब्रह्मानंदस्वामी किंवा ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांनीं खुद्द पेशव्यांस व अष्टागरांतलि ब्राह्मणांस पत्र पाठवून कमवंतांवरील अब्राह्मण्याचा आरोप खोटा असल्याचें त्यांनीं दाखवून दिलें. अशा रीतीनें ग्रामण्याबद्दल चोहोंबाजूनीं नाप ती दर्शविली जात होती. बाळाजी विश्वनाथ केवळ संमतिपत्र देऊन स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं श्री. आंग्र्यांना वारंवार पत्रें लिहून ग्रामण्याचें लवकर निराकरण करण्याविषयीं कळकळीनें लिहिलें ग्रामण्याला जरी तात्पुरता आळा बसला होता तरी अग्नी कायमचा विझाला नव्हता. तो धुमसत राहिल्यानें वेळप्रसंगीं कमवंतांना द्वेषाच्या धुराची बाधा होतच होती. आंग्र्यांनीं कमवंतांना अपंक्त ठरविल्यामुळें त्यांच्या वृत्तींची जी एकदां हलाखी उडाली ती पुन्हां सांवरली नाहीं.

शके १६४१ सालांतील संमतिपत्राचा व्हावा तेवढा उपयोग झाला नाहीं. ग्रामण्य प्रकरणांत फजित झालेल्या ब्राह्मणांच्या मनांत कमवंतांबद्दल जी एकदां अढी बसली ती निघाली नाहीं. त्यामुळें त्यांनीं संमतिपत्राला धाब्यावर बसवावयास कमी केलें नाहीं. संमतिपत्राची अम्मलबजावणी करावयाची तर राजकारणाच्या धामधुमीमुळें आंग्र्यांना ग्रामण्यासारख्या फोलकट बाबींकडे जास्त लक्ष द्यावयास फुरसूत सांपडेना. पेशव्यांनीं दोन तीन पत्रें पाठविली पण कान्होजी कडून एकाही पत्राचा जबाब गेला नाहीं. शेवटीं पेशव्यांनीं पुनः एकदां निक्षून पत्र लिहिलें त्यांत ग्रामण्य निराकरणाची व संमतिपत्राची सर्व हकीकत देऊन ते पुढें ह्मणतात "* तरी ज्याप्रमाणें त्यांचा निर्णय केला आहे, व संमतिपत्र दिलें आहे तेणेंप्रमाणें विस्तारें करून चित्तांत आणून कमवंतांचे ठायीं निर्दोषप्रसंग करून ब्राह्मणांची स्वस्थळीं वृत्तीवर स्थापना केली पाहिजे. तुह्मी आह्मीं धर्मस्थापना करून देवब्राह्मणांचा आशीर्वाद घ्यावा हेच गोष्टी उत्तम असे. यास्तव सहस्त्र प्रकारें करून ब्राह्मणसमुदायाचें संमतपत्र मान्य करून कमवंताचा अभिशाप दूर केला पाहिजे ये विषयीं आपणांस वारंवार ल्याहावेंसे नाहीं जेणें करून ब्राह्मण निर्दोष होऊन सुखरूप रहात, राजेश्रीस व राज्यास कल्याण चिंतीत ते गोष्टी केली पाहिजे." पण याही निकडीच्या पत्राला जबाब गेल्याचें दिसत नाहीं. याच वेळीं मुंबईच्या इंग्रजानें खांदेरीवर हल्ला केल्यावरून कान्होजींचें त्यांच्याशीं वितुष्ट पडलें, म्हणून त्यांना ग्रामण्यांत जास्त मन घालावयास फुरसूत सांपडली नसावी. आणि त्यावेळीं त्यांच्या भोंवतीं कमवंतविरोधी ब्राह्मणचमूचें दाट वलय पडल्यामुळें ग्रामण्याचें निराकरण करण्याच्या बाबतींत आंग्र्यांनीं पुढाकार घेतला नसल्यास नवल नाहीं. संमतिपत्रानंतरही ग्रामण्यावरून

* पान १३

निरंतर कटकटी होत, व बाळाजी विश्वनाथ पेशव्यांच्या कानावर वारंवार तक्रारी जात. पुढल्या एका पत्रांत ते कान्होजी आंग्र्याला म्हणतातः– " * हे गोष्टी आपल्याला योग्य नाहीं..... क्रमवंत ब्राम्हण बहुत थोर संपन्न आणि त्यांचीं घराणीं सातआठशें झालीं आहेत. तेणेंकरून दोनअडीच सहस्त्र ब्राम्हणांशीं संबंध झाले आहेत. दुसरें हें कर्म नूतन आहेसें नाहीं. शेदोनशें वर्षांचे आहे. तिसरे, थोरले कैलासवासी स्वामी ( शिवाजी महाराज ) होते त्यांचे वेळीं हा उत्पात राहातासा नाहीं. ऐसें असतां आपण भलत्याचे शब्दें करून ब्राह्मणांस दंड करावासें नाहीं. " त्याचप्रमाणें पेशव्यांचे सुभेदार व महालकरी यांनीही क्रमवंतांना ग्रामण्यापासून निर्मुक्त करण्याचा प्रयत्न केला; व त्यांच्या वृत्ति त्यांना परत देण्याविषयीं खुद्द आंग्र्यांना त्यांनीं विनंतीपूर्वक पत्रें पाठविलीं. पण या सर्वांही खटपटीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ग्रामण्याचा जरी चोहोबाजूंनीं पाडाव झाला होता तरी प्रतिस्पर्ध्यांच्या मनांतील द्वेषाग्नि तसाच धुमसत राहिला होता. त्यांना फक्त अनुकूल परिस्थितीच्या वाऱ्याची लहानशी झुळुक मिळाली असती तर तो केव्हांच पेट घेता.

अष्टागरांत ग्रामण्याचा डोलारा उभा करणारे ब्राम्हण अशा संधीची वाटच पहात होते; आणि त्यांच्या सुदैवानें त्यांना ती लवकरच मिळाली. शके १६४१ सालच्या संमतिपत्रानें पूर्वीची ग्रामण्याची इमारत ढांसळून पडली होती. पण तत्पूर्वी क्रमवंतांच्या वृत्तीची पुष्कळ खराबी झाल्याशिवाय राहिली नाहीं. पराजय झाल्यामुळें चिडून गेलेले ब्राम्हण क्रमवंतांशीं नीट रीतीनें वागत नसत. कांहीं तरी कुरापत काढून त्यांच्याशीं भांडावें, तीर्थगंधादि ब्राम्हण्यदर्शक मान देते वेळीं नाखुषी दर्शवावी, प्रत्यक्ष बहिष्कार घालणें शक्य नव्हतें तरी अप्रत्यक्ष तऱ्हेनें ग्रामण्य तसेंच कायम ठेवावें, त्यांच्या वृत्तींबद्दल हरकती घ्याव्या, त्यांना स्वतः उपाध्ये म्हणून न बोलावितां हव्यकव्यें दुसऱ्याच्या हातून चालवावीं, व अशा रीतीनें परोपरीनें त्यांची मानखंडना करावी, हा प्रकार कांहीं ठिकाणीं चालूच होता. पेशवे हे सत्ताधारी ब्राम्हण असल्यामुळें ब्राम्हण्यसंरक्षक म्हणून त्यांच्याकडे वारंवार तक्रारी गेल्या, व या नित्य कटकटींना कंटाळून पेशव्यांनाही या प्रकरणाचा कायमचा बंदोबस्त करावा असें वाटलें. क्रमवंतांकडून आपलीं क्रियाकर्मांतरें न चालवितां आपल्या पसंतीच्या मनुष्याकडूनच तीं चालवून घ्यावीं असा त्या वेळच्या प्रतिस्पर्धी ब्राम्हणांचा कटाक्ष होता. व त्या वेळीं ग्रामण्याची उचल करणाऱ्या चित्पावनांची ज्ञाति उदयोन्मुख असल्यामुळें, व त्यांच्या पैकींच पेशवे हे पुण्यास सत्ता गाजवीत असल्यामुळें मध्यवर्ती सरकारकडून आपल्यांना पाठींबा मिळेल, निदान कडक शिक्षा तरी होणार नाहीं असें त्यांना साहजिक वाटलें असावें. आज ज्यांचा

* पान १४

कटु अनुभव आपण भोगीत आहोंत, तीं सर्व ग्रामण्यें पेशव्यांच्या अमदानींत झालीं, व त्यांतील बहुतेक चित्पावन ब्राह्मणांनी उपस्थित केली होतीं, यावरून वरील विधानाला पुष्टी येते. इतकेंच नव्हे तर राजाज्ञा व पूर्वपरंपरागत वहिवाट मोडणाऱ्या ब्राह्मणांचें जसें कडक पारिपत्य मध्यवर्ती सरकारकडून व्हावयास पाहिजे होतें तसें न झाल्यानें ग्रामण्याचा व्रण तसाच चिघळत राहिला. जर उपव्यापी ब्राम्हणांचा वेळींच बंदोबस्त झाला असता तर पुढच्या पुष्कळ भानगडी टळल्या असत्या यांत शंका नाहीं.

वे. शा. सं. पांडुरंग जोशी यांचे घरीं कोटिहोमानुष्ठान व्हावयाचें होतें. अष्टागरांत क्रमवंत वृत्तिवंत उपाध्ये असल्यामुळें कोणी एक क्रमवंत पांडुरंग जोशाच्या घरीं जाऊन मला आर्त्विज्य द्या म्हणून सांगूं लागला. अर्थात् यांनीं तें नाकारलें त्यामुळें चिडून जाऊन तो तामसी क्रमवंत त्या जोशाला व सभेंत जमलेल्या इतर ब्राह्मणांना स्वतःला आर्त्विज्याचें आमंत्रण न दिल्यामुळें अद्वातद्वा बोलूं लागला. तेव्हां क्रमवंतांवर सूड उगविण्यास ही चांगली संधि आहे असें पाहून क्रमवंतांच्या उद्धटपणाला आळा घालण्याच्या निमित्तानें जमलेल्या ब्राम्हण मंडळींनी क्रमवंतांवर बहिष्कार घालण्याचें ठरविलें. व त्याप्रमाणें अंमलबजावणीला सुरवातही झाली. एका क्रमवंतानें उद्धटपणा केला म्हणून सर्व ज्ञातीवर बहिष्कार घालावयाचा हा कोणत्या गांवचा न्याय? पण सरोपुढें शहाणपण नाहीं. ज्ञातीकडून कांहीं आगळीक न होता एका मनुष्याच्या अपराधास्तव बहिष्कार पुकारलेला पाहून पुनः वृत्तिच्छेद होण्याचा प्रसंग आला असें क्रमवंतांनीं जाणलें, व त्यांचे पुढारी पुनः पेशव्यांकडे फिर्याद घेऊन गेले. या प्रकरणांत बखेडा घालणारे पुण्याचे ब्राम्हण होते हें लक्षांत ठेवलें पाहिजे; व त्यांनीं पेशव्यांचे कान आधींच भारून ठेवले असावेत असें दिसतें. कारण पूर्वींच शके १६४१ सालीं सर्व कागदोपत्री पुरावा नीट पाहून माहुली संगमीं पेश[illegible]च्या समोर संमतिपत्र झालें होतें. तरी पुनः हट्टी ब्राम्हणांच्या सान्त्वनार्थ पुण्यास [illegible] सभेंत परंपरागत व्यवहाराचा विचार होऊन शके १६७८ मध्यें आणखी एक सं[illegible] करण्यांत आलें. त्याचा आशय असा:—“ * क्रमवंत ब्राम्हणांचा पंक्तिव्यवहार जो चालत आला त्याप्रमाणे चालवावा. त्या प्रांतीं रहाणार ब्राह्मणांचा व क्रमवंतांचा अनुष्ठानाविषयीं कलह होतो, त्यास जो यजमान स्वमंतोषें क्रमवंतास बोलावून तदहस्तें अनुष्ठान करवील तेथें ब्राम्हणांनीं अधिक्षेप न करावा. जो यजमान अनुष्ठानीं क्रमवंतांचा निवेश न करतां अन्य हस्तें कर्म चालवून त्यांचा वृत्तिकायदा होईल तो त्यास देईल तेथें अनुष्ठानीं

* पान १९

आपल्या निवेशाचा आग्रह क्रमवंतांनीं न करावा " या पत्रावर प्रमुख ब्राम्हण पंडितांच्या व वैदिकांच्या सह्या आहेत. या संमतिपत्रामध्यें खालील गोष्टींचा समावेश केला आहे:-

[ १ ] क्रमवंतांशीं पंक्तिव्यवहार पूर्वीप्रमाणेंच चालवावा.

( २ ) कोणी क्रमवंतांस अनुष्ठानास बोलाविल्यास इतरांनीं त्यास हरकत घेऊं नये.

( ३ ) ज्यांना क्रमवंतांना बोलवावयाचें नसेल त्यांनीं आपल्या मर्जीनुरूप दुसऱ्या उपाध्याला बोलावून आपलीं धर्मकर्मे त्याच्याकडून उरकावीं, पण उपाध्याच्या वृत्तीबद्दल मात्र क्रमवंतांना पैसे द्यावे.

हें संमतिपत्र दिसावयास साधें व न सलणारें दिसतें. पण यांतच क्रमवंतांचा वृत्तिच्छेद करणारी कुऱ्हाड लपलेली आहे. अनुष्ठान क्रमवंतांच्याच हस्तें चालविलें पाहिजे असा क्रमवंतांचा अष्टागरांत अग्रहक्क असतां यजमानांच्या इच्छेप्रमाणें दुसऱ्या मनुष्याची नेमणूक या संमतिपत्राप्रमाणें होऊ शकते. ज्या ब्राह्मणांनीं एवढी यातायात करून क्रमवंतांविरुद्ध ब्राम्हण्याची उठावणी केली ते त्यांना उपाध्ये ह्मणून बोलावतील हें शक्य आहे काय ? आधींच कित्येक वर्षें अपंक्त राहिल्यामुळें वृत्तिलोप झाला होता आणि या तडजोडीच्या संमतिपत्राप्रमाणें इतर ब्राम्हणांना स्वतःचे उपाध्ये क्रमवंतांच्या स्थानावर राजरोसपणें प्रस्थापित करतां येऊं लागले. या बाबतींत पेशवे व इतर ब्राम्हण यांनीं क्रमवंतांना अन्यायाचा निर्णय दिला असें क्रमवंतांचें म्हणणें होतें. वृत्तीच्या बाबतींत क्रमवंतांना नामशेष करण्याची व त्यांना देशोधडीला लावण्याची कामगिरी या संमतिपत्रानें केली. यांतील तिसरें कलम विशेष घातक असून तें क्रमवंतांना शेवटपर्यंत जाचक झालें. पण जें कलम संमतिपत्रांत बुद्धिपुरःसर घुसडण्यांत आलें होतें तें त्यांतून कसें वगळलें जाणार ?

हें संमतिपत्र इतर ब्राह्मणांच्या फार फायद्याचें असूनही त्यांचें समाधान होईना. क्रमवंतांना पूर्णपणें धुळीस मिळविल्याशिवाय व त्यांच्या वृत्तीचा अपहार केल्याशिवाय त्यांचा हेतू पुरणें शक्य नव्हतें. ह्मणून पेशव्यांकडून राजाज्ञा ह्मणून आलेल्या या संमतिपत्राची किंमत अष्टागरांतील प्रतिनिविष्ट ब्राह्मणांनीं फारशी ठेवली नाहीं पण कांहीं ब्राम्हणांना मात्र खर फार ताणणें योग्य न वाटल्यामुळें संमतिपत्रांत लिहिल्याप्रमाणें त्यांनीं व्यवहाराला सुरवात केली. व अशा रीतीनें कित्येकांकडील व्यवहार बिनबोभाट पार पडत असत.

पण जे ब्राह्मण विशेष आग्रही होते त्यांनीं या संमतिपत्रांत कांहीं फट निघते कीं काय हें काकदृष्टीनें पाहिलें [illegible] पंक्तिव्यवहाराचा उल्लेख असून पेशव्यांनीं

स्वत: क्रमवंतांशीं अन्नव्यवहार केल्याचें लिहिलें नव्हतें असें त्यांना दिसलें. पेशव्यांनीं क्रमवंतांना पंक्तीला घेतल्याशिवाय आम्ही त्यांना पंक्तिपावन समजणार नाही म्हणून अष्टागरांतील ब्राम्हणांनी पुनः वितंडवादाला सुरवात केली. पुनः क्रमवंतांनीं पंढरपुरास पेशव्याकडे जाऊन आपलें गाऱ्हाणें कानावर घातलें, या क्षुल्लक प्रकरणावरून वाद माजविणाऱ्या आपल्या ज्ञातिबांधवांबद्दल पेशव्यांना काय वाटलें असेल? क्रमवंतांच्या सद्ब्राम्हण्याबद्दल खात्री पटल्यामुळें पेशव्यांनीं दरखेपेला उदार मनानें क्रमवंतांची बाजू उचलून धरली याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. त्यांनीं क्रमवंतांशीं सहभोजन करून त्यांना आपल्या शिक्कामोर्तबानिशीं एक पत्र करून दिलें. त्यांत ते ह्मणतातः—

" * त्यांत कांहीं किंचित लढा पंक्तिव्यवहाराविषयीं होता. कीं पुणियास पंक्ति व्यवहार झाला नसतां आह्मी करीत नाहीं, ऐसा इकडील प्रांतस्थ ब्राह्मणांनीं आक्षेप घेतला. त्यावरून पुनः क्रमवंत राजेश्री प्रधान पंतापावेतों जाऊन पंढरपुरचे मुक्कामीं त्यांचे पंक्तीस व्यवहार करून त्यांचीं पत्रें हुजूर व इकडील प्रांतस्थ ब्राह्मणांस घेऊन आले...... ह्मणून यांची वृत्ति त्यांचे स्वाधीन केली आहे." याच आशयाचीं पत्रें बाळाजीपंत यांनीं मानाजी आंग्रे यांस कुलाबे मुक्कामी, व कल्याण, भिवंडी, साष्टी, व वसई प्रांत येथें वास्तव्य करणाऱ्या सर्व ब्राह्मण लोकांस उद्देशून लिहिलीं आहेत. वर उल्लेखिलेला सर्व प्रदेश चिमणाजी आप्पांच्या स्वारीमुळें हल्ली पेशव्यांच्या ताब्यांत आला होता. याच वेळीं मानाजी व तुळाजी आंग्रे यांच्या परस्पर यादवीचा फायदा घेऊन नानासाहेब पेशव्यांनीं मानाजीला हातांशीं धरलें, व तुळाजीच्या सत्तेचा बीमोड केला. त्यामुळें आपले नूतन हितकर्ते जे पेशवे त्यांच्या पत्राला मानाजीनें विशेष आदरानें मान दिल्यास नवल नाहीं. म्हणून श्रीमंतांच्या पत्रानुसार खुद्द मानाजी आंग्रे यांनीं अष्टागरस्थ ब्राह्मणांना उद्देशून विनंतीपत्रें पाठविलीं, व क्रमवंतांशीं कोणत्याही बाबतींत लढा न करतां शके १६७८ मध्यें ठरल्याप्रमाणें प्रत्येकानें वागावें अशी त्यांनीं शिफारस केली. सरळ मनाच्या ब्राम्हणांनीं त्याप्रमाणें वागावयाचें कबूल केलें. रेवदंडकर ब्राह्मण मानाजी आंग्र्याला पाठविलेल्या पत्रांत लिहितातः-

" † अतःपर किमपि लढा राहिला नाहीं. ......... पूर्वोक्त प्रमाणें क्रमवंतांस पंक्तीस घेऊन भोजन केलें. आपले प्रांतीं व्यवहार चालता करणार आपण समर्थ आहांत."

पण कांहीं ठिकाणीं पेशव्यांच्या याही पत्राचा तादृश उपयोग झालेला दिसला नाहीं. क्रमवंतांचा छळ करण्याचा उपक्रम अष्टागरांतील कांहीं ब्राम्हणांनीं तसाच अव्याहत चालू ठेवला. क्रमवंतांशीं भोजन प्रतिभोजनाचा व्यवहार ठेऊं नये, त्यांना अनुष्ठानास

---

* पान २२ † पान २६

बोलावूं नये, त्यांच्याकडील निमंत्रण आलें असतां त्यांचा अवहेलना करावी, असा त्यांनीं उपक्रम ठेवला. इतकेंच नव्हे तर क्रमवंतांशीं अन्नोदक व्यवहार व अनुष्ठान व्यवहार ठेवणाऱ्या ब्राम्हणांना पंक्तिबाह्य ठरविण्यापर्यंत या हट्टवादीपणाची मजल गेली. कागाळ्या कानावर गेल्यामुळें पेशव्यांनीं पुनः पुनः अष्टागरांतील ब्राम्हणांना ताकीद द्यावी. पण उपड्या घड्यावर ओतलेल्या पाण्याप्रमाणें सर्व व्यर्थ गेलें. बाळाजी बाजीराव त्यांस एका पत्रांत लिहितात :– "† पंक्ति व्यवहार करून तुम्हांस व शिष्टांस पत्रें पाठविला असतां तुम्हीं म्हणतां कीं यांचे घरीं भोजनास जाणार नाहीं व यांस कोठें अनुष्ठानही सांगणार नाहीं तरी यांस संमत पत्रापेक्षां अधिक गोष्टी बोलावयास प्रयोजन नसे. अन्यथा वर्तणूक केल्यानें क्षमा होणार नाहीं." अशा रीतीनें पेशवे आपल्याकडून ब्राम्हणांना विनंती करून व वेळप्रसंगीं धाकदपटशा दाखवून ग्रामण्याच्या मूर्ख व्यवसायापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत होते. त्याचा कांहीं तर्कटी ब्राम्हणांखेरीज इतरांवर योग्य तो परिणाम झाला.

कांहीं दिवसांनीं वादाला तोंड निराळ्या ठिकाणीं पडलें. आजपर्यंत ग्रामण्याची धुमश्चक्री अष्टागरांत चालली होती, पण त्याचें लोण लवकरच कल्याणपर्यंत जाऊन पोहोंचलें. कल्याण मुक्कामीं रा. रामचंद्र दीक्षित जोगळेकर यांच्या घरीं ब्राम्हण-समाराधना झाली त्यावेळीं पंक्तीमध्यें क्रमवंत बसले होते, म्हणून अष्टागरस्थ चौघे ब्राह्मण गोपाळभट्ट गाडगीळ, शंकरभट्ट सोहनी, गणेशभट्ट करवे व गोविंदभट्ट पाळंदे हे पंक्तीमधून उठून गेले. इतर मात्र न उठतां जेवले. पूर्वीच्या संमतिपत्रांत ठरल्याप्रमाणें क्रमवंतांना पंक्तिबाह्य समजणाऱ्या या चार ब्राह्मणांना शिक्षा व्हावयास पाहिजे होती. पण ती झाली नाहीं. अवमानाचें परिमार्जन व्हावें म्हणून क्रमवंतांनीं पेशव्यांकडे पुनः दाद मागितली. चौकशी झाली व त्यांत या चार ब्राह्मणांनी राजाज्ञा व शिष्ट-मर्यादा मोडली म्हणून पातकाचा परिहार होण्यासाठीं ब्राम्हणांनीं त्यांना निबंधोक्त प्रायश्चित्त द्यावें असें ठरलें. या पत्रांत पुढें म्हटलें आहे " * पुढेंही जो मर्यादेचें उल्लंघन करील त्यास शासन करावें. जो तुमचें न ऐकेल त्याचें पारिपत्य येथून होईल. अशा रीतीनें हट्टवादी ब्राम्हणांना शिक्षा करण्याचा आपला निश्चय पेशव्यांनीं जाहीर केला. क्रमवंतांशीं पंक्तिव्यवहार करण्याचें नाकारणाऱ्या ब्राम्हणांच्या डोळ्यांत हें झणझणित अंजन पडलें. अष्टागरस्थ ब्राम्हणांनी १६७८ च्या संमतिपत्रांतून नवीन

---

† पान २३

* पान २४

एक श्लेषार्थ काढला होता. ते पंक्तिव्यवहार करण्यास कबूल होते पण सभेमध्यें बसले असतां क्रमवंतांना गंधतीर्थादि देणार नाहीं, व त्यांना सुब्राम्हण मानणार नाहीं अशी त्यांनीं नवीनच हिकमत लढविली. या मूर्खपणाचा वरील पत्रांत चांगलाच परामर्श घेतला आहे. अन्नव्यवहार मात्र करावयाचा आणि गंधतीर्थ देतेवेळीं हात मागें आंखडता घ्यावयाचा हे शिष्टसंमत नव्हतें, इतकेंच नव्हे तर केवळ मूर्खपणाचें होतें. ही टूम काढणाऱ्या ब्राम्हणांचा हेतु क्रमवतांचा सभेंत मानभंग करावयाचा व त्यांना फक्त ' ब्राम्हणसम ' लेखावयाचें असा होता.

पण पेशव्यांच्या आणि ब्राह्मण सभांच्या संमतीला गुंडाळून ठेवणारे जनानमर्द ब्राह्मणभाई अष्टागरांत होतेच. त्यांच्या मनावर आज्ञापत्रांचा आणि संमतिपत्रांचा काडीमात्र परिणाम झाला नाहीं. त्यांनी क्रमवंतांशीं पंक्तिव्यवहार करणाऱ्या लोकांना वाळींत टाकलें. पुनः बाळाजी बाजीराव पेशव्याला या बाबतींत निकरानें लिहिणें भाग पडलें " † तुह्मी तट करून क्रमवंतांचे संबंधी व यांस वाळींत टाकलें हे गोष्ट अयोग्य केली..... संमतिपत्रास कुतर्क नानाप्रकारें करून कलह वाढवून कजिया येथें आणितां हें उत्तम नसे. फिरोन कजियाचा बोभाटा आलियास क्षमा होणार नाहीं. " या आमण्यामुळें अष्टागरांत दोन तट पडले. कांहींजण क्रमवंतांशीं पंक्तिव्यवहार व अनुष्ठान व्यवहार करूं लागले तर कित्येकांनी त्यांच्याशीं अन्नोदक व्यवहार बंद केला. पेशव्यांच्या आज्ञेचा खुद्द ब्राह्मणांकडून असा उपमर्द केला जात आहे असें पाहून पेशव्यांचे महालकरी व सुभेदार यांनीं आंग्र्याला पत्रें लिहिलीं व संमतिपत्राप्रमाणें सर्व व्यवहार आपल्या राज्यांत चालू करण्याचें विनंतिपूर्वक सुचविलें. उंदेरींचे सुभेदार नारो त्रिंबक सोमण हे राघोजी आंग्र्याला एका पत्रांत ह्मणतात, " * श्रीमंत वलयांकित पृथ्वीचे सत्तापुरुष यावरार बंगाल व महाक्षेत्र वाराणसी पावेतों यांची आज्ञा कोणी मोडीत नाहीं. असें असोन आपला त्यांचा पुरातन घरोबा येथेंच त्यांचे आज्ञेचा लोप स्वल्प गोष्टीसाठीं होतो हे शब्द लागावयाचें कारण यास्तव लिहिलें असे...... आह्मी हुजूरची आज्ञा पाहून क्रमवंतांसहित अनुष्ठान व महारुद्र करवून पंक्तीस तीर्थगंधादिक यथाविधि पूजन केलें. " पेशव्याचा अंकित जो नारो त्रिंबक याला उंदेरीस जें करणें शक्य झालें तें स्वतंत्र सत्ताधीश राघोजी आंग्र्याला कां करतां येऊं नये? त्याचप्रमाणें दुराग्रही ब्राम्हणांनीं आपल्या विरुद्ध केलेल्या तटाची तपशीलवार हकीकत राघोजीच्या कानांवर क्रमवंतांनीं घातली. व पूर्ववत् एकदिलानें व्यवहार चालवावा म्हणून विनविलें. या दोन पत्रांप्रमाणें राघोजीनें मुरुड मुक्कामाहून आपल्या आजीला पत्र लिहून क्रमवंतां–

---

† पान २८ * पान ३०

विरुद्ध तट मोडण्याविषयीं विनविलें. उद्देगीस कमवंतांशीं व्यवहार विनबोभाट चालतो मग अग्रगरांत एवढा बखेडा कां माजावा याचें राघोजीस नवल * वाटलें. पण यांत अर्थात् नवल वाटण्यासारखें कांही नव्हतें. कारण कांहीं स्वार्थलोलुप व हट्टी ब्राम्हणानीं कमवंतां विरुद्ध जे बहिष्कार अस्त्र उगारलें होतें तें पेशव्यांच्या आज्ञे वरूनही परत म्यानांत घालण्याचा त्यांचा इरादा नव्हता. खुद्द चेऊल रेवदंडा प्रांतांतही जरी वरवर सलोखा नांदत असल्याचा देखावा दिसत होता, तरी कारणपरत्वें ठिकठिकाणीं वादाला तोंड फुटत होतें. कसबें चेऊल येथील वे. शा. सं. पुरुषोत्ताम जोशी व बचंभट्ट रायरीकर यांनी अशी तक्रार केली कीं, वे. शा. सं. बापूभट्ट नेने, दामोदरभट्ट धर्माधिकारी वगैरे शिष्ट ब्राम्हणांनीं कमवंत संबधीयांशीं अनुष्ठान-व्यवहार व अन्न-व्यवहार केलें म्हणून बापूभट्ट प्रथम व बाळंभट्ट मोदगी इत्यादि पांचसात ब्राह्मणांनीं त्यांना चाळींत टाकण्याचें ठरविलें. “ X तुह्मी कमवंताचें संबंधी याजकरितां तुम्हांसमागमें जे अनुष्ठान करितील त्यांसमागमें व तुम्हां समागमें अनुष्ठान करीत नाहीं.” हें कृत्य अर्थात् संमतिपत्राविरुद्ध होतें. या सर्व भानगडींत ब्राम्हणांचा कावा असा होता कीं पंक्तिव्यवहार नीट चालवावयाचा नाहीं, आणि वृत्ति मात्र इतरहस्तें चालवावयाच्या. म्हणजे याचा सरळ अर्थ असा कीं कमवंतांना पंक्तिबाह्य ठरवावयाचें आणि त्यांच्या वृत्तींचा अपहार करून आपली तुंबडी भरावयाची. तेव्हां कमवंतांनी पुन्हां तक्रार करून पूर्वीच्या संमतिपत्रांत एक दुरुस्ती सुचविली, “ § त्यास पंक्तिव्यवहार येकवाक्यता करून यथास्थित न चालवीत आणि वृत्तिमात्र अन्यहस्तें चालवूं म्हणतात तरी इतर हस्तें वृत्ती चालवावी याच्या मना झाल्या विना पंगत चालत नाहीं.” शके १६७८ सालांत झालेल्या संमतिपत्रांतील शल्याप्रमाणें बोचणारें जें तिसरें कलम तें रद्द करण्याबद्दल ही विनंति होती. पण तें कलम समूळ रद्द न करतां तडजोड म्हणून एक निराळी पुस्ती त्या वेळचे पेशवे माधवराव बल्लाळ यांनीं त्याला जोडली. ती अशी “ § पंक्तीस व तीर्थगंधास दिक्कत करूं लागले तरी वृत्ति इतरहस्तें चालों न देणें.” सर्वनाशापेक्षां अर्धनाश बरा या न्यायानें कमवंतांनीं या दुरुस्तीला मान्यता दिली. पण हट्टी भिक्षुकांचा दुराग्रह यानेंही कमी होण्याचा संभव दिसेना ! पेशव्यांच्या सहीशिक्क्यानिशीं आलेलें पत्र सर्व ब्राम्हणांना समजावें व यापुढें कोणांही तंटा न पाडतां सर्व व्यवहार सुरळित चालवावा म्हणून अलीबाग मुक्कामीं काळंबिकेच्या देवळांत, वरसोली, थळ, किहीम, आवास, सासवनें येथील समस्त शिष्ट, भिक्षुक, महाजन

---

* पान २९ X पान ३२ § पान ३३

व गृहस्थ लोकांची प्रचंड सभा राघोजी आंग्रे यांनीं बोलाविली. श्रीमंत पेशव्यां-कडून आलेलें पत्र सभेमध्यें वारंवार वांचून दाखविलें. पूर्वीप्रमाणें क्रमवंतांशीं सर्वांनीं तीर्थगंध अन्नव्यवहार व अनुष्ठान व्यवहार सुरळित चालवावा, पेशव्यांचा आज्ञाभंग करूं नये. कोणी आक्षेप केल्यास वृत्ति इतर हस्तें चालविण्याची जी सवड संमति पत्रांत ठेवली आहे ती काढून घेण्यांत येईल, असें राघोजी आंग्रे यांनीं सर्वांस बजावलें. परंतु कित्येक दुराग्रहीं ब्राह्मणांस तें आवडलें नाहीं. त्यांनीं "* आग्रह निवेदन केला कीं पंक्तीस मात्र घेऊन तीर्थगंध घेणार व लावणार नाहीं." राघोजी आंग्र्यांनीं पुन्हां त्यांना बजाविलें कीं यापुढें कांहीं कुरापती काढून भांडणें उपस्थित केल्यास वृत्ति दुसऱ्याच्या हातून चालविण्याची सवड मिळणार नाहीं. अशा रीतीनें ग्राम-ण्याचें रडगाणें संमतिपत्रें व आज्ञापत्रें यांना न जुमानतां तसेंच चाललें होतें. कित्येक तर्कटी ब्राम्हणांनीं क्रमवंतांना अनुष्ठानास न बोलविण्याचें आपलें दुराग्रही व्रत तसेंच कायम † ठेवलें. मध्यंतरीं शके १६९१ मध्यें राघोजी आंग्र्यांच्या मातुश्रीनें श्रीसंगमेश्वर येथें देवालयाचा जीर्णोद्धार केला, व मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. त्या निमित्तानें अष्टागरांतील सर्व ब्राम्हण मंडळीला अनुष्ठानासाठीं पाचारण केलें होतें. ग्रामण्याच्या भूतानें पछाडलेल्या कांहीं ब्राम्हणांखेरीज बाकी सर्व ब्राम्हण आले, व अनुष्ठान समारंभ सुरळीत पार पडला. पुढें दीड दोन महिन्यांनीं संगमेश्वरीं क्रमवंतांबरोबर ज्या ब्राम्ह-णांनीं पंक्तिव्यवहार केला होता, त्यांना पंक्तीस घेऊं नये अशा अत्याचाराला सुरवात झाली. नंतर लौकरच शके १६९२ च्या वैशाखांत राघोजी आंग्रे यांनीं कुलाबा किल्ल्यांत एक तलाव बांधला होता त्याचा तडागोत्सर्गविधि करावयाचा प्रसंग आला. आंग्र्यांचे कुलगुरु व धर्माधिकारी क्रमवंत त्यांच्यावर अद्यापि कित्येक ब्राह्मणांनीं आकसानें ग्रामण्य ठेवलें होतें हें पाहून आंग्र्यांना पंचाईत पडली. क्रमवंतांनीं हक्कदार म्हणून अग्रमान द्यावा तर कित्येक ब्राह्मण रागावणार व कदाचित् समारंभाला हजरही राहणार नाहीत. व जर प्रतिस्पर्धी लोकांच्या विरोधाला मान देऊन क्रमवंतांना बोलावूं नये तर पेशव्यांची हुकूमवजा शिफारस लाथाडण्याचें पातक आपणांस लागावयाचें. तेव्हां कित्येक दिवस गाजणाऱ्या या ग्रामण्याचा कायमचा सोक्ष-मोक्ष करून घ्यावा या इरायानें राघोजीनें अष्टागर व इतर ठिकाणच्या सर्व ब्राम्हणांना पाचारण केलें व "§ आम्हांस तडागोत्सर्ग करणें आहे तेव्हां सर्वांनीं अनुष्ठानीं निवेश करऊन भोजनादिक जाहलें पाहिजे." असा आपला हेतु त्यांनीं स्पष्टपणें सर्वांपुढें मांडला

---

* पान ३९ † पान ४५ § पान ३९

आजपर्यंत क्रमवंतांना शिष्टांची कित्येक संमतिपत्रें व पेशव्यांचीं आज्ञापत्रें आणलीं होतीं, व त्याप्रमाणें प्रत्येकानें वागावें अशी सर्वांना निक्षून ताकीद मिळाली होती. तरी आतां प्रश्न असा आला होता कीं, संमतिपत्रें सर्वांना अक्षरशः मान्य आहेत कीं नाहीं. ज्यांना मान्य नसतील त्यांनीं पुनः पेशव्यांच्या दरबारीं जाऊन पूर्वीचीं संमतिपत्रें रद्द करण्याविषयीं फेरहुकूम आणावा. अर्थात् पुण्याला जाऊन पूर्वीचीं पत्रें फिरवून आणण्याचें सामर्थ्य किंवा धाडस कोणांतच नव्हतें. कारण त्या वेळीं जें ग्रामण्य चालू होतें तें बेकायदेशीर, अन्याय्य आणि हट्टवादीपणाचें होतें. शेवटीं संमतिपत्राप्रमाणें वागण्याचा निर्धार सर्वांनीं जाहीर केला, व समस्त अष्टागर प्रांतस्थ ब्राह्मणांचें नवीन एक संमतिपत्र शके १६९२ सालीं तयार झालें. शके १६७८ सालच्या पेशव्यांच्या दरबारीं ठरलेल्या संमतिपत्राप्रमाणें वागण्यास तयार आहों म्हणून अष्टागरांतील २२२ प्रमुख ब्राह्मणांनीं या संमतिपत्रावर सह्या केल्या आहेत. अष्टागरांतील विद्यमान ब्राह्मणांनीं यापैकीं आपले पूर्वज कोणते आहेत हें पडताळून पहावें, म्हणजे क्रमवंतांबद्दल अद्याप कोणाची साशंकवृत्ति असल्यास त्यांची संशयनिवृत्ति होईल.

हें संमतिपत्र झाल्यानंतर राघोजीचा तडागोत्सर्गमहोत्सव मोठ्या थाटानें बिन-तक्रार पार पडला. नंतर आंग्र्यांनीं शिवाजीराव वाजी घाटगे, नरसिंगराव गोसावी, बाबाजी बल्लाळ चिटणीस, खंडेराव ताला सुभेदार, इत्यादि आपल्या हाताखालील अंमलदारांना पत्रें पाठवून संमतिपत्राप्रमाणें सर्वत्र कारभार चालू ठेवण्याविषयीं सक्त ताकीद दिली. आंग्रे व पेशवे यांचा द्विदळ कारभार जेथें सुरू होता त्या दुतर्फा प्रदेशांत लक्ष्मण विठ्ठल कारखानीस यांनीं श्री. विठोबाचें नवीन देवालय बांधलें होतें. त्या देवाची प्राणप्रतिष्ठा क्रमवंतांच्या हस्तें करावी असें बाबूराव आंग्र्यांनीं आपाजी बहिरट सुभेदार यांस कळविलें, व प्रतिष्ठा त्यांच्या कडूनच * करविली. व आपले दिवाण परशुरामपंत विवलकर यांस क्रमवंतांची पूर्वापार वृत्तीवर स्थापना करून पूर्वपद्धतीप्रमाणें व्यवहार चालवावा अशी ताकीद दिली †.

इतक्यांत अलीबाग नजीक नागांव येथें आणखी एक स्फोट झाला. वे. शा. सं. जगन्नाथ शास्त्री क्रमवंत हे अष्टागरांत प्रसिद्ध विद्वान् गृहस्थ होते. ते इतर क्रमवंतांसमवेत

---

* पान ४८

† पान ५०

वैदिकांच्या सभेंत बसले असतां † त्यांच्याशीं द्वेषभाव धरून नागांवच्या वे. शा सं. गोविंदभट वैशंपायन या नावांच्या एका ब्राह्मणानें त्यांना सभेंतून उठविलें, व तेव्हांपासून ग्रामण्याला पुनः जोर चढूं लागला. पूर्वीं कान्होजी आंग्र्यांच्या समोर ब्राम्हणांच्या सभेत क्रमवंतांना अपंक्त ठरविल्यापासून उत्पन्न होणारा पैसा सरकारजमा होऊन अनामत रहात असे. त्यावेळीं उंदेरी दुतर्फा प्रदेशात मोडत असे. कांहीं स्वार्थी ब्राह्मणांनीं उंदेरीच्या सुभेदाराकडे जाऊन वृत्तीचा पैसा इतःपर सरकारजमा न करतां तत्रांतस्थ ब्राम्हणांना द्यावा, क्रमवंतांचा त्यावर हक्क नाहीं, अशी त्यांची गैरसमजूत करून दिली. उदेरीच्या सुभेदाराला पूर्वापार हकीकत ठाऊक नसल्यामुळें त्यांनीं वृत्ति सरकारजमा न करण्याबद्दल मोकळीक पत्र लिहून दिलें. नागांवच्या वे. शा. सं. जगन्नाथ शास्त्री क्रमवंतांना ही हकीकत कळल्याबरोबर ते जरूर तीं कागद-पत्रें घेऊन उंदेरीस आले, व त्यांनीं सुभेदाराला सर्व परिस्थिति समजावून दिली. कागद पत्रांवरून उंदेरीची वृत्ति क्रमवंतांची आहे अशी त्याची खात्री पटली, व गैर-समजानें पूर्वीं दिलेलें मोकळीकपत्र त्यांनीं तावडतोब रद्द केलें. या अत्याचाराला पुनः आळा बसावा म्हणून जगन्नाथ शास्त्री आपला दस्तऐवजी पुरावा बरोबर घेऊन पुणें मुक्कामीं पेशव्यांच्या दरबारीं आले, व वृत्तीचा पैसा व पंक्तिव्यवहार याबद्दल पुनः बंदोबस्त व्हावा म्हणून त्यांनीं पेशव्यांची प्रार्थना केली. पण हा ब्राह्मणांचा तंटा असून त्यांत व्यवहाराचा प्रश्न उत्पन्न झालेला होता म्हणून वे. शा सं. जगन्नाथ शास्त्री यांना हुजूरकडील मुख्य न्यायाधीश वे. शा. सं. बाळशास्त्री बावा दीक्षित टेंकेकर यांचेकडे जाऊन त्यांना सर्व हकीकत समजावून द्यावी असें सांगण्यांत आलें. बाळशास्त्री दीक्षितांनीं सर्व कागद पुरावा तपासून पाहिला, व क्रमवंतां-विरुद्ध त्यावेळीं चाललेलें ग्रामण्य अन्यायाचें आहे असें कळल्यावरून पंक्तिव्यवहार व वृत्ति यांबद्दल क्रमवंतांना अनुकूल असा निकाल दिला. त्याप्रमाणें अंमल बजावणीसाठीं आंग्र्यांकडे व दुतर्फांत आज्ञापत्रें पाठविण्यांत आलीं, व पूर्वीप्रमाणें सर्व व्यवहार निर्वेध चालवावा म्हणून समस्त ब्रम्हवृंदास पुनः बजावण्यांत आलें. क्रमवंताशीं पंक्तिव्यवहार न करतां वृत्ति दुसऱ्यांच्या हातून चालविण्याचा कोणी हट्ट धरल्यास त्यास तसें करूं देऊं नये, व जो ब्राह्मण शिष्टमर्यादा उल्लंघील त्याचें पारिपत्य आंग्रे सरकारनें करावें, व प्रसंग पडल्यास पेशवे सरकारही त्याला शिक्षा केल्याशिवाय रहाणार नाहीं, असें या पत्रांतही पुनः फरमाविण्यांत आलें.

---

† पान ५१

श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशव्यांच्या कारकीर्दीपासून थोरले माधवराव पेशव्यांच्या अमदानीपर्यंत, आणि अष्टागरांत सवाई सरखेल कान्होजी आंग्र्यापासून तहत बाबूराव मामा आंग्रे यांच्या कारकीर्दीपर्यंत, क्षमवंत ग्रामण्याबद्दल अनेकवार सभा झाल्या, अनेक संमतिपत्रें झाली, व पेशव्यांच्या शिक्कामोर्तबानिशीं राजाज्ञा मिघाल्या, पण त्यानें अष्टागरस्थ तकेंटी ब्राह्मणांचें पूर्णपणें समाधान झालें नाहीं, किंवा खरी गोष्ट सांगावयाची तर त्यांनीं स्वतःचें कधींच समाधान होऊं दिलें नाहीं. आतां निराळ्या उपाय योजून ग्रामण्याचा कायमचा निकाल लागतो कीं काय हें बघावयाचें होतें. आजपर्यंत पुराव्याची छाननी करून निकाल देण्याचें काम पुणें वगैरे परप्रांतीं झालें होतें. त्यामुळें, अष्टागरांतील आग्रही माणसांना तेवढीच फट सांपडली होती. म्हणून पुणेंदरबारचे खंडेराव नीळकंठ यांनीं अष्टागरांतच पंच कमेटी बसवून वादाचा निकाल करून घ्यावा असें सुचविलें. क्षमवंत प्रकरणामध्यें आजपर्यंत जे जे कागदपत्र झाले होते ते सर्व क्षमवंतांजवळ होतेच. विरुद्ध पुराव्याची उभारणी करण्यासाठीं, किंवा क्षमवंतांजवळील पुरावा नाशाबीत करण्यासाठीं, विरोधी लोकांजवळ जो पुरावा असेल तो त्यांनीं पंचकमेटीपुढें ठेवावा व्यवहारनिर्णयाच्या नेहमींच्या पद्धतिप्रमाणें सबळ निर्बळ पुराव्याची तुलना करून पुराव्याचें भरपूर माप अपराधी पक्षाच्या पदरांत टाकावें म्हणजे त्यांचीं तोंडें बंद होतील अशी ही उपाय योजना होती. "* तुम्ही व राजश्री बाबूराव दिवाणजी व खंडोपंत नाना वगैरे मिळोन यांजवळचीं कागदपत्राचीं साधनें पाहून वैशंपायनादि जे जे ब्राम्हण यांसी दुराग्रहासी प्रवर्तक जहाले असतील त्यांस बोलावून त्यांजला पुरसीस घालून त्याजपाशीं क्षमवंत ब्राम्हणांविशीं काय साधनें आहेत तीं आणवून यांचे साधनाचीं जुनरुसी करून त्यांत सबळ निर्बळपक्ष ध्यानांत आणून...' सर्वांना या चिवटत चाललेल्या ग्रामण्यप्रकरणाचा फार किळस आला होता. या खेपेला तत्प्रांतस्थ लोकांकडूनच निर्णय वदवून घ्यावयाचा होता असें दिसतें. ग्रामण्याचें "जेथून आवाहन तेथून विसर्जन" करणें योग्य होतें, म्हणून अष्टागरांतच याचा निर्णय करण्याचें या योजनेप्रमाणें ठरलें. इतक्या उपर हटवादी ब्राम्हण जर ऐकणार नाहींत व कलह करण्यास प्रवृत्त होतील तर त्याच पत्रांत एक निराळी योजना लिहिली होती. हटवादी ब्राम्हणांची यादी करून जामीन घ्यावे व त्यांनीं आपलें म्हणणें पुढें मांडण्यासाठीं आपले दोन प्रतिनिधि पुण्यास पाठवावे. क्षमवंतांनींही आपली बाजू मांडण्यासाठीं आपल्यातर्फे दोन प्रतिनिधि पाठवावे. हे प्रतिनिधि स्वतांच्या पक्षाची म्हणून जी हकीकत सांगतील, व त्यावरून जो निर्णय ठरेल तो आम्हाला पूर्णपणें मान्य आहे, असा दोन्ही पक्षांच्या ब्राम्हणांचा कबुलीजबाब

---

* पान ६१

आणि अखत्यारपत्र प्रतिनिधींनीं पुण्यास आणावें, इतकेंच नव्हे तर आमच्या मंडळींना विचारून येतों आणि मग निर्णयात्मक उत्तर देतों, अशी दिरंगाईला उपयोगी पडणारी पळवाट प्रतिनिधींनीं ठेऊं नये, येतांना सर्वाधिकार देऊन यावें. अशागरांतील पंचकमेटीची सभा जर वांझ ठरली, तर पुण्यास या स्वरूपाची दुसरी एक पंचकमेटी नेमून तिच्यातर्फे निकाल व्हावा, व तो सर्वांनीं सक्तीनें मान्य केलाच पाहिजे, अशी योजना खंडेराव नीळकंठ यांनीं शिवाजीराव बाजी घाटगे याला लिहिलेल्या पत्रांत आंखलेली आहे.†

या पत्रांत आंखलेल्या योजनेची अंमलबजावणी करण्याचा प्रसंग आला नसावा असें दिसतें. कारण लवकरच क्रमवंतांतर्फे वे. शा. सं. जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांनीं पुणें मुक्कामीं जाऊन बाळशास्त्री दीक्षित यांना सर्व हकीकत समजावून दिली. व पूर्वी प्रमाणें क्रमवंतांशीं सर्व व्यवहार सुरळीत चालवावे अशा अर्थाचें बाळशास्त्री दीक्षितांचें आज्ञापत्र आणलें.

या ग्रामण्याचें प्रकरण अशा रीतीनें जरी वरवर थंडावलें दिसत होतें, तरी मधून मधून दुराग्रही लोकांनीं क्षुद्र कटकटी उत्पन्न करून वर्दळीवर येण्याचा उपक्रम कायमच ठेवला होता. क्रमवंतांच्या वृत्तींत घुसून त्यांना इतर भिक्षुकांनीं बहुतेक हुसकावून दिलें होतें, व जरी वेळोवेळीं पेशवे सरकारच्या सक्तीच्या आज्ञा येत कीं कोणीही नवीन भानगडी उपस्थित करू नयेत, पूर्वीच्या संमतिपत्राप्रमाणें आपलें वर्तन ठेवावें, क्रमवंतांशीं पंक्तिव्यवहार व अनुष्ठानव्यवहार पूर्वीच्या वहिवाटीप्रमाणें अविच्छिन्न कायम ठेवावा, यांत जे लढा उत्पन्न करतील व वृत्ति स्वतःच चालवूं ह्मणतील त्यांना तसें करूं देऊं नये. तरीही स्वार्थलोभाला बळी पडलेले व दुराग्रहानें पछाडलेल्या कांहीं अष्टागरस्थ ब्राम्हण लोकांना पेशव्यांची आज्ञा मानली नाहीं, व शेवटीं आपलाच हट्ट तडीस नेला. विरोधी लोकांना स्वतःचा उपाध्याय नेमून क्रमवंतांना वृत्तीचा निम्मा भाग देण्याची मोकळीक १६७८ च्या संमतिपत्रानें दिल्यामुळें क्रमवंतांचें अपरिमित नुकसान झालें. इतर भिक्षुकांच्या भीडेला बळी पडून पेशव्यांनीं हा आपल्यावर अन्याय केला आहे असें क्रमवंतांना वाटत होतें. त्यामुळें जे लोक राजीखुषीनें त्यांना आपले उपाध्ये म्हणून बोलावीत, व त्यांच्या हातानें हव्यकव्यें करीत, त्यांच्या घरीं क्रमवंत जात, व रीतसर वृत्तीचा अंश घेत. पण क्रमवंतांचा अग्रहक्क असूनही त्यांना न बोलावितां जे गृहस्थ इतरांना बोलावून त्यांच्या हस्तें आपलीं धर्मकर्में उरकीत असत, त्यांच्या घरून कायदा म्हणून आलेला वृत्तीचा अंश क्रमवंत घेण्याचें नाकारीत. त्यामुळें या पक्षाचें काय

---

† पान ६१

करावयाचें असा साहजिकच प्रश्न उपस्थित झाला. तो पैसा आंग्रेसरकारकडे कमवंतांच्या नांवानें अनामत जमा व्हावा असें ठरल्यामुळें वृत्तिचा कायदेशीर अंश सरकारी खजिन्यांत भरीत. पुढें आंग्रे यांचे राज्य खालसा झाल्यावर ब्रिटिश रियासत सुरू झाली, त्यावेळीं पैशावर हक्क सांगावयास कमवंतांपैकीं कोणीही पुढें न आल्यानें लाख रुपयांपर्यंत सांच-लेला हा निधि शेवटीं कायमचा सरकारजमा झाला असें सांगतात. असो.

इतर मनुष्याच्या हातानें धर्मकर्म चालविल्यामुळे वृत्तीचा अंश म्हणून मिळणारा पैसा कमवंतानीं नाकारला हें वर आलेच आहे. कमवंतांनीं तेजस्वीपणानें केलेला हा स्वार्थत्याग पाहून कित्येकांच्या नाकाला मिरच्या झोंबल्या. खरें म्हटलें असता कमवं-तांनीं वृत्यंश नाकारला यांत इतरांना लागण्यासारखें काय होतें? पण कांहीं त्याला खवखवे या दृष्टीनें इतर भिक्षुकांना परोत्कर्ष सहन न होऊन त्यांनीं कमवंतांचा छळ करण्याचा आपला उपद्व्याप तसाच चालू ठेवला. कमवतांना वठणीवर आणण्यासाठीं त्यांनीं एक अजब उपाय योजला. त्यांना कोणत्याच धर्मकार्यांत सामील करून घेतलें नाहीं म्हणजे आपोआप ताळ्यावर येतील, या ठरावाप्रमाणें जे वागणार नाहींत त्यांच्यावर बहिष्कार घालावा. अशा रीतीनें त्यांना चोहोबाजूनें कोंडींत धरलें म्हणजे ते आपोआप शरण येतील, असा हा डाव होता. असल्या विकृत मनाचें प्रदर्शन करणारीं जीं पत्रें आमच्या हातीं आलीं आहेत त्यांपैकीं एकच आम्ही पान ७४ वर छापलें आहे. त्यावरून त्यावेळच्या कमवंत विरोधी लोकांच्या मनःस्थितीवर चांगला प्रकाश पडेल. "* जो यजमान कमवंतांस बोलावित नाहीं त्याकडील कार्य संबंधीचा उत्पन्नाचा आपला कायदा न घेत आणि कमवंत घरीं पावता केला तरी न स्वीकारीत तेव्हां कमवंतांस बहुतांनीं पुशिलें कीं, वृत्यंश कां घेत नाहीं. अशास प्रत्युत्तर केलें कीं आह्मांस कार्यार्थ जो बोलविल तेथलि घेऊं. अन्यथा स्वीकार-णार नाहीं. या प्रकारचा त्यांचा दुराग्रह पाहून गाडगीळ पुराणिक प्रमुखांनीं सर्वांनीं एक वाक्यतेनें नियम केला जे या कमवंतां समागमें अनुष्ठान न करावें ह्मणजे सहजेंच उत्पन्न घेतलि. हा नियम हा काळपर्यंत सर्वांचा चालत आला असतां अलीकडे सर्वांचा उपमर्द करून कोणीएक लोभावर दृष्टी देऊन ततसंगें अनुष्ठानें करावयाशीं रामकृष्णभट्ट प्रवर्तले त्यास आपले व्याही, भाचे, जावई यांसही समागमें घेऊन गेले. तथापि आह्मी कोणी न गेलों कां जे संप्रति कमवंतांची प्रवृत्ति पत्रार्थाप्रमाणें नाहीं असें असतां सर्वांचा विचार मनांत आणितां उपमर्द करून पुराणिक प्रवर्तले हा अन्याय पुराणिकांना [illegible]

---

* पान ७४

न गेलों. असें असतां तुमचे गांवचे ब्राह्मण दहावीसपर्यंत येथें अनुष्ठानार्थ जे आले त्यांस हा येथील अर्थ विदित असोन आले कीं आविदित असें आम्हांस कळलें पाहिजे तदनुरूप आम्हीही वर्तावें अशी आमची इच्छा असे." क्रमवंतांची प्रवृत्ति पत्रार्थाप्रमाणें नाहीं म्हणून हे गृहस्थ तक्रार करतात, पण पेशव्यांकडून वेळोवेळीं आलेल्या पत्रार्थाप्रमाणें याची तरी वृत्ति होती काय? तशी वृत्ति असती तर ग्रामण्यरणें माजतें कशाला? या एकाच पत्रावरून ग्रामण्य प्रकरण कसें धुमसत होतें व अनुकूल परिस्थिती मिळाल्यास कसें पेट घेत होतें याची वाचकांना खात्री पटेल.

* पुढें शके १७७६ सालीं आणखी एक प्रकरण उद्भवलें. वे. शा. सं. बाबाचार्य पुणतांबेकर यांचे पुत्र रामाचार्य पुण्याहून बाहेरगांवीं कोठें प्रवासास गेले होते. मध्यंतरीं त्यांच्या कुटुंबानें आपल्या मुलाचा विवाह मोरेश्वर महादेव मुळेकर क्रमवंत सरवेअर यांच्या मुलीबरोबर करण्याचें योजिलें. इतक्यांत मुळेकर क्रमवंतांबद्दल वैष्णवांचे कोणी तरी कान फुंकले असावे असें वाटतें. आधींच वैष्णव आपल्या मताचे कडे अभिमानी, आणि त्यांत कोणी चुगलखोरानें मुळेकरांच्या कुलशीलाबद्दल कांहीं विपर्यस्त माहिती त्यांच्या मनांत भरवून दिली. त्यामुळें या विवाहाच्या योगानें आपणांस गौणपण येईल म्हणून वैष्णवांनीं पुणतांबेकरीण बाईस लग्नाचा विचार तहकूब ठेवण्यास सांगितलें. पण या लुडबुडीकडे लक्ष न देतां बाईनीं विवाह तर उरकला. त्यामुळें वैष्णवांनीं चिडून जाऊन क्रमवंतांच्या कुलशीलाची समग्र चौकशी होईपर्यंत पुणतांबेकरीण बाईचें घर व मुळेकर यांना शके १७७६ सालच्या आज्ञापत्रानें बहिष्कृत केलें. पुनः हा पूर्वीचा प्रसंग ओढवला असे पाहून मुळेकरांच्या बंधुवर्गापैकीं विनायक भिकाजी व गोपाळ नारायण डुल्लु क्रमवंत यांनीं समस्त वैष्णवांच्या सभेंत आपल्याजवळ असलेलीं कागदपत्रें दाखविलीं व "देशस्थ आश्वलायन व आपस्तंब" यांच्याशीं क्रमवंतांचे शरीरसंबंध आजपर्यंत कसे दरोबस्त घडत आले आहेत याची नांवनिशीवार माहिती सांगितली. जमलेल्या वैष्णव मंडळींनीं सर्व पुरावा सूक्ष्म नजरेनें पाहिला. व आपला निर्णय दहा कलमांच्या संमतिपत्रानें जाहीर केला. या संमतिपत्रांत पूर्वीच्या घडलेल्या ग्रामण्य प्रकरणाचा थोडक्यांत क्रमवार गोषवारा दिला असून त्र्यंबकेश्वरचे बाळंभट बिन निळंभट दशपुत्रे व नाशीक श्री. व्यंकटेश संस्थानचे ह. भ. प. मध्वशास्त्रसंपन्न आप्पाजी तिमयाबावा यांच्या स्वदस्तुरच्या साक्षी आंत घालण्यांत आल्या आहेत. इतकेच नव्हे तर क्रमवंतांचे देशस्थांशीं कसे शरीर संबंध झाले आहेत

* पान ६६-७०

हें दाखविण्यासाठीं नमुन्यादाखल एक लहानशी यादी आठव्या कलमांत दाखल केली आहे. व शेवटीं असा निर्णय दिला आहे कीं " † इत्यादि कारणांवरून पहातां क्रमवंत मुळेकर हे देशस्थ ब्राम्हण असून पूर्वीपासूनच देशस्थ ब्राम्हण यांच्याशीं संबध करीत आहेत असें सिद्ध होतें. हा प्रकार पूर्वी समजुतीस न आल्यामुळें कुलशीलाचा विचार होईतोंपर्यंत कन्या देणार मुळेकर व कन्या घेणार बाई पुणतामकर व यांचे सांसर्गी यांस बहिष्कृत केल्याची यादी झाली तो प्रकार सदरी नमूद केला आहे. पण आतां सदरी लिहिल्याप्रमाणें झालेल्या पुराव्यावरून बहिष्कृत ठेवण्याचें कारण कांहीं राहिलें नाहीं असें स्पष्ट सिद्ध होत आहे वास्तव पूर्वीची यादी रद्द करून करून हें संमतपत्र केलें आहे." अशा रीतीनें शके १६४१ सालीं विकारीनाम संवत्सरमध्यें क्रमवंतांबद्दल कित्येकांच्या मनांत जो विकार उत्पन्न झाला होता, त्याचा शें सवाशें वर्षांच्या प्रचंड ग्रामण्याच्या नाटकानंतर निरास होऊन शके १७७६ आनंदनाम संवत्सरामध्यें वैष्णवांच्या हस्तें आनंददायी भरतवाक्य म्हटलें गेलें.

अग्रागरस्थ भिक्षुकांचा हा ग्रामण्यरूपी खेळ झाला खरा. पण त्यांत सर्वेतोपरी नुकसान क्रमवंतांचे झालें. पुष्कळ दिवस अपंक्त स्थितींत राहिल्यामुळें वृत्ति सरकार जमा झाल्या. त्यानंतर त्यांच्या वृत्तीमध्यें इतर भिक्षुक घुसले, व त्यांनीं ब्राह्मणांच्या सर्वही वृत्ति आपल्या कायीज करून घेतल्या. आज ब्राह्मणेतर जातींच्या थोडेशा वृत्ति मात्र क्रमवंतांजवळ आहेत. या बाबतींत अनेकवार लढे उत्पन्न झाले. पण पेशवे किंवा आंग्रे यांच्या हुकुमांची कडक अंमलबजावणी न झाल्यामुळें क्रमवंत घराण्याला उतरती कळा लागली. ज्या अग्रागरांत पूर्वी क्रमवंतांना २५० गांवचीं सनदी वृत्ती होती तेथें ४।५ घरांना सुद्धां पुरेसा निर्वाह करतां येणार नाहीं इतका वृत्तिसंकोच झाला आहे. ज्या चौल प्रांतांत क्रमवंतांचीं सातआठशें घराणीं होतीं असें * बाळाजी विश्वनाथ पेशवे प्रधान म्हणतात तेथें आतां २५–३० घराणीं विपन्नावस्थेत कशी तरी जीव तगवून आहेत. पेशव्यांनीं व आंग्रे यांनीं दुराग्रही ब्राम्हणांची गय न करतां आज्ञा‑मोडल्याबद्दल वेळच्यावेळीं शिक्षा केल्या असत्या व संमतिपत्रांची अंमलबजावणी सक्तीनें केली असती तर क्रमवंतांवर हा दुर्घट प्रसंग ओढवला नसता. केवळ वृत्तीवर डोळा ठेवून स्वार्थी भिक्षुकांनीं ग्रामण्यें उपस्थित केली असें पुढें छापलेल्या कित्येक पत्रांत स्वच्छ म्हटलें आहे, त्यामुळें ज्या मुख्य हेतूनें ही प्रचंड ग्रामण्याची भिक्षुकांनीं उभारणी केली तो त्यांचा हेतू तडीस गेला असेंच म्हटलें पाहिजे. अशा भयंकर स्पर्धाक्षेत्रांत

† पान ६९  * पान १४

उदरनिर्वाहाची पुरेशी सोय नसतां टेक धरून रहाणें कित्येक क्रमवंतांनां पसंत पडलें नाही, किंबहुना शक्यही नव्हतें. ह्मणून नशिबाची परीक्षा पाहण्यासाठीं त्यांना देशोधडीला जावें लागलें. उदर निर्वाहासाठीं पुणें, नाशिक, त्र्यंबकेश्वर, वाई, सातारा, नगर, खानदेश, इंदूर, उज्जनी, ग्वालेर, प्रयाग, काशी इत्यादि ठिकाणी क्रमवंत पुरुष स्थाईक झाले, व तेथील देशस्थ कोंकणस्थांशीच त्यांचे शरीर संबंध सुरू झाले. ज्या क्रमवंत नांवामुळें या कुळावर एवढा गहजब झाला होता तें नांव कित्यकांनीं टाकलें, व दुसरीं नावें धारण केलीं. पुष्कळ दिवसपर्यंत अष्टागरांशीं त्यांचा संबंध तुटल्यामुळें त्यांनीं कोणतीं नांवें स्वीकारलीं आहत, व त्यांची हल्लींची परिस्थिती काय आहे याची माहिती मिळणें अशक्य झालें आहे. त्यामुळें अष्टागरांतून परागंदा झालेले क्रमवंत आज आपल्या पूर्वजांच्या निवास भूमाला पारखे झाले आहेत असेंच ह्मटलें पाहिजे. अशा रातीनें ग्रामण्याचें निराकरण जरी वारंवार झालें तरी भिक्षुकी अत्याग्रहामुळें क्रमवंतांच्या घराण्याची धातःपात झाली. कर्ते पुरुष देशांतरीं गेले. राहिलेल्या वृत्ति उदर भरण्यास अगदीं अपुऱ्या असल्यामुळें क्रमवंतांची सांपत्तिक स्थिती खालावत चालली. या पडत्या काळांतच दुर्दैवानें विद्वत्तेची व कर्तबगारीची परंपरा तुटल्यामुळें अवशिष्ट क्रमवंत घराणीं जवळ जवळ मुमूर्षु अवस्थेमध्यें काळ कंठीत आहेत.

क्रमवंतांवरील ग्रामण्याचा इतिहास सामाजिक दृष्ट्या फार महत्वाचा आहे. शिवाजीमहाराजांच्या उदयकालीं क्रमवंत घराणीं अष्टागरामध्यें पूर्ण वैभवामध्यें नांदत होतीं. विद्वत्ता, ऐहिक संपत्ति, सामाजिक दर्जा, व राजदरबारीं मानमान्यता, या गुणचतुष्टयामुळें क्रमवंत हेवा करण्यालायक सुस्थितींत होते. पण ग्रामण्याची टोळधाड आल्यामुळें ही सर्व टवटवी नाहींशी झाली, आणि आज क्रमवंत घराणीं नेस्तनाबूद होण्याच्या अवस्थेला येऊन पोंचली आहेत. गेलीं दोनशें वर्षे या ग्रामण्याच्या कालकूटाला मधूनमधून कढ येत आहेत व त्याच्या विषारी फवाऱ्यांनीं क्रमवंत घराणीं अत्यंत हैराण झालीं आहेत. क्रमवंतांचा सत्पक्ष होता व त्यांना अनुकूल असे दर खेपेच निवाडे झाले; तरी अल्पसंख्याक क्रमवंतांना बहुसंख्याक इतर ब्राम्हणांपुढें शेवटीं हात टेकण्याची पाळी आली. यावरून ब्राम्हणांचें ग्रामण्य हें शस्त्र जरी वरवर पहाणारास निर्बळ वाटतें तरी तें तसें नसून महाप्रभावी आहे, अशी कोणाचीही खात्री पटेल. या ठिकाणी दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. क्रमवंतांच्या बाबतींत ब्राम्हण्यसंरक्षणाच्या उच्च हेतूनें ग्रामण्याची उभारणी केली नसून विशेषतः क्रमवंतांच्या विस्तृत वृत्तींचा लोभ हें [illegible] बुडाशीं कारण असावें असें वरील विवरणावरून सहज समजेल.

पण ज्या वृत्तीमुळें पूर्वी भांडणें झालीं त्या वृत्ति विद्यमान कायद्याप्रमाणें कायमच्या निकालांत निघाल्यामुळें शिळया कढीला ऊत देऊन पुनः द्वेषाग्नि कां प्रज्वलित करावा असा कोणीहि आक्षेप काढील. पण आरंभीं सांगितल्याप्रमाणें क्रमवंतां वरील ग्रामण्याचा इतिहास हा नुसता मनोरंजक नसून फार बोधप्रद आहे. व हल्लींच्या काळींही सर्व पोट—जातींचें एकीकरण करून ब्राह्मणांचें अंतः सामर्थ्य वाढविण्याच्या खटपटींत आपल्यांतील कित्येक पुढारी मंडळी असल्यामुळें ब्राह्मणांमध्यें कोण कोणांचा अंतर्भाव होतो, व पूर्वी क्षुल्लक कारणांवरून कशा जाती पडत गेल्या, हें पहाणें जरूर आहे. तसेंच पूर्वानुभवानें शहाणे होऊन आपण सर्वांनीं एकीकरणाचा कसा नेटाचा प्रयत्न केला पाहिजे, या गोष्टी सर्वांना कळणें अवश्य झाल्या आहेत. क्रमवंतांबद्दल अपुऱ्या माहितीमुळें किंवा अज्ञानानें आजपर्यंत कित्येकांनीं गैरसमज उत्पन्न करणारीं विधानें केलीं आहेत. व त्यामुळें त्यांना आणि त्यांच्या संबंधी लोकांना आजपर्यंत बराच उपसर्ग पोंचला आहे. केवळ शब्द-सादृश्यामुळें किरवंत × जातीचा आरोप क्रमवंतावर लादला जाऊन आजपर्यंत क्रमवंतांबद्दल बरेच घोंटाळे माजले. पण प्रत्येक दिव्यांतून क्रमवंत घराणें यशस्वी होऊन शीरसलामत बाहेर पडले. हा केवळ क्रमवंतांचाच प्रश्न नाहीं. अष्टागरांतील † शेंकडा पन्नास घराण्यांशीं क्रमवंतांचे शरीरसंबंध झाले असल्यामुळें क्रमवंतांच्या शुद्धाशुद्धतेच्या निर्णयावर या सर्व कुटुंबांच्या शुद्धाशुद्धतेचें भवितव्य अवलंबून आहे. म्हणून क्रमवंतावरील ग्रामण्याची सांगो-पांग माहिती निदान अष्टागरस्थ सर्व ब्राम्हणांना कळणें जरूर आहे. ब्राह्मणजातींच्या अभ्यासकाला ग्रामण्याचा साद्यंत इतिहास कळणें किती अवश्य आहे हें कोणालाही सहज

---

× आद्यगौडब्राह्मण द्वैमासिकाच्या १९२७ च्या दुसऱ्या व तिसऱ्या अंकांत रा. ब. वासुदेव अनंत बांबर्डेकर या इतिहास संशोधकानें कुडाळ प्रांतांतील किरवंत ब्राह्मणांसंबंधी अनेक अस्सल कागदपत्रांच्या आधारावरून लिहिलेल्या लेखामध्यें म्हटलें आहे कीं, " अष्टागरांतील क्रमवंतांचा व दक्षिण कोंकणांतील (कुडाळ प्रांतांतील) क्रमवंतांचा कांहींच संबंध नाहीं. "

† अष्टागरांतील ब्राह्मणजाति परस्परसंबद्ध होण्यास त्यांचे क्रमवंत घराण्यांशीं झालले शरीरसंबंध दुव्याप्रमाणें उपयोगी पडले, हें लक्षांत ठेवलें असतां प्रो. राजारामशास्त्री भागवतांच्या खालील उक्तींचें स्वारस्य सहज मनास पटेल: " अष्टागर प्रांतांत महा-राष्ट्र ब्राह्मणांचे एकमेकांत संबंध होतात ही जगद्विदित माहिती ज्यास नाहीं त्यानें महाराष्ट्र ब्राह्मणांच्या वर्णनाविषयीं लेखणी उचलणें हें मोठें साहस आम्हांस वाटतें." प्रो. रा. रा. भागवतकृत " जशास तसें " पान ४९. त्याचप्रमाणें याच ग्रंथकाराचें दुसरें पुस्तक पहाः " मराठ्यांविषयीं उद्गार " पान ११०.

पटेल. पुढें छापलेल्या कागदपत्रांपैकीं कांहीं कागद ज्या तत्वजिज्ञासु व इतिहासप्रेमी मनुष्यांस पहावयास मिळाले, त्या सर्वांनीं हे कागदपत्र छापून काढण्याविषयीं आमच्याकडे मोठ्या उत्साहानें निकड लावली, या वरून क्रमवंत ग्रामण्याचा इतिहास समाजशास्त्राभ्यासकांना व संशोधकांना किती मनोरंजक व बोधप्रद वाटत असावा याचें अनुमान करतां येतें. ह्मणून आह्मांस उपलब्ध झालेली माहिती ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारानें आह्मीं जनताजनार्दनाच्या सेवेस सादर केली आहे. ती वाचून त्यांपासून लोकांनीं इष्ट तो बोध घेतल्यास आमची अल्प सेवा फलद्रूप झाली असें आम्ही समजूं.

पेठ रामनाथ, अलिबाग.
ता. २५-९-२७

गणेश दामोदर टिल्लू.

श्री.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २० श्रीमुखनामसंवत्सरे माघ बहुलद्वादशी रविवासरे क्षत्रिय कुलावंतस राजाराम छत्रपती–

यांणीं राजश्री मुद्राधारी व लेखक जंजिरेकुलाबा यासीं आज्ञा केली ऐसीजे.

जंजीरे मजकुरीहून वेदमूर्ती जनार्दनभट्ट विननान क्रमवन्त उपाध्ये हे स्वामीसंनिध चंदीचे मुक्कामीं येऊन विदित केलें जे जंजिरे मुक्कामीं श्रीभवानी आहे त्यास आपले उपाधिक चालले पाहिजे म्हणून श्रुत केलें त्यावरून श्रीचे पूजेनिमित्त वे. जनार्दनभट्ट यांस × × × जमा सुदगी करून पाठविलें असे तरी यांस जंजीरे माहून यांचे हातें श्रीभवानीची पूजा करवीत जाणें. यांस वेतन दरमहा कहारी १५ पंधरा रास केला असे. ई॥ सनदपा॥ पासून दरबार शिरस्ता पडल्याप्रो॥ वेतन देत जाणें

संमत मंत्री — रा॥ छ २६ रजब — संमत सचीव

तारीख २६ — माहे जमा दिलाखर

जमादिलाखर — सुरुसुद्र

घारसुद्र.

श्री.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २० श्रीमुख नाम संवत्सरे फाल्गुन बहुलत्रयोदशी भोमवासर क्षत्रीय कुलावंतस श्री राजाराम छत्रपती आणि समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री शंकराजी पंडीत यांसी आज्ञा केली. ऐसिजे. वेदमूर्ती रघुनाथभट्ट बीन दामोदर भट्ट, जनार्दन भट्ट बीन नान कमवंत येही हुजूर स्वामी संनिध येऊन विदित केलें कीं जंजिरे कुलावा येथें श्री भवानीचे देवस्थान आहे व जंजीरे खांदेरी येथें श्रीवेताळ देव आहे. तरी आपण मामले चेऊलचे उपाध्ये या करतां तेथील पूजा आमची आहे ऐशास स्वामिनी आपली दिवाणांत असामी घालून आपलें हातें देवस्थानाची पूजा घेतली पाहिजे म्हणोन त्यावरून तुह्मांस हें आज्ञापत्र सादर केलें असे आणि यांची असामी दिवाणांत घातली असे.

तपशील

| | |
|---|---|
| रघुनाथभट्ट बीन दामोदरभट्ट जंजीरे खांदेरी श्री वेतालाची पूजा सांगोन वेतन वेरीज केलि २५ | जनार्दनभट्ट बीन नानकमवत जंजीरे कुलावा श्री भवानीची पूजा सांगोन वेतन वेरीज केलि २५ |

याची सनद निराळी जंजीरे मजकूरचे कारकूनाचे नांवें सादर आहे तरी तुह्मीं यांचे हातें देवस्थानाची पूजा घेऊन चालविणे बहुत काय लिहिणे तरी तुह्मी सूज्ञ असा।।

श्री.

राजश्री हवालदार व भवानीकारकून जंजीरे

कुलावा गोसावी यांसी.

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो॰ नीळकंठ मोरेश्वर

आशिर्वाद

सुमआर्व तिसेन अलफ वेदमूर्ती रघुनाथ भट्ट क्रमवन्त हे हुजूर येऊन राजे॰ स्वामींच्या दर्शनास चंदीचे मुक्कामीं आले. इहि विदित केलें कीं जंजीरे मजकू देवस्थान श्री...... ....आहे त्याची पुजा उपाध्येपणा आमच्याकडेस आहे. ऐशि यास............स्वामीनीं चित्तास आणून...........आपले स्वाधीन केली पाहि म्हणून विदित केलें त्यावरून राजश्री स्वामी कृपाळू होऊन यांचे उपाध्येपण व पूजा श्री॰ पहिलेपासून आहे हें ममास आणून पेशजी जोशी यांस पत्रें दिलीं होती तें दूर करू हलीं यास करार केलें आणि अलाहिदा राजश्रीच्या सनदा वरून दिल्या आहेत. त तुम्हीं हें जाणून रघुनाथ भट्ट थोर सत्पात्र आहेत त्यांस कोणेविशीं अनमान न करत लिहिल्याप्रों चालवेंग. अंतर पडो न देणें रवाना छ २७ माहे रजब—आज्ञा प्रों.

श्री.

अथ स्वस्तिश्रीमन्नृप शालिवाहनशके १६४१ विकारी नाम संवत्सरे आश्वीन वहुल त्रयोदशी गुरुवासरे तद्दिने संमतपत्रमिदं महाराज श्रीछत्रपती राजाधिराज यां सन्निध येऊन सातारियाचे मुक्कामीं वेदमूर्ती आप्पाजी भट्ट क्रमवंत तथा अनंतभट्ट क्रमवंत या उभयतांनीं आपलें वृत्त निवेदन केलें जे आपण चौल प्रांतीं अष्टागर येथील वृत्तीवंत वहुतकाळपर्यंत आहों ऐशियाशीं या प्रांतीं कुलाव्यास वेदमूर्ती हरीभट्ट लेले इहिं राजेश्री कान्होजी आंग्रे सरखेल यां पाशीं येऊन सांगितलें जे आपण कुडाळ प्रांताकडे गेलों होतों ते काळीं महादू किरविंत होता तो आपणांस बोलला आमच्या प्रांतांहून एक शेणवई मुंबई प्रांतांत वहुत दिवस गेला होता त्या समई आमचाही एक पुरुष कुटुंब घेऊन गेला त्याचें वृत्त काय आहे किंवा नाहीं हें कळत नाहीं. ऐसें बोलत होता तरी हेही क्रमवंत आहेत तरी त्या घराण्यांतील होतील कीं काय ऐसा प्रसंग श्री. राजश्री सरखेल यांज-पाशीं केला त्यावरून तिहीं सभाकरून त्या प्रांतीचे पांच सात व्राम्हण मिळऊन आम्हांस बोलावून नेऊन पुसों लागले कीं हरिभट्ट लेले काय सांगत आहेत तें ऐकणें. तुमचा पुरातन गांव कोण व तुमची जाति कोण हें सांगणें त्यास आम्हीं बोलिलों जें पुरातन आमचें स्थान जोगाईचेआंबे. आमचे गोत्रपुरुष त्या स्थळींहून निघाले. एक पुरुष पुण्यस्तंभीं राहिला त्याचें उपनाम टुल्लू पावलें. दुसरा खिरडे हें उपनाम पावले. आम्हीं कोकणांत अष्टागर प्रांतास आलों आमचे मूळ पुरुष क्रमाईत होते यास्तव क्रमवन्त ऐसें उपनाम पावले आह्मी कांही हरिभट्ट बोलिल्याप्रमाणें किरविंत या उपनामाची जे जाति आहे त्यांची व आमची एक जाति नाहीं. ते कोण जातीचे आहेत हेंही आपणास श्रुत नाहीं ऐसें आपण बोलिलों त्यावरून राजेश्री सरखेल बोलिले व सभासद बोलले तुमचा एक निर्वाह कळला नाहीं तो काल पर्यंत तुह्मीं अपंक्त असा. आपण वहुकांहीं परिहार केला प्रभु समर्थ यासाठीं आमचा उपाय न चाले मग आह्मी त्या स्थळींहून स्वार होऊन घांटावर पुण्यस्तंभास आलों तेथें त्र्यंबक भट्ट टुल्लू होते त्यांचे शिवरामभट्ट यांचे पुत्र या उभय-तांचें पत्र आणिलें हें आह्मी गोत्र पुरुष यांचें आमचें गांव जोगाईचे आंबे या विषयीं कोणीं संदेह न मानावा. तसेंच नाशीक व त्र्यंबक क्षेत्रास जाऊन तेथील समस्त विद्वद्वृंदि-दिक व्राम्हण मिळोन शोध करून संमतपत्र करून दिधलें व कुडाळ प्रांतीं सहस्त्रचंडी अनुष्ठान झालें तेथें वाडी पासून राजापूर व संगमेश्वर व वर घांटीचा सहस्त्रावधि व्राह्मण समुदाय मिळाला होता तेथेंही शिष्ट थोर व्राह्मण इहीं सभा करून विचार केला तरी उपनांव करवंत या साहचर्य करोन या व्राह्मणांस दूषण ठेवावें असा अर्थ नाहीं त्यावर समस्त व्राम्हणांनीं संमतपत्र करोन दिधलें व वेदमूर्ती विश्वनाथभट्ट लेले यांनींही आपलें पत्र दिधलें जे आमच्या वाडिलांपासुन यांच्या वंशाचे ठायीं दूषण नाहीं ऐसें पत्र दिधलें व किरविंत जे जातीचे कुडाळ व वाडी प्रांतीं आहेत त्यापाशीं गेलों त्यांस पुशिलें जे तुह्मी हरिभट्ट लेले यापाशीं काय बोललांत त्यावरून आह्मांस शब्द ठेवला आहे त्यावरून किर-

विंत उपनामाचे जे आहेत तिहीं आपला समुदाय मिळवून विचार केला जे आप स्वाभाविकपणें बोललों होतों मुंबई प्रांतीही आमचा एक पुरुष गेला होता तो मेला किं काय हें कळत नाहीं यावरून हरिभट्ट थोर शिष्ट ब्राम्हण इहीं इतका अनर्थ करणें उचि नव्हतें. तुमचें गोत्र भिन्न व कुळधर्म भिन्न आमचीं गोत्रें भिन्न व कुळधर्म व आचा भिन्न तुह्मांशीं व आह्मांशीं कोणेही अर्थी संबंध नाहीं ऐसें त्यांचें पत्र आणिलें व आणखीः संमतपत्रें घेऊन कुलाध्यास गेलों राजश्री सरखेल यापाशीं दिधलीं परंतु त्यांचे चित्ताः साक्षी न आली या उपरीं आपला वृत्तिच्छेद व कुळाचाही उच्छेद झाला ऐसें समजोः आपला उद्धार महाराज छत्रपति यांचून होत नाहीं ऐशी विनंती केली यावरून महाराज छत्रपती स्वामी यांणीं वेदमूर्ती राजेश्री मुद्गलभट्ट पंडितराय याशी आज्ञा केली जे ह ब्राम्हण समुदायाचा विचार आहे आमच्या जातीचा कांहीं विचार नाहीं तरी राजश्री बाळाजीपंत प्रधान हे अतिरुद्र व कोटी होम अनुष्ठान करीत आहेत तेथें बहुत थोर थोर काशी आदि करून उभय गोदातीर व कृष्णातीर येथील व कोंकणस्थ महाक्षेत्रींचे थोः थोर शिष्ट ब्राम्हण आले आहेत त्यांच्या विचारें करोन या ब्राम्हणांच्या कुळाचा उद्धाः होय तो अर्थ करणें त्यावरून श्री माहुली संगमक्षेत्रीं सभा करून वेदशास्त्रसंपन्न गोपिनाथभट्ट वाराणशीकर व वैराट क्षेत्रस्थ व प्रतिष्ठान व पुण्यस्तंभ व नाशीक व वरखेड क्षेत्रस्थ व सप्तगोदावरी क्षेत्रस्थ व संगमेश्वर व राजापूर व श्री परशुराम क्षेत्रस्थ समस्त शिष्ट ब्राह्मण मिळोन विचार केला संमतीपत्रें क्षेत्रींची पाहोन व बाळकृष्ण भट्ट हिंगणें वाराणशीकर हेही या प्रसंगी होते तेंही पूर्ववृत सांगितलें महाराज राजेश्री गागाभट्ट वाराणशींत होते ते समयीं बाळकृष्ण भट्ट क्रमवन्त व रघुनाथभट्ट क्रमवन्त हे उभयतां वाराणशींत आले होते. तेथें बाळकृष्ण भट्ट क्रमवन्त यांचा विवाह प्रसंग आरंभिला ते समई यांच्या समुदायांत या क्षेत्रीं कोणी नव्हतें यास्तव वेदमूर्ती गागाभट्ट इहीं बाळकृष्ण भट्ट क्रमवन्त यांस देशस्थ जाणोन पुत्रत्वें मानोन यांचा विवाह केला व महाराज कैलासवासी शिवाजी छत्रपती यांच्या सिंहासन प्रसंगीं व महानुष्ठान प्रसंगीं होते हा अर्थ सर्वांस विदित आहे. राजद्वारीं वेदमूर्ती गोपाळभट्ट ढिल्लु होते. जनार्दन क्रमवन्त ज्या समई येत त्या समई उभयतांचें बंधुत्व चालत होतें हें वृत्त अशेर राजद्वारीचे आश्रित व कृष्ण जोशी यांचे पुतणे वैजनाथ जोशी जाणतच आहेत. उपनामें अनेक विध आहेत तरी केवळ उपनाम साहचर्यें करोन यांच्या ठायीं अपशब्द ठेविला हें उचित न केलें ऐसा निश्चय सर्व ब्राह्मणांच्या मतें जाहला मग संमतीपत्र करोन दिधलें व यांस ब्राम्हण समुदायांत व अनुष्ठानांत व राजद्वारीं व राजश्री श्रीपतराव प्रतिनिधी यांच्या घरीं व बाळाजीपंत प्रधान यांच्या घरीं अनुष्ठान झालें ते समई अनुष्ठान सांगोन बहुमान करून यथार्थ पूर्ण व्यवहार्य पंक्तिपावन केले असत संमतयः

संमतोयमर्थः भट्ट गोपीनाथ भट्टस्य

संमतीपत्र सप्तगोदावरीप्रांतस्थ गोपालशास्त्रिण:
संमतोयमर्थ: हिंगणोपनामक काशिस्थ बाळकृष्णभट्टस्य
पंचवटीतीरनिवासि भट्टाचार्याणां इति संमतोयमर्थ:
संमतिरत्र कऱ्हाडकर यज्ञेश्वरभट्टानां
संमतिरत्र मुद्गलकर त्र्यंबकभट्ट विश्वामित्री
गोदातीरस्थस्य संमतिरत्र राजापुरस्थ नारायण दीक्षितस्य
संमतमिदं पुण्यस्तंभस्थ वरखेडकोपनामकत्र्यंबकस्य
वरखेडकर नारायणभट्ट अपसीकरस्य संमति:
संमतीपत्राप्रमाणे अनंतभट्ट गौतमस्य
आपाभट्ट रोडगे पत्राप्रमाणे संमत क्षेत्र वरुणदेव धुणेश्वर
संमतोयमर्थ: भट्ट विश्वनाथभट्टस्य ढेरोपनामकस्य
बाळंभट्ट वैद्यस्य संमतय: नवरोपनामक भालचंद्रभट्टस्य संमतम्
मल्हारीभट्ट उपाध्ये: संमत मुद्गलभट्ट पंडितराव
संमत मोरेश्वरभट्ट वत्सराज चौककर
समत वरवेश्वरभट्ट गुणे: संमत विरेश्वर दिक्षितस्य गोदातीरनिवासी.
संमतिरत्र सूर्यपुरस्थ भट्ट हरिशंकरस्य.
संमतिरत्र महाबळेश्वरकर यादवभट्टस्य
संमतिरत्र पुणेकर ढेरोपनामक सदाशिवभट्टानां
पत्राप्रमाणे साक्ष नारायणभट्ट पाटणकरस्य संमत बाबुभट्ट सप्रे
संगमेश्वरकरस्य गोसावी भास्करस्य संमतमिदं वाराणशीकर.
देवोपाध्याय संमतं: विश्वनाथभट्ट दिवेकरस्य संमतं
संमत विश्वनाथभट्ट दिवेकर पालशेतकर
पुरोधसो माधवस्या प्यत्रवर्ति संमतमिदं
संमत रामजोशी संगमेश्वरकर
संमतीपत्र गिरिजोशी मांडगणकर
संमत मोरजोशी माडोणकर
छेले विश्वनाथभट्टस्य संमतं काशीमध्ये संमतं.
संमत पंढरपुरकर गोपाळभट्टस्य
संमत सप्तगोदावरीस्थ गोपाळशास्त्री नरसिंहशास्त्री.
संमत कावेरीतीरस्थ कृष्णशास्त्री
संमतं गोदावरीतीरस्थ देवगिरोपनामक देवगिराचार्यस्य
• संमत काशीउपाध्ये
संमतिरत्र माहुलीक्षेत्रस्थ कोंडभट्टादि समस्त ब्राम्हणानां

श्री.

सप्तकोटीश्वर
सहस्रचंडी

वेदमूर्ती दामोदर भट्ट कमवन्त तथा नरसिंहभट्ट कमवन्त चंपावती प्रांत अग्राग देशस्थळग्राम निवासी यांच्या समुदायास वेदशास्त्र संपन्न हरभट्ट लेले हे फोंडे प्रांतीं आले होते तेथून ते प्रांतीं जाऊन फोंडे प्रांती घसासे किरवंत ज्योतिषी आहेत ते या कमवन्तांस स्वसांप्रदायी ह्मणत आहेत ह्मणून त्यांच्या मुखें ऐकिली गोष्ट बोलले त्याव रून चौल प्रांतींचे लोकांहीं आमचा संदेह मानिला तो परिहार करावा ह्मणून फोंडे प्रांती आले आणि या प्रांतीचे ब्राम्हणास स्व वृत्तांत साकल्यें निवेदन केला आणि बोलिले तुह्मीं समस्तांहीं लोकशास्त्ररितीनें ते कोण व आम्ही कोण हा विचार मनास आणून निर्णय पत्र करून दिल्यानें आह्मी अभिश्रापमुक्त होऊं त्यावरून एतत्प्रांतस्थ समस्त ब्राह्मण समुदाय श्रीमत सामंत चक्रे चूडामणी राजश्री सावंत यांहीं श्री समाराधन केलें तेथें मिळाला होता त्यांमध्यें अनेक देशवासी ब्राम्हण मिळाले होते त्यांहीं या कमवन्ताचा पूर्वोत्तर वृत्तांत मनास आणिला व ते फोंडे प्रांतीचे किरवंतांचा पूर्वोत्तर वृत्तांत मनास आणिला परंतु ते किरवंत आणि हे कमवन्त कोणी एक सामान्ये करून एक नव्हत.

क्षेत्रनिवासी ब्रह्मवृंद

फोंडे प्रांतवासी ब्राह्मणांचीं संमते
पांडुरंगभट्ट वाके संमतोयमर्थः
केशवभट्ट पालये संमतोयमर्थः
भास्करभट सफरे
विश्वनाथभट कात्रे
गणेशभट्ट घाटे
रामभट्ट कात्रे
संमतमिदं गणेशोपाध्यायस्य नाटेकरस्य
कोळंवेकरोपनामक हरीभट्ट संमतोयमर्थः
कशेळकरोपनामक शिवभट्टस्य संमतं
वेंगुरले ग्रामस्थ फाटकोपनामक गणेशाग्निहोत्रिणां विदितोयमर्थः
श्री नारवे क्षेत्रनिवासी ब्रह्मवृंदस्य एतत्संमतं
श्री डिचवलीस्थ समस्थ ब्राह्मवृंदस्य एतत्संमतं
काशीवासी अनंतभट गोलवलकर पत्राग्रीं संमती.
भाटे प्रभाकर संमतोयमर्थः
काशीवासी रामभट रायकरोपनामकस्य संमतोयमर्थः
नारायणभट सफरे संमतोयमर्थः
नवरोपनामक चिंतामणीभट संमतोयमर्थः काशिवासी
भास्करभट्ट काशीवासी संमत
काळवे करोपनामक हरी संमत
कशेळकरोपनामक शिवभट्ट

## श्री सदाशिवो जयति.

स्वस्तिश्रीमत्सकल गुणालंकार सद्विचारकृत
निखिलजनोपकार हृत्कमलांतर्गत नित्य
रमारमणापारगांभीर्यचातुर्यवशीकृतानेक
भूपाळ सरखेल पद विराजित कान्होजी प्रभुवर्येषु

जनस्थानस्थित पेंग्योपनामकर्दिनकरभट्टविहिताशिषो विलसंतु शमत्र पत्र लेखने भापया विशेष आपाजी भट्ट क्रमवंत व अनंतभट्ट क्रमवंत जनस्थानीं आम्हांजवळ येऊन आपलें सर्व वर्तमान निवेदन केलें त्यावरून आमचे क्षेत्रीं मोरेश्वरभट्ट व शामभट्ट ठुल्ल आहेत त्यांस पाचारून विचारिलें त्यांहीं आपली कुलकोटी वृद्ध परंपरा मुखें ऐकिली होती तें सांगितलें कीं आमचें आदिस्थळ जोगाईचे आंबे तेथून चार पुरुष चोस्थळीं गेले. एक पुरुष वाराणशीस गेला तेथेंच स्थायीक झाला. कांहीं पुण्यस्थळीं राहिले. कांहीं त्र्यंबकीं राहिले. एक पुरुष चौल प्रांतीं अष्टागरांत गेला या रीतीनें जो जेथें गेला तेथेंच स्थायीक होऊन भिन्न भिन्न उपनामें ठुल्ल व खेडेकर व अयाचित व क्रमवंत ऐशी नामें पाऊन प्रसिद्ध आहेत तरी हेच व आम्हीं सर्व एकच असो. ऐसें वर्तमान वडिलांचे मुखें विदित असे. ऐसें वर्तमान तिहीं आम्हांजवळ विदित केलें यावरून आम्हांस कळतें कीं हरभट्ट लेले याहीं यांजवर प्रत्यवस्थान व्यर्थ केलें याचा परामर्ष करावा कारणें महाराज सर्व प्रकारें समर्थ आहेत कीं पूर्वीं कलीच्या प्रारंभी श्री रामचंद्राची प्रार्थना ऐसिजे. ॥ सामान्योयं धर्मसेतुर्नराणां स्वे स्वे काले पालनीयो भवद्भिः ॥ ऐशी प्रार्थना भगवंतें केली आहे या कारणास्तव व आपलें राज्यामध्यें परस्पर ब्रह्मद्वेषाचें छेदन करून ब्राह्मणांचें स्थापन करावें हें कल्याणकारक असे. इत्यादि बहुप्रकारें लिहावें परंतु प्रश्नावेगळें उत्तर मिळावें हें उचित नसे परंतु आपण गोब्राह्मण प्रतिपालकत्वें विरुदं राजरक्षण बहुकाळ केलें पाहिजे याकरितां पत्र लेख उचित असे कीं ब्राह्मणावर व्यर्थ दोषोत्पत्ति ज्यातें केली आहे त्यासच हा दोष आहे उक्तंच अदंड्यान्दंडयन् राजा दंडयांश्चैवाप्यदंडयन् । अयशो महदाप्नोति नरकंचाधिगच्छति ॥ हें आम्हांस सर्वप्रकारें वंद्य असत. बहुत लिहावें तर आपण सुज्ञ असा. इत्यंशः

श्रीगिरिजाजानिर्विजयतेतराम् ।

स्वस्ति श्रीमदुमाजानिपदाम्भोरुहयोः सदा ।
रोलंबायितचित्तेषु तत्प्रसादादनारतम् ॥
सम्प्राप्तविभवानन्दसन्दोहात्यर्थतृप्तिषु ।
विद्वद्दैन्यतमस्तोमन्हासव्रध्नायितेषु च ॥
श्रीतुकोजीस्वच्छवंशवाध्युद्भूतसुधांशुषु ।
सुधालवालविम्बाद्रिसमुद्भूतामरद्रुषु ॥
सम्प्राप्तराजसम्मानभ्राजमानेषु नित्यशः ।
श्रीमत्सरखेलकान्होजीप्रभुवर्येषु चान्वहम् ॥
श्रीमद्वाराणसीवासिगोपीनाथाग्रजन्मनाम् ।
पुण्यस्तम्भजनस्थानयेरूळस्थद्विजन्मनाम् ॥
पुण्यादिपत्तनस्थानां श्रीमत्र्यम्वकवासिनाम् ।
श्रीमहाबलवैराटमाहुलीभूदिवौकसाम् ॥
सप्तगोदान्तरस्थानां प्रतिष्ठाननिवासिनाम् ।
करवीरपुरस्थानां करहाटकवर्तिनाम् ॥
आगोमांतक्षितिभृतो जवाहिरपुरं यतः ।
तलकोंकणसंस्थानां सर्वेषां भूसुपर्वणाम् ॥
आशिषः सन्तु बहुशो यशःश्रीवंशवर्धनाः ।
युष्मत्कृपाभरसुधाभृशसन्ततवृष्टिभिः ॥
गोचरीकुरुतात्कर्णदूतोऽयं नो लसच्छिवम् ॥
जिज्ञासतेऽपि युष्माकमव्याहतसुमङ्गलम् ॥
लेख्यार्थस्तु. ॥

वेदमूर्ती आपाजीभट्ट व अनंतभट्ट क्रमवन्त हे श्रीकृष्णातीरीं माहुलीसंगमी राजश्री बाळाजीपंत प्रधान यांचे कोटिहोम व होमातिरुद्रप्रसंगी समस्त ब्रह्मवृंदापाशीं येऊन आपलें वृत्त निवेदन केलें. जे आपण चौलप्रांत अष्टागर येथें वंशपरंपरेनें बहुकाळ राहोन सकळ ब्राह्मणयातिमात्र यांचे घरीं श्रौतस्मार्त सकळ कर्मी उपाध्येपण व धर्माधिकरण पुराणादिक चालवून हा काळवर असों व अष्टागरप्रांतीं व इतरत्र सुब्राह्मण ज्ञातीशीं व आह्मांशीं निर्व्याज शरीरसंबंधादिव्यवहारहि चालत आहे ऐसें असतां गतवर्षी वेदमूर्ती हरिभट्ट लेले यांणीं स्वकार्यप्रसंगे कुलाबियास येऊन राजश्री कान्होजी आंगरे सरखेल यांपाशीं कथाप्रसंगें सांगितलें कीं कुडाळ व फोंडे व अंतूर प्रांतीं किरवंत ब्राह्मण आहेत त्यांतून येक किरवंत ब्राह्मण अष्टागरप्रांतीं आला त्याचे वंशीचे हे क्रमवन्त परंतु हेहि किरवंतच आहेत ऐसें आपण आइकिलें आहे ऐसें असतां कुडाळ फोंडेप्रांतीच्या किरवंताशीं व इतर तत्प्रांतीय सुब्राह्मणांशीं अन्नादिव्यवहार चालत नाहीं आणि अष्टागर

प्रांतस्थ क्रमवंतांशीं एतत्प्रांतीय सुब्राह्मण यांशीं अन्नादि शरीरसंबंध कैसा चालतो ऐसा प्रभूसमक्ष आक्षेप केला. त्यानंतर राजश्री सरखेल यांणीं उत्तर दिलें कीं, ब्राह्मणज्ञातिविषय तुह्मीं ब्राह्मणीं मनास आणावा ऐसें उत्तर देऊन अम्हां क्रमवन्तांस बोलावून लेले हरिभट्टोक्त सर्व वर्तमान आइकाविलें. त्यावर आह्मीं स्वपूर्वजांपासोन जें आपलें वंशवृत्त श्रुत होतें तें सांगितलें कीं आह्मीं क्रमवन्त ब्राह्मण. कुडाळ फोंडे अंतूरप्रांतीचे ते किरवंत त्या अम्हांमध्यें गोत्र कुलधर्मादि कोणाही अर्थें संबंध नाहीं. आमचे पूर्वज देशामध्यें जोगाईचे आंबे येथील सुब्राह्मण उपनाम टुल्लु. आमच्या पूर्वजें क्रमान्त शाखाध्ययन केलें यास्तव क्रमवन्त उपनाम पावले. ऐसा बहुतां अर्थें यथावृत्त सांगोन परिहार केला परंतु राजश्री प्रभुसंनिध अष्टागर व कल्याणप्रांतस्थ द्विजवर्य राजकार्यप्रसंगें कुलाब्यास आले होते, त्यांकरवीं संमतपत्र करविलें कीं यावत्काळ या क्रमवन्त ब्राह्मणांचा ज्ञातिनिश्चय होय तवपर्यंत यांणीं भिन्न असावें. ब्राह्मणांमध्यें अन्नादिव्यवहार नसावा. ऐसा अतिशय करून आम्हां क्रमवन्तांस प्रभुसमक्ष सांगविलें कीं तुह्मीं आपले ज्ञातीचा शोध करून निर्णय करणें. ऐसें सांगितल्यावर आम्हीं आपले पूर्वजांचे जोगाईचे आंबें येथें जाऊन आमचे टुल्लु महाराष्ट्र यांचें पूर्ववृत्तप्रमाणें पत्र आणिलें व उपसाक्षीस जनस्थान क्षेत्रस्थ ब्राह्मणांचें पत्र व वेदमूर्ती विश्वनाथभट्ट लेले यांचें पत्र व कुडाळ फोंडेप्रांतीचे द्विजवर्यांचें पत्र व तत्प्रांतीचे किरवंतांचें पत्र ऐसीं पत्रें आणून कुलाब्यास आलों. पत्रें व तदर्थ राजश्री प्रभूस विदित केला परंतु आमच्या प्रारब्धयोगें यथापूर्व व्यवहार आमचा न चाले यास्तव तुह्मीं थोर शिष्ट सर्वज्ञ आहां. आमचें प्राचीनवृत्त, कुळ, गोत्र, विप्रज्ञातिव्यवहार व आम्हीं आणिलीं पत्रें मनास आणून आमचा उद्धार केला पाहिजे म्हणून निवेदन केलें व ब्रह्मसमुदायास शरणार्थ आलें; त्याउपरी आम्हीं सकळ ब्राम्हणांनीं एकमत करून क्रमवन्त ब्राह्मण यांचा पूर्वीपासून गोत्र कुलधर्म मनास आणून शरीरसंबंधादि व्यवहार व यांणीं आणिलेलीं पत्रें मनास आणून बहुतां प्रकारें साक्षीउपसाक्षीनें शोध करितां हे क्रमवन्त सुब्राह्मण पूर्वीं देशामध्यें जोगाईचे आंबें येथील यांचा पूर्वज निःसीम क्रमांत शाखाध्यायी होता यास्तव क्रमवन्त नामें प्रसिद्ध झाला, याकारितां हेही क्रमवन्त नामें प्रसिद्ध झाले. परंतु पूर्वीं यांचे उपनाम टुल्लु ज्ञाति महाराष्ट्र. कुडाळ फोंडे अंतूर प्रांतीचे किरवन्त भिन्न व हे अष्टागर प्रांतीचे क्रमवन्त भिन्न. उपनामाचा एकदेश साम्यें करून ज्ञातिकुलधर्मैक्य मानूं नये ऐसा सर्व ब्राह्मणसमुदायाच्या मतें निश्चय झाला व क्रमवन्तांवर लेले हरिभट्टवचनें अभिशाप आला होता तो सर्व ब्राह्मणांनीं दूर केला. त्यावर क्रमवन्तांस सर्वसंमतें अन्नादिव्यवहारें पंक्तिपावन करून याअर्थीं सर्वसंमतिपत्र करून दिधलें. आणि हें पत्र सकळ ब्राह्मणांनीं तुम्हांस लिहिलें असे. तुम्हीं देव ब्राह्मण श्रुतिस्मृति पुराणोक्त धर्मस्थापक व शरणागत वत्सल, अनाथसंरक्षक आहां तरी हे क्रमवन्त ब्राह्मण बहुदुर्घट काळीं सर्व संकटांपासून तुम्हीं रक्षिले. तैशीच यांची यथापूर्व स्थापना करून चौल व अष्टागर प्रांतस्थ व इतर देशस्थ सुब्राह्मण यांशीं यांचा अन्नादिक

शरीरसंबंधादि व्यवहार यथापूर्व चालवून यांची पूर्ववत् वृत्ति परंपरा चालविली पाहिजे. कोणी दुरभिमानें व द्वेषेंकरून यांशीं आक्षेप करितील त्यांस बुद्धिवाद सांगितला पाहिजे. या आमच्या पत्रास मान देऊन या क्रमवन्त ब्राह्मणांची पूर्ववत् स्थापना केलियानें आमची सकळ ब्राह्मणसमुदायाची स्थापना केलियाचें श्रेयं तुह्मांस प्राप्त आहे. आपला वंश कीर्ति लक्ष्मी आचंद्रार्क भूमंडळीं स्थिर आहे व सर्वांचें कल्याण आहे. सुज्ञांप्रति विस्तारें काय लिहिणें हें विज्ञप्ति शके १६४१ विकारी नामसंवत्सरे कार्तिकशुद्ध त्रयोदश्यां लिखितामिदं पत्रं. ,, ,, ,, ,,

## श्रीवरदमूर्तिर्जयति.

वेदशास्त्रसंपन्न श्रीमद् वेदमूर्ती चंपावतीप्रांतस्थचिंतामणीभट्ट धर्माधिकारी प्रमुख ज्योतिर्विद उपाध्याय पौराणिक शिष्ट ब्रह्मवृंदचरणकमलेषु.

कर्जे ग्रामस्थ जोशी केशव कृतानेकशोनतयः विलसंतु शमत्रभवत्कृपाकटाक्षामृत मात्रवर्षावमात्रेण चैत्र वदि ११ मंदवारपर्यंत जनस्थाने अस्मत् कुशलं ज्ञात्वा स्वीय कुशलपत्रलेखनेन वयं आनन्दनीयाः पत्रलेखने कारणमथ प्राकृतभाषया बाबाजीभट्ट क्रमवन्त जनस्थानीं आमचें दर्शन घेऊन संपूर्ण क्रमवित कुळाचे ठायीं ईश्वरक्षोभ झाला ह्मणून सर्व वृत्त निवेदन केलें त्यावरून परम आश्चर्य होऊन चित्त संशयार्णवीं मग्न झालें कीं पूर्वी चंपावती प्रांतीं ब्राह्मण समाज चार सहस्र होता. त्यामध्यें कांहीं शिष्ट विद्वज्जन असतील त्यांहीं शोध करून जो व्यवहार करणें तो केलाच असेल त्यामध्यें तुमचेही पूर्वज किती एक असतील · सप्त पुरुषपर्यंत तुमचें शरीरसंबंध वृत्तीमुळें गर्भाधानादि सपिंडीकरणांत यत्किंचित् व्यवहार क्रमवन्तांचे हस्तें चालत असतां हरीभट्ट लेले यांच्या वचनीं विश्वास मानून प्रभुनिग्रहें करून क्रमवित् कुळाचा अपमानपूर्वक स्वपूर्वजांच्या ठायीं अज्ञान संपादून प्रभूचे भय मानून हरीभटाचे मताशीं मिळोन संमती केल्यात तर हें कर्म बहु अनुचित केलें असे. ज्या कर्मेकरून राष्ट्रभंग, राज्यभंग होणें असें संपादिलेत व ज्या प्रभूचें अन्न भक्षून त्यांचें ही अनिष्टच इच्छितां ऐसें मजला कळोन येतें कीं ज्या पदार्थें करून प्रभूचे पदरीं द्वेष न पडे आणि उत्तरोतर कल्याण होय असा अर्थ करणें. क्रमवन्त कूल तर प्रसिद्ध यांचा अपमान करून कुळांचा उच्छेद करणें हें उचित नसे व क्रमवन्तही आपलें मूळस्थळ जें सांगतात तेथें ही दोन मनुष्यें साक्षीस देऊन संशय निवृत्ती करून ज्यामार्गें पूर्वज चालले आहेत त्या मार्गें चालणें हें उचित असे या अर्थी कितीएक श्रुति स्मृति वाक्यें लिहावीं तर—सर्व प्रकारें सूज्ञ असती कि बहुना सुज्ञेष्वलमतिविस्तरेण हे विज्ञप्ती १०००

श्री.

राजेश्री कान्होजी आंग्रे दाजी गोसावी यांस.

सकलगुणालंकरण अखंडीत लक्ष्मी आलंकृत रा. रा. स्नेहांकित बाळाजी विश्वनाथ प्रधान आशिर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष क्रमवन्त ब्राह्मणांस हरभटलेले यांचे शब्दें करून पंक्तिबाह्य केलें हें वर्तमान पूर्वी कळलें त्याजवरी त्यांचे विषयीं श्रीमत्परमहंसवर्येश्रीब्रह्मानंद स्वामी यांणीं राजेश्री स्वामीस व आह्मास व वरकड सामादिकांस पत्रें पाठविलीं कीं क्रमवन्तांस दोष नाहीं आणि पंक्तिबाह्य करावेसें नाहीं त्यावरून पूर्वी गोसावी यासी एक दोन पत्रें पाठविलीं परंतु उत्तर न आलें त्या उपरी आमचे घरीं कृष्णातीरीं माहुली संगमीं. कोटीहोम व होमद्वारें अतिरुद्र प्रारंभ झाला ते समयीं वे. आप्पाजीभट्ट क्रमवन्त व अनंतभट्ट क्रमवन्त आले आणि राजेश्रीस्वामीस व सामादिकांस वर्तमान् विदित केलें त्यावरून राजेश्रींनीं आज्ञा केली कीं ब्राम्हण समुदाय बहुत थोर जमा जहाले आहेत आणि हा निर्णय ब्राह्मण यातीचा जो कर्तव्य तो करून ब्राह्मणांचा अभिश्राप दूर होई तें करणें. ऐशास येथें ब्राह्मण वेदशास्त्रसंपन्न गोपिनाथभट्ट ह्मणजे गागाभट्टाचे नातू वेद· मूर्ती विश्वनाथभट्ट ठेले काशी उपाध्ये व वेदमूर्तीकृष्णाचार्य व खंडभट शाळग्राम व हुजुरा-तचे पंडितराव ज्योतिषी व करवीर क्षेत्रस्थ आणखी वांई, कऱ्हाड, महाबळेश्वर, वैराटक्षेत्र व नाशीक पैठण उभय गोदातीर व कृष्णातीरस्थ ब्राह्मण पांच सहा सहस्त्र पावले होते यांच्या एक दोन सभा करवून पूर्वील वृत्तांत व आचरण व गोत्रें व पुरुष यांचा शोध केला ये विषयीं धर्मशास्त्र न्यायें करून साक्षी उपसाक्षी व स्थळोस्थळींचे कागदपत्र मनास आणविले त्यावरून मनास आणितां ब्राम्हण क्रमवन्त यांचे ठायीं दोष किंचित नामाभिधानाचा आहेसे नाहीं हे गोष्टी समस्त ब्राह्मण समुदायाचे मतें झाली आणि क्रमवन्तांस अनुष्ठान प्रसंगाचे ब्राह्मणभोजनांत व राजेश्री श्रीनिवास पंडीत प्रतिनिधी यांचे गृही श्रीचे नवरात्र महोत्साह प्रसंगामध्यें पंक्तिपावन केलें आणि ब्राम्हण समुदायांनीं निर्णय पत्र करून दिलें येणें करून क्रमवन्तांचे ठायीं अभिश्राप हरभट्ट लेले यांचे शब्दावरून आला तो दूर झाला ह्मणून हें पत्र आपणांस लेख केला असे तरी ज्याप्रमाणें निर्णय यांचा केला आहे व संमतपत्र दिलें आहे तेणेंप्रमाणें विस्तारें करून चित्तांत आणून क्रमवन्तांचे ठायीं निर्दोष प्रसंग करून ब्राह्मणांचीं स्वस्थळीं वृत्तीवर स्थापना केली पाहिजे तुह्मीं आह्मीं धर्म स्थापना करून देव ब्राह्मणांचा आशिर्वाद घ्यावा हेच गोष्टी उत्तम असे. यास्तव सहस्त्र प्रकारें करून ब्राह्मण समुदायाचें संमत पत्र मान्य करून क्रमवन्तांचा अभिश्राप दूर केला पाहिजे. ये विषयीं आपणांस वारंवार ल्याहावेसें नाहीं. जेणें करून ब्राम्हण निर्दोष होऊन सुखरूप रहात. राजेश्रीस व राज्यास कल्याण चिंतीत ते गोष्टी केली पाहिजे. जाणीजे रवाना चंद्र १४ मोहरम बहुत काय लिहणें लोभ असो दिजे हे विनंति—

श्री.

राजेश्री कान्होजी आंग्रे दाजी गोसावी यांस—

सकल गुणालंकरण अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित बाळाजी विश्वनाथ प्रधान आशिर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाहिजे. विशेष सांप्रत वर्तमान आइकलें जें ते कीं हरभट्टलेले यांचे शब्दावरून क्रमवन्त ब्राम्हणांशीं अन्नसंस्कार करूं नये असा निश्चय केला म्हणून तरी हे गोष्टी आपल्यास योग्य नाहीं हें मनास आणितां क्रमवन्त ब्राम्हण बहुत थोर संपन्न आणि त्यांचीं घराणीं सात आठशें झालीं आहेत तेणें करून दोन अडीच सहस्र ब्राम्हणांशीं संबंध झाले आहेत. दुसरें हें कर्म नूतन आहेसें नाहीं. शेंदोनशें वर्षांचें आहे. तिसरे थोरले कैलासवासी स्वामी होते त्यांचे वेळेस हा उत्पात राहातासा नाहीं. ऐसें असतां आपण भळयाचे शब्दें करून ब्राम्हणांस दंड करावासें नाहीं सर्वांमध्यें ब्राम्हण थोर थोर आणि बहुता ब्राम्हणांचा क्षोभ करून घेतलीयानें तुम्हां आम्हां लोकांस श्रेयस्कर आहेसें नाहीं. तेंही असोन हें ब्राम्हण कर्म आहे त्यांत आपण चित घालून अडीच सहस्र ब्राम्हण कष्टी करावेसे नाहींत या उपरी जें आपलें कल्याण तेंच आमचें ऐसें मनोदय पुरःसर जाणून हा पत्रलेख केला आहे. तरी गोसावी यांनीं क्रमवन्तांचे खटिलि यांत मन न घाळावें ज्याप्रमाणें पूर्वापार अजि तखत चालले असेल त्याप्रों चालेल यांत आपण सर्वजण विवेकी आहांत जे गोष्टीनें कल्याण होऊन येई ते गोष्टी केली पाहिजे जाणिजे रा. छ १२ सवाल बहुत काय लिहणें लोभ असो दिजे हे विनंति—

लेखन सीमा.

श्री.

स्वस्तिश्रीमदुमारमणचरणसरसीरुहभजनसंपादितजलधितनयावितरण --निरीहीकृत--भूसुरपरिवृढप्रयुक्ताशीराशि कुलिशपराभूतप्रजशामलादि निखिलरिपुगण शरण्येषु निजप्रौढ–प्रतापौदार्यादि—गुणगरिम श्रवण—सानंदशाहक्ष्मापातिनुतानुपमगुणगण समुद्भूत यशस्तोमसोम—समुद्योतितदशदिङ्मंडलेषु भूभारोत्तारणाखिलदेवब्राम्हणपरिपूजनसंततावन-निमित्तकजगदीशावतारेषु सरखेलादि स्वामिदत्तपदेषु कान्होजी प्रभुवर्येषु आश्रितकांयंतर्गत-मठकरभट्टरघुनाथविरचिताशीरशिनिवेदकोयं सुवर्णपत्र प्रणिधिरिहस्थश्रीमतांतदनुदिनमनुक्षणे मेधमानं श्रीसन्निधावाशास्महे विशेषश्च भाषया महाराजांच्या राज्यांतून आपाजी क्रमवन्त व अनंत क्रमवन्त श्रीक्षेत्रासि आले. इहिं सांगितलें कीं वेदमूर्ति हरिभट लेले कुडाळप्रांतींचे तेथें आले होते. तेहीं त्याप्रांतीं सांगितलें कीं आमच्या प्रांतीं किरावेंत आहेत ते आणि हे क्रमवन्त एकचि ब्राह्मण आहेत ऐसें प्रत्यवस्थान स्थापिलें आहे ऐसें निवेदन केलें त्यावरून आम्हीं आप्पाजीभट्ट अनंतभट्ट क्रमवन्त यांसीं पुण्यस्तंभास पाठविलें त्यानंतर तेथून यांचे मूळ पुरुष वृद्ध महाराज शिवाजी राजे यांचे आश्रित गोपाळभट्ट टुल्लु पुत्र त्रिंबकभट्ट टुल्लु याजपाशीं वर्तमान संपूर्ण निवेदन केलें तेंहि सांगितलें कीं महाराज शिवाजी राजे यांच्या सिंहासन प्रसंगीं गागाभट्ट आले होते त्यासमई अष्टागराहून रघुनाथ क्रमवन्त तथा विश्वेश्वर क्रमवन्त जनार्दन क्रमवन्त प्रमुख असे आले होते. ते आम्हा गोत्रपुरुष. ऐसें आमच्या वृद्धीं सांगितलें कीं जोगाईचे आंबे येथून आमचे चार पुरुष निघाले तेथून एक पुरुष वाराणसीस गेले ते टुल्लु तेथें आहेत; दुसरे खेरड गांवांस गेले तेथें खेरडे उपनाव पावले; कोठें अयाचित उपनाम पावले आहेत; व एक पुरुष अष्टागर प्रांतीं निघून क्रमाध्ययनी गेला होते ते क्रमवन्त या नामें करून तेथें आहेत. लौकिकव्यवहार करंत असे तेथें आहेत. हे निःसंदेह आमचे गोत्रपुरुष असत. या ब्राह्मणावर दुर्ब्राह्मण असें प्रत्यवस्थान जांहीं केलें असेल तेच दुर्ब्राह्मण ऐसें पत्र त्रिंबकभट्ट टुल्लु यांहीं पुण्यस्तंभाहून सकल श्रीक्षेत्र निवासि यासी पाठविलें. त्यानंतर आह्मी जनस्थान निवासी श्रीक्षेत्र निवासी असे मिळोन परामर्श केला तेंहि परस्परें करून आमचे संबंधी आहते. तरी हे उत्तम ब्राह्मण आमचे आहेत कांहीं संदेह न मानणें ऐसें असतां त्या प्रांतीं तुमचे राष्ट्रीचे चित्ता पोळेंण याहि दुर्ब्राह्मण ऐसें असत्य प्रत्यवस्थान केले आहे तर महाराजीं राजा राष्ट्र कृपाप मिति अदंड्यान्दडयन् राजा दंड्यांश्चैवाप्यदंडयन् अयशो महदाप्रोति नरकं चाधिगच्छति इति स्मृत्यादिवचनं ह्यास्तव असत्य प्रत्यवस्थानकारी ब्राह्मण जे त्यासच प्रायश्चित्तास महाक्षेत्रीं ठेवणें. महाराज सर्वज्ञ कलियुगीं धर्मप्रवर्तक अवतारी आहेत या ब्राम्हणांची संस्थापना पूर्वापार महाराजीं केली आहे त्यानंतर यांचेचि कांहीं दुर्दैव होतें कीं तुमची सत्ता असतांना याहि दुर्ब्राह्मण ऐसें प्रत्यवस्थान चित्तपोळनें इहिं केलें तरी आतां हे सुदैव आले आहेत यांची स्थापना केलियानें कितींची वृद्धी

होईल अथवा हे ब्राम्हण येथें नसावें हें चित्तीं असेल तर आपले राज्यांतून बाहेर घाल विणें आम्ही वाराणसी पर्यंत या ब्राह्मणांचा अंगिकार करूं महाराज या युगीं धर्मस्था-पनेस देवब्राह्मण पालनास आहेत. ऐसें त्याप्रांतीं आल्यावरि देखीलें अखंडाप्रताप असावा देवब्राम्हणांनें पालन असेंच होईल. महाराजाच्या दयेकरून राज्यांत ब्रह्मद्वेष झालियानें अनुचित् आहे यासि प्रमाण पौरापार महाभारत श्लोक ॥ गतश्रीगणकान्द्वेष्टि गत यु-व्योधिहिंसकान् । गतश्रीश्च गतायुश्च ब्राह्मणान्द्वेष्टि भारत । हा भीष्में धर्मासी उपदेश केला असे. हें जाणोन राज्यांतून ब्राह्मद्वेषासी काढणें महाराज वहीम दूर करायासि समर्थ आहेत ह्मणोन पत्र लिहिलें आहे. हें तो पांचसातशें ब्राम्हणामध्यें या प्रांतीं सुब्राह्मण प्रख्यात आहेत तेहि तो परशरामजींचें चित्त पोळविलें आहे मनुष्याचें पोळवितील हें अपूर्व काय आहे तर त्यांचा विश्वास न धरणें विशेष काय लिहणें महाराज सूज्ञ आहेत. आपण या स्थळीं महाराजांचे अभीष्ट चिंतीत आहों, हे आशिर्वाद.

## श्रीत्र्यंबकराज.

स्वस्तिश्रीमन्निखिलगुणगण मंडनमंडितजगन्निवासपदपंकजभजना सादितानुपमविद्या वैभवनिरीहीकृतांतेवासिनिकरगीयमानयशस्तोमसोमसमुदितदिङ्मंडलनिखिलश्रौतस्मार्तकर्मानुष्ठानप्रवर्तनभूदेवावताराविरतसत्कर्मानुष्ठानिरतांतःकरणपरोपकृतिपरायणचंपावतीप्रांतस्थसमस्तद्विजवर्यवर्गेषु

श्री...निवासी समग्र ब्राम्हणाविहितानंतनतयो विलसंतु विशेषश्च अष्टागरस्थ आपाजी क्रमवन्त तथा अनंत क्रमवन्त नाशिकास व त्र्यंबकास आले यांहीं वर्तमान हरभट ठेल्यांहि कुडाळप्रांतींचे किरविंद व हे एक ऐसें तुमच्या राजश्रीपाशी सांगितलें ते विदित केले त्याउपरी त्र्यंबकेश्वराहून यांस पुण्यस्तंभास पाठविले होते तेथून गोपाळभट टुल्लु यांचे पुत्र त्र्यंबकभट व नातु चिंतामणी भट यांचीं पत्रें घेऊन जनस्थानास आले तेथून शामभट टुल्लु यांस घेऊन त्र्यंबकास आले मग आपण समस्त ब्राह्मण मिळोन तो पत्रार्थ मनांत आणून शामभट टुल्लु नाशिककर त्र्यंबककर टुल्लु यांस पुशिलें ते म्हणूं लागले जे हे क्रमवन्त व आह्मी एक गोत्रज असों. या गोष्टीचा संशय नाहीं आह्मी समस्त प्रांतीचे ब्राह्मण व क्रमवन्त हे सर्व परस्परें सुहृत्संबंधी असों. या गोष्टीचा संशय न धरणें. ज्याचें ब्राह्मण हृदय असेल त्यास संशय न होय यास विप्रतिपत्तिकर्ता तो जातीचा, कुळाचा, गुणाचा नाशक निःसंशय.

पत्राप्रों साक्षी—

| | |
|---|---|
| अनंतभट उपासनी | आपाजी भट प्रदक्षणे |
| रंगभट आकोलकर | गिरमाजीपंत दशपुत्रे |
| रघुनाथभट मठकर | निळकंठ भट रुईकर |
| बापुभट शुक्रस्येदं संमतं | गोविंदभट प्रदाक्षिणे |
| | कृष्णभट आपस्तंभ |
| | आबाजी पंत दशपुत्रे |

श्री.

# शिक्का.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५५ सोम्यनाम संवत्सरे चैत्र शु॥ १२ भानुवासरे क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शंभू छत्रपतिस्वामी यांणीं वेदमूर्ती राजश्री विश्वनाथभट्ट क्रमवन्त व कृष्णंभट्ट क्रमवन्त बीन नारायणभट्ट क्रमवन्त गोत्र कौशिक सूत्र आश्वलायन उपनाम टुल्लु यांसी दिलें इनामपत्र ऐसाजे. तुह्मी किल्ले पन्हाळेचे मुक्कामीं स्वामींच्या दर्शनास येऊन विदित केलें कीं आपण कुटुंबवत्सल आहों योगक्षेमाची अनुकुलता नाहीं महाराज धर्मपरायण आहेत एकगांव सर्वमान्य करून दिधलीयानें स्नान संध्यादि षट् कर्में आचरोन स्वामींस व स्वामींच्या राज्यास कल्याण चिंतून राहोन ह्मणून तुम्हीं विदित केलें त्यावरून मनास आणितां तुम्हीं वहुत थोर विद्यावंत सत्पात्र तुमचे योगक्षेमाचे अनुकूलतेस इनाम गांव सुरक्षित चालविल्यानें स्वामींस व स्वामींच्या राज्यास वहुत श्रेयस्कर ऐसें जाणून स्वामी कृपाळू होऊन तुह्मां उभयतां बंधूंस नूतन इनाम कुलबाब कुलकानु हल्लीं पट्टी पेस्तरपट्टी जलतरु पाषाण निधिनिक्षेप सहीत खेरीज हक्कदार व इनामदार करून मौजें मुळें तर्फ खंडाळें सुभा प्रांत चौल हा गांव देह १ एकरास सर्व मान्य करून दिला असे तरी तुह्मी मौजें मजकूर पूर्व मर्यादेप्रमाणें आपले स्वाधीन करून घेणें ये विषयीं आलाहिदा देशाधिकारी यांस सनद सादर आहे. तरी मौजें मजकूर इनाम सर्व मान्य तुह्मीं उभयतां बंधू व तुमचे पुत्र पौत्रादि वंशपरंपरेनें गांव इनाम अनुभवून सुखरूप राहणें निदेश समक्ष

ति॥ १० लेखन सीमा

रमजान सु॥ तिस्सा अशरीन मयावअलफ

## श्री.

वेदशास्त्रसंपन्न अष्टागर प्रांतस्थ ब्राह्मणांप्रति श्रीमद्बाळाजी बाजिराव प्रधान सभास्थित विद्वद्वैदिक समस्त पंचद्राविड ब्राह्मण यांचा नमस्कार विज्ञप्ति उपरी. वे.शा सं पांडुरंग जोशी यांचे घरीं कोटिहोमानुष्ठान प्रसंगीं कोणी एक क्रमवंतानें आपणांस आर्त्विज्य द्या म्हणून आग्रह केला होता तेव्हां न बोलाविला म्हणून समस्त ब्राह्मणांस दुरुत्तरें बोलून कलह केला तत्प्रसंगीं कित्येक ब्राह्मण क्रोधून यांचे औद्धत्य निवृत्त व्हावें यास्तव क्रमवंतांस बहिष्कार पत्र पाठविलें त्यानंतर ते पंत प्रधान नगरीं येऊन शरण आले तदुत्तर समस्त विद्वद्वैदिक ब्राह्मण राजसभेस मिळोन पूर्वील क्रमवंतांचा व्यवहार विचारून हा अर्थ संमत केला असे कीं क्रमवंत ब्राह्मणांचा पंक्तिव्यवहार जो चालत आला त्याप्रमाणें चालवावा. त्या प्रांतीं राहणार ब्राह्मणांचा व क्रमवंतांचा अनुष्ठानाविषयीं कलह होतो त्यास जो यजमान स्वसंतोषें क्रमवंतांस बोलाऊन तत्हस्तें अनुष्ठान करवील तेथें ब्राह्मणांनीं अधिक्षेप न करावा. जो यजमान अनुष्ठानीं क्रमवंतांचा निवेश न करितां अन्य हस्तें कर्म चालवून त्याचा वृत्तिसंबंध कायदा होईल तो त्यास देईल तेथें अनुष्ठांनीं आपल्या निवेशाचा आग्रह क्रमवंतांनीं न करावा इत:पर राजापाशीं जाऊन या पूर्वोक्त गोष्टीविषयीं परस्परें उपद्रव न करावा जो कलह करील तो जातीचा अपराधी असे. पत्राच्या पंक्ति १५ शके १६७८ धातृनाम संवत्सरे, आश्विन वदी ११ भौमवार.

संमतो यमर्थो बाळकृष्ण शास्त्रिण:
,, शंकर दीक्षितानां
,, गाडगीळ विश्वनाथस्य
,, भैरवज्योतिर्विद:
, रंगनाथ दीक्षितस्य
,, माहुलीकर रामशास्त्रिण:
,, कृष्णज्योतिर्विद:
संमतमिदं वीरेश्वर दीक्षितस्य
,, जगदीश जोशी राइरिकर
,, कृष्णंभट चित्रांव
कोटकरोपनामक रामचंद्रस्य संमतोयमर्थ:
संमतोयमर्थ:धुंडिराज ज्योतिर्विद:

संमतोयमर्थो हनुमदुपनामक गंगाधरस्य
संमतमिदं चित्रावोपनामक काशिनाथस्य
,, विद्वांसोपाख्य धोंडदीक्षितस्य
,, मोरेश्वरज्योतिर्विद:
अष्टगृहालय शाळग्रामोपनामक जनार्दनस्य
संमतोयं पत्रार्थ:
,, कोंडदीक्षितस्य
,, कृष्णदीक्षितस्य देवधरस्य
,, गणेशभट्ट स्यागाशोपाभिधस्य
संमतमिदं श्रीनिवास दीक्षितानां
संमतोयमर्थो ज्योतिर्वित् पांडुरंगस्य
,, काशीनाथ नृसिंहशास्त्रिण:
,, परशुरामभट्ट दांडेकरस्य
,, आत्माराम गरुडस्य

,, काळोनामक गोविंदभट्ट
,, खरे इत्युपनामशंकरोपाध्यायस्य हेदवीस्थसा
,, विराटनगरस्थाष्टपुत्रोपाभिध नरसिंहस्य
,, बाजिभट ढेरे कसबेपुणें
;, थथेत्युपनामक विनायकभट्टस्य
,, हरिदिक्षित गोरे व नारायण जोशी

पत्राप्रो साक्ष-मल्हारदीक्षितस्मार्त पैठनकर
संमतोयमर्थो बाबादीक्षित आठल्योनामकस्य
पत्राप्रो. साक्ष-सदाशिवभट्ट दात्ये वा. खेड

पत्राप्रो. साक्ष–रघुनाथभट्ट सोमण परशुरामकर पत्राप्रो. गंगाधरभट केंव हरिहरेश्वरकर संमतोयमर्थः त्र्यंबक दीक्षितानां पटवर्धनोपनामकानां

,, धोंडज्योतिषी विनायकस्य पावसग्रामस्थस्य

राजापूरप्रांतस्थ ज्योतिर्षि व धर्माधिकारी गुर्जरोपाव्हमहेश्वरोपाध्यायानां सर्वथा संमत एवायमर्थः

## गृहस्थांच्या सह्या.

पत्राप्रो. साक्ष–एमाजी शिवदेव

,, लक्ष्मण चिंतामण धडपळे देशमुख प्रां. पुणें

,, रामाजी महादेव बिवलकर

,, जिवाजी गणेश लिमये

कृष्णाजी त्र्यंबक उपनामगोरे क्षेत्र श्री. मं.

,, शंकराजी गणेश

,, विष्णु विश्वनाथ उपनाम पंडीत

,, गोपाळराम महोद्रे देशपांडे प्रां. पुणें

,, धोंडो मल्हार पुरंधरे जोतिषी कुळकर्णी प्रां. सासवड आदेश कुळकर्णी

,, बाबूराव नृसिंह खरे

,, निलकंठ नारायण मजुमदार प्रभुणे जोशी कुळकर्णी मौजे लोणी प्रांत सुपे

,, कृष्णाजी हरी रास्ते

,, नारोबा बाजी अभ्यंकर

,, बापुराव राम फडणीसभाऊ

,, जनार्दन बल्लाळ फडणीसभाऊ

पत्राप्रो. साक्ष–विसाजी गोविंद गोडबोले कसबा पावस सुभा राजापूर

बळवंतराव गणपत मेहंदळे हरेश्वरकर

केशवराव लक्ष्मण पानशी जोशी कुळकर्णी प्रांत सासवड

,, बाबुजीभाई जोशी

,, कृष्णाजी जिवाजी वाकील कुळकर्णी कसबा कोरगांव प्रां. वाई

निळकंटराव सरनाईक किल्लेपुरंधर

बाजी हरी निंबकर

,, गोविंद हरि पटवर्धन

,, महादाजी खंडेराव देशपांडे प्रां. पुणें

,, बाबुराव रघुनाथ देवस्थळी

,, नारो आपाजी कुळकर्णी मौजे पाडीली प्रांत वाई

,, गंगाधर बाबुजी ओंकार

,, त्र्यंबकराव विश्वनाथ पेठे

,, लक्ष्मण बल्लाळ गुणे

,, बाळाजी अनंत भिडे

याच आशयाचीं दोन पत्रें श्रीमंत बाळाजी बाजिराव प्रधान यांनीं पहिलें अठागर प्रांतस्थ ब्राह्मण यांस छ ६ सफुर सुमा सबा खमसेन मयावअफल व दुसरें राजेश्री मानाजी आंग्रे वजारत माब गोसावी यांस छ ६ सफुरचें, पाठविलीं आहेत.

श्री.

राजेश्री मानाजी आंग्रे वजारत माब गोसावी यांस,

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने. बाळाजी बाजिराव प्रधान आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित असलें पाहिजे, विशेष. पत्र पाठविलें तें प्रविष्ट झालें. क्रमवन्त ब्राम्हण यांस येथें पंक्तींत घ्यावयास आक्षेप सर्वांनीं केला म्हणून लिहिलें तें कळलें. ऐशास येथें आले होते त्यांस पंढरपूरच्या मुक्कामीं सरकारांत पंक्तीस घेऊन भोजन केलें त्याप्रमाणें तेथेंही सर्वांनीं व्यवहार करावा. याप्रमाणें समस्त ब्राम्हणांस ताकीद करून पंक्ति व्यवहार करवावा. सु॥ छ १ माहे जमादिलावल बहुत काय लिहिणें.

याच आशयाचीं पत्रें छ १ जमादिलावल सुरसुबाखमसेन मियावअलफचें पत्र समस्त ब्राह्मण प्रांत कल्याण भिवडी व प्रांत साष्टी व प्रांत वसई यांस लिहिलें आहे व दुसरें छ १७ माहे जमादिलावलचें राजेश्री कांकाजी रायाजी व खंडो गणेश कारकून तर्फ वामणगांव यांस श्री. बाळाजी बाजिराव प्रधान यांनीं लिहिलें आहे.

श्री.

राजेश्री बाबाजी आपाजी महाल नागांव यांस सु।। सब खमसेन मयावअलफ.

वे. क्रमवन्त यांजकडेस पुणेकर ब्राह्मणांहीं कलह निर्माण करून बखेडा पाडला होता त्या निमित्त क्रमवन्त पुण्यास जाऊन राजेश्री पंत प्रधान यांचे सन्निध कलहाचें वृत्त निवेदन केलें. त्यांहीं सर्व वृत्त मनास आणून आपलीं व तेथील ब्राम्हणांचीं पत्रें इकडील प्रांतस्थ ब्राम्हणांस आणून कलह निवारण केलें त्यांत कांहीं किंचित लढा पंक्तिव्यवहाराविषयीं होता. कीं पुणियास पंक्तिव्यवहार झाला नसतां आम्ही करीत नाहीं ऐसा इकडील प्रांतस्थ ब्राह्मणांहीं आक्षेप घेतला त्यावरून पुन्हां क्रमवन्त राजेश्री प्रधान पंतापावेतों जाऊन पंढरपूरचे मुक्कामीं त्यांचे पंक्तीस व्यवहार करून त्यांचीं पत्रें हुजूर वै इकडील प्रांतस्थ ब्राह्मणांस घेऊन आले त्यावरून यांजकडेस कांहीं संशय राहिला नाहीं म्हणून यांची वृत्ति त्यांचे स्वाधीन केली आहे. क्रमवन्त आपली वृत्ति चालवितील सुखरूप चालू देणें. आक्षेप न करणें. छ १७ माहे जमादिलावल.

मोर्तब.

## श्री.

आज्ञापत्र राजश्री पंत प्रधान ता। माहाजन व ग्रामस्थ माहाल नागावे व अकसी प्रांत अष्टागर सुरसमान खमसेन मयातेनवअलफ क्रमवंत ब्राह्मणांविषयीं पूर्वी संमत पत्र व सरकारचीं पत्रें पाठविलीं असतां तुह्मीं येथील पंक्तिव्यवहाराचा आक्षेप घेतला त्याजवरून श्रीपंढरपुरी यांचा पंक्तिव्यवहार करून तुह्मांस व शिष्टांस पत्रें पाठविलीं असतां तुह्मी ह्मणतां कीं यांचें घरीं भोजनास जाणार नाहीं. व यांस कोठें अनुष्टानही सांगणार नाहीं तरी यास संमत पत्रापेक्षां अधिक गोष्टी बोलावयास प्रयोजन नसे. तरी यांचे घरीं पूर्ववत् प्रमाणें चालविणें व यांस सर्वत्र अनुष्ठानीं लावावें व संमत पत्रीं लेख केला आहे कीं जो यजमान संतोषें यांचेहातें अनुष्टान चालवील तेथें कोणी आक्षेप न करावा. जो यजमान अन्यहस्तें चालवील तेथें यांणीं आह्मींच चालवूं हा आग्रह न करावा ऐसे संमत पत्रांत असतां अन्यथा वर्तणूक केल्यानीं क्षमा होणार नाहीं जाणिजे छ २६ जिल्काद् आज्ञा प्रमाणें.

श्री

वे०शा० सं० राजमान्य राजश्री चेऊल प्रांतस्थ समस्त पंडित वेदिक ब्राम्हण यांप्रती *पुण्य* नगरनिवासी श्रीमत्प्रधान पंडित सभास्थित समस्त पंचद्राविड पंडित वैदिक ब्राह्मणें कृत नमस्कार विनंति उपरी येथील क्षेम भाद्रपद वदि १३ पर्यंत जाणोन स्वकीये कुशल वृत्त लिहित असिलें. पाहिजे विशेष तुमचा व क्रमवंत ब्राम्हणांचा अनुष्ठानाविषयीं व पंक्ती-विषयीं पूर्वी विवाद लागला होता यास्तव तुमचे ब्राह्मण व क्रमवंत येथें श्रीमंतांसंनिध येऊन उभयतांनीं आपलें वृत्त निवेदन केलें त्यावरून श्रीमंतांहीं सर्व ब्राम्हणांचे संमतें करून निर्णय केला कीं सर्वांहीं क्रमवंतांशीं पंक्तिव्यवहार निर्विवाद करावा ज्याचे चित्तास येईल त्याणें क्रमवंतांस अनुष्ठानीं निवेश करावा ज्याचे चित्तास न ये त्यांनीं क्रमवंतांचे गुमास्त्यास अनुष्ठानीं निवेश करून वृत्तीचा अंश होईल तो क्रमवंतांस द्यावा याप्रमाणें निर्णय होऊन तुह्मांस पत्रें पाठविलीं त्यांस तुह्मीं आक्षेप केला कीं श्रीमंतांचे घरीं शिष्टांनीं तुह्मांशीं पंक्तिव्यवहार केला असता तर आम्ही करतों त्यावरून क्रमवंत पंढरपूरचे मुक्कामीं श्रीमंतांसंन्निध येऊन निवेदन केलें तेव्हां श्रीमंतांहीं शिष्टब्राह्मणांसहवर्तमान क्रमवंत ब्राह्मणांस पंक्तिपावन करून पत्रें देऊन तुह्मांकडे पाठविलें त्यावरून तुम्हीं त्यांशीं पूर्व पत्राप्रमाणें व्यवहार करीत आला यानंतर कल्याणामध्यें वेदमूर्ति राजश्री रामचंद्र दिक्षित जोगळेकर यांचे घरीं ब्राह्मणसमाराधनेस बहुत समुदाय झाला तेथें पंक्तीमध्यें क्रमवंत बसले होते यास्तव तुम्हांकडील चौघे ब्राह्मण गोपाळभट्ट गाडगीळ, शंकरभट्ट सोहनी, गणेशभट्ट करवा व गोविंदभट्ट पाळंदे हे पंक्तीमधोन उठोन गेले अवशिष्ट सर्व शिष्ट ब्राह्मणांहीं क्रमवंतांस पंक्तीस घेऊन भोजन केलें तुमचे चौघे ब्राह्मण तुह्मांकडे गेलियावर तुह्मीं त्यांस शिक्षा करावी ती न केली हें वर्तमान क्रमवंतांनीं श्रीमंतांस निवेदन केलें त्यावरून हें सत्य किंवा मिथ्या ऐसें मनास आणावयानिमित्त तुह्मांकडील हरभट्ट गाडगीळ प्रमुख ब्राह्मण येथें आहेत ते बोलावून आणून त्यांस विचारलें त्यांनीं लिहून दिलें कीं पंक्तीमधून चौघे ब्राह्मण उठोन गेले त्यांजकडे या गोष्टीचा अन्याय लागला त्यांस शिक्षा कर्तव्य असेल ती करावी त्यानंतर समस्त शिष्टांहीं निर्णय केला कीं ज्या चौघांहीं शिष्टमर्यादा व राजाज्ञा उल्लंघिली त्यांस कर्तव्य शिक्षा करणें उचित आहे हें जाणोन तुह्मांस हें पत्र लिहिलें असे तरी येथें सर्व शिष्टांहीं जें केलें तें तुह्मींच केलें अतःपर तुम्हीं त्या चौघाब्राह्मणांस शिष्टकृत मर्यादेचें उल्लघन निमित्तक निबंधोक्त प्रायश्चित्त देऊन क्रमवंतांशीं **सोळाशें अठ्याह्त्तरांत निश्चय पत्रें** पाठविलीं आहेत त्याप्रमाणें व्यवहार करीत जावा व पुढेंही जो मर्यादेचें उल्लंघन करील त्यास शासन करावें जो तुमचें न आयकेल त्याचें पारिपत्य येथून होईल तुम्हीं क्रमवंतांशीं पंक्तिव्यव-हार करून गंधतीर्थाविषयीं संदेह करितां ही गोष्ट उत्तम नाहीं जेथें अन्नव्यवहार येके पंक्तीस जाहला तेथें गंधतीर्थाविषयीं शंका करणें हें शिष्टांस योग्य नव्हे येथून क्रमवंतही तुम्हांकडे पत्रीं लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करून उत्तर पाठवावें ब्राम्हणांशीं बहुत क्षोभ करणें

उचित नाहीं बहुत काय लिहिणें हे विज्ञप्ति. हें पत्र वाचून पत्राची तालीक घेऊन भोगोटी यास क्रमवंतांपाशीं पत्र परतोन देणें, पंक्ति ३२

संमतोयमर्थ स्तैलंग बाळकृष्णशास्त्रिण:
वेराटक्षेत्रस्थ नृसिंहस्य संमतोयमर्थः आत्माराम गरुडस्य
संमतोयमर्थः कोटदीक्षितानांसंमतमिदं रामशास्त्रिण:
संमत जनार्दनभट्ट शाळग्राम अठवरे प्रांत पुणें
संमतोयमर्थ भैरव ज्योतिर्विद:
पत्रार्थेसंमतिः संगमेश्वरकर इत्युपनाम बाळकृष्ण ज्योतिर्विद:

संमतंविश्वंभरदीक्षितानां । संमतोयमर्थः बापूभट्ट जोगळेकर । परशुरामभट्ट दांडेकर । पत्रार्थ संमत रघुनाथ सोमण परशुरामकर । श्रीनिवासकांचिस्थस्य संमतं । कृष्णदशपुत्रस्य संमतोयमर्थः । संमतोयमर्थः आठल्योपनामक यज्ञेश्वर दीक्षितस्य । संमतोयमर्थः शंकर दीक्षितानां । साक्ष सदाशिव दिक्षित दात्ये सांप्रत वास्तव्य खेड । संमतोयमर्थः पाटणकरोपाख्य कृष्णस्य । संमतोयं वैद्योपनामक धुंडिराजाग्निहोत्री । संमतोयमर्थः ज्योतिर्वित्पांडुरंग दीक्षितस्य । संमतोयमर्थःविद्वांसोपनाम धुंडिराज दीक्षितस्य । पत्रार्थ संमत बाळंभट साने देवरुखकर उपाध्ये संमतोयमर्थः श्रीवर्धनकरोपनामक धुंडिराज देवज्ञस्य संमतोयमर्थः खित्राव इत्युपनाम काशिनाथस्य संमतोयमर्थः गंगाधरभट कर्वे हरिहरेश्वरकर संमतोयमर्थः वरिश्वेर यजनः मनोहरोपनामकस्य संमतोयमर्थः थयोपनामक विनायकभट्टस्य संमतोयमर्थः गोविंदभट्ट सहस्रबुध्युपनामकस्य संमतमिदं श्रीनिवासशास्त्रिण: संमतमिदं हनुमदुपनामकस्य गंगाधरस्य संमतोयमर्थः रायरीकरोपनामक महिपति’

श्री.

## श्रीमंत राजश्री मानाजी आंग्रे वजारतमाब

गोसावी यांस—

आश्रित बाबुभट्ट नेने व दामोदरभट्ट उपाध्ये प्रमुख समस्त ब्राम्हण वास्तव्य रेवदंडा यांचे अनेक आशीर्वाद विनंती विशेष. आपण क्रमवन्त ब्राह्मणांविशयीं पत्र पाठविलें कीं यांजकडे पूर्वी पुणेकर ब्राम्हण यांहीं लटका कजिया करून यांजवर आरोप आणला होता त्यांजवर पुण्यास जाऊन क्रमवन्तांहीं आपला निगम करून आणिला ऐसें असतां मागती एथील ब्राम्हणांहीं पुणेकरांचे पंक्तिव्यवहाराविशीं आक्षेप घेतला ह्मणून मागती क्रमवंत श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीजवळ जाऊन पंढरपूरचे मुक्कामीं शिष्टसहवर्तमान यजमान स्वामींचे पंक्तीस भोजन करून आले. अतःपर किमपी लढा राहिला नाहीं. तुह्मीं सर्वांहीं यांस पंक्तीस घेऊन पूर्ववत् चालवावें म्हणून लिहिलें त्यास येविषयीं श्रीमंत राजेश्री पंतप्रधान स्वामींचें पत्र आहे. व आपलेंही पत्र आलें त्यावरून पूर्ववत प्रमाणें क्रमवन्तांस पंक्तीस घेऊन भोजन केलें. आपले प्रांतीं व्यवहार चालता करणार आपण समर्थ आहांत. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे लक्षाधिक आशीर्वाद.

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री समस्त ब्राह्मण प्रांत चेऊल व अष्टागर स्वामींचे शेवेसी:-

विद्यार्थी बाळाजी बाजिराव प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल लिहीत असलें पाहिजे विशेष. तुमचा व क्रमवंतांचा कलह झाला ते निमित्त तुमचे ब्राम्हण व क्रमवंत येथें आले त्यांचे वर्तमान मनास आणोन शिष्टब्राह्मणांहीं तुह्मांस पत्रें लिहिलीं आहेत त्याप्रमाणें वर्तणूक करावी. हें उत्तम आहे अत:पर कलह केलियास सर्वथा कार्यास येणार नाहीं जाणिजे. छ २५ मोहरम सुमा तिसा खमसेन मयावअलफ बहुत काय लिहिणें हे विनंती.

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री समस्त ब्राह्मण तालुके अष्टागर प्रांत चेऊल स्वामींचे शेवेसीं

विद्यार्थी बाळाजी बाजिराव प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहित असलें पाहिजे विशेष क्रमवंत ब्राह्मणांचे न्याय मनास आणून समस्त ब्राह्मणांचें व सरकारचें पत्र देऊन क्रमवंतांस तुम्हांकडे पाठविलें त्यानंतर पंक्तिव्यवहाराविशीं तुह्मीं आक्षेप केला त्याजवरून क्रमवंतांशीं येथें पंक्तिव्यवहार होऊन पत्र पाठविलें त्यास ते प्रमाणें चेऊल रेवदंडे येथें ब्राम्हणांनीं क्रमवंतांस पंक्तीस घेतलें त्यामुळें तुम्हीं तट करून मागती क्रमवंतांचे समंधीं व यांस वाळींत टाकिलें हे गोष्ट अयोग्य केली या उपरी गत वर्षीं सर्व प्रांतस्थ मिळोन संमत पत्र केलें. त्याप्रमाणें तुम्हीं व क्रमवंतांनीं वर्तणूक करावी. संमतपत्रास कुतर्क नानाप्रकारें करून कलह वाढवून कजिया येथें आणितां हें उत्तम नसे फिरोन कजियाचा बोभाटा आलियास क्षमा होणार नाहीं. समस्तांचें प्रमाण जालें आहे त्यास अन्यथा चालतील त्यांस संमतपत्रात शासन लिहिलें आहे तें होईल असें समजोन कलह न करणें जाणिजे. रवाना छ ३ माहे जिल्हेज बहुत काय लिहिणें हे विनंती.

श्री.

तीर्थरूप मातुश्री आजीसाहेब वडिलांचे शेवेसी—आपत्यें राघोजी आंग्रे वजारतमाब मु. मुरुड चरणावर मस्तक ठेवून दंडवत विज्ञापना. येथील कुशल फाल्गुन व॥ ५ गुरुवार पावेतों सुखरूप जाणोन स्वकीयें कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष क्रमवन्त येऊन विदित केलें कीं श्रीमंतांचीं व साष्टीचीं पत्रें आलीं असतां प्रांतस्थांचे चित्तास सदयता आह्मांविशीं न आली सांप्रत प्रांतस्थ शिष्ट ब्राह्मण कांहीं आम्हांवर सदय होऊन श्रीमंतांचे व शिष्टांचे पत्राचा अर्थ प्रमाण मानोन पूर्ववत् प्रमाणें व्यवहार चालवीत असतां कांहीं शिष्ट भिक्षुक प्रमुख गृहस्थांचा दुराग्रह आहे तो न सोडितां दोन तट केले आहेत कांहीं आमचे तटास व कांहीं ते तटास याप्रमाणें होऊन आमचे व्यवहारास दुराग्रहास प्रवर्तले आहेत. याविशीं पत्र असावें दोन तट नसावे पूर्ववत् प्रमाणें आमचा सर्वांचा एक तट करून द्यावा ह्मणून विदित केलें व राजश्री नारोपंत सुभेदार यांचेंही पत्र आह्मांस आलें त्यांतही हाच मजकूर कीं श्रीमंतांचे आज्ञेप्रमाणें आह्मीं क्रमवन्तांशीं पूर्ववत् प्रमाणें पंक्तिव्यवहार गंधतीर्थ घेऊन महारुद्रादिक अनुष्ठानही यांचे हातोन चालविलें असें असतां आपले प्रांतांत बखेडा कां असावा ते पत्रच वडिलांस श्रवणांस पाठविलें आहे तर श्रवण करून सर्व वृत्त मनास आणून एके प्रांतांत दोन तट न होऊं देतां जे श्रीमंतांचे आज्ञेचे तटास मिळोन क्रमवन्तांचा वेव्हार चालवित आहेत त्यांतच सर्व प्रांतस्थ मिळोन वर्तत ते निक्षूण करून बखेडा दूर करावा. अतःपर बखेडा कामाचा नसे असें स्पष्ट सांगोन जे वर्तत नसतील ते वर्तवावें रवाना छ १७ रजब बहुत काय लिहिणें हे विनंती.

# श्री.

राजश्री राघोजी आंग्रे वजारतमाव गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री स्नेहांकित नारो त्रिंबक आशीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीयें लिहित असावें या नंतर कमवन्त ब्राह्मण तुमचे प्रांतीं आहेत त्यांनीं श्रीमंतांचें आज्ञापत्र व समस्त शिष्ट ब्राह्मण यांचीं संमती पत्रें उंदेरीचे मुक्कामीं दाखविलीं व आपणांसही पत्रें आहेत ऐसें असोन त्यांचे वृत्तिलोप करणार त्यांनीं अनेक दिकती करून ते ब्राह्मणांची छळणा करितात श्रीमंत वलयांकीत पृथ्वीचे सत्तापुरुष यावत्तर बंगाल व महाक्षेत्र वाराणशीपावेतों त्यांची आज्ञा कोणी मोडीत नाहीं असें असोन आपला त्यांचा पुरातन घरोबा येथेंच त्यांचे आज्ञेचा लोप स्वल्प गोष्टीसाठीं होतो हे शब्द लागायाचें कारण यास्तव लिहिलें आहे आह्मी उंदेरीचे कार्य सिद्धी व्हावी म्हणून समस्त ब्राह्मणांस आमंत्रणें करून अनुष्ठानें महारुद्रादिक नवसाचीं करविलीं त्यांत हुजूरची आज्ञा पाहून कमवन्तांसहित अनुष्ठान व महा-रुद्र करवून पंक्तीस तीर्थगंधादिक यथाविध पूजन केलें येणेंप्रमाणें संमतपत्र व आज्ञेप्रमाणें केलें तर आपणही त्याप्रमाणें जो न करील त्यास ताकीद करून कोणी दुसरा तट न करी तें करावें ह्मणोन घरोब्याप्रमाणें उभयपक्षीं किंतु न होतां सर्व गोष्टी उत्तम होतील रवाना चंद्र १९ रजब बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

श्री.

श्रीयामह चिरंजीव आका रावजी मो कुलाबा यांसी राघोजी आंग्रे वजारत माव अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीयें लिहित जाणें. विशेष कमवन्त हुजूर येऊन विदित केलें कीं आमची वृत्त चालविली आहे. वृत्तीचें उत्पन्न जाहलें आहे तें आमचें देववावें त्यावरून तुम्हांस लिहिलें आहे तर कमवन्तांची वृत्ति चालविली आहे तिचें उत्पन्न जाहले असेल तें याचें यांस देववावें येविशीं गांवगन्नाही उत्पन्नाविशीं ताकीद पत्रें देणें यांचें उत्पन्न यांचें हवाली होई तें करणें. ज्यांही ज्यांही चालविली आहे त्यांहीं निःसंशय उत्पन्न यांचे हवालीं करणें येविशीं फिरोन बोभाटा हुजूर न येऊं देणें रवाना छ २० रजब.

मोर्तबसुद.

श्री.

यादी—वेदशास्त्रसंपन्न पुरुषोत्तम जोशी व बचंभट्ट राइरकिर वास्तव्य कसबें चेऊल प्रांत मजकूर यांणीं हुजूर विदित केलें कीं आह्मीं दहा पंधरा घरें क्रमवन्तांचे शरीर संबंधीं कसवें मजकुरीं राहतों त्यांस वे. शा. सं. राजश्री बापूभट्ट नेने वास्तव्य रेवदंडा व दामोदरभट्ट धर्माधिकारी वास्तव्य चेऊल हे उभयतां प्रमुख समस्त शिष्ट ब्राह्मण चेऊल रेवदंडा येथील राहणार हे आह्मांसमागमें अनुष्ठान व अन्नव्यवहार करीत असतां बापूभट्ट प्रथम व बाळंभट्ट मोदगी हे पांच सात मिळोन आह्मांस ह्मणतात कीं तुह्मीं क्रमवन्तांचे संबंधी याजकरितां तुम्हांसमागमें जे अनुष्ठान करतील त्यां समागमें व तुम्हांसमागमें अनुष्ठान करीत नाहीं. ऐसा दुराग्रह करून तट करितात त्यांस पूर्वी श्रमिंत कैलासवासी नानासाहेब यांणीं क्रमवन्तांस व त्यांच्या शरीरसंबंधीं यांचे पूर्ववत् प्रमाणें चालवावें याविशीं पत्रें दिलीं त्याप्रमाणें व्यवहार चालतो आणि या उभयतांहीं तट केला अ हे येविशीं आज्ञा केली पाहिजे ह्मणोन विनंती केली त्याजवरून हें पत्र सादर केलें असे तरी पेशजी सरकारचीं पत्रें सादर होऊन यांचा व्यवहार चालत आला आहे त्याप्रमाणें चालवणें, बापूभट्ट व बाळंभट्ट तट करितील त्यांस ताकीद करणें म्हणून

पत्रें.

राघोजी आंग्रे वजारतमाब यांस १ –<br>
मोराजी शिंदे यांस रेवदंड्याशीं १<br>
२

सिकी बापूभट्ट व बाळंभट्ट यांचे समागमीं ब्राम्हण रेवदंडेस राहतात त्यांस ताकीद करून वावगी दिक्कत न करीत तें करणें म्हणून— –<br>
२

९ सदरहूप्रमाणें दोन पत्रें देणें-

संमतं.

श्री.

राजश्री राघोजी आंग्रे वजारत माब गोसावी यांसी अखंडित लक्ष्मीआलंकृत राज मान्य राजश्री माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वयें कुशल लिहीत असलें पाहिजे विशेष क्रमवंत ब्राह्मण यांनीं हुजूर येऊन विदित केलें कीं आमच्या ब्राह्मण्याच्या व्यवहाराचा सिद्धांत पेशजी हुजूरहून होऊन शिष्ट ब्राह्मणांचें संमत जाहालें त्यांत अन्वय कीं या ब्राह्मणांच्या वृत्ती अष्टागर प्रांतीं आहेत त्यास यांचा पंक्तिव्यवहार व तीर्थगंध चालवावें आणि प्रयोजन इच्छेस येतील त्या ब्राह्मणांकडून करवावीं वृत्यांश यांनीं घ्यावा याप्रमाणें आहे. त्यास पंक्तिव्यवहार येकवाक्यता करून यथास्थित न चालवीत आणि वृत्ती मात्र अन्यहस्तें चालवूं म्हणतात तरी इतरहस्तें वृत्ती चालवावी याच्या मनाझाल्याविना पंगत चालत नाहीं म्हणोन विनंती केली त्याजवरून हें पत्र तुम्हांस लिहिलें असे तरी यथापूर्वक पंगत व तीर्थगंध चालल्यास वृत्तीही इच्छेस येतील त्याजकडून चालवाव्या पंक्तीस व तीर्थगंधास दिक्कत करूं लागले तरी वृत्ती इतरहस्तें चालों न देणें. जाणीजे छ ६ सफार सुमा इसन्ने सितेन मयावअफल बहुत काय लिहिणें.

श्री.

राजश्री राघोजी आंग्रे सरखेल गोसावी यांसी सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहीत जावें विशेष वेदमूर्ति पुरुषोत्तम जोशी व बचंभट्ट राइरीकर वास्तव्य कसबें चेऊळ प्रांत मजकूर यांणीं हुजूर येऊन विदित केलें कीं आह्मीं दहा पंधरा घरें क्रमवंतांचे शरीरसंबंधी कसबें मजकुरीं राहतों त्यास वेदमूर्ति राजश्री बापूभट्ट नेने वास्तव्य रेवदंडा व दामोदरभट्ट धर्माधिकारी वास्तव्य चेऊल हे उभयतां प्रमूख समस्त शिष्ट ब्राह्मण चेऊळ रेवदंडा येथील राहणार हे आम्हांसमागमें अनुष्ठान व व्यवहार करीत असतां बावूभट्ट प्रथम व बाळंभट्ट मोदगी हे पांच सात मिळोन आम्हांस ह्मणतात कीं तुम्हीं क्रमवंत संबंधी याजकरितां तुह्मांसमागमें जे अनुष्ठान करतील त्या समागमें तुह्मांसमागमें अनुष्ठान करीत नाहीं. ऐसा दुराग्रह करून तट करितात त्यास पूर्वीं श्रीमंत कैलासवासी नानासाहेब यांणीं क्रमवंतांस त्यांचे शरीरसंबंधी यांचे पूर्ववत्प्रमाणें चालवावयाविशीं पत्रें दिलीं त्याप्रमाणें व्यवहार चालतो आणि उभयतांहीं तट केला आहे येविशीं आज्ञा केली पाहिजे ह्मणून त्यावरून हें पत्र लिहिलें असे तरी पेशजी सरकारचीं पत्रें तुम्हांस पाठवून व्यवहार चालत आला आहे त्याप्रमाणें चालतें करावें. बावूभट्ट व बाळंभट्ट तट करतील तरी त्यांस ताकीद करावी रा। छ १९ रबिलावल सु॥ समान शितेन मियावअलफ बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

( लेखन सीमा )

राजाराम
नरपति हर्ष निधानं
माधवराव बल्लाळ
मुख्य प्रधान

श्री.

वेदशास्त्रसंपन्न राजश्री शिष्ट व समस्त भिक्षुक व महाजन समस्त गृहस्थ वास्तव्य वेरसोली व थळ, किहीम, आवास, सासवनें—

स्वामीचे सेवेसी.

सेवक राघोजी आंग्रे वजारतमाव दंडवत विनंती उपरी विशेष वेदमूर्ति राजश्री क्रमवंत पुण्यास जाऊन श्रीमंतांचें पत्र घेऊन आले आहेत तेथें लिहिलें आहे कीं क्रमवन्त ब्राह्मण यांनीं हुजूर येऊन विदित केलें कीं आमच्या ब्राह्मणाच्या व्यवहाराचा सिद्धांत पेशजी हुजूरहून होऊन शिष्ट ब्राह्मणांचें संमत जाहालें त्यांत अन्वय कीं या ब्राह्मणांच्या वृत्ती अष्टागरें प्रांतीं आहेत त्यास यांचा पंक्तिव्यवहार व तीर्थ गंध चालवावें आणि प्रयोजनें इच्छेस येतील त्या ब्राह्मणांकडून करवावीं वृत्यांश यांनीं घ्यावा याप्रमाणें आहे त्यास पंक्तिव्यवहार एकवाक्यता करून यथास्थित न चालवीत आणि वृत्ती मात्र अन्य हस्तें चालवूं म्हणतात तर इतरहस्तें वृत्ती चालवावयाच्या मनाझाल्याविना पंगत चालत नाहीं म्हणोन विनंती केली त्याजवरून हें पत्र तुम्हांस लिहिलें असे तरी यथापूर्वक पंगत व तीर्थ-गंध चालल्यास वृत्तीही इच्छेस येतील त्याजकडून चालवाव्या पंक्तीस व तीर्थगंधास दिक्कत करूं लागले तरी वृत्ती इतरहस्तें चालों न देणें म्हणोन श्रीमंतांचीं पत्रें आणिलीं याजवरी तुह्मां समस्त प्रांतस्थांचा समाज श्रीबागीं श्रीच्या देवालयीं करून वारंवार पत्र श्रवण सर्वांस करविलें आणि पत्राप्रमाणें पंक्तिव्यवहार तीर्थगंध चालवीत जावें म्हणोन शिष्टांस प्रार्थनापूर्वक व गृहस्थांस सूचनापूर्वक सांगितलेंच आहे तथापि सर्वांनीं आग्रह निवे-दन केला कीं पंक्तीस मात्र घेऊन तीर्थगंध घेणार व लावणार नाहीं म्हणोन त्याजवरून पुनः पुनः साक्षेप पूर्वक सांगितलेंच आहे कीं श्रीमंतांचे पत्राप्रमाणें क्रमवंतांचा पंक्तिव्यवहार व तीर्थगंध घेणें व लावीत जाणें सांप्रत क्रमवंत तुम्हांकडेस आले असत. श्रीमंतांचे पत्राप्रमाणें तुह्मीं व क्रमवन्त वर्तणूक करणें पंक्ती व तीर्थगंधाविषयीं अतःपर श्रीमंतां-पावेतों बोभाट न जाई ऐसें करणें. पंक्तिव्यवहार न चालविला व तीर्थ न घेतलें व गंध न लावलें तरी इतरहस्तें कार्य चालों न देणें म्हणोन श्रीमंतांचे पत्रीं आज्ञा लिहिलीच आहे त्याप्रमाणें इतरहस्तें कार्य न चालविणें रा॥ छ २५ रा॥ वल बहुत काय लिहिणें हे विनंती.

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री शिष्ट व समस्त भिक्षुक व समस्त गृहस्थ श्रीबाग स्वामींचे सेवेसी—सेवक राघोजी आंग्रे वजारतमाब दंडवत विनंती उपरी विशेष वेदमूर्ति राजश्री क्रमवंत पुण्यास जाऊन श्रीमंतांचें पत्र घेऊन आले आहेत. तेथें लिहिलें आहे कीं क्रमवंत ब्राम्हण यांनीं हुजूर येऊन विदित केलें कीं आमच्या ब्राम्हणाच्या व्यवहाराचा सिद्धांत पेशजी हुजूरहून होऊन शिष्ट ब्राह्मणांचें संमत जाहलें त्यांत अन्वय कीं या ब्राम्हणांच्या वृत्ती अष्टागर प्रांतीं आहेत त्यास यांचा पंक्तिव्यवहार व तीर्थगंध चालवावें आणि प्रयोजनें इच्छेस येतील त्या ब्राह्मणांकडून करावीं वृत्यांश यांनीं घ्यावा याप्रमाणें आहे त्यास पंक्तिव्यवहार येकवाक्यता करून यथास्थित न चालवीत आणि वृत्तीमात्र अन्यहस्तें चालवूं म्हणतात तर इतरहस्तें वृत्ती चालवावयाच्या मनाझाल्याविना पंगत चालत नाहीं ह्मणोन विनंती केली त्याजवरून हें पत्र तुह्मांस लिहिलें असे तरी यथापूर्व पंगत व तीर्थगंध चालल्यास वृत्तीही इच्छेस येतील त्याजकडून चालवाव्या पंक्तीस व तीर्थगंधास दिक्कत करूं लागले तरी वृत्ती इतरहस्तें चालों न देणें ह्मणोन श्रीमंतांची पत्रें आणिलीं याजवरी तुह्मां समस्त प्रांतस्थांचा समाज श्रीबागीं श्रीच्या देवालयीं करून वारंवार पत्र श्रवण सर्वांस करविलें आणि पत्राप्रमाणें पंक्तिव्यवहार तीर्थगंध चालवीत जावें म्हणोस शिष्टांस प्रार्थनापूर्वक व गृहस्थांस सूचनापूर्वक सांगितलेंच आहे तथापि सर्वांनीं आग्रह निवेदन केला कीं पंक्तीस मात्र घेऊन तीर्थगंध घेणार व लावणार नाहीं म्हणोन त्याजवरून पुनः पुनः साक्षेपपूर्वक सांगितलेंच आहे कीं श्रीमंताचे पत्राप्रमाणें क्रमवंतांचा पंक्तिव्यवहार व तीर्थगंध घेणें व लावीत जाणें सांप्रत क्रमवंत तुम्हांकडेस आले असत श्रीमंतांचे पत्राप्रमाणें तुह्मीं व क्रमवन्त वर्तणूक करणें पंक्ती व तीर्थगंधाविषयीं अतःपर श्रीमंतांपावेतों बोभाट न जाई ऐसें करणें. पंक्तिव्यवहार न चालविला व तीर्थ न घेतलें व गंध न लावलें तरी इतरहस्तें कार्य चालों न देणें ह्मणोन श्रीमंतांची आज्ञा पत्रीं लिहिलीच आहे त्याप्रमाणें इतरहस्तें कार्य चालवावयाचीं प्रयोजन नाहीं. रा॥ छ २५ माहे रा। बल बहुत काय लिहिणें हे विनंती.

मोर्तब सुद

श्री.

संमतिपत्र शके १६९२ विकृतिनाम संवत्सरे वैशाख वद्य पंचमी भौमवार तद्दिनीं संमति पत्र त्याहावयास कारण क्रमवंत ब्राह्मणांशीं पूर्वी ब्राम्हणांहीं कलह केला होता तेव्हा क्रमवंत ब्राम्हण पुण्यनगरीं जाऊन श्रीमत् कैलासवासी नानाप्रभूंचे व समस्त विद्वद्वैदिक पंडित ब्राह्मणांचें संमति पत्र चेऊल प्रांतस्थ ब्राम्हणांस आणिलें त्याजप्रमाणें आजपर्यंत वर्तत आले त्यास शके १६९१ विरोधिनाम संवत्सरीं माघ शुद्ध द्वितीयेस श्रीमद्राजश्री वजारतमाव सरखेळ यांचे मातुश्रीनें श्रीदेवाची प्रतिष्ठा व देवालयाचा जीर्णोद्धार करून अर्चा केली त्ये समई सरखेलाईं समस्त प्रांतस्थ ब्राह्मणांस आमंत्रणें केलीं सर्वांहीं मान्य करून कांहीं आले कांहीं न आले संतोषाचा विचार जे आले त्यांहीं अनुष्ठानीं क्रमवंतांचा निवेश करून भोजनादि होऊन अनुष्ठान जाहलें त्यास मास दीढ मास जाहालियानंतर कित्तेक ब्राम्हणांहीं क्रमवंत ब्राम्हणांचे वृत्ति लोभावर दृष्टि देऊन पुन्हा कलह निर्माण केला श्री संगमेश्वरीं ज्या ब्राह्मणांहीं अनुष्टांनीं निवेश करून भोजनादिक केलें त्यांतील कांहींकांस पंक्तींतून उठवावें हा विचार मांडला व एकाठिकाणीं दृष्टिगोचर जाहला हें वर्तमान श्रीमत्राजश्री वजारतमाव सरखेल यांस श्रुत जाहलें जंजिरे कुलाबा येथें तडाग बांधिले त्याचा तडागोत्सर्ग करणार तेव्हां समस्त ब्राम्हणांस आमंत्रणें करून करावें भोजनादिक जाहालें पाहिजे त्यास हे आकांक्षा निर्माण जाहाली तेव्हां श्रीमंतांहीं प्रांतस्थ थोर थोर विद्वद्वैदिक पंडित ब्राम्हणांस पाचारून पृच्छा केली कीं श्रीमंत कैलासवासी नानाप्रभू प्रमुख शिष्ट ब्रांह्मणांची पुण्यनगरीहून संमति पत्रें आलीं त्याजप्रमाणें सुरळित चालत असतां श्री संगमेश्वरीं अनुष्ठान जाहालें ते समयीं सर्वांस आमंत्रणें करून अनुष्ठानास भोजनास सांगितलें ज्यांस अनुकूल पडले ते आले. ज्यांस अनकूल न पडलें ते न आले संतोषावर विचार असतां वृत्ति लोभावर दृष्टि देऊन बखेडा करणारा असें श्रुत जाहलें पुढें आह्मांस तडागोत्सर्ग करणें तेव्हां सर्वांस अनुष्ठांनीं निवेश करउन भोजनादिक जाहलें पाहिजे. यास्तव श्रीमंत कैलासवासी प्रमुख विद्वद्वैदिक पंडित ब्रांह्मण यांचीं संमत्ति पत्रें आलीं त्यास बाध आणणार त्याचा विचार काय तेव्हां चेऊल प्रांतांतील विद्वद्वैदिक पंडित थोरथोर ब्राह्मण यांहीं उत्तर केलें कीं श्रीमंत कैलासवासी पंतप्रधान प्रमुख शिष्टांचीं संमतिपत्रें आलीं तीं आह्मांस मान्य आहेत. एतदर्थीं मान्य अमान्य याची संशय निवृत्ति जाहली पाहिजे तरी समस्त प्रांतस्थांस पाचारून संमत्ति घ्यावया जो अमान्य असें म्हणेल त्यांणीं पुण्यनगरीं जाऊन संमति पत्रें श्रीमंत कैलासवासी प्रमुख समस्त शिष्ट ब्राम्हणांचीं आलीं आहेत त्या पत्रांस बाध ठेवून पत्र आणावें न आणल्यास श्री वाराणशी यात्रेस गेल्याविना तो शुद्ध नाहीं.

## एतदर्थे संमतिः

संमतोयमर्थः बाळंभट्टनामग्निहोत्रिणाम्
संमतमिदं शेवाकूतानां
संमतधोंड ज्योतिर्विदः
संमतोयमर्थः गाडगीळोपाख्य हरिभट्टपौराणिकानां
संमतोयमर्थः गाडगीळोपाभिधभट्ट रामकृष्णस्य
अयमर्थःस्संमतोस्ति नागग्राम निवासिनः
करविंदीकरोपाख्य भट्ट बल्लाळशर्मणः
संमतमिदं फडकोपाभिधा नारायणभट्टानाम् ।
संमतोयमर्थः कृष्णभट्ट पटवर्धनस्य
संमतोयमर्थः भटंभट्ट रिसबूड–
बाळंभट्टवझे
संमतमिंदफाटकोपनामक बापूभट्ट फाठक
रामजोशी
महादेव जोशी पंगारकर
विश्वनाथ भट्ट मराठे
संमत नारोशंकर ग्रा नागांव अक्षी
संमत रामाजीदामले ग्रा नागांव
संमत पत्र गोविंद बल्लाळ आठवले
संमत लक्ष्मण भट्ट रिसबूड
कृष्णाजी दातार नागांव
संमत रामाजी हरीकुंटे ग्रा नागांव
संमतोयमर्थो नेनोपाख्य बापूभट्टानाम्
संमतोयमर्थः गोविंदभट्ट पौराणिकस्य
संमतोयमर्थः विठ्ठलभट्ट पटवर्धन
संमतोयमर्थः रघुनाथभट्ट प्रथमोपाध्यायस्य
महादेव शेशिसंमतमिदं
रामभट्ट गांगल
संमतोयमर्थः बावदेवभट्ट भाटयोपनामकानाम्
संमतोयमर्थः केशवभट्ट जोगळेकर
संमत रामभट्ट शिंत्रे
श्रीमंत व शिष्टाचे पत्रास मान्य रामभट्ट फाटक संमतोयमर्थः

बाबूजोशि संमतोयमर्थः

हरभट्ट पटवर्धन

विठ्ठल जोशी

बाबाजी गोविंद भट्ट

बाजी रघुनाथ आचवल

विसोराम आठवेले

बाळाजी विश्वनाथ पेंडसे

दादंभट्ट भातखंडो संमतोयमर्थः

विठ्ठलभट्ट पेंडसे पत्राप्रमाणें मान्य

रामभट्ट केळेकर मान्य

पत्राप्रमाणें मान्य हरबाजी विठ्ठल आपटे आकशीकर

पत्राप्रमाणें मान्य रामभट्ट आपटे आकशीर

पत्राप्रमाणें मान्य कृष्णाजी फाटक

नारायण जोशी संमत

रामचंद्र जोशी संमत

बाळंभट्ट जोगळेकर संमत

महादेवभट्ट करंदीकर

गणजोयसि संमत

संमत केशवभट्ट केळेकर

संमत रामभट्ट लोंढे

बापूभट्ट रिसबूड

कृष्णंभट्ट बर्वे

पत्राप्रमाणें साक्ष सदाशीव गणेश थथे फडणीस जंजिरे कुलाबा

बाबूदा भालकर

प्रत्राप्रमाणें कृष्णाजी महाजन प्रा। नागांव

बाळाजी नारायण शिंत्रे मान्य

रामजीपंत पेठ्ये मान्य

महादाजी पंत लेले

लक्ष्मणभट्ट लेले

मोरु जोशी मान्य

सदाशिवभट्ट गडबोले

हरभट्ट मराठे मान्य

गोविंद कृष्ण लोंढे मान्य
पत्राप्रमाणें रामभट्ट पटवर्धन
बाळ जोशी मान्य
गोपाळभट्ट गोडबोले मान्य
नारो बल्लाळ आठवले पत्राप्रमाणें मान्य
नारो बल्लाळ वर्तक
बावजी महादेव काणे
गणोबा आठवेले
हरी अनंत
बाबाजी सुंफले
महादेवभट्ट वैशंपायन
बाबजी बल्लाळ आठवेले
वासुदेव नारायण
बाळकृष्ण महादेव आठवेले
त्रिंबक गणेश वईद्य
बाळकृष्ण महादेव रानडये
गणेश राम फाटक
रामाजी नारायण बरवे
केसो रामचंद्र जोशी
पत्राप्रमाणें कृष्णाजी महाजन प्रा नागांव

नारो विठ्ठल लिमये । श्रीसोमेश्वर पत्राप्रमाणें मान्य अंताजी गोविंद आठवेले बाळाजी भिकाजी शिंत्रे मान्य । रामाजी बल्लाळ ठोसरमान्य । बाबाजी सान्ये मान्य । केशव भट्ट आचार्य प्रत्रा प्रमाणें मान्य । विष्णू पंत आठवेले । प्रत्राप्रमाणें मान्य । पत्राप्रमाणें बाळंभट्ट आठवेले । गोपाळ गोखले । विसोबा आठवेले । रामाजी जोगळेकर नागांव । सर्व प्रांतस्थ ब्राह्मणांनीं केलें तें भटंभट्ट शुक्ल यांस मान्य बाबूभट्ट लिमये पत्राप्रमाणें मान्य । प्रत्राप्रमाणें मान्य महादेव भट्ट फाटक । प्रत्राप्रमाणें साक्ष रामाजी अनंत पाटणकर. । विश्वनाथ भट्ट सान्येमान्य. । बाबू लोंढे पत्राप्रमाणें मान्य. । महादाजीपंत आठवेले पत्राप्रमाणें मान्य. । प्रत्राप्रमाणें बाळकृष्ण भट्ट पटवर्धन. । बापुजीपंत सोवनी पत्राप्रों मान्य. । बाळाजी जोगळेकर. बाळंभट्ट भिडे मान्य. शंकरभट्ट वैशंपायन. । सर्व प्रांतस्थ ब्राम्हणांनीं केले तें सदाशीवभट्ट रिसबूड यांस मान्य । जनार्दन भट्ट रिसबूड.

। गोविंदभट्ट वर्वे चंपावतिस्थानानि समंतय: । प्रथमोपाध्याय बावु भट्टानाम् इयंसंमति: । मोदगी बाळंभट्टानां संमतोयमर्थ: । सुंकले भैरव भट्टानां संमतोयमर्थ: । धोंडभट्ट धर्माधिकारिणामियं संमत्ति: । राईरकरोपनामक नारभट्टस्येयं संमति: । पत्राप्रों संमत महादेवभट्ट खरे । पत्राप्रो संमत गणेशभट्ट पेंडशें. । पत्राप्रो सं॥० हरभट्ट दामले । पत्राप्रों सं॥० बावुभट्ट द्वितीय उपाध्ये । संमत पत्राप्रमाणें अनंतभट्ट मराठे. । पत्राप्रमाणें संमत बावुभट्ट बरवे. । बावुभट्ट लिमये. । नारायणभट्ट पाळंद्ये संमतोयं बावूभट्ट बोडस नागांव व वरसोली. । शंकरभट्ट सोवनि । पत्राप्रमाणें संमत आपाभट्ट सोवनी । विठ्ठलभट्ट सोवनी पत्राप्रो सं॥ । नाना गाडगीळ पत्राप्रों संमत । संमतोयमर्थ: वासुदेव ज्योतिषी संगमेश्वेरोपनामक । नारायणभट्ट परांजपे।कृष्णंभट्ट लिमये। अनंतभट्ट रानड्ये । हरिभट्ट रानडये । विठ्ठलभट्ट फाटक । केशवभट्ट दातार । बाबाजीभट्ट वाकणकर. । पत्राप्रो संमत बावुभट्ट शेंडये द्वितीय उपाध्ये । पत्राप्रमाणें मान्य हरभट्ट गोखले उपाध्ये चतुर्थ. । संमत गणेशभट्ट दातार । अयमर्थ: संमतोस्ति भट्ट विठ्ठल शर्मण: । संमत बाळाजी मोरेश्वर आचार्य भोर पंचमहाल उपाध्ये । संमत नारायण भट्ट पटवर्धन । पत्राप्रो सं॥ गोविंदभट्ट वैशंपायन : पत्राप्रो सं॥० महादाजी गणेश झेंसकर मु॥ सासवनें. । पत्राप्रो सं॥ गणेश दादाजी सोमण । पत्राप्रों सं॥० बापूजी दामोदर फाटक । पत्रामाणें संमत गणेश गोविंद सहस्त्रबुद्धे सासवनें बावूराव विठ्ठल झेंमकर मु॥ सासवनें । पत्राप्रमाणें संमत भिकाजी केशव अभ्यंकर मु॥ सासवनें पत्राप्रमाणें मान्य बाळाजी गोविंद बोडस मु॥ सासवणें पत्राप्रमाणें संमत महादाजी बल्लाळ परांजपे नागांवकर हल्ली वस्ती सासवनें । पत्राप्रमाणें संमत बाळाजी नारायण कातरणें मु॥ सासवनें । बाळंभट्ट गोसावी आठल्ये । दादंभट्ट राहाळकर । पत्राप्रमाणें संमत बावजीभट्ट रानडे प्रांतस्थांस मान्य तें आह्मांस मान्य अयमेवार्थ: संमत: रानडे इत्युपनामक बापुभट्टस्य । संमत नारंभट्ट फाटक । संमत महादेवभट्ट करंदीकर । आप्पाजी हरी पाटणकर । अपाभट्ट सहस्त्रबुद्धे । पत्राप्रमाणें बाळाजी रघुनाथ उपाध्ये । पत्राप्रमाणें बाबाजी वरवे । पत्राप्रों रामचंद्र बावाजी साठे । पत्राप्रों गोविंद बल्लाळ विरखंडे । संमतोस्य बाळंभट्ट दातारोपनामक किहिम ग्रामवासी । संमत पत्राप्रमाणें नारायणभट्ट रानड्ये गोविंद दातार.

नारायण वैद्य । आप्पाजीपंत मोडक । महादाजी फाटक । बापूभट्ट लिमये । कृष्णाजी सहस्त्रबुद्धे । दादा गोविंद महाजन । गोविंदपंत सुंकले । बाबाजी केशव उपाध्ये । आप्पाजी गोविंद ओक । आबाजी विश्वनाथ जोगळेकर । गणेशपंत लिमये । बाबाजीपंत मोडक । नारोपंत आपटे । आप्पाभट्ट बोडस । आप्पाभट्ट फाटक । बापूभट्ट भिडे । बाळाजी काळे । नाना गडबोले । गोविंद विठ्ठल जोगळेकर । गोविंद महादेव जोशी । गोविंदराम जोगळेकर । महादाजी विठ्ठल जोगळेकर । संमतमिदं कर्वे इत्युपनामक त्र्यंबकस्य.

**एकंदर संमतींची संख्या:—१३९+८३=२२२**

श्री.

राजाराम
नृपचरणीं सादर मानसिंह
सुत राघोजी वजारतमाव
सरखेल निरंतर

आज्ञापत्र राजश्री वजारत माव सरखेल वेदमूर्ति कृष्ण क्रमवंत वस्ती मौजे थळ सु॥ इहिदे सबैन मियावअलफ तुम्ही हुजूर जंजिरे कुलाब्याचे मुक्कामीं येऊन विनंती केली कीं साहेबाचे छायेस हा काळपर्यंत राहून स्नानसंध्या करून स्वराज्यास अभीष्ट इच्छित आहों सरकारांतून कुटुंब संरक्षणार्थ कांहीं धान्याची बेगमी असावी म्हणून त्याजवरून योर ब्राह्मण यांचें चालवणें अगत्य जाणोन सालिना भात उसनें मॉप केली ॥- मण करार करून तुम्हांस उपभोगास हें आज्ञापत्र सादर केलें असे तरी सदरहू भात साल दरसाल पावत जाईल. छ १९ माहे रजब.

मोर्तब सुद.

**श्री.**

श्रीमत् सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत रा. रा. बाबूराव आंग्रे वजारतमाब सवाई सरखेल यांस शुभचिंतक आश्रितांतर्गत बाबाजीभट्ट टुल्लु व रंगनाथभट्ट टुल्लू वास्तव्य श्रीत्र्यंबकेश्वर यांचे अनेक आशीर्वाद विशेष लिहावयास कारण आम्हीं कांहीं कार्य उद्देशें करून मुंबईस आलों तेथें बंधुवर्ग जगन्नाथभट्ट क्रमवंत व रा. नारोपंत क्रमवन्त हे उभयतां भेटले त्यांनीं परस्पर कुशल वार्तेमध्यें सांगितलें वे. शा. सं. रा रा. बाळशास्त्री बाबा यांचें पत्र आम्हांस आलें होतें तेथें लिहिलें आहे कीं तुमचे जातीचा निर्णय झाला नाहीं तर तुम्हीं पुण्यास निघून यावें ऐसें सांगितलें **त्यास महाराज क्रमवन्त व आह्मीं एक ऐसें वंशपरंपरेनें श्रवण करीत आलों आहों** तरी हे क्रमवन्त आमचे गोत्र पुरुष याजविषयीं कोणी संशय न मानावा. याचप्रमाणें पूर्वीही वडिलांनीं पत्रें दिधलीं आहेतच कळावें सूज्ञ असा. आशीर्वाद मिती माघ शु॥ ३ शके १७२८ क्षयनामसंवत्सरे

बाळंभट्ट शेंडे मु. मुंबई आंतोबा गोसावी वाईकर वस्ती मुंबई.

॥ श्री ॥

राजश्री शिवाजीराव बाजी घाटगे व नरसिंगराव गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ बाबूराव आंग्रे वजारतमाब सवाई सरखेल रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असावें विशेष. *घागर प्रांतीं समस्त प्रांतस्थ ब्राह्मणांनीं कमवंतांची वृत्ति चालत आली त्यांत आकस धरून पंक्तिव्यवहारांत आक्षेप धरीत होते त्यास संस्थानीं स्वारी असतां चार शिष्ट मेळवून त्याचा इत्यर्थ ठराऊन बाजवी रीतीनें प्रवाह चालता केला त्याप्रमाणें चालत आलें हल्लीं तंटे करतात म्हणोन विदित जाहलें त्याजवरून तुह्मांस लिहिलें असे तरी पूर्वीपासून चालत आलि याप्रमाणें चालवावें यांत उगाच कोणी आक्षेप व तंटे करील त्यास निक्षून ताकीद करून पुन्हां कोणीविशीं बखेडा न पडे तें करावें रा॥ छ ५ जिल्हेज सुमा।तिस्सा मिआतैन वआलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

राजा शाहू नरपति चरणीं
सादर येसाजीसुत बाबूराव आंग्रे
वजारतमाब
सवाई सरखेल निरंतर

मोर्तब सुद

## नंबर २

॥ श्री ॥

राजश्री शिवाजीराव बाजी घाटगे व नरसिंगराव गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो॥ बाबूराव आंग्रे वजारतमाब सवाई सरखेल रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असावें विशेष क्रमवंत संस्थानीं आहेत ते सरकारचे उपाध्ये त्यांसी चित्तपावन ब्राह्मण प्रांतस्थ आहेत त्यांणीं द्वेषानें पंक्तिव्यवहार अनुष्ठान प्रसंग त्यांजबरोबर करावयास दिक्कती घेऊन श्रीवेताळजींचे जत्रेस वगैरे जात्रयास दिक्कत घेतली होती व प्रांतांतहि कोठें कार्यें अनुष्ठान प्रसंगास बोलावीत नाहीं या अन्वयें अलीकडे झालें ह्मणोन येथें वे शा सं. हरी क्रमवंत उपाध्ये आले त्यांनीं सांगितल्यावरून त्यास सदरहूप्रमाणें संस्थानीं स्वारी असतां किसे काढले होते त्याची चौकशी होऊन पूर्वापार चालत आल्याप्रमाणें चालतें करून दिलें त्यास हल्लीं कोणी कोणी वेध पाडिला आहे ऐसें ऐकिवांत त्यास ताकीद निक्षून करून पूर्वापार चालत आल्याप्रमाणें चालवावें ये विषयीं तेथें कोणी अतिवादियानें तुह्मांस सांगितल्यास एकंदर ऐकों नये चालत आल्याप्रमाणें चालवावें सारांश **क्रमवंत कुलगुरू** आणि प्रांतस्थांशीं पूर्वापार व्यवहार चालत आहे त्याप्रमाणें चालवावा नवीन दिक्कत प्रांतस्थ घेऊं लागल्यास ताकीद करून प्राचीन चालत आलें असेल त्याप्रमाणें चालवावें रा। छ १४ रबिलाकर बहुत काय लिहिणें हे विनंती.

माहे रजब भाद्रपदमास सन तिस्सा मयावअलफ.

श्री.

राजश्री बाबाजी बल्लाळ चिटणीस गोसावी यांस रामराम विनंती उपरी. अष्टागर प्रांतीं समस्त प्रांतस्थ ब्राह्मणांनीं क्रमवंतांची वृत्ति चालत आली त्यांत आकस धरून पंक्तिव्यवहारांत आक्षेप धरीत होते त्यास संस्थानीं स्वारी असतां चार शिष्ट मेळवून त्याचा इत्यर्थ ठरावून वाजवी रीतींनें प्रवाह चालत केला त्याप्रों चालत आले. हल्लीं तंटे करितात म्हणून विदित झालें त्याजवरून हें पत्र तुह्मांस लिहिलें असे. पूर्वीपासून चालत आलियाप्रमों चालवावें यांत उगाच कोणीं आक्षेप व तंटे करील त्यास निक्षून ताकीद करून पुन्हां कोणेविषयीं बखेडा न पडे तें करावें. रवाना छ ५ जिल्हेज सुभा तिस्सा मिआतेन वअलफ हे विनंती.

श्री.

राजश्री खंडेराव तात्या सुभेदार गोसावी यांस सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित बाबूराव आंग्रे वजारतमाब सवाई सरखेल रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित गेलें पाहिजे. विशेष क्रमवंत प्रकरणीं ब्राह्मणांनीं सांप्रत कांहीं किसे काढून पंक्तिव्यवहारांत खटले करितात ह्मणोन समजलें त्यांस तिगस्तां संस्थानीं आपण आलां होतां ते समई आपणांस याप्रोंच कोणीं समजाविलें होतें त्यावरून आपण आम्हांस पृच्छा केली त्यावरून त्यांचा निर्णयच आपणांस समजाविला तेव्हां त्यांस पंक्तीस आपण घेऊन भोजन केलें. हल्लीं कोणी दरकदार, कारकून मंडळी व ब्राम्हण मंडळी मिळोन खटले करितात त्यास येविशीं आपण निक्षून ताकीद करून स्वारी तेथें असतां प्रवाह चालत आला त्याप्रमाणें चालता करावा. उगेच दुराग्रहाचे किसे काढून ब्राम्हणांचा उच्छेद करावा ही कर्णी ब्राम्हणांस चांगली नव्हत. यास्तव निक्षून ताकीद करून चालत आल्याप्रमाणें प्रवाह चाले तें केलें पाहिजे रा. छ ७ X X बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

मोर्तबसुद.

४८

श्री.

राजेश्री आप्पाजी वइरट सुभेदार गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो बाबूराव आंग्रे वजारतमाव सवाई सरखेल रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहित असावें विशेष दुतर्फांत राजेश्री लक्ष्मण विठ्ठल कारखानिस यांनीं नूतन देवालय श्रीविठोबाचें बांधलें आहे—देवप्रतिष्ठा होणार तेथील वृत्ति क्रमवंत यांची त्यांनीं येथें विनंती केली कीं पूर्वापार अन्वयें हल्लीं आमचे हातून स्थापना व्हावी. म्हणून त्यावरून तुम्हांस लिहिलें आहे तरी क्रमवंत याजविशीं पुणियाहून वे. शा. सं. राजेश्री बाळशास्त्री बाबा यांचीं पत्रें येथें आली व तुम्हांस पत्र आहेच त्याप्रों. होऊन हल्लीं श्रीविठोबाची देवप्रतिष्ठा क्रमवंत यांचे हातून घडविली पाहिजे रवाना छ २ माहे रविलावल बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंती.

श्री.

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वास निधी रा. रा. बाबूराव आंग्रे वजारत-माब सवाई सरखेल तां। पाटेल मौजें मेहुली ता। तर्फ खंडाळें सुभाप्रांत चेऊळ सु॥ सबा मयातेनवअलफ दिल्हे आज्ञापत्र ऐसीजे. × × वे. रा. विश्वनाथ क्रमवंत रामक्रमवंत उपनाम टुल्लु गोत्र कौशिक सूत्र आश्वलायन वस्ती पेठ श्रीबाग उपाध्ये जंजिरे कुलावा यांहीं हुजूर येऊन विनंती केली कीं मकर सक्रांती व व्यतिपात यापर्वास भूमीदान विघे दोन संकल्प करुन धारापत दान दिलें त्याचप्रो बापू जोशी यास एक बिघा व आह्मांस एक बिघा याप्रों दिली आहे. त्याची सनद करार करुन भोगवटीयास देणार धनी समर्थ आहेत. ह्मणोन त्यावरून जमीन बिघा ८१ बिघा एक संक्रांत व्यतिपात पर्वाचे ठायीं उदक पुरःसर संकल्प होऊन दान दिली असे. पेस्तर सन समान मयातेनापासून खाते खराब मो। मजकूर पो। लागवड उत्तम प्रतीची जमीन दिली असे. यास त्यांचे पुत्र पौत्रादि वंशपरंपरेनें भोगवटीयासी खेरीज हक्कदार साल दरसाल आकार होईल तो दान धर्मादाय खर्च लिहित जाणें. प्रतिवर्षीं नूतन सनदेचा आक्षेप धरीत न जातां या सनदेची प्रत करून अस्सल परतोन भोगवटीयास देणें जाणीजे छ २७ जिलकाद मोर्तब सुद.

१८४१ पो। संस्थान कुलावा येथील धर्मादाय बुकाचा नं. ५६ असे.

श्री

राजश्री परशरामपंत दिवाणजी गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो बाबूराव आंग्रे वजारतमाब सवाई सरखेल समराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें विशेष. अष्टागर प्रांतीं समस्त प्रांतस्थ ब्राम्हणांनीं क्रमवन्तांची वृत्ति चालत आली त्यांत आकस धरून पंक्तिव्यवहारांत आक्षेप धरीत होते. त्यास संस्थानीं स्वारी असतां चार शिष्ट मेळवून त्याचा इत्यर्थ ठरावून वाजवी रीतीनें प्रवाह चालता केला त्याप्रों चालत आले हल्लीं तंटे करितात म्हणून विदित झालें त्याजवरून तुम्हांस लिहिलें असे तरी पूर्वीपासून चालत आलियाप्रों चालवावें यांत उगाच कोणी आक्षेप व तंटे करील त्यास निक्षून ताकीद करून पुन्हा कोणेविशीं बखेडा न पडे तें करावें रा। छ ५ जिल्हेज सुम्मा तिस्सा मियातेन वआलफ बहुत काय लिहिणें हे विनंती.

श्री शंकर प्रसन्न

राजेश्री शिवाजीराव बाजी घाटगे गोसावी यांस अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो। खंडेराव नीळकंठ आशीर्वाद विनती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें विशेष वेदमूर्ति रा जगन्नाथ शास्त्री क्रमवन्त वास्तव्य महाल नागांव प्रा अष्टागर यांनीं पुणियाचे मुकामीं येऊन समजाविलें कीं सनसमानचे साली वे राजेश्री गोविंदभट्ट वैशंपायन यांनीं आम्हांसी द्वेशभाव धरून निःकारण सभेंतून उठविलें तेव्हांपासून प्रांतस्थ ब्राह्मण यांनीं आम्हांसी तंट करून वृत्तींत व पंक्तिव्यवहारांत खटले करितात. त्यास येविषयीं मागील कागदपत्र आहेत ते पाहून आमची वृत्ति सुदामत चालत आल्याप्रमाणें पंक्तिव्यवहार सुरळीत चाले ऐसें केलें पाहिजे म्हणोन त्याजवरून याजविशीं पेशजी तुम्हांस पत्र लिहिलेंच होतें. अलीकडे दुतर्फेकर ब्राम्हण यांनीं तालुके उंदेरी येथील सुभेदार येथें आहेत त्यांजकडे जाऊन समजाविलें कीं उपाधिकांचें उत्पन्न दुतर्फी सरकारांत घेतात ते घेऊं नये त्यांचे मोकळीक पत्र द्यावें याप्रमाणें समजावून पत्र घेऊन येथें येऊन मोकळिकीविषयीं पत्र मागूं लागले. ते काळीं तुम्हीं एकपक्षी समजविल्यावरून विनाचोकशी पत्र द्यावयाचें नाहीं असें निखालस सांगितलें इतक्यांत वे. रा. जगन्नाथशास्त्री क्रमवन्त उंदेरीकर सुभेदारांकडे जाऊन दुतर्फादि अष्टागर प्रांतीं वृत्ति आमच्या तेथें पूर्वी प्रांतस्थ ब्राह्मण वृत्तिलोप करणेयास प्रवर्तक होऊन पंक्तिव्यवहारांत बखेडे करूं लागले ते समयीं त्यांची व आमची मनसुबी पुण्यास श्रीमंत स्वामींकडे होऊन सरकारचीं व शिष्ट संमतांचीं पत्रें जाहलीं आहेत त्याप्रों वहिवाट चालत आली असतां सांप्रत प्रांतस्थ ब्राह्मण आम्हांशीं तंट करून सदरहू अन्वयें खटले करतात यास्तव पेशजीचे कागदपत्र आहेत ते पाहून वाजवी बंदोबस्त करून घ्यावा. याप्रों. बोलून मागील सरकारांतून तह करून दिल्याचीं सरकारचीं व शिष्ट संमतांचीं पत्रें आहेत तीं यांनीं समजाविलीं तीं पाहून दुतर्फेकरी ब्राह्मण यांनीं गैर माहुमाती पत्र नेलें तें रद्द करून यांस उंदेरकर सुभेदार यांनीं निखालस पत्र करून दिलें आहे तें पत्र येथें दाखवून. सदरहू वृत्ति व पंक्तिव्यवहार चालण्याचे बंदोबस्ताविशीं संस्थानीं कुळाब्यास इकडील पत्र मागूं लागले त्यावरून यांशीं सांगितलें कीं हा परस्पर ब्राह्मणांचा तंटा याजकरतां तुम्ही येथील सरकारांत हुजूर न्यायाधिशींत वे. शा. सं रा. रा. बाळशास्त्री बावा दिक्षित यांजकडे जाऊन कच्चा वाका कागदपत्रसुद्धां दरोबस्त त्यांस समजावून द्यावा ते मनास आणोन पत्र देतील त्याप्रों. इकडून बंदोबस्त करून देण्याविषयीं गुंता नाहीं यावरून वे. जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांनीं शास्त्रीबावाकडे जाऊन कागदपत्रसुद्धां इत्थंभूत मजकूर समजाविला व मागील पत्रें दाखविलीं त्याजवरून शास्त्रीबावा यांनीं राजेश्री बाबूराव मामा आंग्रे वजारतमाब सवाइ सरखेल यांस व प्रांतस्थ ब्राह्मणांस पत्रें दिलीं तीं क्रमवन्त यानीं येथें दाखविलीं त्यांतील आशय पाहतां पूर्वी कोणी एका क्रमवन्तानें पांडुरंग जोशी यांचे कोटी होम प्रसंगीं मजला आर्त्विज्य द्यावें म्हणोन आग्रह केला होता तेव्हां त्यास न बोलाविलें म्हणोन त्यानें शिष्टांस दुर्भाषणें केलीं या

## श्री सिद्धेश्वर

राजश्री बावूराव आंग्रे वजारत माब सवाई सरखेल यांसी सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रती बाळशास्त्री दिक्षीत आशीर्वाद येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें विशेष वेदशास्त्रसंपन्न राजश्री जगन्नाथ शास्त्री क्रमवन्त वास्तव्य महाल नागांवें प्रांत अष्टागर यांनीं हुजूर न्यायाधिशीकड येऊनी विदित केलें कीं वेदशास्त्रसंपन्न गोविंदभट्ट वैशंपायन यांनीं आह्मांस सभेंतून निष्कारण उठविले तेंव्हांपासून प्रांतस्थ ब्राह्मण यांनीं आह्मांसी तट करून वृत्तींत व पंक्तिव्यवहारांत खटले करितात त्यास येविषयीं मागील कागदपत्र आहेत ते पाहून आमची वृत्ति सुदामत चालत आल्याप्रमाणें चालऊन पंक्तिव्यवहार आह्माशी करून सुदामत चालन ते केलें पाहिजे म्हणून त्यावरून मनास आणून पत्रें पाहतां शके १६४१ सालचें पत्र श्रीमंत कैलासवासी बाळाजी विश्वनाथसाहेब यांचे व मुद्गलभट्ट पंडित राय प्रभृती समस्त शिष्ट संमताचे व प्राचीन वृत्तीसंबंधी वगैरे राज्यपत्रें व आणखीही साधनाचे कागदपत्र पाहतां त्यांतील हांशील **क्रमवन्त हे पुरातन वृत्ति चालवित आले यांचें उपनाम टुल्लु** यांचा मूळ पुरुष कोंकणांत अष्टागर प्रांतीं गेला तो **क्रमाईत होता यास्तव क्रमवन्त असें उपनाव पावले** याप्रमाणें आहे पुढें अष्टागर प्रांतीचे ब्राह्मण यांचे **यजमान** त्यांचा व यांचा अनुष्ठान चालविण्याविशीं नूतन कलह होऊ लागला ते समई पुण्यांत पांडुरंग जोशी यांचे कोटी होम अनुष्ठान प्रसंगीं कोणी क्रमवंतानें मला आर्त्विज्य द्यावें ह्मणोन आग्रह केला होता तेंव्हां त्यास नं बोलाविला ह्मणोन समस्त शिष्टांस दुरुत्तरें बोलूं लागला तेसमयीं कित्येक ब्राह्मण क्रोधून यांचे कुळास आपंक्त पत्र पाठविलें नंतर हे शिष्टमंडळीस शरण आले ते समई त प्रांतीं राहणार ब्राह्मणांचा व यांचा तह करून शके १६७८ सालची सरकारचीं व शिष्ट संमताचा पत्रें करून दिल्हीं आहेत कीं जो यजमान. स्वसंतोषें यांचे हातुन अनुष्ठान चालवील तेथें ब्राह्मणांनीं अधिक्षेप न करावा जो अन्यहस्तें चालवून त्रयांश यांस देईल तेथें यांनीं आग्रह न करावा पंक्तिव्यवहार चालत आल्याप्रों चालवावा. असें असतां अष्टागरकर ब्राम्हण यांनीं आक्षेप घेतला कीं पुण्याहून सरकारचीं पत्रें आलीं त्यांत पंक्तिव्यवहार करावा ह्मणोन आहे परंतु श्रीमंतांनीं तुम्हांसी पंक्तिव्यवहार केला असता तरी आम्ही करितो व कित्येक दिक्कती करून कलह वाढविला तेंव्हां पुन्हां पुन्हां चौकशी होऊन सरकारचीं व शिष्ट संमताची पत्रें आहेत त्यांतील अभिप्राय श्रीमंतांनीं सर्व शिष्टमंडळीसह वर्तमान क्रमवंतांशी पंक्तिव्यवहार केला व कल्याणामध्यें रामचंद्र दिक्षित जोगळेकर यांचे घरीं ब्राह्मण समाराधनेस क्रमवंत होते याजकरितां तुमचे प्रांतीचे चौघे ब्राह्मण पंक्तीमधून उठोन गेले अवशिष्ट सर्व शिष्टांनीं क्रमवंतास पंक्तीस घेऊन भोजन केलें हें वर्तमान येथें कळल्यावर चौकशी होऊन त्या चौघांस निबंधोक्त प्रायश्चित्त द्यावें व पुढेही जो मर्यादेचें उल्लंघन करील त्यास शासन करावें

जो न आयके त्याचें परिपत्य येथून होईल व **क्रमवंताचें घरीं भोजनादि व्यवहार चालत आल्याप्रमाणें चालवावा व यांस सर्वत्र अनुष्ठांनीं लावावे.** जो यजमान अन्यहस्तें प्रयोजनें चालवील तेथें क्रमवंतानीं वृत्तीसंबधें आह्मींच चालऊं ऐसा आग्रह करूं नये वृत्यांश घ्यावा व अग्रागर येथील ब्राह्मण तीर्थगंधादि पंक्तिव्यवहार एक वाक्यतेनें न चालवीत आणि वृत्तिमात्र अन्य हस्तें चालऊं म्हणतात तरी वृत्ति इतर हस्तें चालऊं न देणें याप्रों आहे व शके १६९२ साली तेथील ब्राह्मण वृत्तिलोभावर दृष्टी देऊन पुन्हां हा कलह निर्माण करणार हें वृत्त आपले तेथें कळल्यावरून तेथील ब्राह्मणांस पृच्छा झाली ते समई ब्राह्मणांनीं सांगितलें कीं कैलासवासी नानाप्रभु प्रमुख शिष्ट ब्राह्मणांची पत्रें आली आहेत तीं आम्हांस मान्य आहेत म्हणोन मान्यतापत्र करून दिल्हें त्या अन्वयें चालत आले असतां हल्लीं नूतन खटला करून वखेडे करितात यास्तव हें पत्र तुम्हांस लिहिले आहे तरी जे खटला करीत असतील त्यांस तीर्थ गंधादि पंक्तिव्यवहार चालत आल्याप्रमाणें चालवणें विशीं निक्षून ताकीद करून तट केला असेल तो मोडून ब्राह्मण पेशजीप्रमाणें निर्वेधपणें स्वस्थ राहून राज्यास अभीष्ट चिंतन करीत तें करावें कोणी दुराग्रह करूं लागल्यास त्यांजकडील वृत्ति अन्य हस्तें चालवा-वयाच्या मना करून यांच्या यांचे हस्तें चालत याप्रमाणें बंदोबस्त करून घ्यावा असें असोन जो न आयके त्यास हुजूर रवाना करावा रा. छ १५ मोहरम सुमा अरार. मर्यादेन वअलफ बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

## श्रीशंकर प्रसन्न.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाबूराव दिवाणजी स्वामींचे सेवेसी. पो खंडेराव नीलकंठ साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें विशेष वे. शा सं. राजश्री जगन्नाथशास्त्री क्रमवंत वास्तव्य महाल नागांव प्रांत अष्टागर यांनीं कुणियाचे मुक्कामीं येऊन समजाविलें कीं सनसमानचे अखेरीस राजश्री गोविंदभट्ट वैशंपायन यानीं आह्माशी द्वेषभाव धरून निःकारण सभेंतून उठविलें तेव्हां- पासून प्रांतस्थ ब्राह्मण यांनीं आम्हांशीं तट करून वृत्तींत व पंक्तिव्यवहारांत खटले करितात त्यास येविशीं मागील कागदपत्र आहेत ते पाहून आमची वृत्ति सुदामत चालत आल्याप्रों पंक्तिव्यवहार सुरळीत चालण्याचे बंदोबस्ताविशीं संस्थानीं कुला- व्यास पत्र दिलें पाहिजे ह्मणोन समजाविलें त्यासी येथून सांगितलें कीं हा परस्पर ब्राह्मणांचा तंटा याजकरितां तुम्हीं येथील सरकारांत हुजूर न्यायाधिशींत वेदशास्त्र संपन्न राजमान्य राजश्री बाळशास्त्रीबावा दिक्षीत यांजकडे जाऊन कच्चा वाका कागदपत्र सुद्धां दरोबस्त त्यास समजोन द्यावा ते मनास आणोन पत्र देतील त्याप्रों इकडून बंदोबस्त करून देण्याविशीं गुत्ता नाहीं याप्रों त्यांस सांगितलें त्याजवरून जगन्नाथ शास्त्री क्रमवंत यांनीं शास्त्रीबावाकडे जाऊन कागदपत्र सुद्धां इत्थंभूत मजकूर समजाविला व मागील पत्रें दाखविलीं त्याजवरून शास्त्रीबावा यांनीं राजश्री बाबूराव मामा आंग्रे वजारतमाब सवाई सरखेल यांस व प्रांतस्थ ब्राह्मणांस पत्रें दिल्हीं तीं क्रमवंत यांनीं येथें दाखविलीं त्यांतील आशय राजश्री शिवाजीराव बाजी घाटगे यांचे पत्रांत लिहिला आहे व तुम्हीं संस्थान कुलाब्याहून येथें आलां होतां तेव्हां तुमचें आमचें बोलणें जाहालें कीं क्रमवंतांनीं शास्त्रीबावाकडे मजकूर समजाविला आहे तो समजून शास्त्रीबावा पत्र देतील त्याप्रों संस्थानीहून प्रांतस्थ ब्राह्मणांस ताकीद करून चालवावें याप्रों तुमचें आमचें बोलणें झालें त्यास हुजूरच्या न्यायाधिशीकडील पत्रें पाहून घाटगे यांस व राजश्री गोविंदपंत आण्णा केतकर यांस व हें पत्र तुम्हांस लिहिलें आहे तरी हुजूर न्यायाधिशीकडील शास्त्रीबावा यांचे पत्राप्रों क्रमवंतांचा तीर्थगंधादि पंक्तिव्यवहार सुरळीत चाले असा बंदोबस्त करून देऊन तट मोडावा रा. छ४ सफर सु॥ अशर मया तेन वअलफ बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

## श्रीशंकर.

चिरंजीव राजश्री बाबा जोग यांसी आशीर्वाद राजश्री गोविंदपंत आण्णा यांस लिहिलें आहे त्याजवरून केला हे आशीर्वाद.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदपंत आण्णा केतकर स्वामींचे सेवेसी पो। खंडेराव नीलकंठ साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळ लिहित जावें विशेष. वेदमूर्ति राजश्री जगन्नाथशास्त्री क्रमवंत वास्तव्य महाल नागांव प्रांत अष्टागर यांनीं पुणियाचे मुक्कामीं येऊन समजाविलें कीं सन समानचे अखेर सालीं वे. राजश्री गोविंदभट्ट वैशंपायन यांनीं आम्हांसी द्वेषभाव धरून निःकारण सभेंतून उठविलें, तेव्हांपासून प्रांतस्थ ब्राह्मण यांनीं आह्मांसीं तट करून वृत्तींत व पंक्तिव्यवहारांत खटले करितात त्यास येविशीं मागील कागदपत्र आहेत ते पाहून आमची वृत्ति सुदामत चालत आल्याप्रमाणें पंक्तिव्यवहार सुरळीत चाले ऐसें केलें पाहिजे ह्मणोन त्याजवरून याजविशीं पेशजी राजश्री शिवाजीराव बाजी घाटगे यांस पत्र लिहिलें होतें अलीकडे दुतर्फेकर ब्राम्हण यांनीं तालुके उंदेरी येथिल सुभेदार येथें आहेत त्यांजकडे जाऊन समजाविलें कीं उपाधिकाचें उत्पन्न दुतर्फी सरकारांत घेतात तें घेऊं नये त्यांचें मोकळीक पत्र द्यावें व याप्रों समजावून पत्र घेऊन येथें येऊन मोकळिकीविशीं पत्र मागूं लागले ते कालीं तुम्हीं एक पक्षीं समजाविल्यावरून विनाचौकशी पत्र द्यावयाचें नाहीं असें निखालस सांगितलें इतक्यांत जगन्नाथशास्त्री क्रमवंत उंदेरकर सुभेदाराकडे जाऊन दुतर्फादि अष्टागर प्रांतीं वृत्ति आमच्या तेथें पूर्वी प्रांतस्थ ब्राह्मण वृत्तिलोप करणियास प्रवर्तक होऊन पंक्तिव्यवहारांत बखेडे करूं लागले ते समईं त्यांची व आमची मनसुबी पुण्यास श्रीमंत स्वामींकडे होऊन सरकारचीं व शिष्टसंमताचीं पत्रें जाहालीं आहेत त्याप्रों वहिवाट चालत आली असतां सांप्रत प्रांतस्थ ब्राह्मण आह्मांशीं तट करून सदरहू अन्वयें खटले करितात यास्तव पेशजीचे कागदपत्र. आहेत ते पाहून वाजवी बंदोबस्त करून द्यावा याप्रों बोलून मागील सरकारांतून तह करून दिल्याचीं सरकारचीं व शिष्ट संमताचीं पत्रें आहेत तीं यांनीं समजावलीं तीं पाहून दुतर्फेकरी ब्राह्मण यांनीं गैर मालुमाती पत्र नेलें तें रद्द करून यांस उंदेरकर सुभेदार यांनीं निखालस पत्र करून दिलें आहे तें पत्र येथें दाखवून सदरहू वृत्ति व पंक्तिव्यवहार चालण्याचें बंदोबस्ताविशीं संस्थान कुलाबा यास इकडील पत्र मागूं लागले त्यावरून त्यांस सांगितलें कीं हा परस्पर ब्राह्मणांचा तंटा याजकरितां तुम्हीं येथील सरकारांत हुजूरन्यायाधिशींत वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री बाळशास्त्री बाबा दिक्षीत यांजकडे जाऊन कच्चा वाका कागदपत्रसुद्धां दरोबस्त त्यांस समजावून द्यावा ते मनास आणून पत्र देतील त्याप्रों. इकडून बंदोबस्त करून देण्याविशीं गुंता नाहीं यावरून जगन्नाथशास्त्री क्रमवन्त यांनीं शास्त्रीबावाकडे जाऊन कागदपत्रसुद्धां इत्थंभूत मजकूर समजाविला व मागील पत्रें दाखविलीं त्यावरून शास्त्रीबावा यांनीं राजश्री बाबूराव

मामा आंग्रे वजारतमाव सवाई सरखेल यांस व प्रांतस्थ ब्राह्मणांस पत्रें दिलीं कीं क्रमवन्त यांनीं येथें पत्रें दाखविलीं त्यांतील आशय पहातां पूर्वी कोणी एका क्रमवन्तानें पांडुरंग जोशी याचे कोटी होम प्रसंगीं मजला आर्त्विज्य द्यावें म्हणोन आग्रह केला होता तेव्हां त्यास न बलाविलें म्हणोन त्याणें शिष्टांस दुर्भावणें केलीं यावरून त्यांस आपंक्त केलें होतें त्याजवरून प्रांतस्थ ब्राह्मणांत पंक्तिव्यवहार बंद झाला होता. ते समई श्रीमंतांहीं सर्व शिष्ट मंडळीसहवर्तमान क्रमवंतांशीं पंक्तिव्यवहार केला यावर कल्याणामध्यें रामचंद्र दिक्षीत जोगळेकर यांचे घरीं ब्राह्मणसमाराधनेस क्रमवन्त होते म्हणोन अष्टागरकर चोघे ब्राह्मण पंक्तीमधून उठून गेले अवशिष्ट सर्व शिष्टांनीं क्रमवन्तांस पंक्तीस घेऊन भोजन केलें हें वर्तमान येथें सरकारांत कळल्यावर चौकशी होऊन त्या चोघांस निबंधोक्त प्रायश्चित द्यावें व पुढेंही जो मर्यादेचें उल्लंघन करील त्यास शासन करावें जो न ऐके त्यांचे पारिपत्य येथून होईल व **क्रमवंतांचे घरीं भोजनादि व्यवहार चालत आल्याप्रमाणें चालवावा व यांस सर्वत्र अनुष्ठानीं लावावें** जो यजमान अन्यहस्तें प्रयोजनें चालविल तेथें क्रमवंतांनीं वृत्तीसंबंधें आम्हींच चालवूं असा आग्रह करूं नये वृत्यांश घ्यावा व अष्टागर येथील ब्राम्हण तीर्थगंधादि पंक्तिव्यवहार एकवाक्यतेनें न चालवीत आणि वृत्ति मात्र अन्यहस्तें चालवूं म्हणतात तर वृत्ति इतरहस्तें चालवूं न देणें इत्यादिक मागील सरकार पत्रांतील अभिप्राय पत्रात लिहिले आहेत व श्रीमंत कैलासवासी नानाप्रभू प्रमुख शिष्ट ब्राह्मणांचीं पत्रें आम्हांस मान्य आहेत म्हणोन अष्टागर प्रांतींचें ब्राम्हणांचें मान्यतापत्र आहे त्याअन्वयें चालत आलें असतां हल्लीं नूतन खटला करून बखेडे करितात त्यास जे खटला करीत असतील त्यांस तीर्थगंधादि पंक्तिव्यवहार चालत आल्याप्रों. चालवणेविशीं निक्षून ताकीद करून तट केला असेल तो मोडून ब्राह्मण पेशजीप्रों. निर्वेधपणें स्वस्थ राहून राज्यास अभीष्ट चिंतन करीत तें करावें कोणी दुराग्रह करूं लागल्यास त्याजकडील वृत्ति अन्यहस्तें चालवावयाच्या मना करून यांच्या यांचे हस्तें चालत याप्रों. बंदोबस्त करून द्यावा असें असोन जो न ऐके त्यास हुजूर रवाना करावा म्हणोन या अन्वयाचें छ १५ मोहरमचे सवाई सरखेल यांचे नावें व प्रांतस्थ ब्राह्मणांचे नांवें एकूण दोन पत्रें शास्त्रीबाबा यांचीं आहेत तीं पाहिलीं व राजश्री बाबूराव दिवाणजी संस्थान कुलाब्याहून येथें आले होते तेव्हां त्यांचे आमचे विचारें झालें कीं क्रमवन्तांनीं शास्त्रीबावाकडे मजकूर समजाविला आहे तो समजून शास्त्रीबावा पत्र देतील त्याप्रों संस्थानिहून प्रांतस्थ ब्राह्मणांस ताकीद करून चालवावें याप्रों दिवाणजीचें व आमचें बोलणें झालें आहे व हुजूरन्यायाधिशीकडील पत्रें पाहून हें पत्र तुम्हांस लिहिलें असे आणि संस्थानीं शिवाजीराव वाजी घाटगे यांस पत्र लिहिलें आहे कीं तेथील ब्राह्मणांस निखालस ताकीद करून हुजूरन्यायाधिशीकडे शास्त्रीबावा यांचे पत्राप्रों क्रमवन्तांचा तीर्थगंधादि पंक्तिव्यवहार सुरळीत चाले असा बंदोबस्त करून देऊन तट मोडावा येविशीं संस्थानीं आम्हांकडील मंडळी आहे त्यांजला आलाहिदा पत्र

लिहिलें आहे त्यास शास्त्रीबावा यांचे पत्राप्रों प्रांतस्थ ब्राम्हण आणऊन पंक्तिव्यवहारास दिवाणजी प्रमुख संस्थानची मंडळी समुच्चय होईल व तेथेंही अनुकूल होऊन त्यांजबरोबर पंक्तिव्यवहार करितील अनुमान करणार नाहींत॰ याप्रों घाटगे यांस पत्र व दिवाणजी यांस ऐसीं दोन पत्रें लिहिलीं आहेत त्यास शास्त्रीबावा यांचे पत्राप्रों प्रांतस्थ ब्राह्मण आणऊन पंक्तिव्यवहारास दिवाणजी प्रमुख संस्थानची मंडळी समुचाय होईल तेथें तुम्हीं अनुकूल होऊन त्याजबरोबर आपले मंडळीसुद्धां पंक्तिव्यवहारास जावें रा छ ४ सफर सु॥ अशर मयातेन वअलफ बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

श्री

राजेश्री खंडेराव तात्या सुभेदार गोसावी यांस सकलगुणालंकार अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो॥ बाबूराव आंग्रे वजारतमाब सवाई सरखेल रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित गेलें पाहिजे विशेष. वेदमूर्ति राजश्री हरी क्रमवंत उपाध्ये कुलगुरु यांचा व प्रांतस्थांचा कलह मताभिमानें करून तंटा करीत होते त्याची चौकशी स्वारी संस्थानीं असतां सर्व प्रांतस्थ मिळवून केली तेथें प्रांतस्थ उगाच कलह करतात असें ठरल्यावरून सर्वांस ताकीद करून कोणी कोणतेही प्रकरणीं दिक्कत घेऊं नये याप्रों ठरोन चालत आले त्यास हल्लीं कांहीं वेध पडला होता ते समई मशार निल्हे उपाध्ये अपले भाल येऊन सर्व मजकूर सांगितल्यावरून आपण वेध मोडून टाकिला त्याप्रोंच चालवावें ये विषयीं संस्थानीं लिहून बंदोबस्त करावा रा. छ ७ मोवल बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

श्री.

राजश्री शिवाजीराव बाजी घाटगे गोसावी यांस—

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो. खंडेराव नीळकंठ आशीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जावें विशेष वे.शा. सं. राजश्री महादेव जोशी व जगन्नाथ शास्त्री कमवन्त यांनीं पुण्याचे मुक्कामीं येऊन समजाविलें कीं गोविंदभट्ट वैशंपायन यांनीं आम्हास निष्कारण सभेंतून उठविलें तेव्हांपासून प्रांतस्थ ब्राह्मण कोणी कोणी आमचे द्वेषास प्रवर्तक होऊन आमचे वृत्तीस व पंक्तिव्यवहार तीर्थगंधादिक सुरळीत चालीस पायमल्ली करूं लागले यास्तव पेशजी श्रीमंत कैलासवासी बाळाजी विश्वनाथ साहेब यांचे कारकिर्दीपासून थोरले माधवराव साहेब व के. कान्होजी बावा आंग्रे यांचे कारकिर्दीपासून हल्लीं राजश्री बाबूराव मामा आंग्रे वजारतमाब सवाइ सरखेल यांचे कारकिर्दीत सुदामत चालत आले आहे त्यास आम्हांजवळचे दाखल्याचे कागदपत्र पाहून वैशंपायन वगैरे ब्राह्मणांस निखालस ताकीद होऊन आमची वृत्ति वगैरे पंक्तिव्यवहार तीर्थगंधादिक वहिवाटीस पुढें खळ न पडे असा बंदोबस्त करून देवविला पाहिजे. म्हणोन त्याजवरून यांजवळचे कागदपत्राचीं साधनें पाहतां श्रीमंत के. पंतप्रधान स्वामी यांच्या यामागें ज्या ज्या कारकिर्दी जाहल्या त्या त्या वेळचीं सरकारचीं व शिष्टसंमतांचीं वगैरे पत्रें आहेत जाणोन यास तुम्हाकडे पाठविलें आहे तरी तुम्हीं व राजश्री बाबूराव दिवाणजी, व खंडोपंत नाना वगैरे मिळोन यांजवळचे कागदपत्राचीं साधनें पाहून वैशंपायनादि जेजे ब्राह्मण यांसी दुराग्रहासी प्रवर्तक जहाले असतील त्यास बोलावून त्यांजला पुरसीस घालून त्यांजपाशीं कमवन्त ब्राह्मणाविशीं काय साधनें आहेत तीं आणवून यांचे त्यांचे साधनाची जुनस्सी करून त्यांत सबल निर्बल पक्ष ध्यानांत आणून जो सबल पक्ष दृष्टीस येईल त्या अन्वयें वैशंपायनादि समस्त प्रांतस्थ ब्राह्मणांस निखालसपणें सांगून कमवन्त यांची वृत्ति वगैरे पंक्तिव्यवहार तीर्थगंधादिक पेशजीपासून श्रीमंत पंतप्रधान स्वामींच्या व शिष्ट ब्राह्मणांच्या पत्रान्वयें भोगवट्याप्रमाणें सुरळीत चालत आल्याप्रमाणें चालता करून लिहून पाठवावें. येविशीं बोभाटा फिरोन न येई तें करावें यावर वैशंपायनादि समस्त ब्राह्मणांचा निग्रहच यासी असल्यास जेजे या ग्रामण्यांत असतील तितक्यांची नावनिशीवार याद करून त्यांजपासून जामीन घेऊन त्यांचे तर्फेचे दोन आंग बोलणार पुण्यास यावें. येथें चार शास्त्री पंडित व चार गृहस्थ मुनसबी करणार नेमून त्यांचे मतें पंचाइत न पावे. जो निर्णय दोन आंगचे विद्यमानें ठरेल त्यास सारें मान्य असे तेथील सर्वां ब्राह्मणांचें मान्यपत्र व दोन आंग येथें येतील त्यांनीं पुन्हां समस्तांस विचारून सांगूं अशी उती न धरी असा कबूल किताब त्याचपाशीं घेऊन ऐसे यासुद्धां दोन आंग काय कमवन्त प्रकरणीं साधनाचे कागदपत्र असतील त्यासमेत येथें पाठवून द्यावे कमवन्तही आपले साधन सुद्धा येथें येतील त्यांची यांची मुनसुबी येथें ठरून तुम्हांस लिहून जाईल त्या प्रमाणें तेथें चालतें करावे रा॥ २७ साबान बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

## श्री भवानी

राजश्री मोराजी चिंचवड गोसावी यांस अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित आप्पाजी बइरट सुभेदार तालुके उंदेरी मु + + रामराम विनंती विशेष. दुतर्फातील ब्राह्मण यानीं समजाविलें कीं किल्ला सरकारांत आल्यापासून आह्मांकडील उपाधिक संतोषास येईल तो ब्राह्मण आणून हव्यकव्य दिला तो नेई असें असतां रून इसन मयातेनापासून उपाधिकाचे निम्मे उत्पन्नापैकी निम्मे अंश राजेश्री सवाई सरखेल घेऊं लागले त्याप्रमाणें आपलेकडेही घेतात आम्हीं सवाई सरखेल यांजकडे जाऊन विचारिलें कीं आमचा वादी कोण तो कळवा ;तो न कळवितां निम्में उत्पन्न दुतर्फाकडे घेतात तें मना झालें पाहिजे म्हणोन त्याज वरून याचा कोणी फिर्याद नाहीं त्यापेक्षां अलीकडे निम्में उत्पन्न घेतात हे घेऊं नये म्हणून पेशजी छ ५ सावन अशरीन मयातेनचे पत्र राजश्री आनंदराव आप्पाजी व विनायक बापूजी यांस लिहून ब्राह्मणांजवळ दिलें नंतर वेदमूर्ति राजश्री जगन्नाथशास्त्री क्रमवंत येथे येऊन दुतर्फा आदीं संपूर्ण अष्टागर प्रांती वृत्ति आमच्या तेथें प्रांतस्थ ब्राह्मण आमचे वृत्तिलोप कर्णीयास प्रवर्तक जाहाले ते समई त्यांची आमची मनसुबी पुणीयास होऊन सरकारची व शिष्ट संमतीची पत्रें आली आहेत त्या प्रों वहिवाट चालत आली. अलीकडे नवीन तट करूनै आमचा वृत्ति छेद करून पंक्तिव्यवहाराचे चालीसही खटलें करितात. ये विशीं आम्हा जवळील सरकारचे व शिष्यसंमतीची पत्रें आहेत ती पाहून त्याप्रो बंदोबस्त करून देवविला पाहिजे म्हणोन समजविलें त्याजवरून याजवळील सरकारची व शिष्ट संमतांची पत्रें पाहतां प्रांतस्थ ब्राह्मणांनीं क्रमवन्तांसी पंक्तिव्यवहार तीर्थगंध यथास्थित चालवावा ज्याचे संतोषास येईल त्यांनीं प्रयोजनें क्रमवंतांचे हस्ते चालवावी तेथें कोणी आग्रह करूं नये जो अन्य हस्तें चालवील त्यानें वृत्यांश क्रमवंतास द्यावा तेथें आम्हीं चालवूं असा आग्रह क्रमवंतांनी करूं नये. पंक्तिव्यवहार तीर्थगंधादि यास कोणी दिक्कत करूं लागले तर वृत्ति इतरहस्तें चालवूं न देणें या प्रमाणें निखालस आहेत व किल्ले मजकुरी पेशजी कैलासवासी नारो त्रिंबक सुभेदार होते त्यांचे येथें अनुष्ठानप्रसंगी क्रमवंतादि समस्त ब्राह्मण करीत आले याप्रों कुलावा प्रांती चालावे येविशीं मशार निल्हे यांचे पत्र आंग्रे वजारतमाव यांस आहे ते ही व जिन्नस पाहिलें त्याजवरून दुतर्फातील ब्राह्मण येऊन क्रमवंतांचा वृत्तिसंबंध न दर्शवितां मोघम वाका समजाविला तो गैरवाका सबब,हे पत्र तुह्मांस लिहिलें असें तरी दुतर्फेकरी ब्राह्मण यांनी मालुमाती पत्र नेलें तें रद्द करून निम्में उत्पन्न दुतर्फा सरकारांत घेतात त्या प्रों घ्यावे व क्रमवंतांशीं तीर्थगंधादि पंक्तिव्यवहार सुरळीत चालत आल्या प्रों पुढें चालविण्याविषयीं नवीन तट केला असेल त्याजला ताकीद करावी. याजवर जे ब्राह्मण दुराग्रह करतील त्यांजकडील वृत्ति इतर हस्तें चालवावयाच्या मना कराव्या या पत्राची प्रत घेऊन हे पत्र क्रमवंतांपाशी द्यावें रवाना छ १५ माहे रमजान सुमाआशर मयातेन व आलफ बहुत काय लिहिणें हे विनंती.

मोर्तब सुद

६३

श्री

राजश्री गणेश अनंत ता. दुतर्फा × × ×

सुमा इहिदे आशरे मयातेन वअलफ ता। मजकुरीं श्री विठोबाचें नूतन देवालय उंदेरकर कारखानीस यांनीं बांधिलें आहे त्याची देवप्रतिष्ठा होणार ती पूर्वापार तेथील वृत्योशीं ऋमवंत यांचे हातून होत आल्याप्रमाणें हल्लीं ऋमवंत यांचे हातून करवणें जाणिजे छ १ रबिलावर मोर्तबसुद.

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री आप्पाशास्त्री काका वाईकर स्वामींचे सेवेशी —

विद्यार्थी विनायक परशराम साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता. आश्विन शु० ३ पावेतों जाणोन स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे विशेष वे. रा. हरी कमवन्त उपाध्ये श्रीवागकर यांचे व्याही यांचें पत्र आलें कीं कमवन्त याजशीं संबंध कोणाचे होतात तें ल्याहावें त्याजवरून यांचा शोध पाहतां, कोंकणस्थ व देशस्थ व कऱ्हाडे ब्राह्मण यांजकडे शरीर संबंध परस्परें बहुत कमवन्तांशीं होत आहेत. हें सर्व आपल्यास माहीत आहेच यास्तव कोणी विचारण्यास आल्यास आपणही त्यास येविषयीं सांगितलें पाहिजे. कैलासवासी पेशवेसाहेबांचे दरबारीं कोणीं यांजबरोबर तंटे केले तेव्हां पेशवे सरकारांतून कमवन्त यांस निर्णय पत्रेंही करून देऊन त्याप्रमाणें व्यवहार त्यांचा चालत आहे. तेव्हां कोणीही दिक्कत घेईल त्यास हा मजकूर माहीत असावा. बहुत काय लिहिणें कृपा असावी सन सलास अशरीन आश्विन शु० ३ हे विज्ञापना.

## श्रीसीताराम प्रसन्न.

यादी वेदशास्त्रसंपन्न राजश्री बाबाचार्य पुणतामकर त्यांचे पुत्र रामाचार्य पुणें मुक्कामीं नसून प्रवासास गेले असतां पश्चात् त्यांचे कुटुंबानीं आपले मुलाचा विवाह रा. मोरेश्वर महादेव मुळेकर सरखेभर यांची कन्या घेऊन करणार त्यास कन्या देणार यांचे कुलशीलाची माहिती आमचे वैष्णव मंडळीस कोणास नसून इतर लोक सर्वत्र संशय घेत आहेत यास्तव मुळेकर यांसी शरीरसंबंध आपले वैष्णव मंडळींनीं करावा किंवा करूं नय या गोष्टीचा निश्चय झाल्याखेरीज लग्न करूं नये ह्मणून बाई यांस कळविलें असून बाईनें न ऐकतां लग्न केलें हा प्रमाद आहे यास्तव शरीरसंबंध केले त्याचे कुलशीलाचा निश्चय हाऊन सर्वत्रांची खात्री करून देई तोंपावेतों रामाचार्य यांचे कुटुंबांतील सर्वत्रांस व मोरेश्वर महादेव मुळेकर यांसी बहिष्कृत केलें आहे. सबब वैष्णव ब्राम्हणांनीं अन्नोदक व्यवहार करूं नये ह्मणून ज्येष्ठ शु॥ ९ सोमवार शके १७७६ आनंदनाम संवत्सरे या मितीची यादी समस्त वैष्णव मंडळीचे संमताची झालेली आहे. त्याजवरून मुळेकर यांचे बंधुवर्गांतील रा. विनायक भिकाजी व गोपाळ नारायण टुल्लु क्रमवंत यांनीं समस्त वैष्णव मंडळी यास येऊन आपले कुलशीलाचा व देशस्थ आश्वलायन व आपस्तंभ या मंडळींशीं शरीरसंबंध पूर्वींपासून विद्यमानपर्यंत होत आहे याविषयीं खात्री करून देऊन जो प्रमाद बाईकडे ठरवून बाईस व मुळेकर कन्या देणार यांस बहिष्कृत केलें यांचे निराकरण करण्याविषयीं प्रार्थना केली त्याजवरून कुलशीलाचे खात्रीचा प्रकार खालीं लिहिल्याप्रमाणें संबंध झाले त्यासुद्धां—

१. श्रीजनस्थान क्षेत्र नाशीक व त्र्यंबक येथील शिष्ट ब्राह्मण यांनीं संमतपत्रें लिहिलीं त्यांतील हंशील हरभट्ट लेले यांनी **कुडाळ प्रांतीचे क्रिरवन्त व हे क्रमवंत एकच** आहेत असें आंग्रे सरकारास सांगितलें ह्मणून आप्पाभट्ट व अनंतभट्ट क्रमवन्त यांनीं विदित केल्यावरून पुणतामकर गोपाळभट्ट टुल्लु त्यांचें पुत्र त्रिंबकभट्ट व नातु चिंतामणभट्ट यांचें पत्र व नाशीककर शामभट्ट टुल्लु यांस घेऊन त्र्यंबकेश्वरीं आले त्याजवरून **नाशीककर व त्र्यंबककर टुल्लु यांस विचारतां हे क्रमवंत व आह्मी एकगोत्रज असों या गोष्टीचा संशय नाहीं** तसेंच आह्मां सर्वत्रांशीं क्रमवन्तांचा परस्पर सुहृत संबंधीं आहों या गोष्टीचा संशय न धरणें. ज्याचें ब्राह्मण हृदय असेल त्यास संशय न होय यास अमान्य कर्ता तो जाताचा कुळाचा, गुणाचा नाशक म्हणोन.

२. रघुनाथभट्ट मठकरी त्र्यंबककर यांनीं कान्होजी आंग्रे सरखेल यांचें नांवें पत्र लिहिलें त्यांतील तात्पर्य सदरी निशाणी १ यांत लिहिलेले क्रमवंत यांनीं सदरीं लिहिल्याप्रमाणें वृत्तांत पुणतांव्यास आपले भाउबंद त्र्यंबकभट्ट टुल्लु यांस निवेदन केल्यावरून त्यांनीं क्षेत्रीं पत्र पाठविलें कीं मूळ जोगाईचे आंब्याहून आमचे मूळ चार पुरुष टुल्लु निघाले पेकीं एक वाराणशीस गेले त्यांस त्यांचे आडनांव तेथें टुल्लु आहे व दुसरे खिर-

ऽ्यास गेले त्याजला तेथें खिरडे उपनांव पावले तिसरे आयाचित उपनांव पावले. चवथे अष्टागर प्रांतीं गेले ते क्रमअध्यायी होते सबब तेथें क्रमवन्त असें उपनाम पावलें असे त्यास आह्मी व ते गोत्र पुरुष आहों ह्मणून त्यांनी लिहिल्यावरून आम्ही क्षेत्र-निवासी व जनस्थान निवासी मिळोन परामर्ष करितां हे क्रमवंत व आम्ही परस्परें सुहृत संबंधी आहों ह्मणोन.

३. दिनकरभट्ट पेंगे जनस्थान यांनीं कान्होजी आंग्रे यांस पत्रें लिहिलीं त्यांतील तात्पर्य हरभट्ट लेले यांनीं आरोप ठेवल्याबद्दल वृत्तांत क्रमवन्त यांनीं आम्हांस सांगितल्या-वरून आम्हीं नाशीककर शामभट्ट टुल्लु व मोरेश्वरभट्ट टुल्लु यांस विचारतां सदरी निशाणी २ यांत लिहिल्यांप्रमाणें मजकूर आहे.

४. वाडी प्रांतींचे समस्त ब्राह्मण यांनीं संमत पत्र लिहिलें दामोदरभट्ट क्रमवन्त व नरसिंहभट्ट क्रमवन्त यांनीं येऊन हरभट्ट लेले यांनीं आरोप ठेवल्याबद्दल मजकूर सांगितला त्याजवरून येथें विचार पाहतां **फोंडे प्रांतींचे किरवंत व क्रमवंत हे कोणी एक सामान्यें** करून एक नव्हत म्हणोन

५. आंग्रे सरकारांनीं आपले राज्यांतील समस्त ब्राह्मणांस पाचारण करून संमतपत्र शके १६९२ सालींत केलें त्यांतील हंशील क्रमवन्त ब्राह्मण यांचे वृत्तीचा लोभ धरून हरहमेशा बरवेडा करितात त्यांस हल्लीं आम्हांस तटोत्सर्ग करणें आहे याजकरतां श्रीमंत प्रभु प्रमुख शिष्ट ब्राह्मणांचीं संमति पत्रें चौल प्रांतस्थ ब्राह्मणांस आलीं आहेत त्याप्रमाणें ज्यांस मान्य असेल त्यांनीं संमतपत्रावर सही करावी. ज्यांस मान्य नसेल त्यांनीं श्रीमंतां-कडे जाऊन बाधक पत्र आणावें न आणल्यास आणि विनाकारण तंटा करील तर त्यास काशीस गेल्या खेरीज तो शुद्ध नाहीं असा ठराव करून समस्त ब्राह्मणांच्या सह्या आहेत.

६. त्र्यंबककर बाबाजीभट्ट टुल्लु व रंगनाथभट्ट टुल्लु यांनीं बाबूराव आंग्रे यांस मि॥ माघ शु॥ ३ शके १७२८ क्षयनाम संवत्सरे या रोजीं पत्र लिहिलें कीं आह्मीं कांहीं उद्देशेंकरून मुंबईस आलों येथें बंधुवर्ग वेदमूर्ति जगन्नाथभट्ट क्रमवन्त व नारोपंत क्रमवन्त हे उभयतां आम्हांस भेटून बाळशास्त्री टोकेकर यांनीं लिहिलें तुमचे जातीचा विचार झाला नाहीं तर तुह्मी त्र्यास निघोन यावें म्हणून आम्हांस सांगितल्यावरून आम्ही कळवितों कीं हे क्रमवन्त व आम्ही एक असे वंशपरंपरेनें श्रवण करीत आलों की हे आमचे गोत्र पुरुष आहेत याबद्दल आमचे वडिलांनीं पूर्वीही पत्रें दिलीं आहेत.

७. बाळशास्त्री टोकेकर पेशव्यांचे न्यायाधिश यांचें पत्र बाबूराव आंग्रे यांचे नांवे ता १५ माहे मोहरम सुर सन आशर मयातेनवआलफचें त्यांत हशील वेदमूर्ति रा. जगन्नाथशास्त्री क्रमवन्त यांनीं येऊन विदित केलें कीं गोविंदभट्ट वैशंपायन यांनीं सभेंतून आम्हांस निष्कारण उठविलें म्हणून वगैरे मजकूर कळविल्यावरून त्यांचे कागदपत्र पाहतां शके १६९१ सालचें पत्र बाळाजी विश्वनाथ साहेब यांचे मुद्गलभट्ट पंडितराय

एकून दहा निशाण्यापावेतों कागदपत्र व जाब झाले तें पाहून मोरेश्वर महादेव मुळेकर यांचे कुळशीलाविशीं विचार पाहतां निशाणी १ तागाईत निशाणी ८ पावेतों कागद अस्सल पाहून त्यांतील तात्पर्य सदरी नमूद केलें आहे यावरून मुळेकर यांचे मूळ पुरुष जोगाइचे आंब्याकडील राहणार उपनाम टुल्लु असून तेथून क्रमांत अध्ययन करून अष्टागर प्रांतीं येऊन तेथील समस्त ब्राह्मण वगैरे इत्यादि कडील उपाध्येपणाची वृत्ति वगैरे संपादन करून क्रमाध्याई सबब त्यांस क्रमवन्त असें उपनाम प्राप्त झालें पुढें त्या प्रांतांतील मुळापासून राहणारे ब्राह्मणांची व क्रमवंत यांचा वृत्तीसंबंधीं कलह होऊन कुडाळप्रांत इलाखा सांवतवाडी या प्रांतीं राहणार किरवंत ह्मणोन एक जाती आहे ते लोक व सदरहु क्रमवंत ह्मणणारे लोक एकच आहेत म्हणोन हरभट लेले यांनीं आरोप ठेवल्यावरून क्रमवन्त यांनीं आपले भाऊबंद एकगोत्री पुणतांबे व नाशीक व त्र्यंबक प्रांतीं टुल्लु राहतात त्याजकडे जाऊन मजकूर विदित केल्यावरून त्यांनीं क्रमवंत हे व आह्मी भाऊबंद एकगोत्री आहों म्हणून कबूल केलें त्याबद्दल नाशीक व त्र्यंबक क्षेत्रस्थ शिष्ट ब्राम्हण यानीं हें खरें आहें म्हणून साक्षीदाखल संमतपत्र ब्राह्मणांचें नांवें व आंग्रे सरखेल यांचे नांवे दिलें तसेंच बाळशास्त्री टोकेकर यांनींहीं विचार करून पूर्वींचे कागदपत्र पाहून आंग्रे यांचे नांवें पत्र दिलें यावरून व हल्लीं क्रमवन्त यांचे भाऊबंद उपनाम टुल्लु हे नाशीक व त्र्यंबकक्षेत्रीं राहतात त्यांचा शरीरसंबध त्या प्रांतीं देशस्थ ब्राह्मणांशीं होत आहे म्हणोन वगैरे निशाणी ९ चे त्र्यंबकेश्वर येथील क्षेत्र उपाध्ये व निशाणी १० चे नाशीक येथील संस्थानी हे जाब देतात त्याप्रों. निशाणी ७ चे कागदांत मुळेकर क्रमवन्त यांचा संबंध पुणें व वाई व कोंकण वगैरे प्रांतस्थ देशस्थ ब्राह्मणांचा झालेला आहे म्हणून लिहिलें इत्यादि कारणावरून पाहतां क्रमवन्त मुळेकर हे देशस्थ ब्राह्मण असून यांच्याशीं संबंध देशस्थ ब्राह्मणांनीं पूर्वींपासूनच करीतच आहेत असें सिद्ध होतें हा प्रकार पूर्वीं समजुतीस न आल्यामुळें कुळशीलाचा विचार होई तोंपर्यंत कन्या देणार मुळेकर व कन्या घेणार बाई पुणतामकर व यांचे सांसर्गी यांसी बहिष्कृत केल्याची यादी झाली तो प्रकार सदरीं नमूद केला आहे पण आतां सदरी लिहिल्याप्रमाणें झालेल्या पुराव्यावरून बहिष्कृत ठेवण्याचें कारण कांहीं राहिलें नाहीं असें स्पष्ट सिद्ध होत आहे यास्तव पूर्वींची यादी रहीत करून हें संमतपत्र केलें आहे हें सर्वांनीं मान्य करून या खालीं या मान्यतेची रुजु केली आहे मिती भाद्रपद शु।। ५ रोज बुधवार शके १७७६ आनंदनामसंवत्सरे.

सह्या

आप्पाजी तिमया गोसावी संस्थान श्रीवेंकटेश नाशीक दस्तुरखुद्द
सितारामाचार्य अगरखेडकर दस्तुरखुद्द
रघुतम परभिमाचार्य
बाळाचार्य कट्टी धारवाडकर

भालचंद्र सदाशिव गांवकर
बाळंभट्ट बिन निळंभट्ट दशपुत्रे क्षेत्र त्र्यंबक दस्तुरखुद्द
आबाचार्य तडवळकर दस्तुर खुद्द
सदाशिव उर्फ राघवाचार्य पुणतामकर दस्तुर खुद्द हल्ली वस्ती पुणें
व्यंकटराव राघवेंद्र जोशी प्रांत धारवार वकील नि॥ विंचुरकर
रावजी महादेव कुळकर्णी मौजे मांडकी
विनायक विठ्ठल रासिनकर
गणेशभट्ट पुणतामकर दस्तुरखुद्द
श्रीपतराव त्र्यंबक देशमुख
रंगो कान्हेरे आनोटीकर ता ६ नवंबर १८५४ इसवी
गोपाळराव आण्णाजी रेडकर द खुद्द

कार्तिक व॥ ८ शके १७७६ आनंदनामसंवत्सरे

बाळाचार्य पुणतामकर द खुद्द
व्यंकटाचार्य पुणतामकर द. खुद्द
येरी नरसिंह्वाचार्य बंगलूरकर द. खुद
काकाचार्य शास्त्री दस्तुरखुद्द

श्री

यादी जयसिंगराव चिमणाजी आंग्रे मुक्काम अलिबाग सुमासव X खमसेन मयातेन वअलफ आम्हीं मागील वहिवाटीवरून लिहून देतों आमचे कुळाचे मूळ पुरुष संस्थानचे संपादक. कान्होजी आंग्रे संस्थानीं आले तेव्हांपासून संस्थानचे उपाध्येपणाची वृत्ति क्रमवंत यांची त्याप्रमाणें हल्लींहि चालत आहे. तशीच पुढेंही आमचेकडील उपाध्येपणाची वृत्ति आपली चालावी अशी आमची निष्ठा आहे. मिती वैशाख वद्य ९ रोज मंदवार शके १७७९ पिंगलनाम संवत्सरे दस्तुरखुद.

साक्ष

नारायण विष्णू नेने राहणार अलिबाग दस्तुरखुद

जयसिंगराव चिमणाजी आंग्रे दस्तुर खुद.

श्री.

राजश्री हरी जनार्दन महाल चेऊल गोसावी यांस सुमा इशरीन मयातेन वअलफ महाळ मजकूर येथील चार उपाध्ये मुख्य व गैरा सातजण एकून अकरा उपाध्ये पैकीं गैरा सात जणांतील चौघांचा निर्वंश जाहला त्यांची वृत्ति बाकी राहिले उपाध्ये चालवितात. निर्वंशिकाची वृत्ति छडा लागणें असतां सातजणांचे विभागांत मुख्य चौघांची वृत्ति आहे त्यासुद्धां दरोबस्त सरकारांत जप्त करून जप्तीची वहिवाट वे हरी कमवन्त आबा कमवन्त यांजकडे सांगितली साल मजकूरापासून असे येणें प्रों—

१ ब्राम्हणाकडील उपाध्येपण व कळशपूजन व सुवर्णाभिषेक.

१ व्रतवैकल्य प्रायश्चित्त होईल तेथील दशदानाचा मान.

२ × × × ×

चार वृत्तींची वहिवाट मशारनिल्हेकडून घेणें कच्चे उत्पन्नाचा हिशेब घेऊन हुजूर समजावित जाणें छ २० माहे मोहरम मोर्तब सुद.

## श्रीगजानन प्रसन्न.

श्रीमंत राघोजी आंग्रे सरखेल यांस पुत्र झाला शके १७४५ सुभानुनाम संवत्सरे माहे श्रावण वा॥ ३ स दोन घटिका रात्रौ जन्म झाला त्यावेळेस दक्षणेचा समारंभ थोडका झाला. दुसरे दिवशीं नजर नजराणे झाले. हेलकर्णी बायांस चारशेंपर्यंत लुगडीं दिलीं शिष्ट संभावना आश्विन शु॥ १ स पोशाख दिल्हे. शिष्टांस शेलेपागोटीं त्यांचीं नांवें येणें प्रां:--

१ भाऊ अग्निहोत्री
१ वचंभट शेव
१ गजाननभट दावके
१ बाजोजोशी कुलाबकर
१ तात्या जोशी कुलाबकर
१ घोंडशास्त्री गोडबोले
१ पांडुरंगशास्त्री नाशीककर
१ मैथिल शास्त्री
१ सदाशिवशास्त्री द्रवीड
१ आपाशास्त्री काका वाईकर यांस पालखी दिली शालजोडी व पागोटें व चोळी लुगडें बरोबर दोनशें रुपये दिल्हे

---
८

१ घोंडभट पुराणिक
१ रामचंद्र जोशी थळकर सालकरी
१ हरी क्रमवंत उपाध्ये सालकरी
१ विष्णुशास्त्री नेने
१ गोविंदशास्त्री पाटणकर

---
१०

याखेरीज बारशाचे दिवशीं शिष्टांस दक्षणा दोन दोन रुपये दिल्हे. बाकी पंचवीस ब्राम्हणांस एक एक रुपया दिला. दरवाजावर भूयसी दिली बारशाचा समारंभ आश्विन वद्य १ स जाहला शके १७४५ याप्रों समारंभ यथा पद्धतीनें राजश्री बाबासाहेब दिवाणजी यांणीं केला. मुलाचें नांव बापूसाहेब ठेविलें.

श्री

श्रीमदुमापतिपदनुज भजन नवा प्रामित विभव कोलटकरोपनांमक गणपतिराव कृष्णाभिधानं नायकेषु—आश्रितांतर्गत अष्टागर प्रांतस्थ मस्त ब्राह्मणाप्रति लक्षाधिक आशीर्वाद विशेष पत्र लिहावयाचें कारण ऐसेंजे पूर्वी क्रमवंतास बहिष्कार सर्वांनीं केल्या उपरी ते पुणियास जाऊन श्रीमंतांस शरण आले तेव्हां सर्व शिष्टमंडळीच्या विचारें क्रमवंतांस पंक्त्यर्हतेचें सभापत्र करून दिलें त्यापत्रींचा लेख ऐसाजे. त्याप्रांतीं अनुष्ठानप्रसंगीं ब्राह्मणांचा व यांचा कलह होतो त्यास जो यजमान स्वसंतोषें क्रमवंतांस बोलावून तत्हस्तें अनुष्ठान करवील तेथें ब्राम्हणांनीं अधिक्षेप न करावा. जो यजमान अनुष्ठांनीं क्रमवंतांचा निवेश न करतां अन्यहस्तें कर्म चालवून त्यांचा वृत्तीसंबधें कायदा होईल तो त्यांस देईल तेथें अनुष्ठांनीं आपल्या निवेशाचा आग्रह क्रमवंतांनीं न करावा असें स्पष्ट लिहिलें असतां एक पंक्तीस क्रमवंतांचा व आमचा व्यवहार घडोन आल्यापासून जो यजन क्रमवंतांस बोलवीत नाहीं त्याकडील कार्यसंबंधीं उत्पन्नाचा आपला कायदा न घेत आणि क्रमवंत घरीं पावता केला तरी न स्वीकारीत. तेव्हां क्रम• वंतांस बहुतांनीं पुशीलें कीं वृत्त्यंश कां घेत नाहीं अशास प्रत्युत्तर केलें कीं आम्हांस कार्यार्थ जो बोलावील तेथील घेऊं अन्यथा स्वीकारणार नाहीं. या प्रकारचा त्यांचा दुराग्रह पाहून गाडगीळ पुराणिक प्रमुखांनीं सर्वांनीं एकवाक्यतेनें नियम केला जे या क्रमवंतां समागमें अनुष्ठानच न करावें ह्मणजे सहजेंच उत्पन्न घेतील हा नियम हा काळपर्यंत सर्वांचा चालत आला असतां अलीकडेस सर्वांचा उपमर्द करून कोणीएक लोभावर दृष्टी देऊन तत्संगें अनुष्ठानें करावयाशीं रामकृष्णभट्ट प्रवर्तले. त्यास आपले व्याहीभाचे जांवई यांसही समागमें घेऊन गेले तथापि आह्मीं कोणीं न गेलों कां जे संप्रति क्रमवंतांचीं प्रवृत्ति पत्रार्थाप्रों नाहीं असें असतां सर्वांचा विचार मनास आणितां उपमर्द करून पुराणिक प्रवर्तले हा अन्याय पुराणिकांचा समजून आह्मीं न गेलों असें असतां तुमचे गांवचे ब्राह्मण दहावीस पर्यंत येथें अनुष्ठानार्थ जे आले त्यांस हा येथील अर्थ विदित असोन आले कीं अविदित असें आह्मांस कळलें पाहिजे. तदनुरूप आम्हींही वर्तावें अशी आमची इच्छा असे यास्तव पत्र लिहिलें असे तर तेथील त्याप्रांतीं ब्राह्मणांचा सर्वांचा आशय काय असेल तो स्पष्ट लिहून पाठवावा बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद १०००

श्री,

राजश्री शिवाजी बाजी घाटगे व नरसिंगराव गोसावी यांस,

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो. बाबूराव आंग्रे वजारतमाबसवाई सरखेल रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहित असावें विशेष वेदशास्त्रसंपन्न राजश्री हरी क्रमवंत श्रीमहायात्रेस गेले होते ते यात्राकरून लष्करांत आल्यावर त्यांस येथें राहून घेऊन त्यांचे चिरंजिवाची रवानगी घरीं केली आहे त्यास तेथें त्यांचीं शेतें भातें वगैरे वृत्त आहे त्याजविषयीं कोणतेही खटले पडल्यास वरचेवर उलगडून देत जाणें थांचा व प्रांतस्थांचा खटला कां पडला होता त्याजविषयीं दोनतीन पत्रें पाठविली परंतु त्यांचें उत्तर आलें नाहीं तर पूर्ववत्प्रमाणें याचा त्यांचा व्यवहार चालत आल्याप्रों. चालवून लिहून पाठविणें. साळकरी उपाध्याची अडशेरी कुलाब्यांतील देवीपूजेबद्दल प्राचीन पासून आहे ती बेहुड्यांत नाहीं अद्याप चालत नव्हती त्याज-विषयीं पत्रें लिहून गेलीं तथापि चालती न झाली त्यास हल्लीं लिहिलें आहे तरी देवीचे पूजेची अडशेरी चालती करून द्यावी रवाना छ १ साबान सुभा अशर मियातैनवअलफ बहुत काय लिहिणें हे विनंती.

राजा शाहू नृपचरणीं
सादर येसाजी सुत बाबूराव आंग्रे
वजारतमाब
सवाई सरखेल निरंतर

मोर्तब सुद

## श्री काशी विश्वेश्वर.

आज्ञापत्र समस्त राजकार्य विश्वासनिधी राजमान्य राजश्री बाबूराव आंग्रे वजारतमाव सवाई सरखेल ता। पाटेल मो। चेंढरे ता. खंडाळे प्रांत चेऊल सुमा इसने मयातैन वअलफ बद्दल देणें वो। बावाजी क्रमवंत विन शाम क्रमवंत वास्तव्य पेठ श्रीबाग यांनीं हुजूर जंजिरे कुलाब्याचे मुक्कामीं विनंती केली कीं श्रीस्थान पेठ मजकूर याची पूजा बारमाही करीत आहों साठीं अडशेरीचें ऐवजीं भात दरमहा ०१॥ प्रों साळिना ०॥≈ प्रों तो वजा खर्ची वा। वजा होऊन बाकी थोर मापें ०॥३।१॥ सवातेरा मण दीड पायली आकार होतो त्या ऐवजीं जमीन लावुन दिली पाहिजे ह्मणोन त्याजवरून मनास आणितां श्रीची पूजा नित्य बारमाही करितात यास्तव अडशेरी भात सवातेरा मण दीड पायली सरकारांतून पावते त्याचे आकाराचे ऐवजीं मौजे मनकूर पो। खराबा पडजमीन बिघा ०१ एकून

| | |
|---|---|
| ०॥०॥ | ऐन दस्त |
| ०१॥१ | हा। |
| ०।८। | मु॥ |
| ०।॥१॥ | पो॥ |
| ०॥३≈०≈॥। | |
| ००१॥। | कसर |
| ०॥३।१॥ | |

सदरहू एक बिघे याचा आकार पेस्तर साळापासून साल दरसाल अडशेरीचे ऐवजीं धर्मादाय खर्च लिहित जाणें प्रतिवर्षी नूतन सनदेचा आक्षेप न करणें या सनदेची प्रत करून घेऊन अस्सल भोगवटीयास परतोन देणें एक बिघा जमीन खराबा पडजमीन पैकीं लागवडीस हवाली करणें आणि सदरहू सवातेरा मण दीड पायली भात अडशेरीचे ऐवजीं धर्मादाय खर्च लिहित जाणें सदरहू जमिनीस गुंडी पेंढा व तूर उडीद माफ असे जाणीजे छ ५ शौवाल मोर्तब सुद

श्री.

यादी श्रीनागेश्वर महाल नागावें याची अर्चा श्रीमंत सरखेल यांहीं रामकृष्ण जोशी यांजकडे सत्तानिवृत्त यजमानपण देऊन करविली त्यास अर्च्येस ब्राह्मण शके १७१६ आनंदनाम संवत्सरे कार्तिक व॥ ५ भौमवार

आचार्य बापू × × ×
ब्रम्हे जनार्दनभट्ट पुराणिक
सदस्य बाळ क्रमवन्त
महादेवभट्ट अग्निहोत्री आचार्य
आप्पाभट्ट केळकर
बाळंभट्ट आठवले
महादेवभट्ट आठवले
बाबा साने
विष्णुभट्ट
बाळंभट्ट रिसवुड
आप्पाभट्ट रिसवुड
बापू जोशी
रघू क्रमवन्त आचार्य
हरभट्ट आचार्य
जगन्नाथभट्ट आचार्य
बाबजी जोशी
पांडुरंगभट्ट लवाट्ये
राघोबा कोनकर
रामकृष्ण जोशी

श्री.

शके १७६७ विश्वावसुनाम संवत्सरे श्रावण शुद्ध १३ भृगुवारीं श्रीमंत नानीसाहेब यांकडेस पक्षप्रदोष व्रतोद्यापन झालें नंतर दुसरे दिवशीं शनिवारीं चतुर्दशीस श्रवण नक्षत्र होतें तें समई श्रावण्या ब्राह्मणमंडळीच्या कुलाब्यांत श्री राघवेश्वराचे देवालयांत झाल्या.

यादि ब्राह्मण वेदशास्त्र प्रमुख ॥

पांडुरंगशास्त्री नाशिककर
केशवभट्ट केळकर नागावकर सशिष्य १
त्रिंबकभट्ट फाटक आचार्य
आबाभट्ट फाटक
त्रिंबक बच्याजी जोशी असूदकर
त्रिंबकजोशी पनवेलकर सशिष्य १
धोंडभट्ट पुराणिक
मोरजोशी कुलाबकर
त्रिंबकजोशी कुलाबकर
लक्ष्मणजोशी मेणवलीकर
जोतिबा संतखेडीकर चिरंजीवसहित
सखारामभट्ट निंबकर
जनार्दनभट्ट आठवले
विश्वनाथजोशी चेऊलकर
सदाशिव गोपाळ चेलऊकर
सांवजोशी थळकर पौत्रसहित

**कुलाबकर उपाध्येमंडळी-**

बाळंभट्ट क्रमवन्त
सखारामभट्ट क्रमवन्त
जगन्नाथभट्ट क्रमवन्त
नागेश्वरभट्ट क्रमवन्त
लक्ष्मण आबाभट्ट क्रमवन्त
रामचंद्र गोविंदभट्ट क्रमवन्त
कृष्णंभट्ट वेलणकर

**श्री.**

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री राघोजी आंग्रे वजारतमाब सरखेल ता॥ पाटलें मौजे चेंढरे ता॥ खंडाळें सुभा प्रांत चेऊल सुभासित सवेन मिया वअलफ देणें धर्मादाय वे. त्रिंबक क्रमवन्त, आप्पा क्रमवन्त उपाध्ये उपनाम क्रमवन्त गोत्र कौशिक शाखा आश्वलायन वस्ती श्रीबाग यांस भात शेती जमीन दान निमित्त महाल चेऊल प्रांत मजकूर येथें श्रीरामेश्वर महास्थान यास उपसर्गामुळें किंचित् भग्न झाला तदोत्तर प्रांतांतील समस्त शिष्टमंडळीचे संमतें अद्भूत शांत योजून जंजिरे मजकुरीं केली त्यांतील भूमीदान जमीन बिघे ८॥- दहापांचपैकीं जोशी सदाशिव त्रिंबक जोशी याजकडे ८।- बाकी जमीन ८।॰ पांच पांड क्रमवन्त उपाध्ये यांस दिधली असे. ती रावणुकीस हवाली करणें. रावणुक झाल्यावरी पेस्तरसालापासून आकार साल दरसाल उपाध्ये यांचे नांवें पुत्र पौत्रादि वंशपरंपरेनें धर्मादाय खर्च लिहित जाणें. प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न धरणें. या सदनेची प्रती करून घेऊन असल प्रत भोगवटीयास देणें छ २५ माहे × ×

१८४१ पैकीं संस्थान कुलाबा येथील धर्मादाय बुकाचा नंबर १०८ यास बार असे.

श्री.

राजश्री गोपाळ नारायण ता। खंडाळें गोसावी यांस

सुमा समान मयातेन वअलफ दान देणें धर्मादाय ब्राह्मण अलिबागकर यांस

| अनुष्ठानानिमित्त | जस्त रु. | भात थोर मापे |
|---|---|---|
| विश्वनाथ राम क्रमवंत | ०॥० | ८१८१। |
| माहादेव राम क्रमवंत | १। | ८१॥८१ |
| पांडुरंग राम क्रमवंत | १। | ८१॥८१ |
| | ३ | ८४॥। |

एकून जस्त तीन रुपये व भात थोर मापें पावणेपांच मण एकंदर आदा करणें परभारें जमा असत जाणिजे छ ३० मोवल मोर्तबसुद

## श्रीकाळंबा.

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाबूराव आंग्रे वजारतमाब सवाई सरखेल ता। पाटेल मौ. चेंढेरं ता। खंडाळें प्रांत चेऊळ सुमा इसेन मयातैन वअलफ बदल देणें वे, बापू बाळ क्रमवंत वास्तव्य पेठ श्रीबाग यांनीं हुजूर जंजिरे कुलाब्याचें क्रामीं विनंती केली कीं श्रीस्थान किल्ले हिराकोट याची बारमास नित्य पूजा करीत आहों अशास अडशेरी दरमहा भात ८१।। प्रों बारमाही ०।।ऽ पों. वजा खर्ची वा। वगैरे वजा होऊन बाकी भात थोर मापें ०।।ऽ।१।। सवातेरा मण दीड पायली पावते त्याऐवजीं जमीन लावून दिली पाहिजे ह्मणोन त्याजवरोन मनास आणितां श्रीची पूजा नित्य करितात निमित्य अडशेरीचें भात सवातेरा मण दीड पायलीचे ऐवजीं मौ मजकूर पो खरावा पड जमीन बिघा ८१ बिघा याचा आकार

०।।०।। ऐन दस्त
८१।।१ रा।
८।०। सु।
८।।।१।। पा।

———

०।।ऽ८=।।।
८८१।।। कसर

———

०।।ऽ।१।।

एकुण एक बिघे याचा आकार भात सवातेरा मण दीड पायली साल दरसाल अडशेरीचे ऐवजी पेस्तर सालापासून धर्मादाय खर्च लिहित जाणें प्रतिवर्षी नूतन सनदेचा आक्षेप न करणें या सनदेची प्रत करून घेऊन अस्सल भोगवटीयास परतोन देणें सदरहू एक बिघा जमीन खालसापैकीं पड जमीन राबणुकेस हवाली करणें–सदरहू जमिनीस तूर उडीद व गुंडी पेंढा माफ असे जाणिजे छ५ शोवाल मोर्तब सुद ।

मोर्तबसुद.

# क्रमवंतांबरोबर झालेल्या
# शरीरसंबंधाच्या यादी.

———o:×:o———

[ देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे या तीन ब्राम्हणजातींतील घराण्यांशीं क्रमवंतांचे जे शरीरसंबंध झाले आहेत त्याबद्दल आम्हांस उपलब्ध झालेल्या यादी कांहीं जशाच्या तश्या व कांहीं अकारविल्हेनें तयार करून खालीं देत आहों. या यादी क्रमवंतांवरील ग्रामण्य प्रकरणांत सादर करण्यासाठीं वेळोवेळीं तयार केल्या असाव्या. खरें ह्मटले तर या यादींत नमूद केल्यापेक्षां जास्त घराण्यांशीं क्रमवंतांचें शरीर संबंध झाले आहेत. पण सर्व यादी आज उपलब्ध नाहींत. व नवीन तयार करणें आज अशक्यप्राय आहे. श्री. बाळाजी विश्वनाथ पेशवे यांनीं श्री. कान्होजी आंग्र्यांना लिहिलेल्या पत्रांत, क्रमवन्तांचे अडीच हजार ब्राम्हणांशीं लग्नव्यवहार झाल्याचें स्पष्ट लिहिलें आहे. या यादींत थोड्याबहूत चुका असणें साहजीक आहे. अशा चुका कोणी आमचे नजरेस आणल्यास, या पुस्तकाची नवीन आवृत्ति काढण्याचा सुप्रसंग आल्यास आम्ही त्या सुधारून घेऊ. किंवा कोणी अधीक माहिती दिल्यास आम्हीं ती आभारपूर्वक पुढील आवृत्तींत समाविष्ट करूं. ]

१ लाजेशी नागोठणें याचा चुलता खंड जोशी याची बहिण शिद्धेश्वर भट्ट क्रमवंत यांची आई खंड जोशी यांची कन्या लाडुबाई हा बाबा जोशी राइरीकर यांजकडे दिली.

२ पांडुरंग जोशी राईरीकर निजामपुरकर यांची एक कन्या बापुभट्ट पाटील क्रमवन्त थळकर यास दिली. दुसरी कन्या सदाशिव पांडुरंग मुळकर क्रमवन्त यास दिली.

३ शामलपंत सोनटक्के यांच्या कन्या पांच एक निगळे यांजकडे. तिच्या लेकी २, एक पुण्यास भेणजोगे यांजकडे व दुसरी तळेगावांत ... ... सोनटक्क्याची दुसरी कन्या मेकल याजकडे ... ... मेकल यांची लेक चिंचोर शाहापूरकर यास — तिसरी कन्या शिवरामभट क्रमवन्त नेरळकर यास दिली — चवथी कन्या हरभट्ट घळे याची आई. पांचवी कन्या शिद्रे जोशी यास — अग्नेनेरळकर याच्या स्त्रिया २ त्यापैकीं १ क्रमवन्ताची—गोमाजी भास्कर कल्याणकर देशमुख यांची बायको सानटक्क्याची मावशी ... ... ... ... ... ... ... ...

४ तात्यावत्सराज यांचा पुत्र विश्वंभर याचा पहिला संबंध हरिभट्ट क्रमवन्ताची कन्या - दुसरा संबंध पांडोबा पानशे डोंगरगांवकर यांची कन्या ... ... ...

५ रामाजीपंत दत्तुची लेक गोविंद बावजी भट्ट क्रमवन्त यांची स्त्री ... ...

६ वाई पासून तीन कोस मौजे पांचवडची आमतवाडीचे राघोपंत कुळकर्णी यांची कन्या हरिभट्ट क्रमवन्त याचा पुत्र काशिनाथ भट्ट क्रमवन्त यांस दिली.

७ पुण्यांत मिठाचे गंजाजवळ नागोपंत मांगरोळकर याच्या कन्या २ पैकी एक बाळाजी गोविंद क्रमवन्त आलिबागकर यास दिली—दुसरी बाळाजीपंत कुळकर्णी वाडेबोडेकर यास दिली. ... ... ... ... ...

८ बापु न्याहारखाने पुणेकर याच्या कन्या २ पैकीं १ महादेव जोशी क्रमवन्त याचे दुसरे पुत्रास व दुसरी लाड जोशी नागोठणेकर याचे नातवास —

९ गोपाळ भट्ट घाटपांडे एन्हवडेकर यांची कन्या सखाराम बापू क्रमवंत यांची स्त्री व दुसरी कन्या नारायण भट्ट परळीकर याची स्त्री तिची कन्या पाषाणकर माधवराव धडफळे याचा पुतण्या कोंडोपंत यास दिली निळोपंत धडफळे याचे नातु पतसचीव भोरकर हल्लीं गादीवर आहेत.

१० महादेव जोशी क्रमवंत नागांवकर याचे वडील पुत्रास प्रथम संबंध गणेशपंत अत्रे कुळकर्णी काडीतकर याची कन्या द्वितीय संबंध रत्नाभींगे पुणेकर अमृतभट्ट याची कन्या कनिष्ट पुत्र नाना जोशी यास प्रथम संबंध वरिखळेकर नारोपंत मांडक कुळकर्णी यांची कन्या. दुसरा संबंध कोंडोकर नाना ठकार याची नात वडील पुत्राचे प्रथम संबंधाचा मुलगा बळवंतराव यास केडगाव येथील पाटील देशमुख यांची कन्या दिली ( रामचन्द्रपंत पाटील )

११ दाजीबा अत्रे पर्वतीकर याची कन्या मोरेश्वर महादेव क्रमवंत यांचे पुत्र बळवंतराव यास दिली.

१२ गोपाळ नारायण क्रमवंत यांची कन्या काका दशपुत्रे पुणेकर यांचा नातु दाजीबा यास दिली. ... ... ... ... ... ... ... ... ...

१३ वांद्रीकर रघुभट्ट केतन्रे यांची आई ती क्रमवंताची कन्या तिची मुलगी भिवंडीकर मोदगी याचे येथे दिली तिचा मुलगी गुळसुंदकर मोरे जोशी लांडेग याचे येथें दिली. ... ... ... ... ... ...

१४ महादेव बावाजी क्रमवंत थळकर यांची कन्या जेजुरीकर गंगाधर स्वामी पांडेश्वरकर याचे द्वितीय पुत्रास दिली.

१५ बाजो भट्ट क्रमवंत यांची आई भगवंत पै कानडे कोहोजकर यांचे येथें तिचे पुत्र २ व कन्या ३ पैकीं १ पुत्रास बाळंभट क्रमवंताची कन्या दिली दुसरे पुत्रास बाळजोशी अष्टमकर यांची कन्या दिली. ३ कन्या पैकीं १ कन्या दत्तुकडे. दुसरी गुळपिठे याजकडे तिसरी खंडभट राहये यांची स्त्री व राखे यांची कन्या पेणकर टांकसाळे याजकडे व दुसरि म्याहारख.न्याकडे ... ...

१६ भास्करपंत मुळेकर क्रमवंत यांची कन्या सदाशिवपंत अनगळ याचे मुलास दिली – – –

१७ परशराम नारायण क्रमवंत याची कन्या गणेश जिवाजी गद्रे मुक्काम वेळगांव याचे मुलास दिली ... ...

१८ वासुदेव रघुनाथभट्ट कोरान्ने नाशिकर यांचें एथें माहादेवभट्ट क्रमवंत मुळेकर यांची वहिण दिली तिची कन्या एक भिवंडीकर घोडजोशी याजकडे दुसरी कन्या भास्करभट्ट तट्टू जुनरकर याजकडे तिसरी कन्या नीळकंठभट्ट क्रमवंत याजेड.

१९ सखारामभट्ट क्रमवंताची कन्या दामोदरभट्ट राईरीकराची आई तिची कन्या राळ्याकडे तिचा पुत्र रूद्रभट्ट राखे यांची कन्या रंगोपंत म्हसवडेकर होनप देशपांडे यांची स्त्री तिची कन्या दशपुत्रे याजकडे त्याची कन्या रावबहादूर यांजकडे व दुसरी दाजीबा याणते याजकडे

२० बापूभट्ट क्रमवंताची बहीण कोन्हेरभट्ट कानडे यांची स्त्री

२१ वंडुभट्ट क्रमवंत भुतेवकर यांची वहीण खंडभट्ट तट्टू। दिली ... ...

२२ शिवरामभट्ट क्रमवंताची कन्या तात्यावत्सराज यांची आई तिच्या कन्या दोन पैकी एक भास्करभट्ट तट्टूची आई-दुसरी कोशे वसईकर याजकडे-आणि तट्टूच्यालेका दोन पैकी एक जनोबा मेकल याचे एथे व दुसरी नानापूरकर नाशिकर यांचे एथे दिली ... ...

२३ शिवरामभट्ट क्रमवंताची कन्या यादवभट्ट तट्टूस दिली ... ...

२४ नारायणभट्ट क्रमवंत याची कन्या आबाजोशी बापूजोशी व कोंडजोशी पनवेलकर यांची आई आंता कोंडजोशी यांचा पुत्र लाडजोशी यांची कन्या ती खंडभट्ट कोशे सडकर यांची स्त्री

२५ नाना मुंबईकर क्रमवंत यांची चुलतबहीण सखोपंत मायखळेकर कुळकर्णी यांची स्त्री

२६ माहादेवभट्ट क्रमवंत यांची आत जगन्नाथ खांबळकर यांची आई तिच्या कन्या ३ पैकी एक नाशीकर [illegible] यांजकडे दुसरी कल्याणकर उपाध्ये...

याजकडे तिसरी भिवंडीकर मकल याजकडे तिची कन्या रामचंद्र नुनमरावर्णे डोंगर-गांवकर यांचे येथे दिली.

२७ बाबूभट्ट क्रमवंत भुतवेकर यांची वहीण ती लाड जोशी नागोठणेकर यांची आई तिची कन्या शंकराजी केशव यांचे भाचे नार्टवर यांजकडे दिली. तिची कन्या तात्या नागपूरकर यांचे येथें दिली.

२८ नाना मुंबईकर क्रमवंत यांची वहीण वडुथास शेपाकडे दिली तिची कन्या शिवाजीपंत वडुथकर–ओवर्डे– व देऊर, व अमलगाव व चिखले या चार गांवचे कुळकर्णी यांचा पुत्र अमृतराव त्यांची स्त्री बाई पेठ्यांतील वावोलाकर कुळकर्णी बाबाजी नारायण यांची कन्या. तीन मुली तीन, पैकीं एक एशवंतरावभाऊ फलटणकर याचे बंधू जोतीपंतराव यांस दिली तिचे पुतण्यास ह्मणजे एशवंतरावभाऊचे मुलास तात्या हिव पुरंदरे यांची कन्या दिली.

२९ नाना मुंबईकर क्रमवंत यांचे वहिणीचा जांवई अमृतराव यांचा कन्या आप्पाजी बळवंतराव देशपांडे वाईकर याचे चुलते दत्तो त्रिमळराव देशपांडे व बंधु माधवराव यास दिली ह्या देशपांड्यांची कन्या तुळशीबागवाले यांचे पुत्रास दिली.

३० वीरवाल्हे येथील भालेराव ... यांची कन्या चिमणभट्ट क्रमवंत थळकर यांचे पुत्रास दिली.

३१ पावळकर जोशी बाळंभट ... यांची कन्या सदाशिवभट्ट क्रमवंत थळकर यांचे पुत्रास दिली.

३२ कृष्णभट्ट क्रमवंताची कन्या बापू जोशी अष्टमकर यांची आई.

३३ दादाभट्ट क्रमवंत अलिबागकर यांची वहिण त्रिंबक जोशी अष्टमकर यांची आई.

३४ बाळंभट्ट क्रमवंताची वहीण ही बाळा आचार्य गोपाळ आचार्य यांची आई.

३५ बाबाजी पाटील क्रमवंत यांची वहीण बाबा आचार्य यांची आई.

३६ गोपाळ आचार्य यांची स्त्री ती कृष्ण क्रमवंताची कन्या दुसरी स्त्री महादेवभट्ट क्रमवंतांची कन्या तिचा पुत्र एक सदाशिव. दुसरीचे पुत्र ३ रामचंद्र, रघुनाथ व लक्ष्मण व कन्या दोन पैकीं एक धोंड जोशी याची स्त्री दुसरी दादाभट्ट क्रमवंताची आई...... याशिवाय आणखी बहुत संबंध आहेत. चोळे महेश्वराकडे व काशीकडे इत्यादि ठिकाणीं. परंतु शोध लागला नाहीं. तसेंच सोनेरी येथील पानशाकडील व दुसरे वरघाटीसंबंध फार पुरातन बहुत आहेत. त्यांचीं नांवें सांगण्यास कोणी वृद्ध नाहीं यामुळें लिहिले नाहींत.

३७ भिकंभट्ट क्षीरसागर वासुंद्रीकर यांची आत मोरेश्वर महादेव मुळेकर क्रमवंत याचा वडील चुलता रामचंद्रभट्ट क्रमवंत यांस दिली.

३८ निळोपंत क्रमवंत थळकर पाटील यांची बहीण भिकंभट्ट क्षीरसागर वासुंद्रीकर यांची आई.

३९ बाळाजी पांडुरंग मुळे क्रमवंत खालापूरकर यांची भावजय भोरानजीक कोदवडी गांव आहे तेथील केसोपंत कानडे यांची कन्या ( दाजी रंगनाथ कानडे यांची चुलत बहीण ) आणि रावजी कानडे कोदवडीकर यांची कन्या बाळाजी पांडुरंग मुळे क्रमवंत याचा पुत्र विनायकराव यास दिली.

४० बाबा जोशी ठाणकर क्रमवंत यांची स्त्री ती सितारामतात्या बोडे सोनोवलीकर यांची कन्या व दुसरी भावजय श्रीपतराव आरगडे मौजे वीरवालें यांची कन्या.

४१ गोपाळ नारायण क्रमवंत यांचा पुतण्या महादेव यास पाटसकर तट्टू देशपांडे यांची कन्या दिली.

४२ दादा महादेव जोशी क्रमवंत यांची कन्या चिंचवडकर विष्णुपंत गुपचुप यांचा पुत्र...यास दिली.

४३ ( तात्याशास्त्री ) उर्फ वासुदेव जगन्नाथ शास्त्री यांची स्त्री ती गणपतराव शिवापुरकर देशपांडे यांची कन्या.

४४ सदाशिव पांडुरंग मुळेकर क्रमवंत यांचा द्वितीय संबंध राघोपंत कुलकर्णी शिरापुरकर ( सिद्धटेक नजीक ) यांची बहीण शके १७८३ पुण्यास विवाह झाला.

४५ सखाराम बापू क्रमवंत यांचा वडील पुत्र तात्या याचा द्वितीय संबंध दावडी लिमगांव येथील कुलकर्णी माधवराव धोंडदेव यांची कन्या, शके १७८४ साली झाला फाल्गुनमासीं झाला.

४६ परशराम नारायण मुंबईकर क्रमवंत याचा पुत्र नारायण यांस कानडे यांची कन्या दिली. शके १७८३ विवाह पुण्यांत झाला.

४७ दादासाहेब जोशी यांची दुसरी कन्या नरहर तात्या गांधी शिरस्तेदार मुक्काम पालनपूर यांचे बंधू लक्ष्मणराव हे पालनपुरास फडणीस आहेत त्यास दिली हा संबंध शके १७८४ फाल्गुनमासीं झाला.

४८ विनायक भिकाजी टुल्लु क्रमवंत यांचे मेहुणे दाजी काशिनाथ शेंड्ये याचा द्वितीय संबंध नारोपंत सोवळे वाटारकर यांची भाची दिली पुण्यात विवाह झाला. शके १७८५ फाल्गुनमास.

४९ गोपाळ नारायण क्रमवंत याची मुलगी बोंडोपंत दशपुत्रे याचा मुलगा कोंडोपंत यास दिली आणि कोंडोपंताची बहीण दाजीसाहेब देशपांड्ये इंद्रापूरकर याचे घरीं दिली शके १७८५ फाल्गुनमासीं पुण्यांत संबंध झाला.

५० भाऊसाहेब मुजुमदार याची कन्या गोपाळराव मेराळ बडोदेकर यास दिली आणि गोपाळराव मेराळ याचे वहिणीची पुत्णी दादा जोशी क्रमवंत नागावकर याचे बंधू बजाबा यास दिली.

## शरीरसंबंधांची यादी ( अकारविल्हेनें )

### अ.

**अत्रे** सखाराम गणेश नेरळ यांची बायको येसूबाई कै. गोपाळ जनार्दन जोशी चौल यांची बहीण.

**अत्रे** दाजीबा बाळकृष्ण कै. वासुदेव बल्लाल टिल्लु रामनाथकर यांची मुलगी.

**अत्रेबोवा** नेरळ यांची शेवटली बायको गणेश नारायण पिटकर यांची मुलगी.

**अत्रे** लक्ष्मण मल्हार नेरळ, यांची बायको मोरेश्वर महादेव क्रमवंत यांची मुलगी.

**अत्रेबोवा** नेरळ, यांची बायको रामचन्द्र गणेश जोशी यांची बहीण ( कमळी )

### आ.

**आगाशे** दत्तात्रय महादेव ठाणे, याची बायको, गणेश नारायण जोशी यांची मुलगी.

**आचार्य** केशवराव गोपाळ ठाणे यांची बायको रामचन्द्र दादा क्रमवंत अलिबाग यांची मुलगी, यांची मुलगी सिताबाई ही सिताराम हरी क्रमवन्त रामनाथकर यांची बायको, यांची दुसरी मुलगी मथुराबाई ही रा. केशव दाजी पुराणीक पाली यांस दिली. तिसरी मुलगी ही जनार्दन गणेश मुळेकर थळ यांची बायको, चवथी मुलगी विठाबाई ही हरी केशव टिल्लू रामनाथ यांची बायको, पांचवी मुलगी पिलूबाई शंकर गोविंद टिल्लू याची बायको, सहावी मुलगी द्वारकाबाई पांडुरंग जगन्नाथ टिल्लु याची बायको.

**आचार्य** हरी केशव ठाणे याची बायको दामोदर बल्लाळ टिल्लू यांची मुलगी

**आचार्य** विष्णु केशव यांची बायको लक्ष्मण हरी टिल्लू यांची मुलगी.

**आचार्य** त्र्यंबक सदाशिव भिवंडी यांची मुलगी काशिनाथ नारायण पिटकर यांची बायको.

**आचार्य** कुशाबा ठाणे, यांची १ मुलगी कमळया दांडेकर यांची बायको, २ री मुलगी वासुदेव श्रीधर टिल्लु यांची आई.

**आचार्य** लक्ष्मण गणेश उद्धर यांची मुलगी डॉ. भास्कर रावजी टिल्लु यांची बायको, दुसरी मुलगी बाळकृष्ण रामचंद्र टिल्लु यांची बायको.

**आचार्य** मोरभट्ट यांची बायको विष्णुभट्ट कमवंत यांची मुलगी, दुसरी बायको चेपाद्ती नाटेकर यांची मुलगी.

**आचार्य** बापुभट्ट यांची मुलगी चिंतामणभट्ट कमवंत यांची बायको.

**आचार्य** विश्वनाथभट्ट यांची बायको भास्करभट्ट कमवंत यांची मुलगी.

**आचवल** बाळंभट्ट यांची मुलगी महादेवभट्ट कमवंत याची बायको.

## उ.

**उपाध्ये** काशिनाथ गोविंद उरण यांची बायको जनार्दन गोविंद पाटोळ कमवंत यांची मुलगी

**उपाध्ये** जगन्नाथ रावजी उरण यांची बायको रामचंद्र विश्वनाथ पाटोळ (कमवंत) याची मुलगी

**उपाध्ये** विष्णुभट्ट उरण यांची बायको दामोदर बल्लाळ टिल्लु यांची मुलगी.

**उपाध्ये** पुरुषोत्तम रावजी उरण यांची बायको महादेव गणेश टिल्लु यांची मुलगी.

**उपाध्ये** रामभाऊ उरण यांची बायको महादेवभट्ट कमवत मुंबईकर यांची मुलगी.

**उपाध्ये** कृष्णाजी गंगाधर ऊर्फ काका उरण यांची बायको बाबाराम टिल्लू थळकर यांची बहीण.

**उपाध्ये** मोरेश्वर बोंडो यांची बायको केशव नारायण लोणकर यांची मुलगी.

**उपाध्ये** नीळकंठ पनवेळ यांची बायको भास्करभट्ट कमवंत यांची मुलगी.

## क.

**करंदीकर** महादेवभट्ट यांची मुलगी वामनभट्ट कमवंत यांची बायको, दुसरी मुलगी नारोपंत कमवंत यांची बायको.

**करंदीकर** महादेव भट्ट आक्षीकर यांची मुलगी त्र्यंबक भट्ट कमवंत यांची बायको.

**करमरकर** बाळाजी यांची मुलगी बाळंभट्ट कमवंत यांची बायको.

करमरकर गोविंदराव यांची मुलगी अनन्त निळकंठ पिटकर यांचे मावसभाऊ कर पुणें पेशव्यांचे उपाध्ये याचेकडे दिली.

करकमरकर——— यांची मुलगी नारायण विश्वनाथ पटवर्धन यांची बायको क्रमवंत संबंधी.

## का.

कानडे पनवेल यांची मुलगी नारायण परशराम टिल्लु यांची बायको

काले खंडेराव लक्ष्मण गुळसुंदे यांची बायको गणपतराव उपाध्ये यांची मुलगी, खंडेराव लक्ष्मण यांची आइ ही सदाशिवभट्ट शेंड्ये यांची मुलगी

कापरे नारायण गंगाधर यांची बायको गोपाळ नारायण जोशी यांची मुलगी.

काळे विष्णुपन्त पुणें यांची बायको नारायण जोशी यांची मुलगी.

काळे रामाजीपंत वरसोलीकर यांची मुलगी काशीभट्ट क्रमवंत याची बायको.

किर्लोसकर कृष्णराव सखाराम सोलापूर यांची बायको विष्णु भिकाजी टिल्लु यांची मुलगी.

केळकर विनायक यशवंत पुणें, यांची बायको बाळकृष्ण विनायक टिल्लु यांची मुलगी.

कुळकर्णी महादेव गोविंद यांची आई वासुदेव जगन्नाथ टिल्लु यांची मुलगी.

कोशे केळवेमाहीम कृष्णाजी गणेश पिटकर यांची बायको.

कोशे केळवेमाहीम यांची बायको विष्णुभट क्रमवंत यांची मुलगी.

## ख.

खासनिस माधवराव जत यांची बायको नारायण परशराम टिल्लु यांची मुलगी.

खरे यांची मुलगी बाळंभट महादेव शेंडे यांची बायको.

खोले पुणें यांची बायको भास्कर मोरेश्वर जोशी यांची मुलगी.

खांवळकर जगन्नाथ याची आई महादेवभट्ट याची आत.

## ग.

गडकर विनायक गणेश यांची मुलगी बाळकृष्ण खेडो सोनटक्के यांची बायको.

गरूड दिनकर याची बायको मोरेश्वर महादेव क्रमवंत यांची मुलगी.

**गांगल** जनार्दन विनायक यांची मुलगी गोपाळ नारायण टिल्लु यांस दिली व वहीण श्रीधर रामचंद्र क्रमवंत यांची बायको.

**गांगल** नारायणभट्ट याची बायको गणपत अन्याबा जोशी निजामपूरकर यांची नात.

## च

**चिकमणे** कृष्णाजीपंत याची बायको बाळाजी विश्वनाथभट्ट पेशवे यांची आत्या व त्याच चिमकण्यांची मुलगी विष्णूभट्ट क्रमवंत याची बायको.

## ज

**जळशे** यांची बायको तानभट्ट क्रमवंत यांची मुलगी.

**जोग** दामोदर हरी यांची मुलगी चिमणी वामन रामचंद्र सोहोनी चोल यांची बायको.

**जोग** दामोदर हरी यांची मुलगी यमू जनार्दन गोविंद पाटील यांची बायको.

**जोशी** त्रिंबक हरी यांची बायको गणेश महादेव शेंडे यांची मुलगी. दुसरी बायको दाजाबी थळकर टिल्लु यांची मुलगी.

**जोशी** हरीभाऊ यांची बायको गणेश नारायण पिटकर यांची मुलगी.

**जोशी** विश्वनाथ पेणकर याची बायको लक्ष्मणभट्ट क्रमवंत यांची मुलगी.

**जोशी** दामोदर आपटेकर यांची बायको बाळंभट्ट क्रमवंत यांची मुलगी.

**जोशी** बाबा आपटेकर यांची मुलगी आप्पाभट्ट क्रमवंत यांची बायको.

**जोशी** रामभट्ट थळकर यांची बायको रामभट्ट क्रमवंत यांची मुलगी.

**जोशी** रघुनाथ नागोठणेकर यांची मुलगी कृष्णंभट्ट क्रमवंत यांची बायको.

**जोशी** बाळ अष्टमकर यांची बायको विश्वनाथभट्ट क्रमवंत यांची मुलगी.

**जोशी** तान आपटेकर यांची वहीण केशवभट्ट क्रमवंत यांची आई.

**जोशी** दामोदर आपटेकर यांची मुलगी अनंतभट्ट क्रमवंत यांची बायको.

**जोशी** गणू नागांवकर यांची मुलगी गणेशभट्ट क्रमवंत यांची बायको.

**जोगळेकर** यांची मुलगी सोनभट्ट क्रमवंत याची बायको.

**जोशी** लाड नागोठणेकर यांची आई बापू क्रमवंत यांची वहीण.

**जोशी** लाड यांची मुलगी शंकराजी केशव यांचे भाचे नाटेकर यांचेकडे दिली.

**ज्योतिषी** रंगनाथ याची मुलगी नारायणभट्ट क्रमवंत यांची बायको.

**ज्योतिषी** ईशान यांची मुलगी श्रीपतिभट्ट क्रमवंत यांची बायको.

## ट

**टकले** त्रिंबक जोशी यांची मुलगी विनायकभट्ट क्रमवंत यांची बायको.

**टिटवाळेकर** दादाभट्ट यांची बायको केशवभट्ट क्रमवंत यांची वहीण.

**टेमकर** महादेवभट्ट यांची वहीण केशव बल्लाळ टिल्लू यांची बायको.

**टिल्लू** नारायण खंडेराव बडोदेकर यांची बायको काशिनाथ राजाराम पिटकर यांची ॐ.

**ठाणेदार** नारायण कृष्ण यांची सून बाळकृष्ण विनायक टिल्लू यांची मुलगी.

यांची मुलगी केळकरांची बायको.

## त

**तैत्र** गणेशभट्ट यांची मुलगी नारायणभट्ट क्रमवंत यांची बायको.

**तैत्र** बाळंभट्ट यांची मुलगी तानभट्ट क्रमवंत यांची बायको.

**तट्टू** यांची बायको गोविंद मोर जोशी यांची मुलगी.

## थ

**थिगळे** नरहर वासुदेव यांची बायको केशव विष्णु टिल्लू यांची मुलगी.

यांची आई केशव बल्लाळ टिल्लु यांची मुलगी.

यांची वहीण पेणचे शिधोरे याचेकडे दिली.

यांची चुलती नागेशभट्ट टिल्लू यांची वहीण.

**थिगळे** थळकर यांची मुलगी विश्वनाथ महादेव पाटील यांची बायको.

**थिगळे** थळकर „ भिवंडीचे बिवलकर यांची बायको.

**थिगळे** थळकर „ हिंगडे देशस्थ वरुईकर यांची बायको.

**थिगळे** थळकर यांची बायको वासुदेवभट्ट काशीकर श्रोत्री यांची मुलगी.

**थिगळे** थळकर „ चौटकर वैद्य यांची मुलगी.

**थिगळे** थळकर यांची वहीण वासुदेवभट्ट क्रमवन्त यांची बायको.

## द.

**दावक** बजाबा यांची सून केशव बल्लाळ टिल्लु यांची मुलगी.

**दातार** धुंडीराज भिकाजी खाळापूर यांची मुलगी गणेश बल्लाळ मुळेकर खालापूरकर यांची बायको.

**दातार** विठ्ठलभट्ट किंहिमकर यांची बायको महादेवभट्ट वेळणकर यांची मुलगी आणि ह्याच वेळणकरांची मुलगी दामोदरभट्ट क्रमवन्ताला दिली.

**दातार** किहीमकर यांची मुलगी कृष्णभट्ट क्रमवंत यांची आई

**दाते** नारायण मोरेश्वर दादर यांची बायको आठवले यांची मुलगी

**दाते** दिनकर बाळकृष्ण यांची बायको बाळकृष्ण सफे यांची मुलगी

**दाते** भिकाजी शास्त्री यांची मुलगी नथोबा महादेव शेंडे यांची बायको

**दाते** उद्धरकर यांची मुलगी रामचंद्र धेंडे क्रमवंत यांची आई

**दाते** राजापूरकर यांची मुलगी त्र्यंबकपंत वैद्य चौलकर यांची बायको

**दात्ये** बाबाजीभट्ट यांची बायको महादेवभट्ट क्रमवंत यांची मुलगी

**दांडेकर** नारायण भिकाजी यांची बायको फाटक धोकवडे यांची मुलगी

**दांडेकर** नागांवकर यांची मुलगी नरहर गणेश पिटकर बडोदे यांची बायको

**दामले** नथोपंत यांची बायको सखारामपंत दांडेकर यांची मुलगी

**दामले** अलिबागकर यांची मुलगी लक्ष्मण भास्कर राईळकर यांची बायको
यांची मुलगी नारायणभट्ट फफे यांची बायको

**दामले** हरभट्ट यांची बायको चिंतामणभट्ट मनोहर यांची मुलगी व
गंगाधरभट्ट क्रमवंत यांची नात

**दामले** दामोदरभट्ट यांची मुलगी महादेवभट्ट क्रमवंत यांची बायको

**देव** नारायण कृष्ण केळवामाहीम यांची बायको केशव विष्णु पिटकर यांची मुलगी

**देवधर** विजयदुर्ग यांची मुलगी वासुदेवराव पटवर्धन यांची बायको.

**दिवेकर** विष्णुभट्ट यांची मुलगी विश्वनाथभट्ट क्रमवन्त यांची बायको

**देहाते** जनार्दन गणेश पुणें, यांची बायको हरी केशव टिल्लु यांची मुलगी.

## न.

**नवाशिरे** नारायण सिताराम मूर्तिजापूर यांची बायको रामचन्द्र विष्णु शेंडे. यांची मुलगी.

**नेने** पुरुषोत्तम बळवन्त गुळहदे यांची बायको विनायक शास्त्री पिटकर यांची मुलगी आणि यांची मुलगी वासुदेव सदाशिव मोडक कल्याण, यांची आई.

**नेने** नारंभट्ट यांची मुलगी जनार्दनभट्ट क्रमवन्त यांची बायको.

**नेने** गोपाळपन्त यांची मुलगी गोपाळभट्ट क्रमवन्त यांची बायको.

**नाईक** जनोबा चिंचोलीकर यांची मुलगी जनार्दनभट्ट क्रमवन्त यांची बायको.

**नाटेकर** यांची मुलगी तात्या नागपूरकर यांजकडे दिली व नाटेकर शंकराजी केशव याचे भाचे यांची बायको लाड जोशी नागोठणेकर यांची मुलगी.

## प

**पटवर्धन** चिंतोपंत केशव यांची बायको भाऊसाहेब आठल्ये यांची मुलगी.

यांची मुलगी विठ्ठल रामचंद्र सोहोनी यांची बायको.

दुसरी मुलगी दत्तात्रय गणेश मुळेकर यांची बायको.

**पटवर्धन** वासुदेवभट मुंबई यांची बायको विजयदुर्गकर देवधर यांची मुलगी.

**पटवर्धन** विष्णुपंत नागांवकर यांची मुलगी जगन्नाथ लक्ष्मण जोशी चौलकर यांची बायको

**पटवर्धन** विनायक महादेव कल्याण, यांची एक मुलगी गजानन नृसिंह पाटील क्रमवंत यांची बायको.

यांची बहीण बाळकृष्ण विनायक क्रमवंत यांची बायको.

यांची दुसरी मुलगी रा. रा. शंकर गोपाळ जोशी ठाणा स्टेशन मास्तर यांस दिली आहे यांचें मूळगांव धुळें मालेगांव.

यांची तिसरी मुलगी रा. रा. रघुनाथ सखाराम टिळक अहमदनगर यांस दिली आहे.

**पटवर्धन** रामचन्द्र महादेव कल्याण याची बायको गोविंद वासुदेव घैसास यांची मुलगी.

**पटवर्धन** श्रीकृष्णराव बाबुराव यांची बायको दत्तात्रय गोविंद जोशी यांची बहीण.

**पटवर्धन** महादेवभट यांची बायको रामभट क्रमवन्त यांची मुलगी

**पटवर्धन** बळवंत परशराम कल्याण यांची बायको रामचंद्र दादा क्रमवंत यांची मुलगी.

यांची मुलगी गोविंद बाळकृष्ण टिल्लु यांची बायको.

**प्रयागी** बळवंत हरी उमरावती यांची बायको रामचंद्र गणेश जोशी यांची बहीण.

**पिटकर** ( केतकर ) दत्तात्रय गणेश बडोदें यांची मुलगी केशव गणेश मोडक बडोदें यांची बायको.

वैद्य **पिटकर** पांडुरंग यज्ञेश्वर ( केतकर ) यांची पत्नी ती सदाशिव दामले श्रीवर्धन यांची मुलगी.

यांची एक मुलगी ती महादेव विष्णु गोखले मु. डोलें यांची बायको.

यांची दुसरी मुलगी बाळकृष्ण गणेश शास्त्री लेले नाशिक यांची बायको.

डॉ. **पिटकर** पुरुषोत्तम गोविंद ( केतकर ) यांची पत्नी ती वामन विश्वनाथ लेले पुणें यांची मुलगी.

यांची दुसरी पत्नी ती परशराम विष्णु खरे वाई यांची मुलगी.

**डॉ. पिटकर** वामन गोविंद ( केतकर ) यांची पत्नी ती गोविंद सदाशिव लेले सातारा यांची मुलगी

**पिटकर** गोविंद यज्ञेश्वर ( केतकर ) यांची मुलगी ही गोविंद विश्वनाथ जोशी मुरुड यांची पत्नी.

यांची दुसरी मुलगी ती मुकुंद नारायण अभ्यंकर जांभुळपाडा यांची पत्नी.

**परांजपे** बाळाजीपंत यांची मुलगी वाग्भट्ट क्रमवन्त यांची बायको.

**पाटणकर** महादेवभट्ट यांची मुलगी गोविंदभट्ट क्रमवन्त यांची बायको.

**पिंगळे** माहीम, यांची बायको विठ्ठल वासुदेव टिल्लु यांची मुलगी.

**पिंपळखरे** कल्याण, यांची बायको परशराम बच्याजी जोशी यांची बहीण.

**पुराणीक** केशव दाजी पाली, यांची बायको केशवराव गोपाळ आचार्य यांची मुलगी.

**पेठे** यांची मुलगी कृष्णाजी रावजी वेळांवकर जोशी कोरलईकर यांची बायको.

## फ.

**फाटक** सदाशिव गणेश पडघवली यांची मुलगी रामचन्द्र नारायण बिवलकर यांची बायको.

**फाटक** चिंतोपन्त धोकवडे, यांची मुलगी नारायण ( कमळ्या ) दांडेकर यांची बायको.

**फाटक** पुरुषोत्तम रामकृष्ण पाली यांची मुलगी सदाशिव नारायण पटवर्धन यांची बायको.

**फफे** भिकंभट चौलकर यांची बायको विष्णुभट्ट क्रमवन्त याची नात.

## ब.

**बर्वे** शंकर हरी पुणें, यांची मुलगी रामचन्द्र नारायण बिवलकर यांची बायको,

**बापट** यांची मुलगी दामोदरभट्ट क्रमवन्त यांची बायको.

**बिवलकर** मुकुंद गोविंद भिवंडी, यांची बायको वामन रामचन्द्र सोहनी यांची मुलगी

**बिवलकर** रामचन्द्र नारायण कल्याण यांची बायको सदाशिव गणेश फाटक यांची मुलगी.

दुसरी बायको नारायण उपाध्ये उरणकर यांची मुलगी.

तिसरी रामचन्द्र हरी वर्वे पुणें यांची मुलगी.

**वेडेकर** अन्तोबा नाईक यांची मुलगी नृसिंह क्रमवन्त यांची बायको.

**वेडेकर** दाजिबा नाईक यांची मुलगी अनन्तभट्ट क्रमवन्त याची बायको.

## भ.

**भट** (महाजन) जनार्दन हरी खांबे यांची मुलगी गोपाळ विठ्ठल जोशी यांची बायको.

**भट** ,, लक्ष्मण बळवन्त यांची मुलगी नारायण विश्वनाथ पटवर्धन यांची बायको

**भागवत** यांची मुलगी वासुदेवभट्ट क्रमवन्त यांची बायको.

**भट** दत्तात्रय महादेव कुर्ले, यांची बायको मोरेश्वर दिनकर टिल्लु यांची मुलगी.

**भिडे** अनन्तभट्ट यांची मुलगी जनुभट्ट क्रमवन्त याची बायको.

**भातखंडे** पंडित त्र्यंबकराव नागांवकर यांची मुलगी त्र्यंबकभट्ट क्रमवन्त यांची बायको.

**भुस्कुटे** रघुनाथभट्ट वसई यांची बायको बाबल्या जोशी थळकर यांची मुलगी.

**भुस्कुटे** यांची मुलगी सिताराम हरी टिल्लु यांची बायको.

दुसरी मुलगी नागेश वासुदेव टिल्लु यांची बायको.

**भोळेराव** जनार्दन सिताराम यांची बायको रामचंद्र विष्णु शेंडे यांची मुलगी.

**भोरपकर** नृसिंहभट्ट पुणे यांची बायको दिनकरभट्ट क्रमवन्त यांची मुलगी.

**भोपटकर** शंकर मोरेश्वर पुणे यांची बायको बाळकृष्ण सफे अलिबागकर यांची मुलगी.

**भोळे** गोविंद वामन पावडी यांची बायको वामन विष्णु राईलकर वकील यांची मुलगी.

## म.

**मनोहर** शिवरामभट्ट यांची बायको रामभट्ट क्रमवंत यांची मुलगी.

**मनोहर** चिंतामणभट्ट यांची बायको गंगाधर मुळेकर यांची मुलगी.

यांची मुलगी हरभट्ट दामले यांची बायको.

**मनोहर** रामभट्ट यांची बायको सोनभट्ट क्रमवंत यांची मुलगी.

यांची मुलगी दामोदर क्रमवंत यांची बायको.

दुसरी मुलगी जनूभट्टाचार्य यांची बायको.

**महाजन** जनार्दन हरी खांब यांची मुलगी गोपाळ विठ्ठल जोशी यांची बायको.

**भाऊसकर** वे. डा नारायण मणगांव यांची मुलगी लक्ष्मण जगन्नाथ जोशी यांची बायको.

**भोडक** वासुदेव सदाशिव यांची आई पुरुषोत्तम बळवंत नेने यांची मुलगी
विनायक शास्त्री पिटकर यांची नात.
यांची बायको देवधर यांची मुलगी.

**भोडक** केशव गणेश वडोदें यांची बायको दत्तात्रय गणेश पिटकर यांची मुलगी.

**भोडक** बाळा कल्याण यांची बायको गोविंद मोरू जोशी चौल यांची मुलगी.
यांची बहीण भाऊ जोशी कोरलईकर यांची बायको.

**भोघे** गणेशपंत यांची सून वासुदेवभट्ट क्रमवंत यांची मुलगी.

**भोने** वामनराव पुणें यांची मुलगी रघुनाथ गोविंद जोशी यांची बायको.

**भोदगी** तात्या पेण यांस भाऊसाहेब आचार्य यांची मुलगी दिली.
यांची सून भिकाजी रामचंद्र पिटकर यांची मुलगी.

**म्हसकर** भिकाजीपंत यांची बहीण शंकरभट्ट क्रमवंत यांची बायको.

## र.

**राईलकर** रामचन्द्र दिनकर यांची बायको जनार्दन गोविंद पाटील यांची मुलगी.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **राईलकर** | कृष्णाजी गणेश | ,, | ,, | नृसिंह विश्वनाथ पाटील | ,, | ,, |
| **राईलकर** | दामोदर महादेव | ,, | ,, | दादा मुळेकर | ,, | ,, |
| **राईलकर** | सदाशिव वामन | ,, | ,, | नरहर गणेश मुळेकर | ,, | ,, |
| **राईलकर** | बाळकृष्ण भास्कर | ,, | ,, | पांडुरंग विनायक टिल्लू | ,, | ,, |
| **राईलकर** | दत्तात्रय निळकंठ | ,, | ,, | वामन बजाबा टिल्लू | ,, | ,, |
| **राखे** | | ,, | ,, | लक्ष्मण हरी क्रमवन्त | ,, | ,, |
| **रावेरकर** | सदाशिव | ,, | ,, | बाळकृष्णपन्त सफ्रे | ,, | ,, |
| **रेणावीकर** | दाजी हरी | ,, | ,, | केशव बल्लाळ टिल्लू | ,, | ,, |
| | यांची मुलगी | | | साठे पुणेकर यांची बायको. | | |

**रेणावीकर** हरी दाजी यांची बायको गोपाळ विठ्ठल जोशी कोरलईकर यांची बायको.

**राळे** लक्ष्मण व्यंकटेश यांची बायको विनायकभट्ट श्रोत्री यांची मुलगी.

**राळे** गणेश लक्ष्मण यांची बायको नारायण रघुनाथ पिटकर यांची मुलगी.

**राळे** पगडबंद यांची बायको दामोदर बल्लाळ क्रमवन्त यांची मुलगी.

## ल.

**लेले** मुकुंद रामचंद्र नागांव यांची मुलगी कृष्णाजी चिंतामण श्रोत्री यांची बायको.

**लेले** यांची मुलगी विश्वेश्वरभट्ट क्रमवंत याची बायको.

**लिमये** महादेवभट्ट यांची मुलगी चिंतामणभट्ट क्रमवंत यांची बायको.

दुसरी मुलगी महादेवभट्ट क्रमवंत यांची बायको.

**लोणकर** केशव नारायण यांची मुलगी गोपाळ वामन जोशी चोरकर यांची बायको.

दुसरी ,, मोरेश्वर धोंडो उपाध्ये यांची ,,

यांची बायको उद्धवकर आचार्य यांची मुलगी.

## व.

**वेलणकर** बचंभट्ट यांची मुलगी नारायण कृष्ण राईलकर यांची बायको.

यांची बहीण बाळकृष्ण विश्वनाथ क्रमवंत यांची आई.

**वेलणकर** महादेवभट्ट यांची मुलगी रामभट्ट क्रमवंत यांची बायको.

यांची दुसरी मुलगी विठ्ठलभट्ट दातार किंदिम यांजकडे दिली.

**वत्सराज** मल्हारभट्ट यांची मुलगी जनार्दन क्रमवन्त यांची बायको

**वैशंपायन** मोरोबा यांची बायको गोपाळ नारायण जोशी यांची मुलगी.

## श.

**शिधोरे** बाबजीभट्ट पेण यांची मुलगी गोविंद विनायक पाटील यांची बायको.

**शिधोरे** पेण यांजकडे नरहर वासुदेव पिंगळे यांची बहीण.

**शिधोरे** यांची बायको गणेशभट्ट क्रमवंत यांची मुलगी.

**शित्रे** रामभट्ट आक्षीकर यांची मुलगी गोपाळभट्ट क्रमवंत यांची बायको.

**शेंडे** काशिनाथ गणेश यांची बायको दत्तात्रय गणेश मुळेकर यांची मुलगी.

यांची १ बहीण नृसिंह गोविंद टिल्लु यांची बायको.

२ ,, शिवराम केशव टिल्लु ,, ,,

३ ,, नारायण रामचंद्र टिल्लु यांची बायको.

**शेंडे** वासुदेव चिंतामण याची बायको मोरेश्वर बाळकृष्ण क्रमवंत यांची मुलगी.

**शेंडे** नारायण चिंतामण यांची बायको नृसिंह विश्वनाथ पाटील (क्रमवंत, यांची मुलगी.

**शेंडे** चिंतामण नारायण यांची मुलगी मुरलीधर दामोदर टिल्लु यांची बायको.
दुसरी मुलगी रामचंद्र केशव टिल्लु यांची बायको.

**शेंडे** विष्णु महादेव यांची मुलगी शंकर गोविंद टिल्लु यांची बायको.

**शेंडे** श्रीपत सदाशिव याची बायको वामन पांडुरंग टिल्लु यांची मुलगी.

**शेंडे** रामचंद्र विष्णु याची मुलगी वासुदेव श्रीधर टिल्लु याची बायको.

**शेंडे** गणेश महादेव याची बहीण नारायण गोविंद टिल्लु यांची बायको ( तात्याशास्त्री )

**शेंडे** ( रेवदंड्याचे ) यांची मुलगी पाडुरंग मुळेकर यांची बायको

**शेंडे** तात्या यांची मुलगी नाना उपाध्ये उरणकर यांस दिली.

**शेंडे** सिताराम ठाणें यांची मुलगी गणेश भास्कर पाटील याला दिली.

**श्रोत्री** दामोदर विनायक यांची मुलगी नागेश बाळकृष्ण टिल्लू यांची बायको.

**श्रोत्री** कृष्णाजी चिंतामण याची बायको मुकुंद रामचंद्र लेले नागांवकर यांची मुलगी.

**श्रोत्री** गणेश विठ्ठल यांची मुलगी विश्वनाथ नृसिंह पाटील यांची बायको.
यांची बहीण वासुदेव श्रीधर टिल्लु यांची पहिली बायको

**श्रोत्री** बाळंभट्ट थळकर यांची मुलगी गजानन नृसिंह पाटील ( क्रमवंत ) यांची बायको.

**श्रोत्री** गोपाळ विनायक यांची बहीण महादेवभट्ट क्रमवंत यांची बायको
दुसरी कृष्णाजी विश्वनाथ पाटील क्रमवंत यांची बायको.

**श्रोत्री** जनार्दनभट्ट आवासकर यांची मुलगी अच्युतभट्ट क्रमवंत यांची बायको.

**श्रोत्री** अनन्तभट्ट यांची मुलगी शिवंभट्ट क्रमवंत यांची बायको.

## स

**सांखळकर** वासुदेवराव यांची आत्या रामजोशी चौलकर यांची बायको.
यांची मुलगी गंगाधर विश्वनाथ पिटकर यांची बायको.

**सांखळकर** कृष्णंभट्ट यांची मुलगी विश्वनाथभट्ट क्रमवंत यांची बायको.

**साठे** यांची मुलगी अनंत निळकंठ पिटकर यांची आई.

**साठे** पुणें यांची बायको केशव बल्लाळ टिल्लू यांची नात.

**सप्रे** बाळकृष्ण सदाशिव यांची बायको बाळकृष्ण सखाराम टिळू यांची मुलगी.

यांची १ मुलगी दिनकर बळवंत दाते यांची बायको.

,, २ ,, शंकर मोरेश्वर भोपटकर यांची बायको.

,, ३ ,, केशव विनायक पिटकर यांची बायको.

,, ४ ,, सदाशिव रघुनाथ रावेरकर यांची बायको.

**सोमण** चिंतामण विनायक यांची बायको सदाशिव नारायण पटवर्धन यांची मुलगी.

**सोनटक्के** लक्ष्मण बाळकृष्ण यांची बायको जनार्दन गणेश मुळेकर यांची मुलगी.

**सोनटक्के** विठ्ठल खंडेराव यांची बायको रामचंद्र दादा कमवंत यांची मुलगी.

यांची आत्या विश्वनाथ विनायक पाटील कमवंत यांची बायको.

**सोनटक्के** पेण यांची मुलगी विष्णुभट्ट कमवंत यांची बायको.

**सुकले** मोरेश्वर यांची मुलगी बाळाजीभट्ट कमवंत यांची बायको.

**सोहोनी** विठ्ठलभट्ट यांची मुलगी जिऊभट्ट कमवंत यांची बायको.

**सोहोनी** विष्णु बाळकृष्ण यांची मुलगी जनार्दन रावजी राईलकर यांची बायको.

यांची दुसरी मुलगी बगाजी लक्ष्मण जोशी यांची बायको.

**सोहोनी** वामन रामचंद्र यांची बायको दामोदर हरी जोग यांची मुलगी.

यांची मुलगी मुकुंद गोविंद बिवलकर भिवंडी यांची बायको

यांची सून दिगंबर गणेश मुळेकर यांची मुलगी.

**सोहोनी** विठ्ठल रामचंद्र यांची बायको चिंतोपंत पटवर्धन यांची मुलगी.

याची मुलगी ठाण्यास दातार यांजकडे दिली.

यांची सून भावे यांजकडील.

॥ श्री ॥

## यादी फडके भिकंभट्ट यांची वंशावळ परंपरा पीठिका क्रमवन्तसंबंधीपणाची.

१ भिकंभट्ट फडके यांचे आजे विनायकभट्ट यांची स्त्री दादा क्रमवन्त यांची कन्या.

१ गंगाधर क्रमवन्त मुळेकर यांची बहीण चिंतामणभट्ट मनोहर यांची बायको.

१ मनोहरांची कन्या हरभट्ट दामले यांची बायको.

१ भिकंभटाचे तीर्थरूप नारायणभट्ट यांची बायको हरभट्ट दामले यांची कन्या भिकंभटाची आई.

१ खुद्द भिकंभट्टाची बायको विष्णु क्रमवंत वस्ती मुंबई यांची नात कोशांची कन्या.

२ विष्णु क्रमवंत मुंबईकर यांच्या मुली २; पैकीं १ पेणकर सोनटक्के यांजकडे दिली, व २री बमईस कोशे यांजकडे दिली. तिच्या पोटची कन्या भिकंभटास कोशे यांणीं दिली तीच हल्लीं संतती भिकंभटाची. मुली भाऊ आदी करून.

ही याद वामनभट्ट नेने वस्ती रेवदन्डा यांचे हातची आहे.

मिति भाद्रपद वद्य ५ मंगळवार शके १७५९

## ॥ श्री जोगेश्वरी प्रसन्न ॥

वेदमूर्ती महादेवभट्ट पटवर्धन संबंधी याचे पुत्र ४ त्यांस संबंध १ करमरकर २ मनोहर ३ शेंड्ये राईलकर. कन्या ४ संगमेश्वरकर १ जोशी २ शेंड्ये ३ दातेय ४ संबंधी बाबजीपंत महाजन यांची कन्या संबंधी सोवनी त्यांची कन्या संबंधी जोशी नेने २ संबंधी रामभट्ट मनोहर काशिस्थ त्याच्या कन्या ३ संबंधी पुराणीक १ भिडे २ केळकर ३ त्यांस संबंधी व्यास १ भिडे २ त्यास संबंधी गोविंद राम दीक्षित संबंधी रामभट्ट मनोहर चंपावतीस्थ यांच्या पुत्री त्यांस संबंधी जोशी त्यांची कन्या दामले त्यांस संबंध थथे संबंधी विंझये माधवराव संबंधी चिंतामणभट्ट शेंड्ये उपाध्ये चंपावतीस्थ त्यांचे पुत्र १ संबंधी राईलकर व कन्या पंचनदीकर जोशी. चंपावतीस्थ वैद्य संबंध २ संबंध दातार संबंध नित्सुरे संबंध डोंगरे २ करंदाकर त्यांच्या कन्या ३ संबंध क्रमवंत १ संबंध नारोपंत थथे बाळाजी सहस्त्रबुद्धे संबंध करमरकर बाळाजीपंत त्यांच्या कन्या ५ श्रीखंडे १ राहाळकर २ क्रमवंत ३ फडके ४ साठ्ये ५ संबंध वेलणकर यांच्या कन्या ३ संबंध क्रमवंत १ कर्वे २ [illegible] ३ संबंध लिमये याच्या कन्या ४ नाईक १ क्रमवंत २ जोशी ४ संबंध भिडे कन्या [illेgible] होत्री १ क्रमवंत २ बापट ३ नेने संबंध यांच्या कन्या २ क्रमवंत १ वरवडेकर [illegible] २ संबंध सोहोनी कन्या ४ व्यास १ फाटक २ क्रमवंत ३ ठोसर ४ संबंध बेडेकर कन्या ४ क्रमवंत १ पाउ २ जोशी ४ संबंध मातखेड संबंध भट्ट संबंध तेंव्र

संबंध वैद्य संबंध पाटणकर यांच्या कन्या ३ क्रमवंत १ आठवले २ संबंध परांजपे संबंध भाक संबध शित्रे संबंध वरवडेकर जोशी संबंध दाते संबंध दामले संबंध वेढकर संबंध गोविंद जोशी राईलकर संबंध पाळपंचमहालकर.

| | | |
|---|---|---|
| विश्वनाथ जोशी | रामजोशी यांचा पुत्र लाडजोशी नागोठणेकर | |
| गोपाळ जोशी | खंड जोशी | संबंधी वेखंड्य मल्हारपन्त. |
| लक्ष्मण जोशी | आचार्य | संबंधी पेण पंचमहाल. |
| जिव जोशी | जिवाचार्य | खंडभट्टतट्टू |
| त्रिंबक जोशी | महादाचार्य | यादभट्टतट्टू |
| | बाळाचार्य | खंड जोशी मावळकर |
| | गोपाळाचार्य | खंडभट्ट वत्सराज. |
| | मोराचार्य | बाळंभट्ट राख्ये. |
| | | गणेशभट्ट राख्ये. |
| | | पनवेलकर जोशी |
| | | पनवेलकर उपाध्ये. |

ही याद बाळकृष्ण विनायक टिलटू यांचे घरीं आहे.

# कांहीं अभिप्राय.

श्री. ता. २७-१२-२७

अलिबागचे श्री. ग. दा. टिल्लू यांचा क्रमवंत ग्रामण्याचा इतिहास हा निबंध मी आद्यजीनें वाचून पाहिला. लेखकानें माहिती सुसंगत ऐतिहासिक सत्याला धरून व मत्सरानें प्रेरित न होतां दिली आहे. ह्या माहितीवरून क्रमवंत ब्राम्हण-समाजाच्या इतिहास सुस्पष्ट होतो. आणि क्षुद्र कारणानें व मत्सरानें ग्रामण्यें कशीं होतात व त्यांत कांहीं घराणीं कशीं होरपळून जातात, हें ह्या माहिती-वरून चांगलें समजतें. जुना वाद् गाडण्याकरितांच हा प्रयत्न आहे

**महादेवशास्त्री दिवेकर.**

---

श्री. बदलापूर. २०-१२-२७

क्रु. सा. न. वि. वि. आपण कोंकण वर्तमानपत्रांतून क्रमवंतांसंबंधीं लिहिलेले लेख पाठविले त्याबद्दल मी आपला फार आभारी आहें. सर्व लेख वाचून पाहिले. आपली विचारसरणी बरोबर आहे. शिवाय क्रमवंतांच्या ब्राम्हण्याबद्दल मला कधींच शंका नव्हती. मी रेवदंड्यास लहानपणीं असतांना आमचे उपाध्ये क्रमवंतच होते. शेवटीं मला आपणास इतकेंच लिहावयाचें आहे कीं आपण पेशव्यांच्या निःपक्षपाताबद्दल जरा अधीक स्पष्ट लिहिलें असतें तर योग्य झालें असतें. क. लो. अ. हे वि.

**नारायण गोविंद चाफेकर.** बी. ए. एल्एल्. बी.

---

अलिबागचे श्रीयुत गणेश दामोदर टिल्लू एम्. ए., यांनीं लिहिलेल्या "**अष्टागरांतील क्रमवंत घराण्याचा इतिहास**" ह्या पुस्तकाची एक प्रत माझ्याकडे पाठविली, ती मी काळजीपूर्वक समग्र वाचून पाहिली. श्री. टिल्लू यांनी हें पुस्तक ८१ जुन्या कागदांच्या आधारावर साक्षेपानें लिहिलें असून, आजपर्यंत आग्रहानें, मात्सर्यानें, अज्ञानानें वा गैरसमजानें अष्टागरस्थ क्रमवंत ब्राम्हणांबद्दल इतर ब्राम्हण जातींत झालेला गैरसमज त्याच्या वाचनानें पूर्णपणें नाहींसा होईल यांत संशय नाहीं. अष्टागरस्थ क्रमवंत हे पंच द्राविडांतील महाराष्ट्रभेदाचे देशस्थ ब्राम्हण असून, दुर्गादे-

सोंच्या † दुष्काळांत देशावरून आलिबागेनजीकच्या अष्टागरांत येऊन राहिलेल्या टिल्लू घराण्याचा वेल विस्तार होत. नामसादृश्यावरून अष्टागरांतील क्रमवंत व कुडाळ-गोवें प्रांतांतील किरवंत हे एकच असाव असा कित्येकांचा गैरसमज झालेला होता. या पुस्तकांत ह्या दोन जातींचा अर्थाअर्थी कांहींच संबंध नाहीं ही गोष्ट साधार व उत्तम रीतीनें सिद्ध केली आहे. "क्रमवंत" हें यांचे जातिवाचक नांव नसून, ह्या घराण्यांतील पुरुषांनीं क्रमान्त अध्ययन केल्यामुळें त्यांना विद्वत्तेची प्रावीण्यदर्शक दिलेली ही पदवी होय. ह्या बहुमानसूचक पदवी वरूनच पुढें ह्या घराण्याच्या वेलविस्ताराला क्रमवंत ह्या नांवानें संबोधण्यांत येऊं लागलें.

ह्या पुस्तकांत श्री. टिल्लू यांनीं दिलेली ग्रामण्याची माहिती ज्ञातीतिहासाच्या अभ्यासकांना वाचनीय आहे. ह्या ग्रामण्याचे आद्यप्रवर्तक हरभट्ट लेले या नांवाचे एक लोभी व उपद्व्यापी वैदिक होते. त्यांनीं अष्टागरांतील ह्या क्रमवंत घराण्याकडे चालत आलेल्या २५० गांवांच्या उपाध्येपणाच्या वृत्तीवर डोळा ठेवून **गोमांतकांतील किरवंत आणि अष्टागरांतील क्रमवंत एकच** होत असा कुत्साविषाचा गरळ श्रीमंत कान्होजी आंग्रे यांच्या समोर टाकला; आणि त्याचें मन त्यांचे कुलगुरू क्रमवंत यांच्याविषयीं कलुषित करून शेवटीं त्यांच्या वृत्ति सरकारजमा करविल्या! ह्यानंतर पेशवाईत ह्या ब्राह्मणांवर अनेक ग्रामण्यें झालीं, व तीं कमजास्त प्रमाणानें दीडशें वर्षे मधुन मधुन धुमसत होतीं. ह्या दीडशें वर्षांच्या दीर्घकाळांत अष्टागरस्थ क्रमवंतांची पांगापांग होऊन, त्यांचा वृत्तिच्छेद व कुलच्छेद झाल्यामुळें ते अल्पसंख्य होऊन सांपत्तिक स्थितीला कायमचे आंचवले. एकंदरींत पाहतां ह्या अष्टागरस्थ क्रमवंतांना एका त्र्यक्षरी नांवाचा दुरून काकतालीय न्यायानें लागलेला भासात्मक संबंध फारच जाणवला असें म्हणावें लागतें.

**वासुदेव अनंत बांवडेकर, मुंबई.**

---

I feel great pleasure in certifying that the book of Mr. G. D. Tillu M. A., called the 'Ashtagarantil Kramavant Gharanyacha Itihas' ( **अष्टागरांतील क्रमवंत घराण्याचा इतिहास** ) has been so elaborately brought

---

† रा. टिल्लूंनीं मामुली बहिवाटीप्रमाणें सन १३९६ हें दुर्गादेवीच्या दुष्काळाचें वर्ष दिलें आहे. ग्याझेटिअरकार वगैरे जुन्या इतिहास लेखकांनीं ग्रँटडफचाच अनुवाद करून तेंच दिलें आहे. परंतु इतिहासाचार्य कै. राजवाडे यांनीं अस्सल कागदपत्रांवरून सन १४६८ ते १४७४ च्या दरम्यानच्या काळांत हा दुष्काळ पडल्याचें निर्विवाद सिद्ध केलें आहे.

out in its varied details as to point to his remarkable spirit of research and investigation into the valuable archives of his great and ancient family. To the student of History particularly, this laborious work will mark the learned author out as a zealous contributor to Modern History of some of the glorious episodes that have characterised the long and brilliant careers of his ancestors in making an enviable political history for the family in the past Mr. Tillu's noble exertions in unearthing so much admirable material for the information and study of the present and future generations of his family ought to earn him their eternal gratitude for having brought them so closely and devotedly in touch with his and their renowned forefathers.

20 New-wadi, Bombay
10 th February 1928.

**Bhujangro R. Mankar.**

" आपण अष्टागरांतील कमवंत उर्फ टिल्लु घराण्याचा जो इतिहास प्रसिद्ध करीत आहां तो मोठा उद्बोधक असून गतकालीन ब्राम्हणांच्या विशेषतः भिक्षुक ब्राह्मणाच्या मनोवृत्तीवर चांगला प्रकाश पाडणारा आहे. ब्राह्मणांच्या विस्कळित–पणास आणि त्यांत नसते भेद उत्पन्न करण्यास हीच वृत्ति बऱ्हंशानें कारण झालेली आहे. त्यामुळें आपल्या मूळच्या शुद्ध कुलाच्या अनेक वंशजांस निष्कारण वारंवार जो त्रास व छळ सोसावा लागला त्याबद्दल कोणाहि सहृदय माणसास खेद वाटेल यांत शंका नाहीं. सदर इतिहासांत ब्रामण्याची माहिती देतांना आपण आपल्या ज्ञातिसंबंधीं जो महत्वाचा व बहुविध असा लेखी पुरावा दाखल केला आहे त्यावरून आपल्या ज्ञातीच्या सद्ब्राह्मण्याविषयीं शंकाच रहात नाहीं. हा पुरावा आपण सद्यःस्थितींत ब्राम्हण समाजापुढें मांडला हें चांगलें केलें. त्यामुळें इतःपर आपल्या जातीविषयीं कोणीहि विचारी गृहस्थ सहसा शंका कुशंका घेण्यास प्रवृत्त होणार नाहीं अशी खात्री वाटते."

**वा. दा. मुंडले.**
संपादक 'ब्राह्मण पत्रिका'
इसलामपूर (सातारा)

मिति चैत्र व॥ ५
शके १८५०

**क्रमवंत घराण्याचा इतिहासः**— हें पुस्तक रा. गणेश दामोदर टिल्लू बी. ए. यांनीं अतिशयसे तयार करून छापलें आहे. अष्टागर प्रांतांतील श्रीमान् क्रमवंत घराण्याचा पूर्वेतिहास व तत्संबंधी उपलब्ध झालेले सर्व कागदपत्र दिले आहेत. पेशवाईच्या काळांत अनेक ब्राह्मण घराणीं उदयास आलीं व त्यांचा त्या वेळच्या राजकारणाशीं कसा निकट संबंध येत गेला हें या छोट्याशा इतिहासावरून चांगलें निदर्शनास येतें. अशा प्रकारची सर्व ऐतिहासिक घराण्यांची माहिती त्यांचे वंशज प्रसिद्ध करतील तर महाराष्ट्राचे इतिहास साधनांत पुष्कळ भर पडेल. पुस्तकाचा व कागदपत्रांचा बराच भाग त्या वेळच्या क्रमवन्त घराण्याच्या ग्रामण्याविषयीं हकीकतीनें भरलेला आहे व हे जुने वाद आतां कशाला उकरून काढावे असेंही कोणास वाटेल; पण ऐतिहासिक दृष्ट्या याही वादांचे महत्व असतें. हीं ग्रामण्यें वस्तुतः जात्यभिमानानें प्रेरित नसून वंशपरंपरागत वृत्तिहरणाचे वैयक्तिक प्रयत्न होत असें म्हणावें लागतें. प्राचीन काळीं क्षत्रिय राजे एकमेकांचीं राज्यें घेण्याकरितां स्वाऱ्या करीत त्याप्रमाणेंच हीं पेशवाईंतील ग्रामण्यें होतीं इंग्रजीराज्यांत सर्वांचीच वतनें आणि वृत्त्या नष्ट होत चालल्यामुळें त्यांना कांहीं महत्व राहिलें नाहीं.

मुंबई गिरगांव }<br>ता. २४।२।२८ }

**महादेव राजाराम बोडस.**<br>वकील, हायकोर्ट मुंबई.

---

रा. ग. दा. टिल्लू यांनीं आपल्या अष्टागरांतील क्रमवंत घराण्याचा लिहिलेला इतिहास समग्र वाचिला. **हे क्रमवन्त आमच्या कुडाळप्रांतस्थ किरवन्ताहून सर्वथैव भिन्न आहेत हें आम्हांस पूर्वींच माहित होतें,** व त्याबद्दल कोणास कधीं शंका येण्याचा संभवहि आम्हांस वाटला नव्हता. परंतु केवळ शंकाच घेऊन नव्हे तर ह्या शंकेप्रमाणें प्रत्यक्ष कृतीदाखल या क्रमवंत घराण्याचा वृत्तिनाश करून, त्यांच्याशीं समान ब्राम्हण्याचे व्यवहार बंद करून, कांहीं चित्पावन ब्राम्हणांनीं त्यांचा छळ केला, हें या पुस्तकांत आम्ही पहिल्यांदांच वाचित आहों. शंकेचें कारण केवळ नामसादृश्य, पण तवढ्याचा फायदा घेऊन एका माणसानें उठविलेली वावटळ खालीं बसविणें, सगळ्या क्रमवंत घराण्यांचा लेखी तोंडी पुरावा, पेशव्यांचीं आज्ञापत्रें, आणि ब्रम्हसमूहाचा निर्णय आणल्यावरही फार जड गेलें. केवळ अज्ञान आणि दुराग्रह यांचा मारा या क्रमवंत जातीस फार फार भोंवला. ही सर्व हकीकत रा. टिल्लू यांनी कागदपत्रांसह मुद्देसूद रीतीनें मांडलेली आहे. स्वतःच्या ज्ञातीचेंच का होईना, पण सत्यश्रमपूर्वक पुढें आणल्या-बद्दल, रा. टिल्लू हे सत्यान्वेषी गृहस्थांच्या अभिनंदनास पात्र आहेत.

**रामकृष्ण विठ्ठल मतकरी** बी. ए. एल्. एल्. बी.<br>संपादक '**आद्यगौड ब्राह्मण**'

श्री.

श्रीयुत गणेश दामोदर टिल्लू एम्. ए. कृत **अष्टागरांतील क्रमवंत घराण्याचा इतिहास** हा इतिहास वाचल्यावर, ग्रंथकर्त्याचा दीर्घोद्योग व श्रमसातत्य, त्याची विद्वत्ता आणि निरीक्षणक्षमता, निरलसता व नैपुण्य, उत्कट उत्साह आणि स्वकार्यपरायणता, हीं स्वयमेव व्यक्त होतात.

**अष्टागरांतील क्रमवंत** यांची गणना वेदाध्ययन करणाऱ्या विद्वान ब्राह्मणांत होतें व ते क्रमपाठी असल्यामुळेंच, त्यांना क्रमवंत हें सार्थ उपपद प्राप्त झालें, या विषयीं शंका नाहीं.

मी सेवाधर्म निमित्त **अलिबागेस** इ. स. १८७८।७९ सालीं, सुमारें दीड वर्षे होतों, तेथें एक सुशील व संभावित **क्रमवंत** गृहस्थ माझ्या परिचयाचे झाले. त्यांचा व माझा स्नेहसंबंध जडल्यावर आणि गांवांत मला अवश्य ती हकिकत उपलब्ध झाल्यावर, सदरहू गृहस्थापाशीं योग्य ती चौकशी करण्याचा मला धीर आला, व ते **कोंकणस्थ** कां **देशस्थ** हें मी यांस प्रत्यक्षच विचारिलें.

माझा प्रश्न ऐकून घेतल्यावर, त्यांनीं मला सांगितलें कीं, "**आम्हीं किरवन्त आहों**" तेव्हां मी त्यांस हडसून खडसून उत्तर दिलें कीं, " अहो! तुह्मी जातिवंत विद्वान **क्रमवन्त** घराण्यांतले असून देखील 'आम्हीं किरवन्त अहों असें कां म्हणतां' ? त्यावर त्यांनीं प्रत्युत्तर दिलें कीं, " आम्हीं **क्रमवन्त** आहों ही गोष्ट खरी. पण ती फारच थोडक्यांस विदित आहे, कारण **क्रमवंन्ताचा** खरा अर्थ कोणास ठाऊक नाहीं. सामान्यत:, सर्वांस महशूर, मुलांबाळांस सुद्धां माहीत, आणि अष्टागरांत रूढ असा आमचा जातिवाचक शब्द किरवन्तच होय. मग तो कितीही अपभ्रष्ट असो अथवा सत्यापासून दूर राहो." ह्याचा पडताळा **अलिबागकरांस, अष्टागरस्थांस, सरकारी** नोकरांस व खासगी मंडळींस व खुद्द क्रमवन्त घराण्यांतील शिष्टजनांस विचारून पाहतां ते सर्व किरवन्त हेंच जातिवाचक नांव क्रमवंतांऐवजीं सांगत.

तथापि हा केवळ अज्ञानजन्य संस्काराचा आणि विपरीत रूढीचा दोष होय; व ह्मणूनच त्यांत वस्तुत: लेशमात्रही हीनत्व नाहीं. उदाहरणार्थ, असंस्कृत लोक आपणांस किंबहुना अखिल ब्राह्मण जातीस बामणच ह्मणतात, आणि ह्या संज्ञेनेंच ते त्यांस ओळखतात. पण त्यामुळें आपणांस केव्हांही लेशमात्रसुद्धां विषाद वाटत नाहीं. कारण असंस्कृत

वर्गाला, ब्राह्मण शब्दाचा उच्चार येत नसून, तो त्यांस माहीतही नसल्यानें, त्यांच्यांत खऱ्या शब्दाऐवजीं, बामण शब्दच रूढ होऊन बसला आहे. अर्थात् हा अज्ञानजन्य रूढ प्रचार होय. पण खरें रहस्य शाब्दिक भेदांत नसून, तें स्वयंप्रभावांत व गुणाविशिष्टांत आहे. आणि ह्मणूनच इंग्रजींत एक ह्मण आहे कीं, गुलाबाच्या फुलाला अन्य कोणतेंही नांव दिलें, तरी त्याचा मधुर परिमळ आपली छाप सर्वत्रच मारतो " Rose by any other name would smell as sweet " आतां, दुसऱ्या एका महत्वाच्या गोष्टीकडे, मी क्षणभर वळतों. **गोंवा, फोंडा, अंत्रूज, सांवतवाडी** इत्यादि **कुडाळ** प्रांतांतील **वेदविद्याविरहित किरवन्त** कोणीकडे व **अष्टागरांतील वेद पठण** करणारे विद्वान्, आणि **क्रमपाठाचे** अधिकारी **क्रमवन्त ब्राह्मण** कोणीकडे? काचः काचो मणिर्मणिः । कांच ती कांच व सुवर्ण कोंदणांत शोभणारा मणि तो मणीच. अर्थात् तुलना होणें, केव्हांही शक्यच नाहीं.

अशी वस्तुस्थिति असून देखील, केवळ "**क्रमवंत**" आणि " किरवंत " या अंशत: भासमान होणाऱ्या नामसादृश्यावरच सर्व भिस्त ठेवून वे. शा. सं. हरिभट्ट लेले यांनीं निष्कारण द्वेषाग्नि पेटविला; किंबहुत दीर्घ असूयेलाच बळी पडून, त्यांनीं काड्याचा नायटा व राईचा डोंगर केला; **वेदाध्यनपटु** अशा निरपराधी आणि निव्वळ ग्रामवृत्तीवरच उपजीविका चालविणाऱ्या अनेक विद्वान ब्राह्मणांच्या वृत्तींचा उच्छेद चालविला; तीव्र ग्रामण्याच्या खर्चांत व इभ्रतीच्या असह्य पेंचांत, ह्या विद्वान **क्रमवंत ब्राह्मणांस** अनेकवेळां जेरीस आणिलें; एवढेंच नव्हे तर, त्यांस पदरची शिदोरी आणि अवश्य त्या सामानाची कंठाळ स्वतांच्या खांद्यावर बांधावयास लावून, दारोंदारचे व गांवोंगावचे उंबरठे झिजवावयास लावलें. हें पाहून, अथवा घडलेली हकीकत वांचून, किंवा ती ऐकून, पाषाण हृदयांस सुद्धां, ह्या दुःखाग्नीची आंच लागेल; आणि त्यायोगानें त्यांचा देह होरपळल्यावांचून खचितच राहणार नाहीं.

तात्पर्य. अष्टागरांतील **क्रमवंत** ब्राम्हणांचा स्वार्थत्याग, त्यांची प्रचंड श्रद्धा, त्यांची नैष्ठिक बुद्धि, व सांप्रतकाळीं निदर्शनास आलेला त्यांचा ग्रामण्याचा इतिहास, हीं निःसंशय हृदयद्रावक आणि बोधप्रद आहेत. मात्र दुःखाग्नीनें भेट घेतल्यामुळें, तो प्रबळ झाला, हें निर्विवाद आहे. तथापि " **धीरसे गंभीर** " ह्मणूनच, धीर सोडण्याचें प्रयोजन नाहीं. कारण दुर्धर काळानें, कोणालाच सोडलेलें नाहीं.

**सर्वं यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः**

असो. एकंदरींत, **सत्यमेव जयते । नानृतम्** । ह्या सिद्धांतास अनुसरून शेवटीं **क्रमवन्त** ब्राह्मणानांच **जयश्रीनें** निर्वेधपणें माळ घातली व त्यांची दाद लागली, ही आनंदाची गोष्ट होय. तरी खर्चाच्या भोंवऱ्यांत सांपडल्यानें, ते दुर्बळ झाले, याबद्दल कोणालाही खचितच वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं. तथापि **श्री मंगलमूर्ति** त्यांजवर पुनश्च कृपा करील, अशी मी आशा बाळगतों, कारण,

**कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥**

मुक्काम पुणें
चैत्र व० ३ शके १८५०
रविवार ता. ८।४।१९२८

**नाना पावगी.**

---

रा. गणेश दामोदर टिल्लू एम्. ए यांनीं लिहिलेल्या " अष्टागरांतील क्रमवंत घराण्याचा इतिहास " या पुस्तकाची भूमिका मी समग्र वाचली. हा अनेक प्राचीन पत्रांवरून तयार केलेला इतिहास फारच मनोरंजक झाला आहे. जातींचे तंटे कसे उपस्थित होतात व त्यांत स्वार्थाचें मूळ कसें असतें हें या वरून चांगलें निदर्शनास येतें. हल्लीं जरी जातिबंधन लोकांस नकोसें झालेलें दिसतें, तथापि जातीचा अभिमान कसा दृढ आहे, आणि वे. शा. सं. अप्पाजीभट्ट व अनंतभट्ट यांनीं किती चिकाटीनें व धैर्यानें आपल्या घरचा आलेला भ्रम दूर केला हें पाहून कौतुक वाटतें शाहुमहाराजांच्या व पेशव्यांच्या दरबारांत न्यायदृष्टि किती चोख होती हेंहि यावरून दिसेल. हा पत्रव्यवहार मनोरंजक आणि त्या वेळच्या सामाजिक स्थितीवर प्रकाश पाडणारा असून सर्व इतिहासप्रेमी लोकांस मननीय असा आहे, आणि यानें इंग्रजी पूर्वकालीन मराठी भाषेच्या वाङ्मयांत प्रशंसनीय भर पडेल.

मुंबई ता. २५।४।२८

चिंतामण विनायक वैद्य
3६७३

श्री

साष्टांग न. वि. वि.

मी आपलें पुस्तक वाचलें. पुस्तक चांगलें असून, आपल्या पुस्तकाचा उपयोग, ब्राह्मण जातींतील पोटभेद, त्यांचा इतिहास, आचार व व्यवहार या संबंधानें अलिकडे जो गैरसमज झालेला आहे तो दूर करण्याकडे चांगला होईल यांत शंका नाहीं. रा. टिल्लू यांचें पुस्तक हलींच्या संघटनेच्या काळांत उपयुक्त होईल. असो. कळावें लोभ असावा हे वि.

पुणें ता. २४ एप्रील १९२८

न. चिं. केळकर.

REFBK-0003674